म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.

REFBK-0005700

# गोड निबंध

( भाग पहिला )

THE IDEAL BOOK CO.
BILDAS ROAD.

REFBK-0005700

लेखक :

साने गुरुजी,
एम्. ए.

मराठी ग्रंथ संग्रहालय
५६००

किंमत ३ रुपये

प्रकाशक व व्यवस्थापक
**रा. ज. देशमुख,**
देशमुख आणि कंपनी
१९१ शनिवार पेठ, पुणें २

संचालक
**भ. व्यं. देशमुख,**
बी. ए., एलएल्. बी.

१ पुढील आवृत्तीचे सर्व हक्क मो. धों. पुसाळकर यांच्याकडे आहेत.
२ मुखपृष्ठावरील चित्र श्री. दीनानाथ दलाल यांचें आहे.
३ मुखपृष्ठावरील चित्राचे ब्लॉक बॉंबे प्रोसेस स्टुडिओंत केले आहेत.

एकमेव विक्रेते
**पंडित अनंत कुलकर्णी**
मु. पो. लोहारा, जि. उस्मानाबाद.

मुद्रक
**न. वि. सरदेशपांडे,**
आदर्श मुद्रणालय,
३९५/५ सदाशिव पेठ, पुणें २

# देशमुख आणि कंपनीचीं प्रकाशनें

## वि. स. खांडेकर

| | |
|---|---|
| फुलें आणि दगड | १॥। |
| घरट्याबाहेर | १॥। |
| पहिली लाट | ३ |
| स्त्री आणि पुरुष | २ |
| कालचीं स्वप्नें | २। |
| पहिलें प्रेम ( आ. दुसरी ) | ३ |
| क्रौंचवध ( ,, ) | ५ |
| पांढरे ढग ( ,, ) | ४। |
| दोन ध्रुव ( आ. तिसरी) | ५ |
| हिरवा चांफा ( ,, ) | ५ |
| जळलेला मोहोर | ३ |
| सहा भाषणें | २ |
| फुलें आणि कांटे | २। |
| सायंकाल (आ. २ री) | २॥ |
| अविनाश | १॥। |
| मंदाकिनी | १॥। |
| कलिका | २। |
| मृगजळांतील कळ्या | |

## ग. त्र्यं. माडखोलकर

| | |
|---|---|
| अवशेष | २ |
| माझी नभोवाणी | २ |
| व्यक्तिरेखा | २। |
| नागकन्या | २ |
| नवे संसार ( जप्त ) | ४ |
| चंदनवाडी | ६॥ |

## ना. धों. ताम्हणकर

| | |
|---|---|
| तात्या भाग १ ला | २॥ |
| तात्या भाग २ रा | ३ |
| निवाडे भाग १ ला | २॥ |
| निवाडे भाग २ रा | ४ |
| चकमकी | १॥ |
| बच्चा नवरा | १॥ |
| अनेक आशीर्वाद | ३॥ |
| दाजी भा. १ ला | ३॥ |

## चिं. वि. जोशी

| | |
|---|---|
| आणखी चिमणराव (आ.२री ) | ४ |
| नवें भारूड | २ |
| स्टेशनमास्तर | २ |

## साने गुरुजी

| | |
|---|---|
| पुनर्जन्म ( आ. दुसरी ) | ३ |
| आस्तिक ( ,, ) | ३ |
| सोन्यामारुति ! (आ. २ री) | २ |
| गोड निबंध ( भाग १ ) | ३ |

## दत्तु बांदेकर

| | |
|---|---|
| सख्याहरी ( आ. दुसरी ) | १॥ |
| नवी आघाडी | १॥ |
| तूं आणि मी | २। |

## प्र. के. अत्रे

| | |
|---|---|
| साखरपुडा | १॥ |
| ललितवाङ्मय | ३॥ |

## द. र. कवठेकर
अपुरा डाव ३
रेशमाच्या गांठी ३

## वा. म. जोशी
स्मृति–लहरी २
विचार–लहरी =।

## पु. य. देशपांडे
नवें जग ? २।

## भाई बेके
रॉयचरित्र १।

## प. ले. वि. स. खांडेकर
काव्यज्योति :

## आनंदीबाई जयवंत
पारंब्या :

## लक्ष्मणराव सरदेसाई
ढासळलेले बुरुज :

## प्रो. वि. ह. कुलकर्णी
व्यक्तिचित्रें २।

## ना. ह. आपटे
फसगत १।

## शकुंतला परांजपे
भिल्लिणीचीं बोरें ३

## कृष्णाबाई मोटे
मीनाक्षीचें जीवन २

## र. गो. सरदेसाई
चलतीं नाणीं २

## रा. श्री. जोग
सौंदर्यशोध आणि आनंदबोध ८

## ना. म. पटवर्धन
हितपत्रें ३
वा. म. जोशी यांचें चरित्र ‌—४।

## वि. वि. बोकील
बेबीची बहीण ३

## सत्याग्रही
ग्रह आणि तारे =॥

## अनंत काणेकर
धुक्यांतून लाल ताऱ्याकडे ३
पिकलीं पानें (दु. आ.) =॥

## काकासाहेब कालेलकर
ब्रह्मदेशचा प्रवास ॥

## य. दि. पेण्ढरकर
प्रापंचिक पत्रें ३
घायाळ २

## वि. म. भुस्कुटे
स्टॅलिन ॥

## कमलाबाई टिळक
आकाशगंगा ॥

## रामतनय
साखरगोटी

# अनुक्रम


| निबंध | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | निवेदन | ७ |
| २ | राष्ट्रीय सप्ताहाचा इतिहास व आपलें कर्तव्य | ११ |
| ३ | गुढी पाडवा | १४ |
| ४ | रामभक्तींचा अर्थ | १६ |
| ५ | शेतकऱ्यांची दुर्दशा | २० |
| ६ | कर्मवीर अण्णासाहेब कर्वे | २३ |
| ७ | राष्ट्रीय सप्ताह | २८ |
| ८ | हरिजनांची दुर्दशा | ३० |
| ९ | काँग्रेसला बळकट करा | ३१ |
| १० | हिंदु–मुसलमान ऐक्य | ३४ |
| ११ | आंधळे रे आंधळे | ३६ |
| १२ | पुण्याचा रक्तलांछित १ मे दिन | ३९ |
| १३ | यात्रा झाली, पण—– | ४० |
| १४ | काँग्रेसची दृष्टि | ४४ |
| १५ | खानदेशाची परीक्षा | ४७ |
| १६ | शेतकरी जागा झाला | ५० |
| १७ | दोन व्याख्यानें | ५३ |
| १८ | महाराष्ट्रा ऊठ ! | ५९ |
| १९ | खरा धर्म | ६२ |
| २० | मुख्य गोष्ट | ६५ |
| २१ | सेनापति | ६६ |
| २२ | गोड भक्ति | ६९ |
| २३ | बा शेतकऱ्या ऊठ ! | ७० |
| २४ | दिवाळी | ७४ |
| २५ | चार लाख गांधी टोप्या | ७८ |

२६ भविष्यदर्शन कीं सुखस्वप्न ... ... ८२
२७ अहिंसा ... ... ... ८६
२८ एकच उपाय ... ... ... ८९
२९ एकजूट ... ... ... ९२
३० कॉंग्रेसची कसोटी ... ... ... ९६
३१ मोठी दृष्टि ... ... ... ९८
३२ स्वातंत्र्य–दिन ... ... ... १०१
३३ मंत्र्यांचे चरणीं ... ... ... १०३
३४ कैदी ... ... ... १०६
३५ सुंदर मनुष्य आणि मडकें ... ... १०९
३६ त्रिपुरी म्हणजे जवाहरलाल ... ... ११६
३७ आरसपानी नर्मदा ... ... ... ११८
३८ देवा गणेशा ... ... ... १२२
३९ हरिजनांसंबंधीं प्रश्नोत्तरें ... ... ... १२५
४० राष्ट्रीय आठवडा ... ... ... १२९
४१ थोरांचें तरी ऐका ... ... ... १३२
४२ धर्म म्हणजे शब्द नव्हेत; अनुभव ... ... १३४
४३ वृक्षसंवर्धन ... ... ... १३७
४४ भारताचें भवितव्य ... ... ... १४०
४५ मंगल विवाह ... ... ... १४४
४६ राष्ट्रला कमीपणा नका आणूं ... ... १५०

५५०८

# निवेदन

१

राष्ट्रीय सप्ताहाचा आजचा पहिला दिवस. आज हिंदुस्थानभर प्रभातकाळीं सर्वत्र प्रभातफेऱ्या निघाल्या असतील. स्वातंत्र्याच्या गीतांनीं उगवणाऱ्या सूर्याचें स्वागत केलें असेल. आज हिंदुस्थानच्या वातावरणांत राष्ट्रप्रेम भरून राहिलें असेल. स्वातंत्र्याची उत्कटता तीव्रतेनें भासूं लागली असेल. आजचा स्फूर्ति देणारा दिवस आहे. अशा या पवित्र व तेजस्वी दिवशीं हें नवीन साप्ताहिक मी सुरू करीत आहें.

१९३१ सालीं गांधी–आयर्विन करारामुळें सुटल्यापासून खानदेशमध्यें एखादें साप्ताहिक चालवावें असें माझ्या मित्रांजवळ मी शतदां बोललों असेन. अनेक वेळां चर्चा होत. आमचे वादविवाद होत. परंतु प्रत्यक्ष सृष्टींत कांहींच येत नसे. मध्यंतरीं धुळें येथें निघणाऱ्या 'भारत' पत्रांत मी कधीं थोडें लिहीत असें. परंतु मी संपूर्णपणें स्वतंत्रच असणें श्रेयस्कर असें मला हळुहळू वाटूं लागलें. वर्तमानपत्र सुरू केलें पाहिजे ही भावना एखादे वेळेस माझ्या मनांत इतकी तीव्र होई कीं मी रात्रभर बसून साप्ताहिक लिहून काढीत असें व उषःकाळीं स्वतःच्याच हृदयाशीं तें धरून बसत असें!

संयुक्त खानदेशमध्यें गेला महिना कामगारांचा झगडा चालला आहे. परंतु या झगड्याची वाच्यता इतर वर्तमानपत्रांत फारशी दिसत नाहीं. पगार न घेतां हजारों कामगार पोट बांधून शांतपणें कामें करीत होते. परंतु त्याची दाद–फिर्याद फारशी कोठें आली नाहीं; कामगारांची बाजू तेजस्वीपणें कोणीं मांडली नाहीं. कॉंग्रेसची प्रतिष्ठा खानदेशांत धोक्यांत आहे असें रणशिंग कोणी फुंकलें नाहीं. ही वस्तुस्थिति पाहून मनांतल्या मनांत मी जळफळत होतों. त्या जळफळींतूनच हें 'कॉंग्रेस' साप्ताहिक बाहेर येत आहे.

प्रत्येक जिल्ह्याला राष्ट्रीय विचारांचें एक तरी साप्ताहिक आहेच आहे. हा पूर्व खानदेश जिल्हाच दुर्दैवी होता. सर्व जिल्ह्यांत हा जिल्हा मोठा. अकरा

तालुके व दोन पेटे एवढा ह्याचा विस्तार.' एवढ्या जिल्ह्याला एकहि सच्चें राष्ट्रीय पत्र नसावें ही दुःखाची गोष्ट होती. काँग्रेसला संपूर्णपणें वाढविणारें पत्र पूर्व खानदेशांत नाहीं याची प्रखर जाणिव मला कित्येक वर्षांपासून आहे. ही उणीव अंशतः भरून काढावी म्हणून मी आज नम्रपणें परंतु निश्चयानें उभा राहिलों आहें. हें पत्र मी एकदम सुरू करीत आहें. कोणाला विचारलें नाहीं, पुसलें नाहीं. कारण विचारपूस करूं लागेन तर आज सात वर्षें बसावें लागलें तसें आणखी दहा वर्षें स्वस्थ बसावें लागेल. आतां चर्चा न करितां अर्चा सुरू झाली पाहिजे असें मनांत आलें. माझ्या मनाच्या समाधानासाठीं मी आरंभ करण्याचें ठरविलें आणि हा अंक बाहेर पडत आहे.

मजजवळ पैसा अडका नाहीं. दुसरा अंक कसा निघेल याची मला विवंचना आहे. परंतु मी आरंभ करीत आहें. मी माझें हें पत्रक भिक्षेवर चालविणार आहें. जी तूट येत जाईल ती भिक्षेतून शक्य तों भरून काढावयाची. भिक्षेवर चालणारें हें पहिलें पत्र आहे. या पत्राला इतर कोणाचा न मिळाला तरी समर्थांचा तरी थोर आशीर्वाद मला मिळाल्याशिवाय राहणार नाहीं. मी व माझे मित्र निरनिराळ्या ठिकाणीं झोळ्या फिरवूं व हें पत्र चालवूं. भिक्षेकऱ्याचें पत्र मरत नसतें. कारण त्याला अनंत हातांचा नारायण देत असतो.

परंतु खानदेशांतील राष्ट्रप्रेम या 'काँग्रेस' पत्राला भिक्षा मागावयास लावणार नाहीं अशी मला श्रद्धा आहे. खानदेशांतील सहानुभूतीचे झरे या पत्राचें पोषण करतील. शेंकडों बालगोपाळ या पत्राचा आपलेपणानें सर्वत्र प्रचार करतील. खानदेशांत का माझे शंभर मित्र नाहींत कीं जे वीस वीस वर्गणीदार या पत्रकाला मिळवून देणार नाहींत? माझे मित्र म्हणजे काँग्रेसचे मित्र. माझ्या मैत्रीचा दुसरा अर्थ नाहीं.

राष्ट्रीय सप्ताहाच्या पहिल्या मंगल दिवशीं हा पहिला अंक जन्म घेत आहे. या एकाच गोष्टीवरून या पत्राचें धोरण कळून येईल. राष्ट्रीय सप्ताह म्हणजे काय? त्याचा इतिहास अन्यत्र दिला आहे. राष्ट्रीय सप्ताह म्हणजे पंजाबांतिल जालियनवाला बागेंतिल शेंकडों हुतात्म्यांचें स्मरण. राष्ट्रीय सप्ताह म्हणजे स्वातंत्र्यासाठीं सर्वस्व अर्पावें लागतें याची प्रखर आठवण. राष्ट्रीय सप्ताह म्हणजे स्वातंत्र्याच्या सर्व साधनांची पूजा व प्रचार. ज्या ज्या योगें

राष्ट्राचें बळ वाढेल त्या त्या सर्व गोष्टी करूं पाहणें म्हणजे राष्ट्रीय आठवडा. राष्ट्रीय सप्ताह म्हणजे त्याग, राष्ट्रीय सप्ताह म्हणजे खादी, राष्ट्रीय सप्ताह म्हणजे हिंदु–मुस्लीम ऐक्य, राष्ट्रीय सप्ताह म्हणजे हरिजन–सेवा; राष्ट्रीय सप्ताह म्हणजे दारुबंदी, राष्ट्रीय सप्ताह म्हणजे विचार–प्रसार; राष्ट्रीय सप्ताह म्हणजे निर्भयता, राष्ट्रीय सप्ताह म्हणजे जातिभेदांचा अंत; राष्ट्रीय सप्ताह म्हणजे खेड्यांची सेवा, कामगार किसानांची सेवा, राष्ट्रीय सप्ताह म्हणजे साक्षरता प्रसार, स्वच्छता प्रसार; राष्ट्रीय सप्ताह म्हणजे संघटना, स्वयंसेवक दलें वाढविणें, वानरसेना वाढविणें; राष्ट्रीय सप्ताह म्हणजे कॅांग्रेसचे लाखों सभासद करणें, झेंडा गांवोगांव फडकाविणें; राष्ट्रीय सप्ताह म्हणजे प्रभातफेऱ्या, पोवाडे, गाणीं यांची मंगल दंगल; थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे राष्ट्रांत उत्पन्न झालेल्या शेंकडों स्वातंत्र्यपोषक व स्वातंत्र्यसाधक अशा सेवासाधनांचा उत्कटपणें निरलस प्रचार व आचार. जें साप्ताहिक राष्ट्रीय सप्ताहाच्या आरंभीं निघत आहे तें राष्ट्रोद्धारकारक सर्व सेवासाधनांना सतत उचलून धरील; या सर्व गोष्टींचा सर्वत्र प्रचार व्हावा म्हणून धडपड करील.

या पत्रांत जी विशाल व व्यापक सहानुभूति आढळेल तशी क्वचितच आढळेल. लोक म्हणतात साने गुरुजी खादीधारी लोकांची संख्या वाढत नाहीं म्हणूनहि उपवास करतात, आणि कामगारांचा प्रश्न अजून कसा महाराष्ट्र उचलीत नाहीं म्हणूनहि अधीर होऊन उपवास करतात. उठल्या बसल्या उपवास करणें कदाचित् वेडेपणा असेल व अहंकार असेल. परंतु खादीलाहि प्रेमानें मिठी मारणारा व कामगारांतहि उत्कटपणें शिरणारा असा एक विचित्र प्राणी म्हणजे हे साने गुरुजी! अर्थात् त्यांचें पत्रहि असेंच असेल. या वर्तमानपत्रांत खादी दिसतांच ‘ क्रांति ’ पत्राचे संपादक कदाचित् हंसतील. तर या वर्तमानपत्रांत क्वचित् कोणाला साम्यवादाचा वास येऊन ते कपाळाला आंठ्या पाडतील. परंतु कोणी हंसो वा कोणी रागावो. आपल्या स्वतःच्या समाधानासाठीं हें पत्र आहे.

हें पत्र जातिभेदाचें भूत गाडूं पाहील, द्वेषाला शमवूं पाहील; अहिंसा प्रचारील, सद्धर्मांच्या कल्पना फैलावील; रूढींना जाळील, दंभ दुरावील, जीवनांत निर्मळपणा आणील, प्रेम आणील, कर्म आणील. खानदेशभर एक

प्रकारचें नवचैतन्य हें पत्र निर्माण करूं पाहील; निद्रितांना जागें करील व जागृतांस कामास लावील; जनतेचीं हृदयें कॉंग्रेस-प्रेमानें उचंबळून सोडील व कॉंग्रेसच्या भक्तीनें रंगलेले जीव ठायींठायीं असंख्य आहेत, त्यांना जोडील.

हें पत्र कोणाचें मिंधें नाहीं. कोणाचें बंदें नाहीं. या पत्राचें एकच दैवत म्हणजे कॉंग्रेस संस्था. कॉंग्रेस संस्थेचा निर्मळ आत्मा जनतेला दाखवून त्या निर्मळ आत्म्याचे उपासक व्हा असें हें पत्र आग्रहानें व प्रेमानें सर्वांना सांगेल. कॉंग्रेसचें मला जें स्वरूप दिसतें, जें आवडतें, तेंच मी दाखविणार. कॉंग्रेसच्या ज्या स्वरूपाची मी पूजा करतों, त्याच स्वरूपाची इतरांस करावयास लावणार. मी या पत्राला नांवच 'कॉंग्रेस' ठेविलें आहे. कारण कॉंग्रेसशिवाय मला अस्तित्व नाहीं. भगवान् नानक म्हणत 'देवा तुझें नाम मला श्वासोच्छ्वासाप्रमाणें होऊं दे.' कॉंग्रेसचें नांव म्हणजे माझा श्वासोच्छ्वास. कॉंग्रेसचें काम माझ्या हातून न झालें तरी मी तिचा जप करीत असतों. खानदेशांत कॉंग्रेसचे एक लाख सभासद होवोत, पांच हजार स्वयंसेवक होवोत, पन्नास हजार खादीधारी होवोत, अशीं स्वप्नें मीं रंगवीत असतों. या माझ्या वृत्तीमुळें मी 'कॉंग्रेस' असें नांव माझ्या पत्राला दिलें आहे. साने गुरुजी व कॉंग्रेस हा संबंध अभेद्य आहे.

या पत्राच्या कॉंग्रेस नांवामुळें खानदेशांत कॉंग्रेसचा जयजयकार होण्यास मदत होईल. विकणारा 'कॉंग्रेस, कॉंग्रेस' म्हणून पुकारील आणि घेणारा 'कॉंग्रेस, कॉंग्रेस' अशी हांक मारील. कॉंग्रेस कॉंग्रेस असें सर्वत्र व्हावें अशी मला तहान आहे. ही तहान तृप्त करण्याचें लहान साधन म्हणून हें पत्र मी सुरू करीत आहें. कोणाला हें नांव आवडणार नाहीं, कोणाला यांतील विचार क्वचित् आवडणार नाहींत; कोणाला यांत वेडेपणा वाटेल, कोणाला अहंकार दिसेल. कवि रवींद्रनाथ म्हणतात—

'तुझी हांक ऐकून कोणी येवो वा न येवो. तूं एकटा जा. तुझ्या हातांतील दिवा टीकेच्या वाऱ्यानें विझेल. श्रद्धेनें पुन्हां पेटवून एकटा जा.'

हे रवींद्रनाथांचे शब्द ध्यानांत धरून हें पत्र मी सुरू करीत आहें. या पत्रद्वारां कॉंग्रेसची संघटना, कॉंग्रेसचें सामर्थ्य, कॉंग्रेसची शोभा, कॉंग्रेसचें वैभव वाढो, वाढण्यास मदत होवो, एवढीच माझी इच्छा आहे.

वंदे मातरम्! वंदे भ्रातरम्! —६ एप्रिल, १९३८.

# राष्ट्रीय सप्ताहाचा इतिहास व आपलें कर्तव्य २

सहा एप्रिलपासून तेरा एप्रिलपर्यंत दरवर्षी राष्ट्रीय सप्ताह पाळण्यांत येतो. या सात दिवसांचें काय महत्त्व ? आपण या सात दिवसांचा इतिहास कधींहि विसरतां कामा नये. हे अमर दिवस आहेत. १९१४ पासून १९१८ पर्यंत युरोपखंडांत महायुद्ध सुरू होतें. या महायुद्धाची संधि साधून हिंदुस्थान स्वतंत्र करावा असे विचार कांहीं क्रांतिकारकांच्या मनांत होते. पंजाब, बंगाल वगैरे प्रांतांत क्रांतिकारकांचीं जाळीं पसरलीं होतीं. कॅनडा, अमेरिकेंतून कांहीं क्रांतिकारक देशांत त्या वेळेस आले होते. गदर चळवळ हिंदुस्थानांत व्हावयाची होती. परंतु गदर चळवळीचे पुढारी पकडले गेले. कांहीं फांशी गेले; कांहीं काळ्या पाण्यावर गेले. आपल्या महाराष्ट्रांतलि दामोदर पिंगळे हा अत्यंत तेजस्वी तरुण त्या गदर चळवळींतच फांशी गेला. बंगालमध्यें शेंकडों तरुण ठिकठिकाणीं डांबून ठेवण्यांत आले. या तरुणांची चौकशी करण्यांत येईना. शेवटीं या तरुणांची चौकशी करण्यासाठीं सरकारनें एक कमिटी नेमिली. या कमिटीचे रौलेट साहेब अध्यक्ष होते. रौलेट साहेबांनीं शेवटीं रिपोर्ट लिहिला. क्रांतिकारकांची चळवळ दडपून टाकण्यासाठीं त्यांनीं कांहीं उपाय सुचाविले.

महायुद्ध आतां समाप्त झालें. महायुद्धांत सरकारनें हिंदी जनतेला किती तरी अभिवचनें दिलीं होतीं. परंतु युद्ध संपतांच हिंदुस्थानच्या उरांत सुरी भोंसकण्यासाठीं सरकार उभें राहिलें. रौलेट ॲक्ट नांवाचा एक कायदा १९१९ च्या फेब्रुवारी महिन्यांत वरिष्ठ कायदे कौन्सिलांत मांडला गेला. मार्च महिन्यांत हा कायदा दिल्लीला पास झाला. त्या वेळेस महात्मा गांधी साबरमती तरिावर आश्रमांत तपस्या करीत होते. १९१५ मध्यें आफ्रिकेंतलि सत्याग्रहाचा दिव्य झगडा यशस्वी करून ते मायभूमीस परत आले होते. चंपारण्यांत व खेडा जिल्ह्यांत शेतकऱ्यांवर होणाऱ्या जुलमाविरुद्ध त्यांनीं सत्याग्रह करून यश मिळविलें होतें. अहमदाबाद येथें कामगारांचा झगडा हातांत घेऊन तोहि सत्याग्रही पद्धतीनें त्यांनीं यशस्वी केला होता. हिंदुस्थानां-

तहि सत्याग्रहाचे प्रयोग महात्माजींनीं असे केले. आतां राष्ट्रव्यापक सत्याग्रह सुरू करावयाचा होता.

मार्च महिन्यांत रौलेट कायदा पास होतांच साबरमतीचा महात्मा उभा राहिला. रौलेट ॲक्ट नागरिक—स्वातंत्र्य संपूर्णपणें हिरावून घेणारा आहे. हा कायदा म्हणजे माणुसकीला काळिमा आहे; न्यायाची थट्टा आहे, असें महात्माजींनीं जाहीर केलें. संशयावरून वाटेल त्या ठिकाणीं डांबून ठेवण्याचा अधिकार या कायद्यानें सरकारला दिला होता. पकडण्याचा अधिकार सर्वसाधारण पोलिसास देण्यांत आला होता. संशय येतांच पकडावें, डांबून ठेवावें. चौकशी होवो वा न होवो. खटला चाललाच तर त्यावर अपील नाहीं. निकाल शेवटचाच. अशा प्रकारचा हा कायदा होता.

हा कायदा नाहींसा करण्यासाठीं मला सत्याग्रहाची चळवळ सुरू करावी लागेल असें महात्माजींनीं जाहीर केलें. हिंदुस्थानांत नवीन तेज आलें. उपवास, प्रार्थना व हरताळ यांनीं सत्याग्रहास आरंभ व्हावयाचा होता. प्रथम ३० मार्च १९१९ हा दिवस जाहीर करण्यांत आला. परंतु मागून सहा एप्रिल हा दिवस निश्चित करण्यांत आला. दिल्ली वगैरे ठिकाणीं हा झालेला बदल कळला नाहीं. तेथें ३० मार्च रोजींच सभा झाल्या. दिल्लीला गोळीबार झाला. स्वामी श्रद्धानंद यांच्यावर पिस्तुल रोखण्यांत आलें. त्यांनीं पिस्तुलासमोर छाती उघडी ठेवून "चलाव तेरी गोळी" असें सांगितलें. पुढें सहा एप्रिलला सर्व हिंदुस्थानभर उपवास, हरताळ, प्रार्थना, सभा असा कार्यक्रम झाला. सहा एप्रिल १९१९ म्हणजे नवयुगाचा आरंभ होता. सत्याग्रहाचा सूर्य सर्व हिंदुस्थानभर त्या दिवशीं तळपला. ते दिवस रोमांचकारी होते. हिंदु-मुसलमानांत पराकाष्ठेचा बंधुभाव उत्पन्न झाला होता. मुसलमानी पाणी हिंदु प्यायले, हिंदू पाणी मुसलमान प्यायले. मशिदींतून श्रद्धानंदांनीं व्याख्यानें दिलीं. गोळीबारांत मेलेल्या हिंदूंना मुसलमानांनीं खांदे दिले तर मुसलमानांच्या कबरस्थानांत हिंदु पोंचवावयास गेले. हिंदु-मुसलमानांचें तें दिव्य प्रेम आपण विसरतां कामा नये. सहा एप्रिल येतांच त्याची आठवण झाली पाहिजे. सहा एप्रिल दिवसाला प्रारंभ झाला. आम्ही उपवास केला, सरकारनें गोळीबार केला. या गोळीबाराची पराकाष्ठा तेरा तारखेस झाली. तेरा तारखेस अमृतसर येथें जालियनवाला बागेंत वीस

हजार लोकांची प्रचंड सभा भरली होती. वर्षप्रतिपदेचा तो दिवस होता. पंजाबांत सत्याग्रह पेटत चालला होता. कारण, महायुद्धाच्या काळांत रिक्रूट भरती करतांना पंजाबांत भयंकर अत्याचार झाले होते. पंजाबी सिंह ब्रिटिश सरकारच्या पंजाखालीं चिरडण्यांत आला होता. सत्याग्रहाचें नवीन साधन येतांच पंजाबी जनता उठून उभी राहूं लागली. पंजाबचे गव्हर्नर ओड्-वायर यांना जागृत पंजाब सहन होईना. पंजाबला चिरडून टाकण्याचा त्यांनीं निश्चय केला. ही पेटती ज्योत दडपून टाकण्याचें त्यांनीं ठरविलें. जालियनवाला बागेंतील वीस हजार लोकांवर सोळाशें गोळ्या झाडण्यांत आल्या. गोळ्या संपल्या, नाहीं तर सोळा हजारहि सोडण्यांत आल्या असत्या. स्त्री-पुरुष-मुलें यांच्या प्रेतांचे खच पडले. तेरा एप्रिल रक्तानें रंगला. गुढी पाडव्याचा तो दिवस भारत मातेच्या मुलांच्या रक्तानें रंगला. निष्पाप बलिदान झालें. त्यानंतर पंजाबभर लष्करी कायदा पुकारण्यांत आला. भराभर अमानुष शिक्षा झाल्या. रस्त्यांतून फटके मारले गेले. उन्हांतून मुलांना मैल मैल फिरविण्यांत आलें. जमिनीवरून सरपटत जाण्याचे हुकूम सोडण्यांत आले.

सरकारनें पुढें चौकशी कमिटी नेमली तिनें सर्व कृत्यांवर बोळा फिर-विला. सोळाशें गोळ्या घालणाऱ्यास इंग्लंडमधील जनतेनें फंड उभारून देणग्या दिल्या! कॉंग्रेसनें स्वतंत्र चौकशी कमिटी नेमली. या कमिटीचा रिपोर्ट पुढें जप्त करण्यांत आला. या कॉंग्रेस कमिटीच्या रिपोर्टावर शेवट-च्या सह्या मला वाटतें काशी किंवा अलाहाबाद येथें गंगेच्या तीरावर कर-ण्यांत आल्या. आणि राष्ट्राचा अपमान धुवून निघेपर्यंत स्वस्थ रहावयाचें नाहीं अशा प्रतिज्ञा पुढाऱ्यांनीं घेतल्या. सत्याग्रहाचा संग्राम स्वराज्य मिळे-पर्यंत निरनिराळ्या स्वरूपांत सुरू ठेवावयाचा अशी ती घोषणा होती.

असा हा राष्ट्रीय सप्ताहाचा इतिहास आहे. या इतिहासाचें स्मरण करा. राष्ट्राचा अपमान आठवा. राष्ट्राचें बलिदान आठवा. स्वातंत्र्यासाठीं शक्य तें सारें करावयास उभे रहा. या सप्ताहांत निरनिराळे निश्चय करा. मी मरेपर्यंत खादी वापरीन, मी दरवर्षीं कॉंग्रेसचा सभासद होईन. मी नेहमीं कॉंग्रेसलाच मत देईन, मी स्वदेशीचा उपासक होईन, मी हिंदु-मुसलमान

ऐक्याचा पुरस्कार करीन, मी हरिजनांना छातीशीं लावीन, मी जातिभेदांस मूठमाती देईन, असे संकल्प मनांत करा.

तालुका कॉंग्रेस कमिट्यांनीं या सात दिवसांत कार्यक्रम करावे. ता. कॉं. कमिटींतील प्रत्येक सभासदानें दोनशें सभासद या सात दिवसांत नोंदविण्याचा ठराव करावा. तसेंच रोज प्रभात फेरी काढावी, खादी विकावी; गांव स्वच्छ करावा; झेंडावंदन करावें. अशा रीतीनें हे सात दिवस राष्ट्रीय जागृतींत जाऊं देत. हा सप्ताह नीट साजरा होऊं दे.

—६ एप्रिल, १९३८.

## गुढीपाडवा ३

आपण गेल्या शुक्रवारीं गुढीपाडवा साजरा केला. घरोघर गुढ्या उभारल्या गेल्या. हा गुढीपाडवा आपण साजरा कां करतों ? ह्याचा इतिहास आहे. आपल्या महाराष्ट्रावर जवळजवळ दोन हजार वर्षांपूर्वी परचक्र आलें होतें. त्या वेळेस महाराष्ट्रांत शालिवाहन राजा होता. पश्चिमेकडून शक नांवाचे शत्रु महाराष्ट्राला त्रास देत होते. त्या वेळची दंतकथा अशी आहे कीं, शालिवाहन राजानें कुंभाराच्या मडक्यांचे घोडेस्वार बनविले व शत्रूचा पराजय केला. हा जो मोठा विजय शालिवाहन राजानें मिळविला, त्याची खूण म्हणून महाराष्ट्रभर त्या दिवशीं गुढ्या उभारतात. शालिवाहन राजानें आपल्या नांवाचा शक सुरू केला आणि तो शकारंभ आपण विजयध्वज उभारून साजरा करितों.

शालिवाहन राजानें मातीच्या मडक्याचे घोडेस्वार केले, यांत मोठा अर्थ आहे. महाराष्ट्रांतील लोक मातीच्या ढिपळाप्रमाणें पडलेले होते. त्यांच्यांत राम नव्हता; तेज नव्हतें. परंतु मातीसारख्या पडलेल्या या लोकांत शालिवाहन राजानें नवप्राण ओतला. जीं मढीं होतीं, तीं चैतन्याचीं तेजस्वी रूपें बनलीं. पडलेले उठले. नेभळे झुंजार झाले. महाराष्ट्राचा विजय झाला.

गुढी कोणी उभारावी ? जो मातीसारखा पडलेला नाहीं त्यानें. गुढी

'उभारणें म्हणजे मान उंच करणें. माझी मान कोणी खालीं दडपणार नाहीं असा आत्मविश्वास असणें म्हणजे गुढी उभारणें. खेड्यापाड्यांतून शहराशहरांतून महाराष्ट्रांत आज गुढी उभारली जाईल. परंतु हृदयांत निर्भयपणा आहे का ? जर अद्याप खेड्यांतून भीति असेल तर गुढी उभारून काय फायदा ? राष्ट्रीय झेंडा घरोघर निर्भयपणें लावतां येत नसेल, गांवांत राष्ट्रीय झेंडा उभारतां येत नसेल तर या गुढीपाडव्यांना काय किंमत ?

कांग्रेसचें मुख्य कार्य म्हणजे निर्भयता निर्माण करणें हें आहे. परवां अमळनेर तालुक्यांतील एक गोष्ट कानांवर आली. तुम्हीं लोक कांग्रेसचा झेंडा लावतां, हरिपुऱ्याला जातां, वगैरेबद्दल नापसंति कोण्या मोठ्या अधिकाऱ्यानें प्रगट केली व लोकांना दरडावलें. ही गोष्ट जर खरी असेल तर गुढीपाडवा साजरा करण्यांत काय अर्थ ? अमळनेर जवळ मारवड गांव आहे. हा मोठा गांव आहे. येथें दोन अडीचशें कांग्रेसचे सभासद होतात. येथें मोठी शेतकरी परिषद भरली. येथें स्वयंसेवक दलाचा कॅम्प उघडला गेला. येथें वर्तमानपत्रें जातात. नेहमीं सभा होतात. अशा एखाद्या मोठ्या गांवीं जर एखाद्या मोठ्या अधिकाऱ्यानें रागानें कांहीं समजा सांगितलें तर का लोकांनीं नेभळटपणानें ऐकून घ्यावयाचें ? कांग्रेससारख्या महान् संस्थेवर कोणी आग पाखडली तर का निमूटपणें बघावयाचें ? निर्भयपणें व शांतपणें उत्तर दिलें पाहिजे कीं " साहेब, कांग्रेसचा झेंडा आम्हीं मिरवणार, हरिपुऱ्याला जाणार. ते दरडावण्याचे दिवस आतां गेले. आतां आम्हीं मेंढरें राहिलों नसून माणसें होत आहोंत." परंतु असें उत्तर न देतां मारवड गांवासारख्या भरण्याच्या गांवच्या लोकांनीं उगीच चरफडत बसणें हें योग्य नाहीं. सह्यांचें पत्रक काढून जर असें कोणी अधिकारी बोलला असेल तर त्याचा निषेध केला पाहिजे. आज निर्भयता पाहिजे. मंत्री मुरारजीभाई खान्देशांत दीड महिन्यापूर्वीं आले होते. त्यांनीं सर्व सभांतून हेंच सांगितलें. " निर्भय व्हा. अन्याय होत असतील ते निर्भयपणें बोला. पुरावे द्या. भिऊं नका. असें न कराल तर आम्हांस कांहींही करतां येणार नाहीं." हा संदेश मंत्री मुरारजीभाई ह्यांनीं दिला. जळगांव तालुक्यांतील भादली गांवचे पाटील त्रास देतात. त्याची चौकशी करावयास फौजदार जातात, तर लोक गप्प बसतात. पारोळें तालुक्यांतील जंगलांच्या कांहीं तक्रारी

कॉँग्रेसकडे येतात. तर पोलिसांना उलट साक्षहि तेच लोक देतात. अशा भित्रे-पणानें काम कसें होणार ? आपण भीति सोडणार नाहीं तर गुलाम राहण्या-सच आपण लायक ठरूं. लायकीप्रमाणें सरकार मिळत असतें. आपण भ्याडाप्रमाणें वागूं तर इंग्रजांच्या जोखडाखालीं राहावयांसच आपण लायक ठरूं.

निर्भय बना. स्वराज्य मिळवावयाचें आहे. आज कॉँग्रेसमंत्रिमंडळाचें छत्र डोक्यावर आहे. आज भय कां धरावें ? दीडशें वर्षांत भय रोमरोमांत भिनलें आहे. भीतीची संवय आपणांस सोडावयाची आहे. एवढ्यासाठीं मंत्रिमंडळ आहे. मंत्रिमंडळ सांगतें 'भय सोडा' तुम्ही जर तें सोडणार नाहीं तर मग काय मिळालें ? निर्भयपणा ही मंत्रिमंडळाची सर्वांत थोर देणगी तुम्हांला मिळत आहे. मान वर करा. अन्याय प्रकट करा. कॉँग्रेसची संघटना वाढवा. झेंडा नाचवा. असें करीत गेलेत तरच गुढी-पाडवा साजरा होणार ? नाहीं तर त्या गुढ्यांत राम काय ? गुढ्यांत भित्रे-पणानें मान घालून बसणाऱ्यांसाठीं गुढीपाडवा नाहीं.

—६ एप्रिल, १९३८.

## रामभक्तीचा अर्थ ४

शुक्रवारीं रामनवमी झाली. सर्व हिंदुस्थानभर त्या दिवशीं रामनामाचा जयजयकार झाला. गांवोगांवीं, शहरोशहरीं रामजन्म साजरे करण्यांत आले. रामा हो, रामा हो, या निनादांनीं आकाश दुमदुमून गेलें. राम-नवमी झाली. परंतु रामनवमीचा अर्थ कळला का ? रामनवमी आपण कां पाळतों ? रामाची जयंति कां साजरी करतों ? त्यांतलि रहस्य काय, हेतु काय ?

रामाला आपण अवतार मानतों. अवतार म्हणजे काय ? अवतार म्हणजे खालीं उतरणें. जो स्वतःचे सुख-भोग सोडून, स्वतःचे माड्या-महाल सोडून, स्वतःचें सारें वैभव सोडून, स्वतःचा अहंकार व श्रेष्ठपणा

सोडून, बहुजन समाजांत मिसळण्यासाठीं खालीं येतो, तो अवतार. श्रीरामचंद्रांनीं राज्य सोडलें. वरचा हिंदुस्थान सोडला. वैभव सोडून दडपलेल्या वानरांसाठीं ते धांवून आले. रामचंद्र वरून खालीं आले. रावणाची सुलतानशाही धुळींत मिळविण्यासाठीं खालीं उतरले. रावणाच्या कैदखान्यांत कोट्यवधी लोक गुलाम होऊन पडले होते. त्यांना मुक्त करण्यासाठीं राम धांवला. राम अवतारी पुरुष कां ? राम पददलितांची बाजू घ्यावयास आपलें सारें वैभव सोडून आला म्हणून. त्यानें तुच्छ वानरांना प्रेमानें छातीशीं लावून, त्यांच्यांतील दिव्यता प्रकट करण्यास अवसर दिला म्हणून. जी जी व्यक्ति आपलें महोच्चस्थान सोडून दीन-दुबळ्यांसाठीं उभी राहाते, तिला अवतार म्हणतात.

भगवान् बुद्धांनीं स्वतःचें समृद्ध राज्य सोडलें; जनतेंतील भ्रामक धर्म जावेत म्हणून त्यांनीं सारें, जीवन दिलें. पंडितांची संस्कृत भाषा टाकून लोकांच्या भाषेंत ते बोलूं लागले. महायागादिकांचे धर्म फेंकून परस्परांवर प्रेम करा, एकमेकांस साहाय्य करा, असें त्यांनीं सांगितलें. सर्व खालच्या समाजांत ते उतरले व त्यांना वर नेण्यासाठीं झटले. म्हणून बुद्धांना आपण अवतार मानतों.

कृष्णाला अवतार कां मानतों ? नंद राजाचा मुलगा असूनहि हातीं काठी व खांद्यावर कांबळा घेऊन तो गायी चारावयास जाई. सर्व गुराख्यांत मिसळे. त्यांच्या बरोबर खेळे, खाई पिई. श्रीकृष्णांना कोणतेंहि कर्म कमी वाटत नसे. स्त्रियांचें शेण लावण्याचें काम करावयास कृष्ण तयार, अर्जुनाचा रथ हांकावयास तयार; घोड्यांचा खरारा करावयास तयार ! ज्यांना ज्यांना वरचे वर्ग तुच्छ मानतात, त्या सर्व श्रमजीवी स्त्रीपुरुषांची बाजू घेऊन कृष्ण उभा राही. आपला खोटा मोठेपणा सोडून बहुजनसमाजांत तो मिसळला, म्हणून तो अवतार.

गंगेला आकाशांत राहण्यास मौज वाटत नव्हती. येथें सूर्य चन्द्र तारे होते. परंतु खालीं पृथ्वीवर ओसाड प्रदेश पाहून, लोक भुकेले पाहून ती गंगा आकाशांतून खालीं उतरली. भगीरथानें प्रार्थना केली " हे गंगे, तेथें आकाशांत राहून काय करतेस ? येथें लाखों शेतकरी शेती पिकत नाहीं, पाणी मिळत नाहीं, म्हणून तडफडत आहेत, तुला वर वैभवांत राहवतें कसें ?

आपलें वैभव घेऊन खालीं ये. तुझ्या वैभवाचा पूर किसानांचीं शेतें समृद्ध करण्यांत खर्च होऊं दे." गंगामाईनें ऐकलें. ती आकाशांतून खालीं आली. गंगेचा अवतार झाला.

अवतार या शब्दांतील महान् अर्थ आपल्या कधींच ध्यानांत येत नाहीं. आपण अवतारांचे उत्सव करतों. परंतु त्या अवतारी व्यक्ति, त्या महान् व्यक्ति बहुजनसमाजासाठीं, तिरस्कृतांसाठीं, पददलितांसाठीं, दीनदुबळ्यांसाठीं उभ्या राहिल्या हें आपण विसरतों. शिवाजी महाराजांचा अवतार म्हणून त्यांची जयंति साजरी करूं. परंतु शिवाजी महाराज सर्व इनामदार जहागिरदारांस दूर करून मावळ्यांसाठीं, शेतकऱ्यांसाठीं मरावयास उभे होते हें आपण विसरूं. 'प्रजेनें लावलेल्या झाडास हात लावूं नका.' असें आज्ञापत्र काढणाऱ्या श्रीशिवाजी महाराजांच्या चरित्रांतील अर्थ किती संस्थानिकांना, राजे महाराजांना, सरदार दरकदारांना, सावकार कारखानदारांना कळतो ? छत्रपतींचे उत्सव सारे करितात व गरिबांना छळतात. रामाची जयंति करितात आणि बहुजनसमाजाला तुच्छ मानतात. कृष्णजयंति करितात आणि शेतकऱ्यांना कुणबट्टे म्हणतात. अवतारांचा अर्थ कोणालाहि कळत नाहीं.

रामनवमी साजरी करणारे हरिजनांना हृदयाशीं धरावयास तयार आहेत का ? नाशिक येथें राममंदिरांत त्यांना येऊं दिलें का ? अंमळनेरच्या वाडींत हरिजनांना येऊं दिलें का ? पुण्याच्या तुळशीबागेंत हरिजनांना प्रेमानें येऊं दिलें का ? हरिजनांना सर्वत्र बंदी. आणि रामनवमी साजरी करितात ! रामाला वानर प्रिय होते. माणसें तरी आहेत कीं नाहीं अशी ज्यांची दुर्दशा वरिष्ठ वर्गांनीं केली होती, त्यांचे अश्रू पुसावयास राम उभा होता. रामाला शेट सावकार प्रिय नव्हते; भटभिक्षुक, शास्त्रीपंडित प्रिय नव्हते. त्या सर्वांना सोडून तो भिल्लांची भेट घ्यावयास आला. तो कोळ्यांना कुरवाळावयास आला. तो वानरांना वंदावयास आला. आणि राम अयोध्येंत गेला तेव्हां वानरांनीं वेष्टित असा गेला. रामाच्या भोंवतीं वानर आहेत असें पाहून वसिष्ठ ऋषि पळाले नाहींत. रामाला प्रायश्चित्त देण्यासाठीं त्यांनीं गोमूत्र भरून आणलें नाहीं. रामावर कोणी बहिष्कार घातला नाहीं. सर्व पददलितांची मान उंच करून, त्यांना विमानांत स्वतः बरोबर घेऊन राम अयोध्येंत आला. त्या रामाची जयंति आज हिंदुस्थानांत कशी होत आहे ?

जोंपर्यंत पददलितांना तुम्हीं जवळ करीत नाहीं, तोंपर्यंत रामजन्म तुम्हांला कळला नाहीं. जोंपर्यंत हरिजनांना जवळ करीत नाहीं, त्यांना पाणी भरूं देत नाहीं, त्यांना घरींदारीं येऊं देत नाहीं, त्यांच्यांत बंधु-भावानें जात नाहीं, त्यांना मंदिरांत येऊं देत नाहीं, तोंपर्यंत या भारतांत रामजन्म होणें शक्य नाहीं. तोंपर्यंत या भारतांत रावणांचेच जन्म होणार.

जोंपर्यंत शेतकऱ्याचें दुःख दूर व्हावें, त्याला पोटभर धान्य उरावें, रहावयाला लहानसें घर असावें, असें आम्हांस वाटत नाहीं तोंपर्यंत राम-जन्म आम्हांस कळला नाहीं.

जोंपर्यंत कामगारांची कष्टदशा पाहून आम्हीं कळवळून उठत नाहीं, त्यांना माणसांसारखें वागवलें जात नाहीं, हें पाहून आम्हीं पेटत नाहीं, त्यांना उंदीरघुशींप्रमाणें लहान बिळांत रहावें लागतें हें पाहून संतापत नाहीं, तोंपर्यंत रामजन्म आम्हांला कळला असें वाटत नाहीं.

भारतांतलि स्त्रीपुरुषांनो ! रामजन्म खरोखरच पाहिजे असेल तर हरि-जनांचें प्रेम येऊं दे. सध्यां प्रखर उन्हाळा आहे. गांवोगांव हरिजन बंधूंना नीट पाणीहि मिळत नाहीं. अरे रामाच्या भक्तांनो ! कसें हें तुम्हांला पाहवतें ? अमळनेर तालुक्यांतलि अमळगांवचे कांहीं तरुण मित्र माझ्या-कडे आले व म्हणाले ‘ गुरुजी ! आमचे गांवाला हरिजनांना नीट पाणी मिळत नाहीं. आम्हीं आमच्या आडांवर भरूं दिलें तर गांवांतील लोक ओरडतील. काय करावें ? ’ मी त्यांना सांगितलें, ‘ तुम्हांला हृदय असेल तर हरिजनांना पाणी भरूं द्या. पुकारूं दे गांवकऱ्यांना बहिष्कार. अतः-पर तरुणांनीं तरी रूढिधर्म जाळावयास व माणुसकीची पूजा करावयास उभें राहिलें पाहिजे. ’

खेड्यांपाड्यांतलि मित्रांनो ! अरे तुम्ही रामाचे व कृष्णाचे ना भक्त ? मग अशी कसाबकरणी कशी करतां ? रामाचा खरा भक्त आपलें घर, आपली विहीर, आपलें मंदिर, आपलें हृदय सर्वांसाठीं मोकळें करील. त्यानेंच देशांत व स्वतःच्या हृदयांत राम आणला. बाकीच्यांनीं रामाचा वध केला; समाजाचा व देशाचा रामबोलो केला !

सर्व उदार मनाच्या तरुणांनो ! तुम्ही खरे रामभक्त बना. हरिजनांसाठीं उठा. त्यांना भेटा. त्यांना पाणी द्या. तें रामाला पाणी दिल्यासारखें

होईल. तडफडणारा राम जिवंत होईल. आणि भारतांत राम जिवंत झाला म्हणजे रावणांचा अंत झाल्याशिवाय कसा राहील?

—११ एप्रिल, १९३८.

## शेतकऱ्यांची दुर्दशा ९

हिंदुस्थानांतील शेतकरी ठार होण्याची वेळ आली. पूर्वीं कधींहि घसरले नव्हते अशा प्रमाणांत सारे भाव घसरत आहेत. नाशिकला आणा सव्वा आणा शेर द्राक्षें मिळत आहेत. द्राक्षें पिकविणाऱ्यांना काय उरणार, काय मिळणार? रोज भावाचे आंकडे पाहावे तर घसरगुंडी दिसत आहे.

वर्ध्याच्या आश्रमाचे आचार्य पूज्य विनोबाजी भावे यांची एक गोष्ट नुकतीच ऐकली. आश्रमांतील स्वयंसेवक नित्याप्रमाणें वर्ध्याच्या बाजारांत भाजी आणण्यासाठीं गेला. दिडकीला कोथिंबिरीच्या बारा जुड्या तो घेऊन आला! विनोबाजींच्या कानावर ती गोष्ट गेली. त्यांचें हृदय पेटलें. ते म्हणाले, "त्या बाईनें बारा जुड्या दिल्या, परंतु तुमच्यानें घेववल्या कशा? उद्यांपासून भाजी आणावयास मी स्वतः जात जाईन." दुसऱ्या दिवशीं स्वतः विनोबाजी टोपली घेऊन भाजीबाजार करावयास गेले. त्यांनीं दिडकीला चारच जुड्या आणल्या. ते भाजीवालीस म्हणाले, "तुला बारा जुड्या कशा देववतील? मी चारच नेतों."

वर्ध्याचे विनोबाजी असे एक वागतील. परंतु तेवढ्यानें भारताचा प्रश्न सुटावयाचा कसा? स्वस्त मिळत असतां महाग कोण घेणार? सर्व शेतकऱ्यानें निर्माण केलेल्या वस्तू मात्र स्वस्त! आणि त्याला देणें मात्र पूर्वींच्या भावांत. शेतकऱ्याचे तहशील एका पैनेंहि कमी झाले नाहींत. सरकारानें वीस वर्षांपूर्वीं धान्याचे भाव भरमसाट वाढले होते तेव्हां सारावाढ केली. ती सारावाढ आज सारे भाव कित्येक वर्षांपासून घसरले असतांहि सरकार कमी करीत नाहीं म्हणून आम्हीं ओरडत होतों. परंतु ही ओरड कोण ऐकतो?

कांग्रेसच्या मंत्रिमंडळासहि ही गोष्ट अजून शक्य करतां आली नाहीं. बाकी इतर शेंकडों गोष्टींच्या आधीं सारावाढ ताबडतोब कमी करण्यांत आली पाहिजे होती, असें आमचें मत आहे. महाराष्ट्रांत शेंकडो ठिकाणीं भरलेल्या शेतकऱ्यांच्या सभांतून असे ठराव झाले. परंतु ते ठराव हवेंत नाहींसे झाले. जिल्हा कांग्रेस कमिट्या, प्रांतिक कांग्रेस कमिटी, यांनीं या प्रश्नाचा सारखा पिच्छा पुरविला पाहिजे होता. शेतकऱ्यांची फार विपन्न दशा आहे. थोडीशी सारावाढ कमी केल्यानें शेतकऱ्याचे प्रश्न थोडेच सुटणार आहेत, असें म्हणून तो काडीचाहि आधार त्या बुडणाऱ्यास न देणें म्हणजे असह्य कठोरता आहे.

अमळनेर तालुक्यांतील मारवड गांवीं कांहीं दिवसांपूर्वीं प्रांतसाहेब आले होते. त्यांनीं मारवड गांवच्या पाटलांना म्हणे तंबी दिली. तहशील वसूल होत नाहीं तर तुम्हांला सस्पेंड करतों असें म्हणाले. गरीब बिचारे पाटील! ते का आपल्या गांवच्या शेतकऱ्यांना दरडावणार, छळणार? परवां कलेक्टर साहेब आले व ते जरा सौम्यतेनें म्हणाले 'तुम्हाला सस्पेंड नाहीं करणार. परंतु जरा तगादा करा.'

तगादा करा हें ठीक. परंतु तगादा केला म्हणजे का पैसे उत्पन्न होतात? झाड हलवलें कीं पैसे पडले असते तर काय मजा झाली असती? परंतु तसें नाहीं. बारा बारा महिने राबून शेत पिकवावें तर मालाला भाव नाहीं. मजुराला मजुरी द्यावी लागते; सावकाराचें व्याज भरावें लागतें; सरकारचा पूर्वीप्रमाणेंच शेतसारा भरावा लागतो. कसें करावें शेतकऱ्यानें?

सरकारचा सारा कमी होत नाहीं. सावकार नवीन कर्ज देत नाहीं. जें सावकारी नियंत्रण बिल नुकतेंच झालें, त्यांत असें लिहिलें कीं वर्षाचें व्याज भरावें म्हणजे मग पांच का पंधरा एकर जी बागाईत वा इतर शेत जमीन असेल तिचा लिलाव होणार नाहीं. परंतु वर्षाचें व्याज भरावयाचें कोठून? तहशील भरावयास पैसा नाहीं. मग व्याज कोठून भरा? व्याज भरतांच जेथें येत नाहीं तेथें जप्ती कशी चुकणार? व्याज भरलें तर जप्ती चुकावयाची! तहशील देतांच येत नाहीं तेथें दंड कसा वाचविणार?

क्रांतिकारक उपाय योजल्याशिवाय शेतकरी जगणार नाहीं. परंतु क्रांतिकारक उपाय तरी कसे योजावयाचे? सावकाराचें सारें कर्ज माफ,

असें जाहीर करावयास हवें. सावकाराशीं सरकारनें करार मदार कर्ज-फेडीचे करावे. परंतु शेतकऱ्यांना कर्ज देण्याची नवीन भरपूर व्यवस्था केल्याशिवाय सावकार दूर करतां येत नाहीं. भरपूर कर्ज देतां येण्यासाठीं चांगल्या भरपूर भांडवलाच्या बँका पाहिजेत. त्यासाठीं प्रांतांतून मध्यवर्ती सरकाराकडे लष्करी वगैरे अवाढव्य खर्चासाठीं जाणारे पैसे कमी करतां आले पाहिजेत. प्रांतांतील सर्व धनिकांवर निर्वाणीचा जादा कर बसवला पाहिजे. परंतु हें सर्व करावयाचें म्हणजे सत्ता हातीं हवी. ती कोठें आहे? सत्ता हातीं नाहीं. लष्करी खर्च कमी करतां येत नाहीं. बड्या अधिकाऱ्यांचे पगार कायद्याप्रमाणें कमी करतां येत नाहींत. श्रीमंतांवर जादा प्रांतिक कर बसवावा तर ते गव्हर्नरकडे संरक्षण मागतील. गव्हर्नर कायद्याप्रमाणें त्यांना तें देईल. अशामुळें बँकांना भरपूर भांडवल नाहीं. सावकारी दूर करतां येत नाहीं. सरकारी खर्च कमी करतां येत नाहीं. म्हणून शेतसाराहि कमी करतां येत नाहीं. कर्ज देण्याचीहि व्यवस्था करतां येत नाहीं.

बड्या अधिकाऱ्यांचे पगार कायद्याप्रमाणें कमी करतां येत नाहींत हें खरें. परंतु माणुसकीचा कायदा सर्वांच्या हृदयांत नाहीं का? ज्यांना ज्यांना शंभर रुपयांच्यावर पगार मिळत आहे, त्या सर्वांनीं आपले पगार देशांतील शेत-कऱ्यासाठीं कां न कमी करून घ्यावे? शेतकऱ्यांचे हाल हाल होत असतां मी शंभरापेक्षां अधिक पगार घेणें म्हणजे शेतकऱ्यांचे खून करणें होय. अरे शंभरावर पगार घेणाऱ्या मित्रांनो! तुम्हीं या देशचे, या लोकांच्या रक्तामांसाचे ना? तुम्हीं तर सातासमुद्रापलीकडून नाहीं ना आलेत? तुम्हांला शेतकऱ्याची करुणा कां येऊं नये? शेतकरी जगेल तर तुम्ही जगाल. शेतकऱ्याला जगविणें हा उपकार नसून स्वतःच्या जगण्यासाठींच तें अवश्य आहे.

वरती कमळ हंसतें. परंतु कमळाचा देंठ खालीं चिखलांत लडबडत असतो. देंठाच्या जवळचा ओलावा जर सुकला तर वरचें कमळ हंसेल का? देंठ सुकला तर कमळ सुकणार, गळणार! म्हणून पांढरपेशांनो, शंभरावर पगार घेणाऱ्यांनो! तुम्ही प्रांतिक सरकारला भराभरा कळवा कीं, 'आम्हांला शंभर रुपये पगार जास्तींत जास्त द्या, बाकीचा कापून टाका व शेतकऱ्यांचा बोजा कमी करा.'

प्रांतसाहेब अमळनेर तालुक्यांत रागावले. परंतु त्यांना जर हृदय असतें तर ते शेतकऱ्यांवर रागावले नसते. त्यांनीं सरकारला वरती कळविलें असतें 'शेतकऱ्याची दुर्दशा आहे. मी ४।५ शें पगार कसा घेऊं? मला पुढील महिन्यापासून शंभर रुपये पगार पुरे.' परंतु ही माणुसकी कोण ओळखणार? माणुसकीहि कायद्यानें शिकवावी लागते.

स्वातंत्र्याचा लढा तीव्र करणें हाच याला उपाय आहे. आणि हा लढा केव्हां तीव्र होईल? कॉंग्रेस किसान व कामगार यांचीं दुःखें दूर करण्यासाठीं लढेल तेव्हां. किसान व कामगार यांचे प्रश्न हे कॉंग्रेसचे मुख्य प्रश्न झाले पाहिजेत. कारण बहुजन समाज म्हणजे किसान कामगार. ते सुखी तर बाकी सर्व सुखी.

किसान व कामगार हीं दोन राष्ट्रपुरुषाचीं फुफ्फुसें आहेत. या फुफ्फुसांची काळजी घेण्यास कॉंग्रेसनें एकदिलानें उठलें पाहिजे. म्हणजे किसान कामगारांत स्फुरण चढेल. देशांत तेज उत्पन्न होईल. कॉंग्रेसची खरी शक्ति वाढेल व स्वराज्य जवळ येईल.

—११ एप्रिल, १९३८.

## कर्मवीर अण्णासाहेब कर्वे ६

अण्णा! आज तुमचा ८१ वा वाढदिवस. केवढी धन्यतेची गोष्ट, केवढी आनंदाची गोष्ट! आपल्या राष्ट्रांत राष्ट्रसेवकांच्या वांट्याला दीर्घायुष्य क्वचितच येतें. राष्ट्रांतील पडलेलें अपरंपार काम करावयास कोणी पुढें येत नाहीं असें पाहून पुढारी सर्व रक्त ओतून गाडा ओढूं लागतात व आपल्यांतून ते लौकर जातात. नामदार गोखले, विष्णुशास्त्री, रामतीर्थ, विवेकानंद, आगरकर, देशबंधू दास, कितीतरी थोर रत्नें भारतास फार दिवस लाभलीं नाहींत. अशा स्थितींत राष्ट्राची अहोरात्र सेवा करणाऱ्या एखाद्या महापुरुषाचा ८१ वा वाढदिवस साजरा करण्याचें भाग्य जनतेला लाभणें ही परमसुखाची गोष्ट आहे.

अण्णा ! तुमचें अपूर्व चरित्र डोळ्यांसमोर आलें म्हणजे तुमच्या चरणीं डोकें ठेवावेंसें वाटतें. पुण्याला फर्ग्युसन कॉलेजांत तुम्हीं तेव्हां प्रोफेसर होतांत. तुम्हीं आपल्या पगारांतून पैन् पै वांचवून पुण्याजवळ चार मैलांवर हिंगणें येथें अनाथ बालिकाश्रम संस्था सुरू केलीत. प्रथम तीन मुली संस्थेंत आल्या. ध्येयनिष्ठेनें तुम्हीं कार्य सुरू केलें. आज त्या छोट्या गुतवळा-सारख्या प्रवाहाची केवढी भव्य गंगा झाली आहे.

लोकहितवादी, महात्मा ज्योतिराव फुले, आगरकर, न्यायमूर्ति रानडे वगैरे थोरांनीं स्त्रीशिक्षणाला जोरानें चालना दिली. स्त्रियांनीं शिकणें म्हणजे पाप, ही विचारसरणी त्यांनीं मारून टाकली. परंतु तुमच्याशिवाय संपूर्ण-पणें या कार्याला कोणी वाहून घेतलें ? एकेका कार्याला एकांतिक निष्ठेनें वाहून घेतल्याशिवाय कार्यें उठत नसतात. स्त्रीशिक्षण हें जीवनाचें ध्येय करून तुम्हीं उभे राहिलांत.

स्त्रियांना शिक्षण कां द्यावयाचें ? कोणी म्हणतात त्या पतीचा हिशोब ठेवतील. कोणी म्हणतात त्या आजारीपणांत नीट औषधें देतील, थर्मामीटर लावतील. कोणी म्हणतात त्या शिकल्या तर लग्नाला अडचण पडणार नाहीं. कोणी म्हणतात त्या शिकल्या तर पतीबरोबर वादविवाद करतील. पति-पत्नींत काव्यशास्त्रविनोदाला पूर येईल. ह्या अनेक दृष्टींनीं स्त्रीशिक्षण असावें असे म्हणणारे लोक आहेत. परंतु स्त्रीशिक्षणाकडे पाहण्याची ही खरी दृष्टि नव्हे.

अण्णा ! तुमची दृष्टि कोणती होती ? तुमची दृष्टि एका प्रसंगीं मला कळून आली. १९३० सालांतील ती गोष्ट. एप्रिल महिन्याचे अखेरचे दिवस होते. सत्याग्रहाचा संग्राम भडकला होता. अंमळनेरची शाळा सोडून मी कोकणांत माझ्या भावाला भेटावयास जात होतों. मी आगबोटींत बसलों होतों. मुंबईच्या धक्क्यावरून बोट सुटली नव्हती. बोटींत अलोट गर्दी होती. मी माझी घोंगडी अंथरून जागा काबीज केली होती. तुम्हीं तेथें उभे होतांत. हातांत बॅग घेऊन शांतपणें तुम्हीं उभे होतांत. मी तुम्हांला ओळखलें व वंदन करून म्हटलें "बसा, या घोंगडीवर बसा."

तुम्हीं नुकतेच जगाची यात्रा करून आलां होतांत. मी तुम्हांला अनेक प्रश्न विचारले. ३५ कोटि लोक असून तुम्हीं गुलाम कसे राहतां असा

प्रश्न परदेशांत सर्वत्र विचारण्यांत येतो असें तुम्ही सांगितलेंत. नंतर सत्याग्रहाच्या गोष्टी सुरू झाल्या. तुम्हीं म्हणालेत "जपानांत मी वाचलें कीं, महात्माजी मिठाचा सत्याग्रह सुरू करणार. मिठाचा सत्याग्रह सुरू करणार म्हणजे काय करणार असें मनांत आलें. परंतु मुंबई बंदरांत उतरलों. विलेपार्लें येथें स्वयंसेवकांची छावणी आहे असें ऐकलें. मी तेथें गेलों. तेथलि तें देशभक्तीचें निर्भय व यज्ञमय वातावरण पाहून मलाहि स्वयंसेवक व्हावें अशी स्फूर्ति झाली. परंतु मोठ्या संयमानें ती इच्छा दाबली. नंतर मुंबईस गिरगांवांत एक देखावा पाहिला. हजारों नारी 'नहि रखनी नहि रखनी जालीम सरकार नहि रखनी' असें गाणें गात जात होत्या. त्यांच्या कडेवर समुद्राच्या पाण्यानें भरलेल्या कळशा होत्या. कायदेभंग त्या करीत होत्या. पोलीस लाठीमाराचा हुकूम येण्याची दुःखानें वाट पहात होते. तो रोमहर्षण देखावा पाहून माझ्या डोळ्यांचें पारणें फिटलें. मिठाचा सत्याग्रह हातीं घेऊन महात्माजींनीं राजकारण चुलीजवळ नेलें. स्त्रियांचा आत्मा त्यांनीं जागा केला. पंचवीस वर्षांत मला करतां आलें नाहीं तें महात्माजींनीं दोन महिन्यांत केलें. स्त्रियांचा आत्मा जागृत करणें ही सर्वांत महत्त्वाची वस्तु आहे. शिक्षणाचें हें ध्येय आहे."

अण्णा! तुमचे ते थोर अर्थपूर्ण उद्‌गार मला नेहमीं आठवतात. त्या शब्दांची मी स्वतःला सदैव आठवण देत असतों व जेथें कोठें विद्यार्थी भेटतील त्यांनाहि देतों. स्त्रियांच्या शिक्षणाला तुम्ही कां हात घातलात? त्या स्वावलंबी होतील, त्यांना कामधंदा मिळेल, बालसंगोपन चांगलें करतील, हिशोब ठेवतील—शेंकडो फायदे होतील. परंतु तुमची मुख्य दृष्टि कोणती होती? स्त्रियांचा आत्मा जागृत व्हावा ही. पुरुषांप्रमाणेंच स्त्रियांना मन, बुद्धि, हृदय आहे. त्यांना आत्मा आहे. त्या आत्म्याच्या विकासासाठीं शिकावयाचें.

आत्मा जागृत होणें म्हणजे काय? दुसऱ्याच्या सुखदुःखांचा विचार करावयास शिकणें. सुशिक्षित अशिक्षित यांत फरक कोणता? जो दुसऱ्यांच्या सुखदुःखांचा विचार करूं लागला, तो शिकलेला. लिहिणें वाचणें म्हणजे मुख्य शिक्षण नव्हे. लिहिण्यावाचण्यानें मानवजातीच्या, बहुजन समाजाच्या जीवनाशीं एकरूप होण्यास शिकलें पाहिजे. शिकलेला मनुष्य देशांतील

बहुजनसमाजाचें दुःख पाहील. तें दुःख दूर करण्याचे उपाय हातीं घेईल. स्वराज्य व स्वातंत्र्य जवळ आणण्यासाठीं खटपट करील. शिकलेला मनुष्य शेतकरी कामकरी यांना तुच्छ मानणार नाहीं. उलट त्यांना प्रेमानें जवळ करील, त्यांच्या दुर्दशेनें दुःखी होईल. आत्मा जागृत होणें याचा हा अर्थ आहे. म्हणून स्वातंत्र्यासाठीं मुंबईच्या हजारों स्त्रिया उभ्या राहिलेल्या पाहून, व्यापक राष्ट्रजीवनांत त्या भाग घेत आहेत असें पाहून तुमचें हृदय उचंबळलें.

स्त्रियांचें शिक्षण हातीं घेणाऱ्या कितीकांना अण्णांच्या हृदयांतील ही तहान कळेल? ही दृष्टि कळेल? सुशिक्षित स्त्रियांत ही दृष्टि कितीशी आहे? उलट पुष्कळ वेळां सुशिक्षित भगिनी म्हणजे निराळेंच कांहीं तरी वाटतें. विदेशी खेळणीं, विदेशी वस्त्रें, विदेशी वस्तू यांतच त्यांचा आत्मा रमतो. त्यांना स्वदेशाची स्मृति नसते. अशिक्षित भगिनींपासून त्या अहंकारानें दूर राहतात. शहरांतील सुशिक्षित स्वयंसेविका खेड्यांतील अशिक्षित परंतु देश-प्रेमानें भारलेल्या स्वयंसेविकांस कसें वागवितात याचे कटु अनुभव क्वचित् येतातच.

शिक्षणानें असें होतां कामा नये. अण्णांना याचें फार वाईट वाटेल. आज अण्णांचा वाढदिवस महाराष्ट्रांत हजारों सुशिक्षित स्त्री-पुरुष साजरा करितील. परंतु अण्णांचा मोठा सत्कार म्हणजे शिक्षणानें स्त्रियांचा आत्मा जागृत करून त्यांना बहुजनसमाजाच्या सुखदुःखाशीं एकरूप होण्यास शिकविणें हा होय.

अण्णा! तीन मुली घेऊन ज्या कार्याचा तुम्ही विस्तार केलात, त्याचा आज केवढा विस्तार झाला आहे! स्त्रियांचें स्वतंत्र विद्यापीठ आज महा-राष्ट्रांत शोभत आहे! साऱ्या भरतखंडांत ही अपूर्व गोष्ट तुम्ही घडवून आणली. संस्थेसाठीं लाखों रुपये तुम्ही जमविलेत, त्याच्यासाठीं वणवण केलीत. ध्येयवादी लोकांच्या हातांत ती संस्था देऊन आज तुम्ही एक प्रकारें कृतार्थ झालां आहांत.

खरें म्हटलें तर आतां तुम्हीं विश्रांति घ्यावयाची. परन्तु न्यायमूर्ति रानडे म्हणत "मरणानंतर विश्रांति. तोंपर्यंत विश्रांति नाहीं" स्त्रियांच्या शिक्षणाचें काम योग्य लोकांच्या हातांत देऊन, आज वृद्धपणीं तुम्ही पुण्यांत घरोघर

प्राथमिक शिक्षणासाठीं फंड जमवीत असतां. विद्यार्थी निजलेले असावेत, आणि प्रभातकाळीं आपली पवित्र मूर्ति दारांत शिक्षणार्थ भिक्षा मागावयास आलेली असावी! अंधार दूर करणारा सूर्य वर उगवलेला, आणि तरुणांच्या मनांतील अंधार हरण करण्यासाठीं आपला दारांत अवतार! लाजेनें विद्यार्थी उठत व तुमचा सत्कार करीत. जवळचे रुपये तुमच्या हातीं ठेवीत.

तुम्हांला कर्तव्य प्राणांहून अधिक प्रिय आहे. कर्तव्य नीट पार पाडतां यावें म्हणून तुमचें वर्तन किती नियमित व संयमी! अमळनेरमध्यें पुष्कळ वर्षांपूर्वी तुम्हीं आलां होतांत. श्री. गोखले गुरुजी यांच्याकडे उतरलां होतांत. पहाटे थंडी होती. तरी तुम्हीं उठलां होतांत. अंथरुणांत पडून तुमच्यानें रहावेना. तुम्ही बरोबर सामानहि पूर्वी स्वतः नेतां येईल तेवढेंच बाळगीत असां. पुण्याच्या स्टेशनवर टांगा करावा लागूं नये, म्हणून तुम्ही फार सामान बरोबर नेत नसां. प्रत्येक पैन् पै शिक्षणाच्या कामांत तुम्ही खर्च करीत असां.

आज ८१ व्या वाढदिवशींहि तुमचा उत्साह कायम आहे, बुद्धि स्वच्छ आहे, उद्योग अविरत सुरू आहे. महाराष्ट्रांतील लाखो लोकांस तुमच्यापासून स्फूर्ति मिळेल. चिकाटी, स्थिरता, निर्भयता, निंदास्तुति-निरपेक्षता, एका कार्यास वाहून घेणें, दीर्घोद्योग, निरहंकारता, स्वच्छ विचारसरणी, त्याग, प्रेमळ स्वभाव—किती तुमचे गुण मी वानूं! तुमची स्तुति करणें सोपें आहे. परंतु तुमचें स्वल्पाहि अनुकरण करणें कठिण.

परमेश्वर आम्हांला स्फूर्ति देण्यासाठीं तुम्हांला उदंड आयुरारोग्य देवो.

—१८ एप्रिल, १९३८.

## ७. राष्ट्रीय सप्ताह

राष्ट्रीय सप्ताह सर्व हिंदुस्थानभर साजरा झाला. ठिकठिकाणीं चरका-सप्ताह झाले. सभासद नोंद झाली. स्वयंसेवकदलें निर्माण झालीं. खादीविक्री झाली. फेऱ्या निघाल्या. झेंडावंदनें झालीं. सभा झाल्या. राष्ट्रीय सप्ताहांतील उत्साह सर्व वर्षभर आपणांस पुरला पाहिजे. महात्माजी दरवर्षी राष्ट्रीय सप्ताहाच्या आरंभीं उपवास करीत असत कीं काय तें मला माहीत नाहीं. परंतु या वर्षी ही वार्ता मी वर्तमानपत्रांतून वाचली व माझें अंतःकरण भरून आलें. हा उपवास महात्माजींचा आहे. तो आमचातुमचा नाहीं. शेंगांच्या दाण्यांचा वा शिंगाड्याच्या शिऱ्याचा उपवास नाहीं. महात्माजींचा उपवास म्हणजे उपनिषद आहे. महात्माजी आज अत्यंत महत्त्वाच्या कार्यांत मग्न आहेत. अहिंसेचा प्रचंड प्रयोग आज सुरू आहे. दहशतवादी लोकांची हिंसेवरील व अत्याचारावरील श्रद्धा उडाली आहे. या पूर्वहिंसा-वादी देशभक्तांच्या सुटकेचें कंकण त्यांनीं हातांत बांधलें आहे. आपलें जीवन हातांत घेऊन या थोर कार्यासाठीं ते उभे आहेत. कॉंग्रेस सरकार-कडून ते अहिंसेचा अपूर्व प्रचार करूं इच्छीत आहेत. दारूबंदी करून कुटुंबांतील हिंसा ते दूर करूं पहात आहेत. समाजांतील दुःख दूर करूं पहात आहेत. शिक्षण स्वावलंबी करून भारतीय बाळांना ते स्वतंत्र करूं पहात आहेत. दंगेधोपे झाले तर पोलीस व लष्कर उपयोगांत न आणतां, कॉंग्रेसचीं प्राणार्पण करणारीं अहिंसक सैन्यें ते उभीं करूं पहात आहेत. हिंदुमुस्लीम ऐक्यासाठीं बॅ. जिनांजवळ पुनः प्रयत्न करीत आहेत. सूत कातणाऱ्यास किमान आठ आणे खेड्यांत मिळावे असें सांगत आहेत. हरिजनांबद्दल कॉंग्रेस सरकारकडून व हरिजन-सेवासंघाकडून अपार सेवा करवून घेत आहेत. महात्माजींनीं उपवास केला त्या दिवशीं भारताच्या शेंकडों प्रश्नाशीं ते एकरूप झाले असतील. भारतांतील विषमता, दास्य, दारिद्र्य, रूढी, व्यसनें, आलस्य, अत्याचार, भेदाभेद, यांवर अहिंसक व सत्यमय मार्गानें कशी जोरानें

चढाई करावयाची याचें त्यांनीं चिंतन केलें असेल. परमेश्वराला ते कळवळयानें म्हणाले असतील " देवा, अहिंसेच्या व सत्याच्या मार्गानें भारताचें ग्रहण सुटावें म्हणून चाललेल्या नम्र प्रयत्नास यश दे. "

देशांत सेवेचे अनेक प्रयत्न चालले आहेत. मागें हरिजनांविषयीं महात्माजींनीं एकवीस दिवसांचा उपवास जेव्हां केला होता, तेव्हां नाशिकच्या तुरुंगांत त्यांचे प्रायव्हेट सेक्रेटरी श्री. प्यारेलाल होते. महात्माजींनीं त्यांना पत्रांत लिहिलें होतें — " मी उपवास कां करीत आहे ? श्रीमान् बिर्लाशेठ लाखों रुपये देतील. परंतु आध्यात्मिक भांडवल पाहिजे. आध्यात्मिक संपत्ति पाहिजे. माझ्या उपवासानें मी आध्यात्मिक भांडवल आणीत आहें. "

देशांतील हजारोंच्या सेवेंत आध्यात्मिक भांडवल महात्माजींच्या उपवासानें मिळत असतें. आध्यात्मिक भांडवल म्हणजे काय ? सत्य, अहिंसा, सहनशीलता, आशा, स्थिरता, सतत उद्योग, नम्रपणा, दंभराहित्य, इ० सेवेंत आणणें. अशा गुणांनीं युक्त होऊन लहानमोठे सेवाकार्यांत जर तन्मय होतील तर काम झपाट्यानें वाढेल.

महात्माजींचा उपवास म्हणजे दिव्यता आहे. त्या दिवशींच्या त्यांच्या चिंतनांत काय असेल ! त्या चिंतनांत कोण डोकावूं शकेल, कोण शिरूं शकेल ? तें चिंतन अनंत सिंधूप्रमाणें व अनंत आकाशाप्रमाणें आहे. तें पवित्र, अति उदात्त व परम गंभीर आहे.

महात्माजींच्या या उपवासानें तुम्हांला स्फूर्ति नाहीं येत ? राष्ट्रीय सत्ताहाचें महत्त्व नाहीं कळत? राष्ट्रभक्ति नाहीं समजत? हरिजनसेवा नाहीं करावीशी वाटत ? हिंदु-मुसलमान प्रश्न मिटवावे असें नाहीं का वाटत? खादी वापरावी असें नाहीं हृदय सांगत ? शेतकरी कामकरी यांची स्थिति सुधारावी असें नाहीं मनांत येत ? स्वदेशी नाहीं जवळ करतां येत ? स्वातंत्र्याची नाहीं तहान लागत ? अहिंसा, सत्य, ऐक्य, हीं नाहीं मनांत रुजत?

महात्माजींच्या या उपवासानें जर तुमचें हृदय हलत नसेल तर तें हलविण्यास कोणती शक्ति आतां आणावी ?

—१८ एप्रिल, १९३८.

# हरिजनांची दुर्दशा

८

अंमळनेर येथील पंधरा दिवसांपूर्वीची गोष्ट. येथील गिरणी कामगार युनियनचे सेक्रेटरी श्री. वसंतराव भागवत वकील यांच्या घराजवळ दोन हरिजन लांकडें फोडीत होते. त्यांना तहान लागली होती. ते पाणी प्यावयास कोठें जाणार? श्री. वसंतराव यांच्या दारांत ते आले व पाणी मागूं लागले. "विहिरीवर बादली आहे. या, पाणी काढा व पोटभर प्या" असें वसंतराव त्यांना म्हणाले. ते हरिजन म्हणाले, 'असें कसें होईल रावसाहेब, आम्ही पाणी कसें काढूं?' वसंतरावांनीं फिरून फिरून त्यांना सांगितलें कीं, 'पाणी काढा. हें माझें घर आहे. विहीर माझी आहे. तुम्हांस मनापासून सांगतों. आमच्या येथें भेद नाहीं. या.' परंतु ते हरिजन गेले नाहींत.

दुसरा अनुभव एरंडोल येथील साळवे गांवचा. सार्वजनिक आड आहे. प्रांतसाहेब तेथें गेले होते. त्यांना कळलें कीं, हरिजन त्या आडावर पाणी भरीत नाहींत. प्रांतसाहेब एकदोन चांभार बंधूंना म्हणाले, "या, पाणी भरा, कोण तुम्हांला प्रतिबंध करतो तें बघतों. जा, दोर बादली घेऊन या." ते चांभारबंधू गेले ते परत आले नाहींत. दुसऱ्याच्या हातीं निरोप पाठविला. तोहि अदृश्य झाला. प्रांतसाहेब स्वतः हजर राहून पाणी भरा असें सांगत होते, परंतु हरिजन आले नाहींत.

अंमळनेर येथें श्री. वसंतराव भागवत पाणी भरा असें सांगत होते. साळवें येथें प्रांतसाहेब सांगत होते. परंतु हरिजन पाणी भरण्यास कां धजले नाहींत? कारण त्यांना इतर निर्दय सनातनी मंडळींची भीति वाटते. प्रांतसाहेब आतां आहेत, परंतु नेहमीं थोडेच तेथें राहणार! रोज बसल्या उठल्या गांवकऱ्यांशीं गांठ! सनातनी मंडळी म्हणतील, "त्यांनीं पाणी भरा सांगितलें म्हणून तुम्ही भरावें कीं काय? त्यांनीं धर्माची मर्यादा सोडली म्हणून तुम्ही सोडावयाची कीं काय?" हरिजनांनीं पाणी भरलें असतें तर "तुम्ही म्हारडे माजलेत" असें सनातनी मंडळींनीं म्हटलें असतें. त्यांच्यावर बहिष्कार घातला असता. त्यांना कदाचित् मारहाणहि केली असती.

हरिजन भितात. सनातनी बंधूंनो! हरिजनांस पाणी पिण्याचीहि मोकळीक न देऊन कोणता मोक्ष तुम्हांला मिळणार आहे? तुमच्या विहिरीवर गाई, म्हशी पाणी पितात. त्यांच्यापेक्षां मनुष्य नीच झाला का? हें पाप कोठें फेडाल?

तृषिताय जलं यच्छेत् । हरेत् दीनस्य चापदम् ।

असा हा सनातन धर्म आहे. हरिजनांना माणसांप्रमाणें वागवावयास लागूं, त्याच दिवशीं आपण स्वराज्यास पात्र ठरूं. आपल्या बांधवांस गुलाम करणारा स्वतः चिरकाल गुलाम होऊन पडेल. आपल्या बांधवांची स्थिति पशुहून नीच करणारा जगांत स्वतः पशु होईल. सारें जग त्याच्या तोंडावर थुंकेल!

—१८ एप्रिल, १९३८.

## काँग्रेसला बळकट करा ९

कांग्रेसची संघटना आतां चैतन्यमय झाली पाहिजे. आतां लेचेंपेचें काम चालणार नाहीं. पोलादी संघटना आतां हवी. कांग्रेसचे ताणेतणावे सर्वत्र पसरले पाहिजेत. देशभर जाळें विणलें गेलें पाहिजे. हरिपुरा येथें कांग्रेस झाली. त्या कांग्रेसचा कोणता संदेश आहे? संघटना हा एकच संदेश आहे.

कांग्रेसची संघटना करावयाची म्हणजे काय करावयाचें? तालुक्यांत सर्वत्र कांग्रेस कमिट्या स्थापन करावयाच्या. ज्या गांवाला कांग्रेस कमिटी नाहीं, तो अभागी गांव. असा अभागी गांव अतःपर राहतां कामा नये. गांव चार घरांचा असेना, तेथें सरकारी पोलीस पाटील आहेत. त्याप्रमाणें आमच्या कांग्रेसची बैठकही प्रत्येक गांवीं हवी.

कांग्रेस कमेटीनें काय करावयाचें? गांवांतील सर्व गोष्टींकडे पहावयाचें. गांवांत विहीर आहे कीं नाहीं, रस्ता नीट आहे कीं नाहीं, पकि कसें आहे,

रोगराई आहे कीं काय, शाळा आहे कीं नाहीं, भांडणें आहेत कीं काय, कर्ज किती, तहशील किती, दारूचा गुत्ता आहे कीं काय—सर्व माहिती गांव कांग्रेस कमिटीजवळ हवी. गांवचीं दुःखें तिनें वर कळवावीं; गांवच्या तक्रारी गांवांतील अन्याय वरतीं कॉंग्रेस कमिट्यांना कळवावे. अशा रीतीनें कांग्रेस कमिटी कार्यकर झाली पाहिजे.

प्रत्येक गांव कांग्रेस कमिटीच्या ऑफिसांत नवाकाळ, लोकशक्ति, कांग्रेस हीं पत्रें असावींत. चावडीवर बसून या पत्रांचें रोज रात्रीं वाचन करावें. आपण पांडवप्रताप, रामविजय ऐकावयाला जमतों. परन्तु नवाकाळ हाच आपला आजचा पांडवप्रताप. आजचे जवाहिरलाल, सुभाषबाबू हे काय करीत आहेत, आज महात्मा गांधी कोठें आहेत, हें सर्व माहित पाहिजे. हें आजचें रामायण भारत ऐकलें पाहिजे. ऐकविलें पाहिजे.

कांग्रेसनें काय काय केलें, मंत्रिमण्डळें काय काय करीत आहेत, त्यांचे तक्ते चावडीवर लिहून ठेवावे. कमिटीनें कॉंग्रेसचे सारे ठरलेले दिवस साजरे करावे. प्रत्येक हालचाल सर्व हिंदुस्थानभर झाली पाहिजे. कॉंग्रेसच्या हुकुमाच्या अंमलबजावणीचा नाद साऱ्या भरतखंडांत दुमदुमला पाहिजे. स्वातंत्र्य दिन, राष्ट्रीय सप्ताह, लवंग—बहिष्कार दिन. सर्वत्र पाळले गेले पाहिजेत.

कॉंग्रेस कमिट्या तेव्हांच बलशाली होतील, जेव्हां पाठीमागें हजारों लोक असतील. प्रत्येक गांवांतील अठरा वर्षांच्या वर असलेल्या सर्व स्त्री-पुरुषांनीं वर्षाचे चार आणे देऊन कॉंग्रेसचे सभासद झालें पाहिजे. कॉंग्रेसचें सभासद होणें हें पहिलें कर्तव्य आहे. कॉंग्रेसच्या कार्याला यामुळें आपण पाठिंबा देतों. असेंब्लीचे मतदार सर्व हिंदुस्थानांत ३॥ कोटी होते. मग प्राणप्रिय कॉंग्रेसचे सभासद ७ कोटी कां होऊं नयेत?

पूर्व खानदेशांत मागच्या वर्षीं पंचवीस हजार सभासद झाले होते. या-वर्षीं एक लाख झाले पाहिजेत. सरहद्द गांधी पेशावर प्रांतांत दोन लाख सभासद करणार आहेत. सरहद्द प्रांताची लोकसंख्या २३ लाख आहे. पूर्व खानदेशाची बारा लाख आहे. आपण एक लाख सभासद करूं तेव्हांच सरहद्द गांधींना आपण तोंड दाखवूं शकूं. नुसती धूम उडवून दिली पाहिजे.

• कॉंग्रेसचे लाखों सभासद हवेत, त्याप्रमाणेंच कॉंग्रेसचीं सेवादलें गांवोगांव पाहिजेत. प्रत्येक तालुक्यांत कॉंग्रेसचे पांचशें स्वयंसेवक पाहिजेत. तालुक्याच्या मुख्य ठिकाणीं शंभर दीडशें. बाकीचे तालुक्यांतील खेड्यांत. नीट गाणीं म्हणणारे, नीट चालणारे, कॉंग्रेसची माहिती असणारे, कॉंग्रेसचें काम करण्यासाठीं सदैव सिद्ध असणारे असे स्वयंसेवक हजारोंनीं तयार करा.

कॉंग्रेस कमिट्या स्थापन करणें, सभासद होणें, स्वयंसेवकदलें निर्माण करणें, त्याचप्रमाणें ज्या ज्या वेळेस निवडणूक येईल त्या त्या वेळेस कॉंग्रेसलाच मत देणें. निवडणूक येतांच सर्वत्र एक जयजयकार झाला पाहिजे. गटागटावर स्वयंसेवकांच्या रांगा उभ्या राहिल्या पाहिजेत. एक वातावरण निर्मिलें पाहिजे. आपली तर आतां इंग्रज सरकार दूर करून कॉंग्रेसचें प्रतिसरकार निर्मावयाची इच्छा आहे. स्वतःचें संपूर्ण सरकार कॉंग्रेसला पाहिजे आहे. सर्व सत्ता परकीयांच्या हातून कॉंग्रेसला हिरावून घ्यावयाची आहे. परंतु कॉंग्रेसला साधीं बोर्डें जिंकतां येत नसतील, तर इंग्रजाला कसें जिंकतां येईल ? अशानें स्वराज्य मिळवूं पाहणाऱ्या कॉंग्रेसचें हंसें होईल. कॉंग्रेसचें हंसें होणें म्हणजे भारतमातेचें हंसें होणें. कोणता सुपुत्र आपल्या मातेची फटफजीति करील ?

सारे सभासद बना, स्वयंसेवक बना, स्वयंसेवक दलें काढा, कांग्रेस कमिट्या बळकट करा, निवडणुकींत कांग्रेसची फत्ते करा, सर्वत्र कांग्रेसची शक्ति वाढवा. कांग्रेसची शक्ति वाढली म्हणजे, सुख जवळ येईल. जें आज करतां येत नाहीं तें करतां येईल. आपण सारे सुखी होऊं.

—२ मे, १९३८.

## हिंदु-मुसलमान ऐक्य

१०

कांग्रेसच्या मागील एका अंकांत पारोळ्याचें जें बातमीपत्र छापण्यांत आलें होतें, त्यांत 'मुसलमानांच्या असह्य वर्तनामुळें' असे शब्द आहेत. त्यावर पारोळ्याच्या मुसलमानांकडून असें लिहून आलें आहे कीं, मुसलमानांचें असह्य असें कोणतेंच वर्तन नाहीं. तुम्ही असें लिहून आमची बदनामी केली आहे.

जर माझ्या मुसलमान बंधूंचें असह्य वर्तन होत नसेल तर मला त्याचा अत्यंत आनंद आहे. आपल्या हृदयांतील परमेश्वराला स्मरून जर ते असें सांगत असतील तर त्यावर मी विश्वास टाकतों.

महात्मा गांधी व बॅ. जिना यांच्यांत २८ तारखेला फार मोठी वाटाघाट झाली. ती तीन तास सुरू होती. मुंबईच्या अनंत समुद्राच्या तीरावर ही ऐतिहासिक चर्चा झाली. हिंदु-मुस्लीम ऐक्यासाठीं समुद्र रात्रंदिवस ओरडून ओरडून सांगत आहे. थोर पुढाऱ्यांच्या या प्रयत्नांस यश येवो व भारतमातेचें तोंड तेजानें फुलो.

आपले हिंदु-मुसलमान पूर्वज परस्परांशीं आधींच भांडले, परंतु गुण्यागोविंदाचे व प्रेमाचे संबंध ते निर्माण करीत होते. आपल्या खानदेशांत पहा ना! अमळनेरला संत सखाराम महाराजांचा जेव्हां रथ निघतो, त्या वेळेस रथाला पहिली मोगरी देण्याचा पहिला मान मुसलमानभाईचा आहे. आणि त्यांना आधीं नारळ देण्यांत येतो. जळगांव जवळच्या कानळदेगावीं, मुसलमानभाई पंढरपूरला दिंडी चालली कीं आपल्या मशिदीजवळ मुद्दाम थांबवून भजन करण्यास सांगत. अशी पद्धत होती. राम व रहीम एकरूप आहेत याचा अनुभव ते घेत.

मुसलमानांचा निराकार देव व हिंदूंचा साकार देव दोन्ही एकच आहेत हें पूर्वज ओळखण्यास शिकले होते.

पूर्वजांची ही थोर दृष्टि घेऊन आपण पुढें जाऊं या. थोर बाबर बादशहानें हिंदुस्थानांत मुसलमानांस सुखानें रहावयाचें असेल तर गायीला मारूं

नये असें लिहिलें आहे. गाय आपल्याला दूध देते. तिचे बैल शेतीला मिळतात. मुसलमान शेतकरी लाखों, हिंदुस्थानांत आहेत. गाय मारण्यांत का धर्म आहे ?

ही कुरबानीची चाल कशी पडली ? अरबस्थानांत एक थोर संत झाला. एकदां देवदूत देवाला म्हणाले, 'देवा तुझा थोर भक्त कोण ?' देव म्हणाले, 'अब्राहम.' देवदूत म्हणाले, 'कशावरून ?' देव म्हणाला, 'मी मागेन तें तो मला देईल.' देवदूत म्हणाले, 'प्रत्यक्ष परीक्षा घेऊन पहा.' देव म्हणाला, 'बरें.'

देव अब्राहमच्या स्वप्नांत आला व म्हणाला 'बेटा, तुला जी वस्तु सर्वांत प्रिय असेल ती दे.' सकाळीं अब्राहम उठला व मनांत विचार करूं लागला. कोणती बरें वस्तू त्याला प्रिय होती ? अब्राहमची एक उंटीण होती. ती सर्वांत त्याला प्रिय होती. त्यानें ती उंटीण देवाला देण्याचें ठरविलें. उंटिणीची त्यानें कुरबानी केली. परंतु पुनः रात्रीं देव स्वप्नांत आला व म्हणाला 'गड्या, उंटिणीपेक्षांहि दुसरी वस्तु तुला प्रिय आहे. ती मला दे' सकाळीं अब्राहाम पुन: उठून विचार करूं लागला. तो म्हणाला, 'माझा मुलगा मला प्राणापेक्षांहि प्रिय आहे. देवाला तो देतों.' अब्राहाम आपल्या मुलाचा बळी देणार, इतक्यांत देवानें त्याचा हात धरला. देव म्हणाला 'गड्या, तूं परीक्षेंत उतरलास, तूं खरा भक्त.' देवदूतांनीं जयजयकार केला.

परमप्रिय उंटीण ज्या दिवशीं अब्राहामनें दिली, तो दिवस कुरबानीचा म्हणून मुसलमान पाळतात. पुढें मुसलमान हिंदुस्थानांत आले. येथें फार उंट नाहींत. येथें गाई. येथें गाय सर्वांना प्रिय म्हणून येथील मुसलमान गायीची कुरबानी करूं लागले. हिंदूंचा द्वेष म्हणून नव्हे तर गाय प्रिय म्हणून ही पद्धत सुरू झाली. परंतु पुढें हिंदूंना वाटूं लागलें कीं, गाय मुद्दाम मारतात आणि मुसलमानांसहि ही गोष्ट माहित नसल्यामुळें हिंदूंना दुखविण्यासाटीं गाय मारण्यांत त्यांना धर्म वाटूं लागला.

ईश्वराला रक्ताची तहान नाहीं. आपल्या हृदयांतील कामक्रोधांची कुरबानी देवाला द्या. म्हणजे हृदयांत शांति येईल.

आपण हिंदु-मुसलमानांनीं परस्पराचीं मनें ज्या ज्या गोष्टींनीं दुखवतील

त्या गोष्टी वर्ज्य कराव्या. इस्लाम या शब्दाचा अर्थ शांति व हिंदुधर्मांतहि प्रत्येक मंत्राचे शेवटीं शांतिः शांतिः शांतिः असें म्हणतात. आपले पूर्वज या मार्गानें जाऊं पहात होते. परकी सत्तेनें आपणांत पुन्हां झगडे उत्पन्न केले व आपण त्याला बळी पडत आहोंत. हिंदु-मुस्लीम ऐक्य ही हिंदुस्थानच्या जिव्हाळ्याची गोष्ट आहे. थोर पुढारी प्रयत्न करीत आहेत. आपणहि लहानथोर नम्रपणें त्या प्रयत्नांत सामील होऊं या.

—२ मे, १९३८.

## आंधळे रे आंधळे ११

पुण्याला पुण्यमूर्ति सेनापति बापटांवर हिंदू युवकांचा हल्ला झाला ह्या वार्तेवर प्रथम विश्वास बसेना. परंतु ती एक खरोखर घडलेली सत्यकथा होती. सेनापति बापट बेशुद्ध होऊन पडले. ज्यांनीं राष्ट्राला स्वतंत्र करण्यासाठीं सारें जीवन दिलें आहे, ज्यांचें हृदय गंगाजलाप्रमाणें निर्मळ आहे, बुद्धि आकाशाप्रमाणें विशाल आहे, त्या सेनापतींच्यावर पुण्यास जमलेल्या युवकांनीं हल्ला चढविला. पुण्य पुरुषाचें रक्त सांडलें गेलें. निष्पाप अशा इतर तरुणांचेंहि रक्त सांडलें गेलें. सेनापति बापट व सेवानंद बाळूकाका कानिटकर यांच्यावर हल्ले झालेच, परंतु त्यांच्या मुलांवरहि झाले. सेनापतींची मुलगी कु. कमल व मुलगा वामन, सेवानंदांचा मुलगा मोरू या सर्वांवर हल्ले झाले. साम्यवादी इतर तरुणांवरहि हल्ले झाले. राष्ट्रांतील सर्वांना सुखी करूं पाहणाऱ्या राष्ट्रवीरांवर हल्ला झाला. शिवाजी महाराजांनीं मान खालीं घातली असेल. सेनापतींवर अपरंपार प्रेम करणारे लोकमान्य आकाशांत खदिरांगारासारखे लाल झाले असतील. परंतु पुण्याच्या हिंदु युवक परिषदेंत जमलेल्या पुढाऱ्यांनीं काय केलें ?

सेनापतींवर हल्ला होत होता, त्या वेळेस तेथें कोण होते ? स्वातंत्र्यवीर सावरकर कोठें होते ? श्री. ग. वि. केतकर कोठें होते ? लाठीबहादूर भोपटकर

कोठें होते ? सेनापति हेडगेवार कोठें होते ? वीरशिरोमणि मुंजे कोठें होतें ? ते सारे निघून गेले होते. सेनापति मरून पडते तरि त्यांना त्याचें काय होय!

महाराष्ट्रांतील तरुणांनो ! तुम्ही अतःपर स्वच्छ विचार केला पाहिजे. स्वच्छ विचारांची आज जितकी जरुरी आहे, तितकी ती पूर्वी कधींच नव्हती. केवळ हिंदू हिंदू करून आतां भागणार नाहीं. सर्व राष्ट्राचा विचार केल्यास्वेरीज गत्यंतर नाहीं.

हा हिंदुस्थान कोणाचा ? हिंदुस्थान ज्याची पितृभू व पुण्यभू आहे त्याचा. पितृभू म्हणजे काय ? पितृ ह्या शब्दाचा अर्थ संस्कृतांत मायबाप असा आहे. जो देश आपणांस पोसतो तो देश आपली पितृभू. आणि पुण्यभू म्हणजे काय ? जेथें आपण पुण्यकृत्यें करतों ती पुण्यभू. सर्वांत श्रेष्ठ पुण्यकृत्य कोणतें ? राष्ट्र स्वतंत्र असेल तर त्याचें स्वातंत्र्य राखणें व गुलामगिरींत असेल तर त्याला स्वतंत्र करणें याच्याहून दुसरें श्रेष्ठ असें पुण्यकृत्य नाहीं.

हिंदुस्थान ज्यांना ज्यांना पोशीत आहे व हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं जे लढावयास तयार होतील त्याचा हा हिंदुस्थान आहे. जो हिंदु राष्ट्रासाठीं लढावयास तयार नसेल त्याचाहि हा देश नाहीं. जो मुसलमान तयार नसेल त्याचाहि नाहीं.

कॉंग्रेस आज सर्वांना लढावयास हांक मारीत आहे. स्वातंत्र्याचा लढा तीव्र करावयास सर्वांना बोलावीत आहे. सर्व प्रकारचे लोक तिच्या झेंड्याखालीं जमा होत आहेत.

कॉंग्रेसच्या झेंड्याखालीं मुसलमानहि आहेत. अधिकाधिक येत आहेत. अधिक यावेत म्हणून तिची खटपट सुरू आहे. ज्या खैबरखिंडींतून मुसलमानांच्या स्वाऱ्या होत, त्याच खैबरखिंडींतून देशभक्तीचा वणवाहि पेटत येत आहे. सत्याग्रहाच्या चळवळींत बारा हजारांच्यावर पठाण स्वयंसेवक तुरुंगांत गेले होते व कोणत्याहि प्रांतांत हाल झाले नाहींत इतके त्यांचे झाले.

कोठेंतरी ठिणगी पडावी लागते. मुसलमान समाजांत ती पडली आहे. 'वन्हि तो पेटवावा रे, पेटवितांचि पेटतो' असें समर्थ म्हणत. तो पवित्र वन्हि मुसलमानांत पेटला आहे. तो हिंदुस्थानभर पेटल्याशिवाय राहणार नाहीं.

इंग्रजांना तोंड द्यावयाचें असेल तर प्रचंड संघटना केल्याशिवाय देतां येणार नाहीं. सर्वांना बरोबर घेतल्याशिवाय तोंड देतां येणार नाहीं. इंग्रजांचें राज्य कशाच्या जोरावर चाललें आहे? दुहीच्या. फोडा व झोडा या तत्त्वावर इंग्रज राज्य करितो. फोडा व झोडा हें जर इंग्रजांचें सूत्र असेल तर एकमेकांस जोडा हें आमचें असलें पाहिजे. जर आम्हीहि आमच्यांत फूट पाडूं तर इंग्रजांचेच बगलबच्चे आपणहि होऊं. आपल्यांतील हीं भांडणें पाहून इंग्रज मनांत हंसत व हिंदुस्थान कायमचा बंधनांत ठेवूं असें म्हणत असेल.

नवयुवकांनो जुन्या लोकांचे विचार तुम्ही तरी आपल्याजवळ येऊं देऊं नका. हिंदुस्थानचे धिंडवडे करणाऱ्या लोकांच्या पाठीमागें जाऊं नका. तुमच्या स्वप्नांतून उद्यांचा हिंदुस्थान बनावयाचा आहे. जुनीं भांडणें मनांत आठवण्यांत पुरुषार्थ नाहीं. उज्ज्वल भविष्यकाळाचीं निर्मळ व उदात्त चित्रें रंगविण्यांत व तदनुरूप वागविण्यांत पुरुषार्थ आहे.

भारताला एक महान् प्रयोग करावयाचा आहे. भारताचें भाग्य बनविणाऱ्या ईश्वराचे कांहीं हेतु आहेत. या हिंदुस्थानांत प्राचीन काळापासून सर्व धर्मांचे लोक येत आहेत. सर्व धर्मांचे लोक एकत्र आणून त्यांची एक महान् संमिश्र संस्कृति परमेश्वराला बनवावयाची आहे. हिंदु, मुसलमान, शीख, पारशी, जैन, बुद्ध, ख्रिस्त सारे धर्म येथें आहेत, या सर्वांना येथें आणण्यांत एक अर्थ आहे. या सर्वांना प्रेमानें टिपऱ्या खेळत ऐक्याचा गोप विणावयास प्रभु लावणार आहे.

या थोर ध्येयासाठीं भारत जगला आहे. ही खरी विशाल भारतीय संस्कृति. भारताच्या उत्तरेस उंच हिमालय आहे. तो उंच हिमालय सांगत आहे कीं, मनें उंच करा, स्वच्छ ठेवा. तो समुद्र सांगत आहे, मी सर्व ठिकाणच्या नद्या घेऊन मोठा झालों. तुम्हीं सर्व मानव एकत्र येऊन महान् प्रेमसिंधु निर्माण करा.

ऋषींचें हें स्वप्न होतें. संतांचें हें स्वप्न होतें. भारतीय संस्कृतींत हिंदु-मुसलमान संत मिळून गेले आहेत. कबीर हा हिंदूंना का परका वाटतो? नाहीं! नाहीं. कबीराचे दोहरे आमचा वेदच आहे. अशी थोर भारतीय संस्कृति आज कोण वाढवीत आहे? कॉंग्रेस. सर्व मानव जातींत जितके

धर्म आहेत, तितके धर्म आज येथें आहेत. मानवजातीच्या ऐक्याचा हा प्रयोग आहे. हा प्रयोग यशस्वी करून आपण मानवजातीस सांगूं. "पहा भारत कसा भेदांत अभेद पहात आहे, विभिन्न सुरांतून दिव्य मधुर संगीत निर्माण करीत आहे." असें भारतास केव्हां बरें म्हणतां येईल ?

तुम्ही नवतरुण आंधळेपणा सोडून भारतीय संस्कृतीच्या दिव्य प्रकाशानें दृष्टि भरून घ्याल तेव्हां. आंधळे होऊं नका. जुनीं मढीं उकरून काढूं नका. श्रद्धेचा दिवा हातांत घेऊन भव्य दिव्य ध्येयासाठीं उभे रहा. सेनापतींसारख्यांवर हल्ले करणाऱ्या या संघांतून शिरूं नका. मनें या विषारी प्रचारापासून दूर ठेवा. एका कॉंग्रेसच्या झेंड्याखालीं या. बोला, भारतीय तरुणांनो, बोला. तुम्हीं पुण्याला मवालीपणा करणाऱ्या आत्मघातकी आंधळ्या तरुणांप्रमाणें होणार का राष्ट्राचे तुकडे जोडूं पाहणाऱ्या, राष्ट्राची एक नाडी, एक हृदय, एक बुद्धि करूं पाहणाऱ्या खऱ्या भारतीय संस्कृतीचे उपासक होणार ?

—९ मे, १९३८.

## पुण्याचा रक्तलांछित १ मे दिन १२

साम्राज्यवादी भांडवलशाही सरकारें पूर्वीं मे-दिनाच्या दिवशीं गोळीबार लाठीमार करीत. जगांत बहुतेक राष्ट्रांतून मे-दिन आतां पाळला जातो. हिंदुस्थानांतहि मे-दिन पाळला गेला. पुण्याला मे-दिनाची मिरवणूक निघाली. त्या मिरवणुकीवर हल्ला झाला. कोणी केला होता तो ? ब्रिटिश सरकारच्या शिपायांनीं ? नाहीं नाहीं. आमच्याच भाऊबंदांच्या लाठ्या आमच्या कपाळीं बसल्या. राष्ट्रीय स्वयंसेवक—संघाच्या काठ्या आकाशांतील विमानांना थोड्याच पोंचणार आहेत ! निःशस्त्र लढा लढणाऱ्या आमच्याच माथ्यावर त्या पडावयाच्या आहेत.

पुण्याच्या हिंदु युवक परिषदेनें समाजसत्तावादी लोकांच्या निषेधाचा ठराव केला आहे. या हिंदु युवकांना भारतीय संस्कृतीची थोडीहि कल्पना

असती तर असा ठराव ते करते ना. समाजसत्तावाद म्हणजे वेदान्त. सर्वांना पोटभर अन्न मिळणें, अंगभर वस्त्र मिळणें, सर्वांना शिक्षण मिळणें, रहावयास घर असणें म्हणजे समाजसत्तावाद. यांत कोणतें पाप आहे?

सज्जनगडाची एक जुनी गोष्ट मी ऐकली होती. एकदां समर्थांच्या पुण्यतिथीचा नऊ दिवसांचा उत्सव नेहमींप्रमाणें गडावर होत होता. गडावर येणाऱ्या सर्वांना जेवण मिळालें कीं नाहीं, हें पाहून मग गादीवरचे महाराज जेवत. एकदां रात्रीं बारा वाजतां महाराजांचें पोट दुखूं लागलें. पोट कांहीं केल्या थांबेना. महाराज म्हणाले, "गडावर कोणी उपाशी नाहीं ना पाहून या." गडावर एक क्षुधेनें काळवंडलेला मनुष्य आढळला. त्याला अन्न देण्यांत आलें. महाराजांचें पोट दुखावयाचें राहिलें.

उपाशी लोकांसाठीं ही पोटदुखी आज ज्याला लागली असेल, तो खरा धार्मिक. तो खरा संस्कृतीचा उपासक. संस्कृतीचा खरा उपासक सर्वांना सुखी करूं पाहील. समाजसत्तावाद खरी संस्कृति आणील. भारतीय संस्कृतीला उजळा देईल.

समाजसत्तावादी मित्रांनो! पुण्याला तुमचेवर काठ्या पडल्या. दिलदार व ध्येयवादी एस. एम. जोशी रक्तबंबाळ झाले. तेजस्वी व ध्येयोत्कट भाऊ फाटक घायाळ झाला. सौ. नर्मदाताई साने यांनाहि लाठी बसली. कृतार्थ झाली सारी मंडळी. मे-दिन पवित्र रक्तानें रंगला. मे-दिनाचें बीज भारतांत नीट पेरलें गेलें. त्याला रक्ताचें खत मिळालें. या बीजाचा महान् वृक्ष होईल व लाठ्या मारणाऱ्यांसहि तो छाया देईल.

—९ मे, १९३८.

## यात्रा झाली, पण— १३

अंमळनेरची यात्रा झाली. एकादशीस रथ निघाला. पौर्णिमेस पालखी निघाली. हजारों लोक आले. श्रीमंत सखाराम महाराजांचा जयजयकार त्यांनीं केला. अनेक वारकरी जमले. निरनिराळ्या

गाद्यांवरचे महाराज एकत्र जमले. कांहीं शास्त्री पंडित येऊन त्यांनीं आपली पढिक विद्वत्ता दाखविली. सनातन धर्माची महति गायिली गेली. भजनें झालीं. सारें झालें. परंतु या सोहळ्यांत धर्माचा प्राण होता का ? हा सोहळा भगवंताला मान्य झाला असेल का ? परमेश्वर या समारंभांत होता कीं तो कष्टानें व खेदानें दूर निघून गेला होता ?

हा सर्व समारंभ प्राणाशिवाय कुडीप्रमाणें होता. जोंपर्यंत आपल्या सर्व धार्मिक महोत्सवांत हरिजनांना आपण अभेदानें भाग घेऊं देत नाहीं, तोंपर्यंत हे सारे सोहाळे निर्जीव व अधार्मिक आहेत. संतांच्या पादुकांना हरिजनांना स्पर्श करतां येत नाहीं, तुमच्या मंदिरांत हरिजनांना जातां येत नाहीं, देवाच्या पालखी, रथाला हरिजनांना हात लागूं देत नाहीं तोंपर्यंत देव मेलेला आहे. भारतवर्षांत देवाला जिवंत करावयाचें असेल तर सर्वांना देवाजवळ जाऊं दे.

मुसलमानांच्या मशिदींत सारे समानतेच्या नात्यानें बसतात. तेथें कोणी अमीर नाहीं, फकीर नाहीं. दिल्लीच्या जुम्मा मशिदींत एकदां औरंगजेब बादशहा प्रार्थनेच्या वेळेस जरा उशिरा गेला. औरंगजेबाला पाहतांच लोक पुढें मागें सरूं लागले. बादशहा म्हणाला, " हलूं नका. जो उशिरां येईल तो मागें बसेल. देवासमोर मी बादशहा नाहीं. मी साधा माणूस आहें. मशिदींत सारे सारखे. रावरंक भेद नाहीं. "

खिश्चनांच्या चर्चमध्यें सारे एकत्र जमतात. सामुदायिक प्रार्थना म्हणतात. कोणाला अस्पृश्य करून मंदिराबाहेर ते ठेवीत नाहींत.

परन्तु हिंदुधर्मातच हें पाप आहे. आम्ही देवासमोरहि सर्वांना येऊं देत नाहीं. आम्ही देवालाहि एक नबाब बनविलें आहे. आमचा देव सर्वांचा मायबाप म्हणून तेथें उभा नाहीं. कांहीं लोकांच्या मिरासदारीला मान देणारा कोणी सुलतान मूर्तिरूपानें तेथें उभा असतो. ज्याप्रमाणें तुमच्या दिवाणखान्यांत सर्वांना प्रवेश नाहीं, त्याप्रमाणें तुमच्या देवाजवळहि प्रवेश नाहीं.

एखाद्या आईचीं तीन मुलें तिला चिटकून बसून चौथ्या मुलाला तीं तीन मुलें जर येऊं देणार नाहींत, आईजवळ बसूं देणार नाहींत तर त्या आईचें

लक्ष कोणाजवळ असेल? जवळच्या तीन मुलांकडे असेल कीं दूर हांकललेल्या त्या चौथ्याकडे असेल? चौथ्या मुलासाठीं आईचा जीव थोडाथोडा होईल.

आपण देवाला माउली म्हणतों. माझी विठाई माउली। प्रेमपान्हा पान्हावली॥ असें म्हणतों. जर तुमची मूर्ति केवळ दगडाची नसून चैतन्यमय व भावनामय असेल तर त्या मूर्तीचें लक्ष जवळच्या पंड्याबडव्यांकडे, जवळच्या देशमुखदेशपांड्यांकडे, जवळच्या पंचांकडे, जवळच्या सनातनींकडे न राहतां दूर ठेवलेल्या अस्पृश्यांकडेच जाईल. तुम्हांला तुमची विठाई माउली पाहिजे असेल तर हरिजनांना जाऊन मिठी मारा.

ज्ञानेश्वरींत म्हटलें आहे 'तेथ जातिव्यक्ती पडे बिंदुलें.' देवाचें चिंतन करणाऱ्यास जातगोत कांहीं आठवतां कामा नये. 'मी' मी कुठला, कोण; याचेंहि स्मरण उरतां कामा नये. तुकाराम महाराज म्हणतात 'जाळिन मी भेद। येथें प्रमाण तों वेद' 'जिकडे तिकडे देखे उभा। अवघा चैतन्याचा गाभा' 'विष्णुमय जग वैष्णवाचा धर्म' 'भेदाभेद भ्रम अमंगळ' 'येथें भाग्य कधी लहान होऊन। अवघें देख जन ब्रह्मरूप' संतांना भाग्य पाहिजे होतें. सर्वांना हृदयाशीं धरण्याची त्यांना तहान होती. परन्तु तुम्हीं सारे करंटे. संतांना जें भाग्य पाहिजे होतें, तें तुम्हीं लाथाडून देत आहांत.

इतर कोठें हरिजनांना नाहीं येऊं दिलें तरी तें एक वेळ मी समजेन, परंतु देवाजळ येऊं देत नाहीं, हें मला समजतच नाहीं. लोक म्हणतात 'मंदिरांत तर नाहींच येतां कामा. मी म्हणतों, 'मंदिरांत तर आधीं येऊं दे. म्हणजे मंदिराला मंदिरत्व येईल.' देवाजवळ तरी सारे आपापले अहंकार विसरून जाऊं या. मी ब्राह्मण, मी पंडित, मी मोठा, मी श्रेष्ठ असले श्रेष्ठपणाचे बिल्ले छातीवर लावून देवाजवळ कशाला जातां? तुमचे हे बिल्ले पाहून देव पळेल. देवासमोर सारे क्षुद्र किडे म्हणून उभे रहा. अहंकार धुळींत मिळवून उभे रहा.

आईला जेव्हां भेटावयाचें असतें, तेव्हां कोट, बूट, सूट, हॅट घालून, किंवा पागोटें, उपरणें घालून आपण जात नाहीं. हा सारा जामानिमा बाहेर ठेवून आपण आंत जातों व आई आपल्या अंगावरून प्रेमानें थबथबलेला हात फिरविते. त्याचप्रमाणें देवाचा हात तुमच्या डोक्यावरून फिरावा असें वाटत असेल तर मी ब्राह्मण, मी सरदार, मी श्रेष्ठ, मी स्पृश्य या सर्व गोष्टीं

दूर करून, मनावरचे हे सारे कपडे दूर करून केवळ उघडे होऊन जा. असें जोंपर्यंत करणार नाहीं तोंपर्यंत देव दूरच राहील.

मी दीड महिन्यापूर्वी अंमळनेरच्या कामगारांच्या सभेंत म्हटलें होतें " कामगारासाठीं उपवास करावा, नाहींतर यात्रेच्या वेळेस हरिजनांना मंदिर-प्रवेश मिळावा म्हणून करावा असें मनांत येत आहे." या वर्षी यात्रेंत गडबड होणार असें लोक म्हणत होते. सानेगुरुजी गडबड करणार नाहीं. ते मुद्दाम तुमच्या मंदिरांत जा असें हरिजनांना सांगणार नाहींत.सानेगुरुजी उपवास करणार होते. परन्तु मी विचार केला. खेड्यापाड्यांतून सर्वत्र विचारप्रसार केल्या-शिवाय मी उपवास कसा करूं ? बारा वर्षें खऱ्या धर्माचा प्रचार करूं दे. व मग वाटलें तर उपवास करूं दे.

महात्माजींनीं हरिजनांसाठीं प्राणहि पणाला लावले. महान् चळवळ त्या यशांतून निर्माण झाली. परन्तु अद्याप खेड्यापाड्यांतून हरिजनांबद्दल एखा-देंहि व्याख्यान झालें नाहीं. मागें पुण्यास भरलेल्या हिंदुमहासभेनें हरिजनां-बद्दल एक हजार व्याख्यानें देण्याचें ठरविलें होतें. परन्तु तो ठराव खोलीं-तच राहिला. हिंदुमहासभेचे झाडून सारे सेवक जर हरिजनकार्याला लागतील तर ती केवढी धर्मसेवा आहे ?

माणसांचीच वाण आहे. कांग्रेसचा प्रचार करावयास तालुक्याला सर्वस्वी वाहून घेतलेला एकेक इसम नाहीं. हरिजन कार्याला सर्वस्वी वाहून घेतलेला एकहि नवीन नाहीं. सत्कल्पनांचा ध्यास घेऊन त्या मी सर्वत्र वाऱ्याप्रमाणें पसरीत जाईन असें म्हणणारे वेडे लोक फारसे नाहींत. उदार धर्माचा प्रचार करणारे शेंकडों नव कीर्तनकार, शेंकडों नव शाहीर, शेंकडों पुराणिक पाहिजे आहेत, परन्तु आहेत कोठें ?

समर्थांनीं एक हजार मठ स्थापिले. एक हजार प्रचारक गांवोगांव बसाविले. आज सात लाख खेड्यांना सात हजार प्रचारक कमींत कमीं हवे आहेत. शंभर गांवांना एक प्रचारक. म्हणजेच तालुक्याला एक. प्रत्येक तालुक्याला कांग्रेसप्रचारक, हरिजनसेवक, खादीसेवक, साक्षरताप्रसारक, असे लोक वाहून घेतलेले असतील तरच तालुक्यांत नवचैतन्य येईल.

हरिजनांना सार्वजनिक विहिरीवर पाणी भरूं देणें, मंदिरांत येऊं देणें, सभेंत सर्वत्र बसूं देणें म्हणजे अधर्म असें जें लोकांस वाटतें, तें दूर केलें

पाहिजे. यानेंच माणुसकीचा खरा धर्म येईल, यानेंच देवाला आपण आवडते होऊं असें सांगितलें पाहिजे.

पुढच्या वर्षींच्या यात्रेंत तरी श्री सखाराम महाराजांच्या जवळ हरिजनांना येऊं देतील का ? वाडीच्या मंदिरांत जाऊं देतील का ? देव पाहिजे असेल, धर्माचा गाभा पाहिजे असेल तर करतील. नाहीं तर ? नाहीं तर देवाच्या यात्रेऐवजीं सनातनी लोकांच्या अहंकाराची यात्रा भरत जाईल. पालखींत कोण ? सनातनींचा अहंकार. रथांत कोण ? सनातनींच्या अहंकाराची मूर्ति. आणि मग देव कोठें आहे ? देव दुःखानें दूर दूर दूर निघून गेला ! असेंच म्हणावें लागेल.

—१६ मे, १९३८.

## कांग्रेसची दृष्टी १४

चाळीसगांव तालुक्यांतील कांग्रेसविरोधी कांहीं उमेदवारांनीं पत्रकें काढलीं आहेत. एका पत्रकांत सह्या करणारे म्हणतात 'कांग्रेसनें श्री. केशवराव पाटील यांना कां उभें केलें ? हे कालपर्यंत कांग्रेसला विरोध करीत होते. श्री. वाडेकरांच्या निवडणुकीच्या वेळेस ते विरोधीच होते. अशांना कांग्रेसनें कां तिकीट द्यावें ? तसेंच चाळीसगांवचे सावकार श्री. हरिशेट वाणी यांनाहि कां तिकीट मिळावें ? सावकार तर माना कापतो. पिळून पिळून व्याज घेतो. अशांना कांग्रेसनें जवळ कां घ्यावें ? कांग्रेसनें अशांना उभें केलें नसतें तर आम्हीहि उभे राहिलों नसतों. बिनविरोध निवडणुकी झाल्या असत्या.

कांग्रेसची भूमिका मी मागें एकदां समजवून देण्याचा प्रयत्न केला होता. कांग्रेसनें आपले दरवाजे बंद केलेले नाहींत. कांग्रेस सर्वांना जवळ घेण्यास तयार आहे. अजामीळ कालपर्यंत पापी होता. परन्तु 'आज माझें नांव घेत आहे, मी त्याचा उद्धार करीन असें भगवान् म्हणाले. इंग्रजींत एक म्हण आहे, ' संतांना भूतकाळ असतो. पाप्याला भविष्यकाळ असतो.'

सर्वांना सुधारण्याची मोकळीक आहे. श्री. हरिशेट वाणी निष्ठुर सावकार असतील. त्यांना चांगले सावकार आपणांस बनवायचे आहेत ना ? त्यांना आपल्या कांग्रेसच्या झेंड्याखालीं घ्या. भडगांव पेट्यांतील गोंडगांव वगैरे गांवची वाणी सावकार मण्डळी कांग्रेसवर रागावली आहे. कांग्रेस कर्जतह-कुबी देते, सावकारी नियंत्रणबिल आणते, म्हणून ते शिव्याशाप देत आहेत. चाळीसगांवचे हरिशेट वाणी असें न करितां कांग्रेसच्या तिकिटावर उभे राहात आहेत. कांग्रेसच्या तिकीटावर उभें राहणें म्हणजे थोडीफार माणु-सकी अंगीं येणें, हरिशेटांना आपण कायमचे दूर ठेवूं तर ते कसे सुधारणार ? त्यांना होमकुण्डांत ओढलें पाहिजे. त्यांच्या कानांत कांग्रेसचा हा मंत्र ओतला पाहिजे. त्यांना चांगले बनविण्याची खटपट आपण केली पाहिजे.

जसें हरिशेटवाणी यांच्या बाबतींत तसेंच श्री. केशवरावांचे बाबतींत. महा-राष्ट्रांत व अन्यत्र पूर्वीचे शेंकडो कांग्रेसविरोधक आज कांग्रेसच्या झेंड्याखालीं येऊन सेवा करीत आहेत. कर्नाटकांतलि कट्टे कांग्रेस-विरोधी श्री. अंगडी आज कांग्रेसच्या निशाणाखालीं आहेत. परवां अंगडी स्वयंसेवकां-बरोबर रस्ता खणीत होते! श्री. अंगडी एका व्याख्यानांत म्हणाले, 'सहा महिन्यांपूर्वी माझा पुनर्जन्म झाला ही गोष्ट खरी आहे. राष्ट्रकार्याचें ज्ञान होण्यास व दृष्टि येण्यास मला इतका विलंब लागला. ज्या गंगाधररावांना मी शत्रु समजत होतों, त्यांना मी आतां गुरु मानतों. माझा पूर्वीचा मार्ग चुकला असें मला कळून आलें आहे. एक प्रकारचें धैर्य माझ्या मध्यें आज आलें आहे.'

आपले सर्वांचे याच जन्मांत असे अनेकदां पुनर्जन्म होत असतात. नदी का नेहमींच वाकडी जाते? नाहीं. म्हणून आपण कालपर्यंत अमुक असा वागत होता एवढ्यामुळें त्याच्या नवीन स्वीकारलेल्या ध्येयाबद्दल अविश्वास दाखवूं नये. श्री. केशवराव कालपर्यंत विरोधी असतलि. परंतु आज आपल्या झेंड्याखालीं जबाबदार उमेदवार म्हणून उभे आहेत याचा आप-णास उलट आनंद वाटला पाहिजे. कांग्रेसचा वाढता गोतावळा, वाढता जय पाहून नाचलें पाहिजे.

पश्चिम खानदेशांतील बॅ. मोरे मागच्या निवडणुकींत नामदेवरावांसाठीं खटपट करीत होते. परन्तु आज त्यांना खरी दृष्टि आली आहे, ते खेड्यांतून

सांगत " मला मतें द्या किंवा देऊं नका. परन्तु कांग्रेसचें कार्य ऐका. कांग्रेसचे विचार सर्वत्र जाऊं दे. कांग्रेसच कल्याण करील. " बॅ. मोरे पूर्वी तसे होते म्हणून का मी त्यांना झिडकारूं ? तें पाप होईल. तो अधर्म होईल. बॅ. मोरे कांग्रेसचा झेंडा घेऊन नाचूं लागतांच मीहि त्यांना डोक्यावर घेऊन नाचलें पाहिजे.

कांग्रेसच्या झेंड्याखालीं येऊन हे का जातिनिष्ठ राहतील ? नसते भेद माजवतील ? कांग्रेसच्या पवित्र मंदिरांत हे का क्षुद्रपणाचे तमाशे सुरू करतील ? कांग्रेसमातेजवळ येऊन श्री. हरिशेट वाणी का शंभराचे दोनशें लिहून घेत बसतील ? असें करतील तर कांग्रेस का दुबळी आहे ? तिच्या दृष्टिक्षेपांत यांना नमविण्याचें सामर्थ्य आहे.

गायनाच्या मजलसींत अरसिक मनुष्यहि मान डोलवूं लागतो. भजनी मेळ्यांत नास्तिकहि विठ्ठल विठ्ठल म्हणून टाळी वाजवतो. त्याचप्रमाणें कांग्रेसच्या मेळाव्यांत हे नूतन बंधू आले म्हणजे तेहि तोच तालसूर धरतील, तोच राष्ट्रैक्याचा राष्ट्रहिताचा सूर आळवूं लागतील.

जे पूर्वीपासून कांग्रेसभक्त आहेत ते आहेतच. आपणांस आपला पंथ वाढवावयाचा आहे. नवीन सेवक निर्मावयाचे आहेत. त्यांना जवळ घेऊं या. त्यांच्यावर विश्वास टाकूं या. तेहि आणाभाका घेऊन येत आहेत. अशा वेळीं खऱ्या कांग्रेसभक्तानें न रागावतां उलट या नवीन कांग्रेससेवकांचें कौतुक केलें पाहिजे. चला उठा सारे. सर्व कांग्रेस-उमेदवारांना निवडून द्या. हा तो असें म्हणूं नका. आपण सारे एका अमृत-सिंधूंतील बिंदू. एका कांग्रेस संस्थेचे पाईक. बोदवड भागांतील मतदारांनो, श्री. पंढरी पाटील व श्री. संपत पाटील दोघांना निवडून द्या. मी वर सांगितलेली मंगल व निर्मळ दृष्टि घ्या. चाळीसगांव तालुक्यांतील मतदारांनो, तुम्ही तेंच करा. सर्व ठिकाणच्या मतदारांनीं हीच दृष्टि घेऊन उभें राहिलें पाहिजे. हाच खरा मार्ग आहे.

—१६ मे, १९३८.

# खानदेशाची परीक्षा

१८

उद्यां २४ तारीख. बोर्डाच्या निवडणुकीचा उद्यांचा दिवस. खान-देशांतील मतदार उद्यां कोणाला मतें देणार? राष्ट्राचा तिरंगी झेंडा त्यांना हांक मारीत आहे. भारताचें स्वातंत्र्य त्यांना हांक मारीत आहे. ३५ कोटी लोकांचा संसार सुंदर करूं पाहणारी मायमाउली कांग्रेस हांक मारीत आहे. खान-देशांतलि मतदार या हांकेला ओ देतील अशी सबळ आशा आहे.

कांग्रेसचें बळ आज वाढलें आहे. कांग्रेसचा शब्द आज ब्रिटिश सरकाराकडून सन्मानिला जात आहे. ओरिसा प्रांतांत ही गोष्ट दिसून आली. कोणाला तरी गव्हर्नर नेमून कांग्रेसचा अपमान करणार असाल तर तें कांग्रेसला सहन होणार नाहीं असें महात्माजींनीं लिहितांच सरकार नरमतें व कांग्रेसच्या इच्छेप्रमाणें वागतें. कांग्रेसचें हें बळ आज कोठून आलें? आज सात प्रांतांत कांग्रेसचीं मंत्रिमंडळें आहेत त्यामुळें. हें कांग्रेसचें बळ आपण आणखी वाढाविलें पाहिजे. हें कसें वाढविणार? सदैव कांग्रेसच्या पाठीमागें उभें राहून. ज्या ज्या वेळीं कांग्रेस हांक मारील, त्या त्या वेळेस तिच्या पाठीमागें मागें पुढें न पाहतां उभे राहत जा.

कांग्रेसला मत म्हणजे स्वराज्याला मत. कांग्रेस राष्ट्राची प्रतिनिधीभूत संस्था नाहीं असें ब्रिटिश सरकार म्हणत असतें. सारे मतदार झाडून जर कांग्रेसला मत देतलि तर सरकारला आपण पुरावा देऊन सांगू कीं राष्ट्र कांग्रेसच्याच पाठीमागें आहे. कांग्रेसला मत देणें म्हणजे कांग्रेसच्या स्वराज्याच्या ध्येयाला संमति देणें. आम्ही स्वराज्यासाठीं धडपडणाऱ्या कांग्रेसच्या पाठीशीं आहोंत असें निःशंकपणें जगाला कळविणें. कांग्रेसला मत न देणें म्हणजे स्वराज्याचें ध्येय आम्हांस मान्य नाहीं, इंग्रज सरकारच सुखानें येथें राज्य करो; याचें राज्य किती न्यायाचें, भरभराटीचें; याच्या राज्यांत शेतकरी कसे सुखी आहेत, उद्योगधंदे कसे वाढले आहेत, कसें नंदनवन सर्वत्र आहे, असें जाहीर करणें होय.

ब्रिटिश सरकारानें नंदनवनें निर्मिलीं का नंदनवनांचीं स्मशानें केलीं हें आप-

त्या मतानें जगाला कळवायचें आहे. आणि जर ब्रिटिश राजवटींत दिवसें-दिवस वाईट दिवस येत असतील तर ही सत्ता दूर करणाऱ्या कांग्रेसला मत देणें हें सर्वांचें कर्तव्य ठरतें.

इंग्लण्डमध्यें कांहीं दिवसांपूर्वीं हिंदुस्थानांतून परत गेलेला एक ब्रिटिश मुत्सद्दी सभेमध्यें म्हणाला, "हिंदुस्थानाला स्वराज्य देण्याची जरूरी नाहीं." हे शब्द ऐकून कोणाला संताप येणार नाहीं ? जगाच्या बाजारांत हिंदुस्थानची ही बेअब्रू कां ? जर्मनीला स्वराज्य नको असें म्हणण्याची ब्रिटिश मुत्सद्द्यांची छाती झाली असती का ? जर्मनीच्या गर्जनेनें त्यांच्या उरांत धडकी भरते. कां ? सात कोटी जर्मन एक आवाज काढतात म्हणून.

हिंदुस्थाननेंहि एक आवाज काढला पाहिजे. एक ध्येय, एक संस्था, एक झेंडा, एक राष्ट्र या भावनेनें सर्वांनीं पाहिलें पाहिजे, कृति केली पाहिजे. असें जर होईल तरच हिंदुस्थानला स्वराज्याची खरीखुरी तहान लागली आहे असें जगाला वाटेल. आपलीं दहा दिशांना दहा तोंडें राहतील तर गुलामगिरी-चीच हौस हिंदुस्थानला आहे असें इंग्लण्डमधील मुत्सद्दी म्हणत राहतील.

डोंगरावर पडणारें पाणी नाना दिशांना वाहून गेलें तर प्रचंड नदी निर्माण होत नाहीं. तें सारें पाणी एका दिशेला जाईल तरच मोठा प्रवाह निर्माण होईल. कालवे, पाट, बंधारे येतील. शेतीभाती पिकेल. त्याप्रमाणेंच मतदारांच्या मतांची गंगा जर एका दिशेनें वाहील तरच कांहीं शक्ति उत्पन्न होईल. तरच सुख-समाधान उद्यां मिळण्याचा संभव.

स्वराज्य आम्हांला पाहिजे असें राष्ट्राध्यक्ष सुभाषबाबू म्हणतात. परन्तु त्यांनीं म्हणून भागणार नाहीं. सुभाषबाबूंचा हात एकट्याचा असेल तर त्या हाताला ब्रिटिश पकडतील व त्या हातांत हातकड्या घालतील. परन्तु त्या सुभाषबाबूंच्या हाताला चिकटलेले ३५ कोटि लोकांचे हात जर असतील तर तो हात वज्राचा होईल. त्या हाताला ब्रिटिश पकडणार नाहींत, तो हात आदरानें हातांत घेऊन स्वराज्य ठेवतील.

इंग्रजांना असें दिसलें पाहिजे कीं हिंदुस्थानांत अशी एक जबरदस्त संस्था उभी राहिली आहे कीं जिचा शब्द सर्वत्र झेलला जातो. राष्ट्रा-ध्यक्षांची आज्ञा प्रांताध्यक्ष झेलतात. प्रांताध्यक्षांची आज्ञा जिल्हाध्यक्ष मान-तात. जिल्हाध्यक्षांची आज्ञा तालुक्याचे कॉंग्रेस अधिकारी मानतात, तालुक्याच्या

अध्यक्षांचा शब्द सारीं खेडींपाडीं पाळतात. कांग्रेसचें असें स्वरूप जेव्हां सर्वत्र दिसेल, त्या वेळेसच स्वराज्य जवळ येईल. त्या वेळेसच इंग्रज गंभीरपणें विचार करूं लागेल.

निवडणूक म्हणजे पोरखेळ नाहीं. जातपोत, नातगोत, चहाचिवडा, घोडागाडी नाहीं. ज्या ज्या वेळेस कॉंग्रेस निवडणुकीस उभी रहाते त्या त्या वेळेस ती स्वराज्याचा प्रश्न हातांत घेऊन उभी असते. त्या त्या वेळेस राष्ट्राची अब्रू हातांत घेऊन उभी असते. म्हणून मतदारांनीं ही गोष्ट लक्षांत घेतली पाहिजे. आपापल्या गांवचा कोणी उमेदवार कांग्रेसला विरोधी उभा राहिला असला तरी त्याला महत्त्व देतां कामा नये. सात लाख खेड्यांची अब्रू हातांत घेऊन कांग्रेस दारांत उभी असतां आपआपलीं गांवें तिच्यावरून ओंवाळून टाकलीं पाहिजेत. कांग्रेस नसेल त्या वेळेस माझें गांव, कांग्रेस उभीं असेल तर सारीं गांवें तिच्या पायापार्शी असा देखावा दिसला पाहिजे.

सर्व मतदारांनो! क्षुद्र भावाला, मनांत थारा न देतां एक विशाल राष्ट्रीय दृष्टि घेऊन उद्यां मतें द्यावयाला जा. मिरवणूक काढून मतें द्यावयास जा. पोळ्याच्या दिवशीं तुमच्यासाठीं कष्ट करणाऱ्या बैलोबांचीहि कृतज्ञपणें तुम्ही मिरवणूक काढतां. बार वाजतात. वाद्यें वाजतात. मग कांग्रेसला मतें देतांना मिरवणूक कां नको ? झेंडा हातांत घ्या, वाद्यें वाजवा , शिंगें फुंका, टाळ मृदुंग घुमवा. पंढरपुरच्या यात्रेला निघतां तसें या स्वराज्याच्या यात्रेला निघा. उत्साहाचा समुद्र उचंबळू दे. सर्वत्र एक दिव्य देशभक्तीचा हृदयंगम देखावा दिसू दे. कांग्रेस शंभर टक्के यशस्वी होऊं दे. खानदेश सत्त्वपरीक्षेंत संपूर्णपणें उत्तीर्ण होऊं दे. म्हणा वंदे मातरम्, म्हणा कांग्रेस-माता की जय, भारत माता की जय !

—२३ मे, १९३८.

# शेतकरी जागा झाला १६

सोमवार १६ मे १९३८ हा दिवस खानदेशच्या इतिहासांत महत्त्वाचा मानला जाईल. त्या दिवशीं अमळनेर तालुक्यांतील शेतकऱ्यांनीं अमळनेरच्या म्युनिसिपालिटीशीं असहकार एक प्रकारें पुकारला. अमळनेरच्या हद्दींत आपल्या गाड्या न्यावयाच्या नाहींत अशा प्रकारचा निश्चय शेतकरी करीत आहेत. अमळनेर शहराचीं आठ ठिकाणीं नाकीं आहेत. या आठ ठिकाणांहून गाड्या शहरांत येतात. मागील सोमवारीं तीन नाक्यांवर कडक बंदोबस्त झाला. दोनतीनशें गाड्या अमळनेर शहराच्या हद्दीच्या बाहेर उभ्या होत्या. अमळनेरच्या हद्दींत गाड्या नेऊं नका अशी प्रार्थना खेड्यांतील स्वयंसेवक करीत होते. डांगरीकर दे. भ. उत्तमराव पाटील, मारवडचे श्री. यशवंतराव, अमळगांवचे श्री. नामदेवराव, भरवसचे कांग्रेस उमेदवार श्री. दगाजीराव पाटील हे स्वतः ठायीं ठायीं शेतकऱ्यांस सांगून गाड्या बाहेर सोडावयास लावीत होते. शेतकरी बंधू ऐकत होते.

लढ्याला तोंड आतां लागलें आहे. अमळनेर तालुक्यांतील हजारों शेतकऱ्यांनीं संघटित झालें पाहिजे. त्रास सहन केला पाहिजे. अमळनेरच्या हद्दींत गाडी आणतां कामा नये. खेड्यापाड्यांतून स्वयंसेवक उभे राहिले पाहिजेत. खेड्यापाड्यांतील प्रतिष्ठित व वृद्ध माणसांनींहि पुढाकार घेतला पाहिजे. शेतकऱ्यांची दीडशें वर्षें दडपलेली मान वर होऊं दे. आज भारतमाता आनंदली असेल. तिचीं लेंकरें अन्यायाविरुद्ध आपण होऊन उभीं रहाण्यास तयार आहेत.

म्युनिसिपालटीचा हा टॅक्स अन्याय्य आहे. या टॅक्साविरुद्ध चळवळ करणाऱ्यास कोणी प्रतिष्ठित प्रश्न विचारतात "उद्यां तुम्ही तहशील देऊं नका म्हणूनहि सांगाल." या शहाण्यांना आमचें सांगणें आहे कीं "आमच्या जवळ थोडा सारासार विवेक आहे. तहशीलाची फाजील वाढ झाली तर तसें आम्हीं सांगूंहि. सरदार वल्लभभाईंनीं नाहीं का तसें केलें? बार्डोलींतील शेतकरी अन्याय्य करवाढ झाली म्हणून झगडले, आम्हीहि झगडूं."

ज्यांच्यावर कर बसविण्यांत येतो, त्यांचे प्रतिनिधि घेतले पाहिजेत असा एक सर्वसामान्य सिद्धांत आहे. अमेरिकेंतील लोक १५० वर्षांपूर्वी इंग्रजांजवळ याच तत्त्वावर लढले व स्वतंत्र झाले. " प्रतिनिधित्व नाहीं तर करहि नाहीं " अशी गर्जना अमेरिकन लोकांनीं केली. अमळनेरची म्युनिसिपालटी खेड्यांतील जनतेवर कर बसविणार. परन्तु त्या खेड्यांतील जनतेला एका अक्षरानें विचारलें का ? खेड्यांतील जनतेचे प्रतिनिधी का म्युनिसिपालटींत असतात ? त्यांची बाजू कोण मांडणार, त्यांना न्याय कोण देणार ?

एक दिवस उजाडतो व खेड्यांतील लोकांवर बॉंबगोळा पडतो. हा कराचा बांबगोळा पडतो. जे खेडयांतील शेतकरी अंमळनेरच्या सर्व शहरास पोसतात, त्यांच्यावर आणखी कर बसविणें ही अन्यायाची परमावधि आहे. अंमळनेरचे दलाल, सावकार, व्यापारी, कारखानदार, वकील, सारे खेड्यांवर पोसतात. त्या खेडयांचा अंत पाहूं नका.

अशा रीतीनें शहराच्या सुखसोयी करा व तिकडे शेतकऱ्याला नाहींसा करा. शेतकरी मेला तर अंमळनेरा, तूं कोणावर जगणार ?

शेतकऱ्या ! तुझी कोणी दाद घेणार नाहीं. तुझ्यावर कितीहि कर बसविले तरी तूं रागावणार नाहींस असेंच सारे समजतात. अंमळनेरच्या म्युनिसिपालिटीचे प्रमुख चालक वर सरकारकडे गेले असतील व म्हणाले असतील " शेतकरी रागावणार नाहीं. आणा दोन आण्यांचा तर प्रश्न. असंतोष माजणार नाहीं." मिळाली परवानगी.

आज आपण आपला असंतोष जगजाहीर करूं या. मंत्रिमंडळापर्यंत असंतोषाच्या लाटा जाऊन आदळूं दे. शेतकऱ्यांच्या दृढनिश्चयापुढें कायदे सारे बदलले पाहिजेत. शेतकऱ्याची सादिच्छा म्हणजे हिंदुस्थानचा कायदा झाला पाहिजे. शेतकऱ्याच्या जीवावर पोसणारीं सारीं बांडगुळें आज शेतकऱ्याला मातींत मिळवूं पहात आहेत. या बांडगुळांच्या शब्दांना मान ! खेडयांना किती छळणार, पिळणार, लुटणार ? अंमळनेरा, हा अन्याय दूर कर.

टोलटॅक्सचें अंमळनेर म्युनिसिपालिटीला उत्पन्न मिळणार सोळा हजार रुपये. परंतु सरकारला कर्जफेडीसाठीं दाखविणार पांच हजार रुपये ? जें सव्वा लाखाचें कर्ज म्युनिसिपालिटी काढीत आहे, त्याच्यासाठीं टोलटॅक्सचें

सर्व उत्पन्न लाविलेलें नाहीं. पांच हजार कर्जफेडीसाठीं, अकरा हजार इतर खर्चासाठीं ! म्हणजे वीस वीस वर्षें कर्जफेड व्हावयाला नको व टॅक्स कधीं जावयाला नको.

एकीकडे गटारांसाठीं म्युनिसिपालिटी कर्ज काढते व त्यासाठीं खेड्यांतील शेतकऱ्यांच्या मानेवर दगड ठेवते. गटारांसाठीं एक कर्ज काढलें, तर उद्यां रस्ते डामरी करण्यासाठीं आणखी कर्ज काढण्यांत येणार आहे असें ऐकतों. टोलटॅक्सच्या सोळा हजार उत्पन्नांतील पांच हजार ड्रेनेजच्या कर्जासाठीं, पांच हजार डामरी रस्त्याच्या कर्जासाठीं, उरलेलें पांच हजार आणखी तिसऱ्या एखाद्या कर्जासाठीं ! शेतकरी लुटा व कर्ज काढा !

आज खानदेशचें तोंड उजळ होत आहे. श्री सखाराम महाराजांचा अंमळनेर तालुका उभा राहिला आहे. अंमळनेरच्या म्युनिसिपालिटीचें पाहून जळगांव म्युनिसिपालिटीनें चावटपणा सुरू केला. परवां भुसावळ असेंच करील. अंमळनेर तालुक्यानें या अन्यायाला मान तुकविली, म्हणून साऱ्या तालुक्यांच्या बोकांडीं हा कर बसणार आहे. यासाठीं अंमळनेर तालुक्यावर जबाबदारी आहे. ती अंमळनेर तालुक्यानें उचलली पाहिजे.

खेड्यांतील शेतकऱ्याजवळ आज रोख एक दिडकी नसते. अंमळनेरची यात्रा यंदा किती मंदावली होती ! निःसत्त्व झालेले शेतकरी यात्रेंत कशाला येतील ? टरबुज, खरबूज घ्यावयास दिडकी नाहीं, मुलाला खेळणें घेऊन देण्यासाठीं पैसा नाहीं. यात्रा कशाला भरेल ? यात्रा भरायला हव्या असतील तर शेतकरी सुखी केला पाहिजे.

गाडींतील शेतकऱ्याजवळ टोलटॅक्सला पैसे नसले म्हणजे नाकेवाले त्याची छत्री हिसकावतात. दुसर गाडीची सोडून घेऊं लागतात, पागोटें गहाण ठेव म्हणतात ! शेतकऱ्याच्या अब्रूचे कोण हे धिंडवडे, कोण हा शेतकऱ्याचा अपमान !

अमळनेर तालुक्यांतील तरुणांनो उठा ! अमळनेर तालुक्यांतील मायबहिणींनो उठा ! अमळनेर तालुक्यांतील सर्व शेतकऱ्यांनो, उठा ! हा अन्यायी कर दूर करावयास उठा. आज एकदां तुम्ही जिंकलेंत म्हणजे दुसरे अन्याय दूर करावयासहि तुमच्यांत ताकद येईल. आपण संघटित होऊन कांहीं करूं

शकतों हा आत्मविश्वास एकदां अंगीं बाणला म्हणजे मग शेतकरी सर्व जगास भारी होईल. छळणाऱ्या सर्व सत्तांना तो दूर करील.

—२३ मे, १९३८.

## दोन व्याख्यानें १७

" मित्रांनो, जळगांवच्या विद्यार्थिसंघानें जें हें पवित्र कार्य केलें त्याबद्दल त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत. आज़पर्यंत खेड्यांची उपेक्षा होत होती. आतां तुमच्याकडे डोळे लागले आहेत. तुम्ही राष्ट्राचीं मुळें. तुम्ही बळकट झाल्याशिवाय सारें फुकट आहे. तुम्ही धान्य देतां. तुम्हांला ज्ञान द्यावयास कृतज्ञतेनें हे नागर तरुण आले आहेत. शहरें व खेडीं जवळ आलीं तर राष्ट्रपुरुष जिवंत होईल. साक्षरताप्रसार करणाऱ्यास कोणी टिंगल करीत विचारतात, 'शिकून का आतां मामलेदार मुन्सफ होणार?' आपण केवळ नोकरीसाठीं शिकावयाचें नाहीं. आपण माणसें आहोंत म्हणून शिकावयाचें. आपला संसार सुखाचा व्हावा, म्हणून शिकावयाचें. पदोपदीं शिकण्यावाचून आपलें अडतें. पत्र लिहितां येत नाहीं, आलेलें पत्र वाचतां येत नाहीं. मनीऑर्डर करतां येत नाहीं, अर्ज लिहितां येत नाहीं, हिशेब ठेवतां येत नाहीं. सारी फजीति होते. अज्ञानामुळें आपण नाडले जातों. पत्र लिहिणाराला दे पैसा. अर्ज करणाराला दे आणा. असें चालतें. त्याचप्रमाणें आपणांस जगांतलि इतर लोक काय करीत आहेत, आपल्या देशांत काय चाललें आहे हें कळलें पाहिजे. नाहीं तर म्हणाल गांधींनीं व्यापार बुडावला, कांग्रेस महारमांगांना मंदिरांत घुसवते. मंदिरप्रवेशबिल म्हणजे काय? 'मंदिराच्या पंचांनीं किंवा ट्रस्टींनीं जर हरिजनांस मंदिर खुलें करण्याचें ठरविलें तर सरकारची आडकाठी नाहीं.' असें तें बिल आहे. यांत कोणती सक्ति आहे, कोणावर जुलूम आहे? परंतु एखादा सनातनी वाचाळपंडित येतो व कांहींतरी बडबडतो. तुम्हांला खरें वाटतें. प्रत्यक्ष वाचून पहा. त्यासाठीं शिका म्हणजे खरें खोटें कळूं लागेल. समर्थ

सांगत, 'दिसामाजी कांहींतरी तें लिहावें, प्रसंगीं अखंडीत वाचीत जावें.' रोज लिहा व वाचा. नवाकाळ, लोकशक्ति, कॉंग्रेस वाचा. आजचा वेद म्हणजे आजचें ज्ञान. कांग्रेसची हकीकत कळणें म्हणजेच रामायण, महाभारत वाचणें. गांधी काय म्हणतात, जवाहीरलाल कोठें आहेत, सारें माहित पाहिजे. शिकण्यानें धैर्य येतें. एखादा वाचलेला विचार जीवनांत क्रांति घडवितो. एकदां मी एक गोष्ट वाचली होती. तुरुंगांत एक राजकीय कैदी होता. त्याला फाशी देणार होते. जेलरची मुलगी फांसावर जाणारा कोणत्या मनःस्थितींत असतो तें पहावयास गेली. तो कैदी शांत होता. त्याच्या तोंडावर दिव्य तेज होतें. ती मुलगी म्हणाली, 'पहा तो तुमच्या खिडकीसमोर तुम्हांला फांशी देण्यासाठीं वधस्तंभ उभारण्यांत येत आहे. उद्यां सकाळीं तेथें फांसावर चढवतील. तुम्हांला त्याचें काहीं वाटत नाहीं? तुमच्या डोळ्यांत अश्रु नाहीं, मुखावर खिन्नता नाहीं, प्रेतकळा नाहीं. तुमचें तोंड कमळाप्रमाणें फुललें आहे. हा काय चमत्कार आहे?' तो कैदी म्हणाला, 'जगाची सेवा करतांना आलेलें मरण म्हणजे मेजवानी आहे; मरण म्हणजे अमृताचा जीवनदायी पेला आहे' ती मुलगी म्हणाली 'असें तुम्हांला कोणी शिकविलें?' हातांतील पुस्तक पुढें करून तो म्हणाला 'या लहान पुस्तकानें.' ती म्हणाली, 'मला केव्हां बरें अशीं पुस्तकें वाचतां येतील? बाबा तर शिकूं नको म्हणतात. मी केव्हां शिकेन, अशीं पुस्तकें केव्हां वाचीन?'

मित्रांनो, साक्षरतेनें संसार सुखाचा कसा करावा तें कळेल. साक्षरतेनें तुम्ही फसविले जाणार नाहीं, साक्षरतेनें भय जाईल; साक्षरतेनें अक्षर व शाश्वत सुखहि मिळवाल. संतांनीं संस्कृतांतील सारें ज्ञानभांडार तुमच्या मराठी बोलींत आणलें. मराठी भाषेंत मंगल विचारांचा सुकाळ करण्यासाठीं श्री. ज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरी लिहिली. संतांनीं मराठींत लिहिलें. तें लिहिलेलें वाचावयास कोणी शिकवायचें ? आज जे शिकवितील ते संतांचें काम पुढें चालविणारे आहेत असें मला वाटतें.

जगाच्या पाठीवर हिंदुस्थानच एक असा अभागी देश आहे, जेथें अद्याप शेंकडा ८५ लोक निरक्षर आहेत. स्त्रियांना शिक्षणाचा गंधच नाहीं. थोर कविसम्राट रवींद्रनाथ ९ वर्षांपूर्वी रशियांत गेले होते. तेथें ७५ वर्षांच्या

म्हाताऱ्या बायका ७ वर्षांच्या मुलीबरोबर शिकत होत्या. त्या बाया रवींद्रनाथांना म्हणाल्या, "तुमच्या हिंदुस्थानांत स्त्रिया सुशिक्षित आहेत कीं नाहींत?" रवींद्रनाथ म्हणाले, "माझ्या देशाची मान खालीं आहे. पुरुषहि जेथें शेंकडा ८० निरक्षर आहेत, तेथें स्त्रियांची गोष्ट काय सांगू?" त्या रशियन बायका मग म्हणाल्या, "आम्हीं हिंदुस्थानांत येऊन तुमच्या आयाबहिणींना, लेकीसुनांना शिकवूं." हिंदुस्थानांतील स्त्रियांना का रशियन भगिनींनीं येऊन शिकवायचें? इंग्लण्डमधून मार्गरेट ई नोबेल या भगिनी निवेदिता होऊन बंगालमधील मुलींना शिकवितां शिकवितां मेल्या. मिराबेन आज महात्माजींच्या शिष्या होऊन खेड्यांची सेवा करीत आहेत. परदेशांतील नरनारींनीं येऊन आमची सेवा करावी, आम्हीं काय करीत आहोंत?

स्त्रियांनाहि शिकूं दे. बार्डोलींत जेव्हां झगडा चालू होता, तेव्हां त्या झगड्यांत स्त्रियांनींहि शर्थ केली. त्याचें कारण काय? ज्या ज्या वेळेस सरदार वल्लभभाई सभा घेत तेव्हां ते आधीं म्हणत "स्त्रिया घेऊन या. ज्या सभेंत आयाबहिणी नाहींत तेथें मी बोलणार नाहीं. पुरुष तुरुंगांत गेल्यावर स्त्रिया झगडा चालवतील. त्यांच्या कानांवर विचार गेले पाहिजेत." अशा रीतीनें बार्डोलींतील स्त्री-पुरुष लढावयास सिद्ध झाले.

ज्ञानाची टिंगल करूं नका. नोकऱ्या थोड्याच मिळणार आहेत असें म्हणूं नका. सर्वजण साक्षर व्हा. तेजस्वी स्वातंत्र्याच्या चळवळीचें मर्म जाणा. फसूं नका. जगांत काय चाललें आहे तें वाचा. तुम्हांला ही शक्ति यावी म्हणून ज्या विद्यार्थ्यांनीं सुट्टीचे दिवस तुमच्यांत काढले, तुमच्यासाठीं जे झटले, त्यांचें मी अभिनंदन करतों."

* * *

"बंधूनो! तुम्हांला काँग्रेसमध्यें या असें म्हटलें म्हणजे तुम्हीं अनेक शंका काढतां. कोणी म्हणतात, काँग्रेसनें भाव घटविले. भाव ठरविणें हें काँग्रेसच्या हातांत नाहीं. जगांतील परिस्थति त्याला कारण असते. तसेंच इंग्लंडांतील शिलिंगाशीं आमच्या रुपयाची जी किंमत ठरते त्यावरहि हें अवलंबून असतें. हल्लीं रुपयाची किंमत १८ पेन्स आहे. म्हणजे काय? आपणांस रुपया देतात व १८ पेन्सांचा म्हणजे अठरा आण्यांचा माल नेतात. वर रुपयामागें आपलें दोन आण्यांचें नुकसान होत आहे,

परंतु सरकार कांहीं करीत नाहीं. हुंडणावळीचा भाव बदलला तर आतां भाव वर चढतील. म्हणून कॉंग्रेसला शिव्या नका देऊं. कॉंग्रेसला जें आज करतां येत नाहीं, तें करतां यावें म्हणून कॉंग्रेसमध्यें या. उगीच खोट्या कंड्यांना बळी नका पडूं.

कोणी म्हणतात, कॉंग्रेस सबगोलंकार करिते. कॉंग्रेस सबगोलंकार नाहीं करीत. ती माणुसकीनें वागा सांगते. सार्वजनिक ठिकाणीं सारे समान व्हा असें तिचें सांगणें आहे. ज्यांना ज्यांना विहिरीवर पाणी भरूं देतां, ओटीवर घेतां, त्यांच्याशीं का एकदम लग्नें लाविलींत? मग हरिजनाला ओटीवर घ्या, विहिरीवर येऊं दे असें म्हणतांच असे चावट प्रश्न कां करतां? संतांनीं केलें तें कॉंग्रेस करीत आहे. शास्त्रीपंडित गादीमहाराज समाज बुडवितात; संत तारतात. ज्ञानबातुकाराम म्हणून तुम्ही टाळ कुटतां. खरोखरच त्या टाळांखालीं माझे संत तुम्ही चिरडीत असतां. 'वंदीन मी भूतें। आतां अवघींचीं समस्तें' अशा घोषणा करणाऱ्या संतांना तुम्ही ठार मारीत आहांत. संतांचा खरा माणुसकीचा धर्म ओळखा. 'या रे या रे अवघेजण' अशी त्यांनीं हाक मारली. त्यांनीं फक्त वरच्या वर्गांना हांक मारली? 'अवघाची संसार सुखाचा करीन' असें संत म्हणत. केवळ ब्राह्मणाचा नाहीं, मराठ्याचा नाहीं. सर्वांचा संसार. आज कांग्रेस सर्वांचा संसार सुखाचा करूं इच्छीत आहे सर्वांना रहायला घर, सर्वांना पोटाला भाकर व मनाची भाकर—धान्याची भाकर व विचाराची भाकर, सर्वांना पोटभर खायला, अंगभर ल्यायला असावें म्हणून कांग्रेस मरत आहे. कांग्रेसला कोणी दीनवाणा नको, कोणी अरेराव नको. हिंदु, मुसलमान, शेतकरी सावकार, कारखानदार कामगार, स्पृश्यास्पृश्य—सर्वांना सुखानें नांदवावयाची पराकाष्ठा कांग्रेस करीत आहे. स्वराज्य म्हणजे सर्वांचें राज्य. कोणावर जुलूम नाहीं, कोणाचा अपमान नाहीं. उद्यां स्वराज्य मिळाल्यावर हरिजनांना का पुन: कोल्ह्याकुत्र्याप्रमाणें ठेवणार आहांत? हरिजन म्हणतील 'मग इंग्रज बरा.' हरिजनांना खात्री वाटली पाहिजे कीं आपण स्वराज्यांत माणसांप्रमाणें नांदूं. ते पहा हरिजन जरा दूर बसून ऐकत आहेत. माझें हृदय तडफडत आहे. तुम्ही कुत्र्याला थोपटीत बसाल. मांजरें कुरवाळाल. पेरूची फोड स्वत:च्या तोंडांत धरून

पोपटाच्या लाल चोंचींत द्याल. परंतु माणसाला दूर ठेवाल. हरिजन तुमचे पाय सांभाळतात. जोडे शिवून देतात, मोटा शिवून देतात. त्यांना हें बक्षिस? कृतघ्न झालेत हजारों वर्षें त्यांचीं फळें भोगा. म्हणे शिवाजीनें अस्पृश्यता राखून नाहीं का स्वराज्य मिळविलें? परंतु बाबा तें गेलें. कां गेलें? तुमचे हजार भेद. तुमचीं श्रेष्ठकनिष्ठपणाचीं भांडणें. प्रभुप्रकरणें, ब्राह्मण्य-प्रकरणें, गोमूत्र-प्रकरणें, प्रायश्चित्त-प्रकरणें यांना ऊत आला. अशा करंट्यांना स्वराज्य मिळत नसतें.

हरिजनांना जवळ घ्या. ओटीवर बसवा. त्यांना पानसुपारी द्या. त्यांना विहिरीवर येऊं दे. मंदिरांत येऊं दे. हा खरा संतांनीं आचरलेला धर्म आहे. त्या धर्माची कॉंग्रेस सेवा करीत आहे. कॉंग्रेसला पवित्र माना.

शारदाबिलामुळेंहि कॉंग्रेसवर तुम्ही रागावतां. जर तुम्ही खरे शेतकरी असाल तर तुम्ही शारदाबिलाचें स्वागत कराल. शेतकरी आंब्याच्या रोप्याला लौकर आलेला मोहोर खुडून टाकतो. आंब्याला लौकर फळें लागलीं तर त्याची नीट वाढ होणार नाहीं हें त्याला कळतें. तसेंच संन्यासंसंव्याचें. ज्वारीचें ताट लहान आहे तोंच पसवलें तर तें उंच वाढत नाहीं. हें सारें तुम्ही पहातां ना? शारदाबिलांत तेंच आहे. पुराणांत वर्णिलेल्या आंगठ्याएवढ्या वालखिल्य ऋषीप्रमाणें व्हावयाचें नसेल तर शारदा बिल पाहिजे. समाजावर परिणाम शेंकडों वर्षांनीं दिसतो. शेंकडों वर्षांच्या बालविवाहाचीं फळें आज दिसत आहेत. आज जर पुन्हां प्रौढविवाह सुरू करूं तर त्याचे सुपरिणाम कित्येक वर्षांनीं दिसतील. शारदा बिल वेदानुसारी आहे. सीता का दोन वर्षांची होती? द्रौपदी, दमयंती, सावित्री का बाहुल्या होत्या? वेदांतील विवाहमंत्रांत वधूला उद्देशून म्हटलें आहे "घराची धनीण हो. सासूबाई आतां बसतील." आठ वर्षांची मुलगी का धनीण होईल? सारा चावटपणा आहे. शहरांतील कांहीं सनातनी आपल्या मुली शिकवितात आणि तुमची मात्र दिशाभूल करतात. या शहरी सनातन्यांच्या मुली चांगल्या प्रौढ झाल्यावर विवाहित होतात, तुमची मात्र फसवणूक. शेतकरी म्हणतात "आमच्या मुली कामावर जातात. तेथें त्यांचा कोण सांभाळ करणार?" असें बोलूं नका. खंबीरपणा उत्पन्न करा. मुलांना तेजस्वी बनवा. पावित्र्याचा प्रचार केला पाहिजे. आपण का डुकरें आहोंत?

कुत्रीं मांजरें आहेत? मुलीच्या शरीराची वाढ १८ वर्षेपर्यंत होत असते. तर चौदाव्या वर्षी तिला मूल स्वतःचें सांभाळावें लागतें. जिचें खेळण्याचें, उड्या मारण्याचें वय, तिला स्वतःचें लेंकरूं खेळवावें लागतें. अरेरे. नका हें पाप करूं, शारदाबिल पवित्र आहे. तो वेदानुकूल आदेश आहे.

खोट्या कल्पनांना बळी पडूं नका. कांग्रेसचें खरें स्वरूप ओळखा. सध्यां आपलें मंत्रिमण्डळ आहे. निर्भय व्हा. स्वतःच्या दुखाःच्या दूरीकरणार्थ चळवळ करा. कांग्रेसच्या झेंड्याखालीं लाखोंनीं सभासद होऊन या. खान-देशांत या वर्षी एक लाख सभासद करा. कांग्रेसचे कोट्यवधि सभासद झाले म्हणजे तिचा आवाज कोण दडपील? महात्माजी म्हणतात 'हा गव्हर्नर नको.' तें ऐकलें जातें. कां? तुम्हीं पाठिंबा दिलात म्हणून. सरदार वल्लभ-भाई म्हणत आहेत "लष्करी खर्च कमी करा. नाहींतर पेंचप्रसंग निर्माण होईल." तुम्हीं कांग्रेसच्या पाठीमागें याल तर सरकार ऐकेल. राष्ट्रपति सुभाषचंद्र म्हणाले, "रुपयाची किंमत सोळा पेन्स करा म्हणजे भाव वाढतील." व्हॉइसराय साहेब म्हणतात, 'आम्ही करणार नाहीं.' अठरा आण्यांचा माल घेऊन आम्ही सोळा आणेच देणार. राष्ट्रपतींचा हा अपमान कां? तुम्ही कांग्रेसमध्यें सामील होत नाहीं म्हणून. स्वतःचा संसार कांहीं तरी केल्याशिवाय सुधारणार नाहीं. झगड्यांत सामील व्हा. तमास-गिरांसारखे दूर राहूं नका. खोट्या शंका फेका. 'हे गांधींचे लोक, ही कांग्रेस' असें नका म्हणूं. कांग्रेस तुमची आहे. तुम्ही तिला वाढवा. म्हणजे ती सुखाचा सुकाळ करील. दर वर्षी स्त्री पुरुष सारे सभा-सद व्हा. निवडणूक आली तर प्रत्येक मत कांग्रेसला द्या, चळवळ आली तुरुंगांत चला. लष्करी कायदा पुकारला तर गोळीसाठीं छाती फुगवून पुढें करा. ज्याला जेवढें जमेल तेवढें करावें. परन्तु कांहीं तरी करा म्हणजे स्वातंत्र्य जवळ येईल."

—२० जून, १९३८.

# महाराष्ट्रा ऊठ ! १८

जगांतील परिस्थिति झपाट्यानें बदलत आहे. स्पेनचें लोकसत्तात्मक सरकार त्रस्त झालें आहे. त्यानें जाहीर केलें कीं जर आमच्या शहरांवर इटलीच्या मदतीनें बंडवाले वैमानिक हल्ले करतील तर इटलीच्या शहरांवरहि आम्ही वैमानिक हल्ले करूं. मुसोलिनीच्या रोम शहरावर बॉंब टाकूं. स्पॅनिश लोकांच्या या घोषणेला मुसोलिनीच्या सरकारनें मगरूरपणाचें उत्तर दिलें आहे. "स्पॅनिश सरकार जर इटलीवर बॉंब टाकील तर त्याला शब्दांनीं नव्हे तर तोफेच्या गोळ्यांनीं आम्ही उत्तर देऊं. किती दिवस जगावयाचें याची विवंचना रात्रंदिवस करणाऱ्या स्पॅनिश सरकारला मग घटका पळें मोजावीं लागतील." इटली व जर्मनी यांची स्पॅनिश बंडखोरांस मदत आहे. जर्मनीनें आस्ट्रिया खाल्ला आहे. इटलीनें स्पेन खावा याला जर्मनीची सहानुभूति आहे. अशा रीतीनें फ्रान्सचा सर्व बाजूंनीं कोंडमारा करण्याचा हा डाव आहे. फ्रान्स इंग्रजांच्या स्वार्थी व नेभळट धोरणामुळें स्पेनला तितकी मदत करूं शकत नाहीं. फ्रान्स व इंग्लंडला युद्धांत ओढण्यासाठीं जर्मनी व इटली तयार आहेत. परंतु आपलें बळ वाढेपर्यंत इंग्लंड सारे अपमान पोटांत घालीत आहे. इंग्लंडची तयारी झाली म्हणजे युद्धाचा वणवा पेटेल. फ्रान्सचा फारच कोंडमारा होत आहे. फ्रान्सला इंग्लंडची मैत्री तोडतां येत नाहीं. रशियाशीं तह केलेल्या फ्रान्सबद्दल तितकीशी सहानुभूति इंग्लंडला नाहीं. रशिया व इंग्लंड यांच्यामध्यें फ्रान्स लोंबकळत आहे.

जगांत युद्धाचा वणवा पेटल्याशिवाय रहात नाहीं. त्या वेळेस हिंदुस्थानांत प्रबळ संघटना हवी. आज सारी शक्ति संघटना करण्यांत ओतली पाहिजे. तिकडे संयुक्तप्रांतांत पहा. महान् संघटना त्यांनीं आरंभिली आहे. पांच लाख कॉंग्रेसचे स्वयंसेवक ते तयार करणार आहेत. कशी आहे प्रतिभा, केवढें आहे संकल्पबळ ! अचाट योजना हातीं घ्याव्या व त्या पार पाडण्यासाठीं मरणांतिक श्रम करावेत. संयुक्तप्रांत कॉंग्रेस कमिटी एक

काँग्रेसचें वर्तमानपत्र सुरू करणार आहे. हें वर्तमानपत्र विमानद्वारा सर्वत्र पाठविलें जाईल. गांवोगांव अंक टाकले जातील. अशा रीतीनें विचारप्रसार व संघटना या दोन्ही कामांस संयुक्त प्रांतानें हात घातला आहे.

अशी संघटना आपल्याकडे कधीं होणार? संयुक्तप्रांतांत ५ लाख स्वयंसेवक, तर महाराष्ट्रांत एक लाख झाले पाहिजेत. म्हणजे प्रत्येक जिल्ह्यानें दहा दहा हजार स्वयंसेवक उभे केले पाहिजेत. प्रत्येक तालुक्यानें एक हजार स्वयंसेवक तयार केले पाहिजेत.

ही का अशक्य गोष्ट आहे? कांहींहि अशक्य नसतें. तालुक्यांच्या मुख्य गांवीं २५० स्वयंसेवकांचें पथक हवें. तालुक्यांत ४०।५० तरी मोठीं गांवें असतात. त्या गांवांतून कोठें दहा, कोठें वीस असे स्वयंसेवक तयार केले पाहिजेत. स्वयंसेवक तयार करण्यासाठीं शिक्षक हवेत. एकेका गांवाला पंधरा पंधरा दिवस राहून रात्रीं तेथील तरुणांना शिक्षण द्यावें. प्रत्येक तालुक्याला असे स्वयंसेवक तयार करणारे दोन तरी शिक्षक हवेत. त्या शिक्षकांना पोटापुरता पगार दिला पाहिजे. स्वयंसेवकांना पोशाख दिले पाहिजेत. या सर्व गोष्टी कशा होणार?

संयुक्तप्रांतांत एवढा उत्साह कां आहे? तेथें शेतकऱ्याच्या दुःखांना, कामगारांच्या दुःखांना, अधिक जिव्हाळ्यानें सहानुभूति दाखविली जाते. संयुक्तप्रांतीय कॅांग्रेसकमिट्यांना समाजसत्तावादाचा थोडा वास आहे. हा सुवास सर्वत्र दरवळत जातो व संघटनेला मदत होते. कॅांग्रेसच्या स्वयंसेवकांत विद्यार्थीच तेवढे दिसावे का? प्रौढ लोक कां नकोत? सारे शेतकरी, कामकरी स्वयंसेवक होतील. शेतांत काम करतील, इकडे झेंडा नाचवतील. शाळेंतील दोन सुशिक्षित विद्यार्थी किती पुरे पडणार? जर्मनींत, इटलींत का विद्यार्थीच स्वयंसेवक असतात? सारी जनता स्वयंसेवक बनते. पेशावरच्या लाल डगलेवाल्यांत का विद्यार्थीच आहेत? गांवोगांवचे शेंकडों शेतकरी त्या संघटनेंत आहेत.

कांग्रेसचें स्वयंसेवकदल खेडयापाडयांतून उभारलें पाहिजे. खेडयांतील लोकांचीं सुखदुःखें दूर करण्यासाठीं आधीं उठलें पाहिजे. म्हणजे शेतकरी तुमच्या झेंडयाखालीं येतील. आनंदानें गाणीं म्हणूं लागतील.

जे प्रचारक नेमावयाचे ते सेवक हवेत. ते गांवें स्वच्छ करतील. रात्रीं

ड्रिल शिकवतील. लोकांना कांग्रेसचा व जगाचा इतिहास शिकवतील. असे प्रचारक हवेत. परन्तु या प्रचारकांना पगार कोण देणार ?

आपणच यासाठीं सर्वस्व दान करावयास उठलें पाहिजे. कांग्रेसला वाढवूं इच्छिणारांनीं दर महिना आपल्या उत्पन्नाचा दशांश कांग्रेस कामाला दिला पाहिजे. ज्याचें महिन्याला पांचशें रुपये उत्पन्न असेल त्यानें ५० रुपये दिले पाहिजेत. ज्याचें महिन्याला पांच रुपये उत्पन्न असेल त्यानें आठ आणे दिले पाहिजेत. स्वराज्य म्हणजे थट्टा नाहीं. स्वराज्य म्हणजे अपरंपार त्याग. कांग्रेसच्या लोकांनीं आधीं असें उदाहरण घालून दिलें पाहिजे. अशा पैशांतून ही संघटना उभी करावयाला हवी.

कांग्रेसचें प्रचंड स्वयंसेवकदल उभारून त्याच्या मिरवणुका काढल्या पाहिजेत. त्या मिरवणुकींचा जनतेवर इष्ट तो परिणाम होतो. कांग्रेस खरा राजा आहे, कांग्रेस आतां सरकार शोभतें असें लोकांना वाटूं लागतें. खेड्यांतील कांग्रेस पाहून जनतेवर हीच छाप पडते. हरिपुराचे ७।८ हजार स्वयंसेवक पाहून शेतकरी म्हणत 'हाऊ राजा शे.' फैजपूरला सारी व्यवस्था स्वयंसेवक ठेवीत होते व पोलीस बाहेर रस्त्यावर असत. याचा फारच नैतिक परिणाम जनतेवर झाला. लोक आपल्या गांवीं गेल्यावर पोलीसांस म्हणत, 'तेथें तुम्ही तर रस्त्यांत धूळ खात होतेत; कारभार तर कांग्रेसचे स्वयंसेवक व स्वयंसेविका पहात होत्या.' या सर्व गोष्टींनीं वातावरण तयार होतें. आणि वातावरण तयार करावयास कितीहि किंमत पडली तरी ती कमीच असते.

संयुक्त प्रांताच्या प्रमाणांत महाराष्ट्रांत एक लाख तर खानदेशांत दहा हजार स्वयंसेवक हवेत. परंतु या वर्षीं निम्मेंच काम करूं या. पाच हजारांचा तरी संकल्प करूं या. १९३९ च्या जानेवारी २६ च्या स्वातंत्र्य-दिनाच्या दिवशीं जळगांव शहरीं खानदेशांतील पांच हजार स्वयंसेवकांची परेड झाली पाहिजे. किंवा त्या त्या तालुक्याचे ठिकाणीं पांचशें स्वयं-सेवकांची कवाईत झाली पाहिजे. एव्हांपासून या कामाला लागा.

महाराष्ट्रानें इतर प्रांतांच्या पाठीमागें राहतां कामा नये. सर्वांच्या पुढें नाहीं तर निदान सर्वांच्या बरोबरीनें तरी राहिलें पाहिजे. यासाठीं वाटेल तो त्याग करा. कोणत्याहि बाबतींत कॉंग्रेसची मान खालीं राहतां कामा नये. खानदेशाला कोणी विचारिलें "तुमच्याकडे स्वयंसेवक आहेत कीं नाहींत ?" " पांच हजार

आहेत." असें पटकन् उत्तर देतां आलें पाहिजे. परंतु असें कितीकांना वाटतें? कितीकांना अशी हौस आहे? किती या कामासाठीं सर्वस्व देतील?

—४ जुलै, १९३८.

## खरा धर्म १९

ठाणें जिल्ह्यांतील बोर्डी गांवची ही एक सत्यकथा आहे. त्या गांवांत एक टांगेवाला होता. हा टांगेवाला मुसलमान खाटीक होता. तो टांगेवाल्याचें काम करी व खाटकाचाहि धंदा करी. परंतु तरीहि कुटुंबाच्या पोषणापुरतें त्याला मिळत नसे. स्टेशनवर मोटारींची जा ये सुरू झाली. त्यामुळें टांगेवाल्यांचा धंदा बसला. खाटकाचाहि धंदा आमच्या या टांगेवाल्याला जमेना. एक तर त्याच्याजवळ पुरेसें भांडवल नव्हतें. आणि दुसरें म्हणजे त्याला त्या धंद्यांत पडावें असें वाटत नसे. नाइलाज म्हणून तो खाटीक बने. परंतु केव्हां हा धंदा सुटेल असें त्याला वाटे.

त्या खाटिक टांगेवाल्याला कर्ज होतें. हें कर्ज तो कसा फेडणार? घरांत ना पोटभर खायला, ना नीट ल्यायला. काय करील बिचारा! जें कांहीं थोडें फार उरे तें तो सावकारास नेऊन देई. सावकाराचा संताप शांत करण्यासाठीं तो पाया पडे, डोळ्यांत पाणी आणी.

परंतु एके दिवशीं सावकार फारच संतापला. "बस्स, तुझ्यावर फिर्याद करतों. किती दिवस वाट पाहायची तरी? व्याज सुद्धां तूं देत नाहींस." अशी सावकाराची संतापगाथा सुरू झाली.

"मालक, रागावूं नका. घरांतून काढूं नका. कोठें जाऊं बालबच्चे घेऊन? वडिलांपासूनचें घर. राहूं दे एवढें. दया करा" खाटिक म्हणाला.

"दया करा? हा व्यवहार आहे. व्यवहार पाहिलाच पाहिजे. धर्माच्या वेळेस दया. व्यवहारांत दया करून कसें चालेल?" तो मालक म्हणाला.

खाटिक घरीं गेला, बायको व तो दोघे विचार करीत बसलीं, कांहीं

उपाय सुचेना. लहान मूल थंडींत गारठत होतें. आईनें त्याला आपल्या पोटाशीं धरलें. शेवटीं ती नवऱ्याला म्हणाली,

" खाटकाचा धंदा जरा नीट करा ना. कंटाळून कसें चालेल ? तुम्हांला बकऱ्याची मान कापवत नाहीं, परंतु सावकार तुमची मान कापायला तयार आहे. आपल्या मुलांबाळांची उपासमार होऊं नये, तीं उघडीं पडूं नयेत म्हणून करा धंदा."

" पण धंद्यांत किती स्पर्धा ! एकदम खरेदी केलीं तर स्वस्त पडतात जनावरें. एक दोन घेणें परवडत नाहीं." तो म्हणाला.

" सावकाराजवळ आणखी कर्ज मागा. तो देईल." ती म्हणाली.

*  *  *

" तुमचें कर्ज मी फेडीन. परंतु आणखी भांडवल पाहिजे. शंभर रुपये आणखी द्या. तीनशेंचा कागद करून घ्या." खाटिक सावकारास म्हणाला.

" अशी हिंमत बाळग. इतर खाटकांना बंद पाड. किती, शंभर रुपये हवेत म्हणतोस ? हरकत नाहीं, देतों. परंतु जसजसे मिळतील तसतसे आणले पाहिजेत." सावकार म्हणाला.

" रोज रुपया आणून देईन." खाटिक म्हणाला.

" वा: छान, आतां देतों पैसे." असें म्हणून सावकार घरांत गेला.

घरांत पत्नी उभी होती. तिच्या डोळ्यांत अश्रु आले होते. तिचें तोंड काळवंडलें होतें. " काय ग, काय झालें. उपास लागला वाटतें ?" सावकारानें पुसलें.

" उपास नाहीं लागला. परंतु तुमची कसाबकरणी हृदयाला जाऊन लागत आहे. हें काय करतां आपण ? सध्यां आपले उपवासाचे दिवस. जैनधर्मांतील पर्युषण ना सध्यां सुरू आहे ? परवां महावीर जयन्ती ना झाली ? जैन धर्माचे आपण लोक. जैन धर्म अहिंसा शिकवितो. आणि तुम्हीं एका निरुत्साही खाटकाला उत्तेजन देऊन मोठा खाटिक बनवूं पहात आहांत ! काय हें ? " पत्नीच्यानें पुढें बोलवेना.

" अग हा व्यवहार आहे " तो म्हणाला.

" धर्माचा व्यवहाराशीं संबंध नसेल तर त्या धर्माला काय किंमत ? व्यवहार सुंदर व्हावा मंगल व्हावा म्हणून ना धर्म—" तिनें विचारिलें.

" मला चर्चा करावयाची नाहीं. तुम्ही बावळट बायकांनीं यांत पडूं नये–" असें म्हणून तो बाहेर आला.

तीनशें रुपयांची नवीन प्रॉमिसरी तयार होऊं लागली. त्या पवित्र सतीला तें सहन होईना. ती बाहेर आली व म्हणाली 'तुम्ही जर हें असत् कर्म थांबविणार नसाल तर माझा हा सध्यांचा उपवास कायमचा होईल.'

ते गंभीर शब्द ऐकून सावकार स्तंभित झाला. त्यानें पुष्कळ वादविवाद केला. परन्तु पत्नीचा निश्चय अभंग राहिला. तिचा ओठधर्म नव्हता. धर्माची खरी निष्ठा तिजजवळ होती. पोथींतील धर्म कृतींत यावा म्हणून तिला तळमळ होती.

" मग करूं तरी काय मी ?" त्यानें विचारिलें.

" हे पैसे त्याला द्याच. परंतु त्याला असें सांगा ' या पैशांतून तुझा टांगा तूं पुन्हां सुरू कर. पूर्वींचें कर्ज तुला माफ. हे नवीन शंभर रुपयेहि तूं फुकट घे. नीट धंदा कर. परंतु कांहीं केल्या खाटीक बनूं नको. तुला तें कार्य करवत नाहीं. चांगलें आहे. तुझा हा स्वभाव वाढूं दे.' " असें ती पतीला म्हणाली.

सावकार हतबुद्ध झाला. एकीकडे त्याला ३०० रुपये दिसत होते. परंतु दुसरीकडे पत्नीची भीषण गंभीर प्राणार्पणाची प्रतिज्ञा समोर दिसत होती. शेवटीं सत्याचा जय झाला. त्यानें त्या खाटकाला शंभर रुपये दिले. " मी खाटकाचा धंदा कधीं करणार नाहीं." असें त्याच्याकडून लिहून घेतलें. पूर्वींचें कर्ज माफ झालें.

तो टांगेवाला भरल्या अंतःकरणानें निघून गेला. त्यानें पुन्हां टांगा सुरू केला. आज त्याचा टांगा चांगला चालला आहे. सर्व गांवभर ती गोष्ट पसरली. सतीची स्तुति सर्वजण करूं लागले. खाटकाचा धंदा सोडण्याची इच्छा करणाऱ्या त्या टांगेवाल्याचा टांगा लोक मुद्दाम बोलावतात. त्याचीं मुलेंबाळें सुखी आहेत.

हल्लीं जैनांचे उपवास सुरू आहेत. सर्व जैन जमीनदार सावकार कारखानदारांनीं ही गोष्ट ध्यानांत आणून सभोंवतालचा संसार प्रेममय व आनंदमय करण्याची शर्थ करावी; दुसरें काय ?

—५ सप्टेंबर, १९३८.

## मुख्य गोष्ट

२०

देशभक्ति, धर्मप्रीति, मातृभक्ति वगैरे अनेक शब्द आपण ऐकतों. अमुक मनुष्य मोठा देशभक्त आहे, मातृभक्त आहे, धर्मभक्त आहे असें आपण म्हणतों. याचा खरोखर खोल पाहिलें तर काय अर्थ असतो ?

मी माझ्या आईवर प्रेम करतों. मी मातृमहिमा ओळखतों. मी जर मातृमहिमा खरोखर ओळखीत असेन तर सर्व मातांना नमस्कार करीन. कोणत्याहि मातेचा मी उपमर्द होऊं देणार नाहीं. माझ्या आईच्या सुखासाठीं दुसऱ्या आईला जर धुळींत मिळवूं इच्छीन तर मातृमहिमा मी यथार्थपणें ओळखला असें म्हणतां येणार नाहीं. माझ्या मातृभक्तीनें इतर मातांचाहि सन्मान करावयास मी शिकलें पाहिजे.

तसेंच धर्माचें. आईच्या दुधावर आपला देह पोसतो. त्याप्रमाणेंच धर्मांतील सद्विचारांच्या दुधानें आपलें हृदय व बुद्धि यांचें पोषण होतें. माझा धर्म मला पूज्य, तसाच त्याचा धर्म त्याला पूज्य. मी माझ्या धर्माचा खरा भक्त असेन, तर दुसऱ्याच्या धर्माबद्दलहि आस्था ठेवीन. दुसऱ्याच्या धर्माची टिंगल करणाऱ्यास धर्माचें महत्त्व समजलें नाहीं. इतर धर्माविषयींहि सहानुभूति व सद्भाव दाखवावयास जो शिकला त्यालाच स्वतःच्या धर्माविषयीं खरें प्रेम आहे असें समजावें

तसेंच देशभक्तीचें. मी माझ्या देशावर प्रेम करतों. त्याचा अर्थ मी इतर देशांचा द्वेष करणें असा नव्हे. माझा देश मला प्रिय व पूज्य. तसा त्याचा देश त्याला प्रिय व पूज्य. त्याच्या भावना माझ्यावरून मी ओळखल्या पाहिजेत. भारताचा भक्त दुसऱ्या देशाचा द्वेष करणार नाहीं. इंग्लंडवर प्रेम करणारा जर हिंदुस्थान धुळीला मिळवतील, तर ती खरी इंग्लड देशाची भक्ति होणार नाहीं.

उपनिषदांत दोन महावाक्यें आहेत. 'तत् त्वमसि व अहं ब्रह्मास्मि' मीहि ब्रह्म आहें व तूंहि ब्रह्म आहेस. मीहि चांगला, तूंहि चांगला. माझा धर्म मला भला, तुझा तुला भला. माझा देश मला प्यारा, तुझा

तुला. एकमेकांच्या भावना आपण सांभाळूं या. शत्रूचें निशाण हातांत सांपडलें तर द्वेषानें तें अपमानूं नये. १९०४–५ मधील रूसो–जपानी युद्धांत रशियाचीं जिंकून घेतलेलीं निशाणें जपानी शिपायांनीं फाडलीं नाहींत, अवमानिलीं नाहींत. लढाई असेल. परन्तु निशाण म्हणजे सारी जनता, सारें राष्ट्र. त्याचा अपमान नाहीं कोणी करतां कामा. खऱ्या भक्तीचा हा जर अर्थ आपण लक्षांत घेऊं तर मग देशभक्ति, धर्मप्रीति ही मारक न होतां सर्वांस तारक होईल. परन्तु हें कोण करणार?

—५ सप्टेंबर, १९३८.

## सेनापति २१

सेनापति बापटांची एक विशेष भूमिका आहे. ते पक्षातीत आहेत. स्वातंत्र्यासाठीं कोणीहि उठो, त्याला ते नांवें ठेवणार नाहींत. इतक्या अभेदाच्या भूमिकेवरून स्वातंत्र्याचें रणशिंग फुंकणारा पुढारी फारसा आढळत नसतो. ते दोष दाखवतात, परंतु तिटकारा करीत नाहींत. ते कम्युनिस्ट बंधूंत जातात परंतु म्हणतात "वर्गयुद्धांत श्रीमंत तेवढे वाईट व श्रमणारे सारे चांगले असें म्हणतां तें मला मान्य नाहीं. श्रीमंतहि सात्त्विक असतील व श्रमणारेहि नाठाळ असतील." त्यांना अमुक एक वर्ग तमुक पंथ असलें कांहीं नाहीं. असा हा तेजस्वी अवलिया महाराष्ट्राच्या पुण्याईनें महाराष्ट्रांत वावरत आहे.

हैदराबादमध्यें स्टेट कॉंग्रेसनें सत्याग्रह सुरू केला आहे. बाहेरच्या सत्याग्रहींची जरूरी नाहीं, असें त्या कॉंग्रेसच्या अध्यक्षांनीं जाहीर केलें आहे. त्यांचें करणें त्यांच्या दृष्टीनें योग्य आहे. आपली भूमिका स्वच्छ ठेवण्यासाठीं त्यांनीं तसें पत्रक काढणें उचितहि होतें. केवळ बाहेरच्या लोकांच्या चिथावणीनें आंतील जनतेनें ही चळवळ सुरू केली नसून संस्थानांतील जनतेच्या हृदयांतून निघालेली ही स्वयंभू चळवळ आहे, हें त्यांना दाखवावयाचें होतें. त्यांचें कर्तव्य त्यांनीं केलें पाहिजे.

सेनापतींनीं ही गोष्ट जनतेला समजून दिली आहे. त्यांनीं पत्रक काढून

सत्याग्रह सुरू ठेवलाच पाहिजे असें पटवून दिलें आहे. सेनापतींच्या पाठी-मागें अवघ्या महाराष्ट्रानें उभें राहिलें पाहिजे. सेनापतींचा वाढदिवस साजरा करण्यांत आला. परंतु सेनापतींच्या पाठीमागें सेना उभी राहणार नसेल तर हे वाढदिवस काय कामाचे ?

आपण विवेचना करीत बसण्यांत अर्थ नाहीं. हृदय उचंबळून आलें म्हणजे माणूस चर्चा करीत बसत नाहीं. स्वातंत्र्याचा संग्राम हैदराबादमध्यें सुरू झाला. या वार्तेनें आम्ही नाचूं लागलें पाहिजे. व तेथें नाचत गेलें पाहिजे. महाराष्ट्र नेहमीं चर्चा करीत बसतो. कार्याची वेळ येतांच सारा उत्साह मेलेला असतो.

जुन्या इतिहासाचे पोवाडे गाण्यांतच आमचा पुरुषार्थ उरला आहे. सरदार वल्लभभाई एकदां म्हणाले, " गुजराथला जुना भव्य दिव्य इतिहास नसेल तर गुजराथनें नवीन दिव्य इतिहास बनविला पाहिजे ! " गुजराथ नवीन अहिंसक इतिहास रचीत आहे. बार्डोलीनें तेजस्वी इतिहास लिहिला. रासगांव स्वातंत्र्यांतील क्षेत्र बनलें. बोरसद तालुक्यानें नांव मिळविलें. आतां राजकोट इतिहास रंगवीत आहे. महाराष्ट्राचें सारें अर्धवट. शस्त्रा-स्त्रांच्या चर्चा करीत बसतात. जवळ शस्त्र नाहीं म्हणून तो मार्ग बंद व निःशस्त्र मार्ग पुळकट वाटतो. मग गुलामगिरीच्या गर्तेत का सडत बसणार ?

स्पेनच्या शेतकरी कामकरी लोकांच्या रिपब्लिकच्या मदतीस आंतर-राष्ट्रीय स्वयंसेवक हजारोंनीं गेले होते. दुसऱ्या देशाच्या स्वातंत्र्यासाठीं उचंबळून जाणारे ते पाश्चिमात्य तरुण कोठें व जवळ स्वातंत्र्याचें अभिनव असें निःशस्त्र संगर रंगत असतां उदासीन राहणारे आम्ही करंटे कोठें ?

महर्षि सेनापतींचा शब्द महाराष्ट्रानें झेलला पाहिजे. ते मागतील तेवढे सत्याग्रही स्वयंसेवक त्यांच्या पाठीशीं उभे राहिले पाहिजेत. मागतील तेवढा पैसा दरिद्री महाराष्ट्रानें श्रीमंत मनानें दिला पाहिजे. सेनापति महाराष्ट्राची सारखी परीक्षा करीत आहेत. १९३१ मध्यें त्यांनीं मरणासाठीं तयार अस-णाऱ्यांचीं नांवें मागितलीं होतीं. महाराष्ट्र नापास झाला. नंतर पुन्हां त्यांनीं प्राणयज्ञदलासाठीं नांवें मागितलीं. महाराष्ट्र गप्प. कदाचित् त्या दोन परीक्षा तुम्हांला मानवल्या नसतील. परन्तु आतां सोळा महिन्यांसाठीं सोळाशें स्वयं-

" मला चर्चा करावयाची नाहीं. तुम्ही बावळट बायकांनीं यांत पडूं नये–" असें म्हणून तो बाहेर आला.

तीनशें रुपयांची नवीन प्रॉमिसरी तयार होऊं लागली. त्या पवित्र सतीला तें सहन होईना. ती बाहेर आली व म्हणाली 'तुम्ही जर हें असत् कर्म थांबविणार नसाल तर माझा हा सध्यांचा उपवास कायमचा होईल.'

ते गंभीर शब्द ऐकून सावकार स्तंभित झाला. त्यानें पुष्कळ वादविवाद केला. परन्तु पत्नीचा निश्चय अभंग राहिला. तिचा ओठधर्म नव्हता. धर्माची खरी निष्ठा तिजजवळ होती. पोथींतील धर्म कृतींत यावा म्हणून तिला तळमळ होती.

" मग करूं तरी काय मी ?" त्यानें विचारिलें.

" हे पैसे त्याला द्याच. परंतु त्याला असें सांगा ' या पैशांतून तुझा टांगा तूं पुन्हां सुरू कर. पूर्वींचें कर्ज तुला माफ. हे नवीन शंभर रुपयेहि तूं फुकट घे. नीट धंदा कर. परंतु कांहीं केल्या खाटीक बनूं नको. तुला तें कार्य करवत नाहीं. चांगलें आहे. तुझा हा स्वभाव वाढूं दे.' " असें ती पतीला म्हणाली.

सावकार हतबुद्ध झाला. एकीकडे त्याला ३०० रुपये दिसत होते. परंतु दुसरीकडे पत्नीची भीषण गंभीर प्राणार्पणाची प्रतिज्ञा समोर दिसत होती. शेवटीं सत्याचा जय झाला. त्यानें त्या खाटकाला शंभर रुपये दिले. " मी खाटकाचा धंदा कधीं करणार नाहीं." असें त्याच्याकडून लिहून घेतलें. पूर्वींचें कर्ज माफ झालें.

तो टांगेवाला भरल्या अंतःकरणानें निघून गेला. त्यानें पुन्हां टांगा सुरू केला. आज त्याचा टांगा चांगला चालला आहे. सर्व गांवभर ती गोष्ट पसरली. सतीची स्तुति सर्वजण करूं लागले. खाटकाचा धंदा सोडण्याची इच्छा करणाऱ्या त्या टांगेवाल्याचा टांगा लोक मुद्दाम बोलावतात. त्याचीं मुलेंबाळें सुखी आहेत.

हल्लीं जैनांचे उपवास सुरू आहेत. सर्व जैन जमीनदार सावकार कारखानदारांनीं ही गोष्ट ध्यानांत आणून सभोंवतालचा संसार प्रेममय व आनंदमय करण्याची शर्थ करावी; दुसरें काय ?

—५ सप्टेंबर, १९३८.

# मुख्य गोष्ट

२०

देशभक्ति, धर्मप्रीति, मातृभाक्ति वगैरे अनेक शब्द आपण ऐकतों. अमुक मनुष्य मोठा देशभक्त आहे, मातृभक्त आहे, धर्मभक्त आहे असें आपण म्हणतों. याचा खरोखर खोल पाहिलें तर काय अर्थ असतो ?

मी माझ्या आईवर प्रेम करतों. मी मातृमहिमा ओळखतों. मी जर मातृमहिमा खरोखर ओळखीत असेन तर सर्व मातांना नमस्कार करीन. कोणत्याहि मातेचा मी उपमर्द होऊं देणार नाहीं. माझ्या आईच्या सुखासाठीं दुसऱ्या आईला जर धुळींत मिळवूं इच्छीन तर मातृमाहिमा मी यथार्थपणें ओळखला असें म्हणतां येणार नाहीं. माझ्या मातृभक्तीनें इतर मातांचाहि सन्मान करावयास मी शिकलें पाहिजे.

तसेंच धर्माचें. आईच्या दुधावर आपला देह पोसतो. त्याप्रमाणेंच धर्मांतील सद्विचारांच्या दुधानें आपलें हृदय व बुद्धि यांचें पोषण होतें. माझा धर्म मला पूज्य, तसाच त्याचा धर्म त्याला पूज्य. मी माझ्या धर्माचा खरा भक्त असेन, तर दुसऱ्याच्या धर्माबद्दलहि आस्था ठेवीन. दुसऱ्याच्या धर्माची टिंगल करणाऱ्यास धर्माचें महत्त्व समजलें नाहीं. इतर धर्मांविषयींहि सहानुभूति व सद्भाव दाखवावयास जो शिकला त्यालाच स्वतःच्या धर्माविषयीं खरें प्रेम आहे असें समजावें

तसेंच देशभक्तीचें. मी माझ्या देशावर प्रेम करतों. त्याचा अर्थ मी इतर देशांचा द्वेष करणें असा नव्हे. माझा देश मला प्रिय व पूज्य. तसा त्याचा देश त्याला प्रिय व पूज्य. त्याच्या भावना माझ्यावरून मी ओळखल्या पाहिजेत. भारताचा भक्त दुसऱ्या देशाचा द्वेष करणार नाहीं. इंग्लंडवर प्रेम करणारा जर हिंदुस्थान धुळीला मिळवतील, तर ती खरी इंग्लड देशाची भक्ति होणार नाहीं.

उपनिषदांत दोन महावाक्यें आहेत. 'तत् त्वमसि व अहं ब्रह्मास्मि' मीहि ब्रह्म आहें व तूंहि ब्रह्म आहेस. मीहि चांगला, तूंहि चांगला. माझा धर्म मला भला, तुझा तुला भला. माझा देश मला प्यारा, तुझा

तुला. एकमेकांच्या भावना आपण सांभाळूं या. शत्रूचें निशाण हातांत सांपडलें तर द्वेषानें तें अपमानूं नये. १९०४–५ मधील रूसो–जपानी युद्धांत रशियाचीं जिंकून घेतलेलीं निशाणें जपानी शिपायांनीं फाडलीं नाहींत, अवमानिलीं नाहींत. लढाई असेल. परन्तु निशाण म्हणजे सारी जनता, सारें राष्ट्र. त्याचा अपमान नाहीं कोणी करतां कामा. खऱ्या भक्तीचा हा जर अर्थ आपण लक्षांत घेऊं तर मग देशभक्ति, धर्मप्रीति ही मारक न होतां सर्वांस तारक होईल. परन्तु हें कोण करणार?

—५ सप्टेंबर, १९३८.

## सेनापति २१

सेनापति बापटांची एक विशेष भूमिका आहे. ते पक्षातीत आहेत. स्वातंत्र्यासाठीं कोणीहि उठो, त्याला ते नांवें ठेवणार नाहींत. इतक्या अभेदाच्या भूमिकेवरून स्वातंत्र्याचें रणशिंग फुंकणारा पुढारी फारसा आढळत नसतो. ते दोष दाखवतात, परंतु तिटकारा करीत नाहींत. ते कम्युनिस्ट बंधूंत जातात परंतु म्हणतात "वर्गयुद्धांत श्रीमंत तेवढे वाईट व श्रमणारे सारे चांगले असें म्हणतां तें मला मान्य नाहीं. श्रीमंतहि सात्त्विक असतील व श्रमणारेहि नाठाळ असतील." त्यांना अमुक एक वर्ग तमुक पंथ असलें कांहीं नाहीं. असा हा तेजस्वी अवलिया महाराष्ट्राच्या पुण्याईनें महाराष्ट्रांत वावरत आहे.

हैदराबादमध्यें स्टेट कॉंग्रेसनें सत्याग्रह सुरू केला आहे. बाहेरच्या सत्याग्रहींची जरूरी नाहीं, असें त्या कॉंग्रेसच्या अध्यक्षांनीं जाहीर केलें आहे. त्यांचें करणें त्यांच्या दृष्टीनें योग्य आहे. आपली भूमिका स्वच्छ ठेवण्यासाठीं त्यांनीं तसें पत्रक काढणें उचितहि होतें. केवळ बाहेरच्या लोकांच्या चिथावणीनें आंतील जनतेनें ही चळवळ सुरू केली नसून संस्थानांतील जनतेच्या हृदयांतून निघालेली ही स्वयंभू चळवळ आहे, हें त्यांना दाखवावयाचें होतें. त्यांचें कर्तव्य त्यांनीं केलें पाहिजे.

सेनापतींनीं ही गोष्ट जनतेला समजून दिली आहे. त्यांनीं पत्रक काढून

सत्याग्रह सुरू ठेवलाच पाहिजे असें पटवून दिलें आहे. सेनापतींच्या पाठी-मागें अवघ्या महाराष्ट्रानें उभें राहिलें पाहिजे. सेनापतींचा वाढदिवस साजरा करण्यांत आला. परंतु सेनापतींच्या पाठीमागें सेना उभी राहणार नसेल तर हे वाढदिवस काय कामाचे ?

आपण विवेचना करीत बसण्यांत अर्थ नाहीं. हृदय उचंबळून आलें म्हणजे माणूस चर्चा करीत बसत नाहीं. स्वातंत्र्याचा संग्राम हैदराबादमध्यें सुरू झाला. या वार्तेनें आम्ही नाचूं लागलें पाहिजे. व तेथें नाचत गेलें पाहिजे. महाराष्ट्र नेहमीं चर्चा करीत बसतो. कार्याची वेळ येतांच सारा उत्साह मेलेला असतो.

जुन्या इतिहासाचे पोवाडे गाण्यांतच आमचा पुरुषार्थ उरला आहे. सरदार वल्लभभाई एकदां म्हणाले, " गुजराथला जुना भव्य दिव्य इतिहास नसेल तर गुजराथनें नवीन दिव्य इतिहास बनविला पाहिजे ! " गुजराथ नवीन अहिंसक इतिहास रचीत आहे. बार्डोलीनें तेजस्वी इतिहास लिहिला. रासगांव स्वातंत्र्यांतील क्षेत्र बनलें. बोरसद तालुक्यानें नांव मिळविलें. आतां राजकोट इतिहास रंगवीत आहे. महाराष्ट्राचें सारें अर्धवट. शस्त्रा-स्त्रांच्या चर्चा करीत बसतात. जवळ शस्त्र नाहीं म्हणून तो मार्ग बंद व निःशस्त्र मार्ग पुळकट वाटतो. मग गुलामगिरीच्या गर्तेत का सडत बसणार ?

स्पेनच्या शेतकरी कामकरी लोकांच्या रिपब्लिकच्या मदतीस आंतर-राष्ट्रीय स्वयंसेवक हजारोंनीं गेले होते. दुसऱ्या देशाच्या स्वातंत्र्यासाठीं उचंबळून जाणारे ते पाश्चिमात्य तरुण कोठें व जवळ स्वातंत्र्याचें अभिनव असें निःशस्त्र संगर रंगत असतां उदासीन राहणारे आम्ही करंटे कोठें ?

महर्षि सेनापतींचा शब्द महाराष्ट्रानें झेलला पाहिजे. ते मागतील तेवढे सत्याग्रही स्वयंसेवक त्यांच्या पाठीशीं उभे राहिले पाहिजेत. मागतील तेवढा पैसा दरिद्री महाराष्ट्रानें श्रीमंत मनानें दिला पाहिजे. सेनापति महाराष्ट्राची सारखी परीक्षा करीत आहेत. १९३१ मध्यें त्यांनीं मरणासाठीं तयार अस-णाऱ्यांचीं नांवें मागितलीं होतीं. महाराष्ट्र नापास झाला. नंतर पुन्हां त्यांनीं प्राणयज्ञदलासाठीं नांवें मागितलीं. महाराष्ट्र गप्प. कदाचित् त्या दोन परीक्षा तुम्हांला मानवल्या नसतील. परन्तु आतां सोळा महिन्यांसाठीं सोळाशें स्वयं-

सेवक व त्यांचा खर्च ते मागत आहेत. एवढी मागणीहि जर महाराष्ट्राला पुरी करतां आली नाहीं तर महाराष्ट्रानें जगावें कशाला ?

खानदेशांतील तरुणांनो, निजामहद्द तुमच्याशेजारीं आहे. तीं अजिंठ्याचीं अमर लेणीं तुमच्या जवळ आहेत. तुम्हीं निजाम राज्यांत स्वातंत्र्य-सूर्य उगवावा म्हणून उठावले पाहिजे. मागें ३० सालीं खानदेशांतील सत्याग्रही महाराष्ट्रभर पसरले होते. घणसोळी, विलेंपार्लें, रत्नागिरी येथें सर्वांआधीं धांवून गेले होते. आतां का मागें रहाल ? स्वातंत्र्याचें रणशिंग फुंकलें गेलें आहे. तुम्हीं तयार रहा. खानदेशांत यंदा धान्याचा दुष्काळ आहे. पिकें बुडालीं आहेत. परंतु स्वातंत्र्यभक्तीचा दुष्काळ कधीं होतां कामा नये. स्वातंत्र्याचें पीक हृदयांत दिवसेंदिवस वाढत चाललें पाहिजे. स्वातंत्र्याच्या पिकाची जोड बाहेरच्या पिकांस मिळत नाहीं, म्हणून बाहेरचें पीक कंटाळलें आहे.

दर वर्षीं पीक बरें दिसतें. परन्तु मागून नाहींसें होतें. प्रभु म्हणतो, "मी द्यावयास तयार आहें. परन्तु तुमचे हात घेण्यास नालायक आहेत. गुलामागिरींत दीडदीडशें वर्षें कुथत बसणाऱ्या किड्यांना कशानें चेव येईल तें मला समजत नाहीं. गुलाम असून पुन्हां आपसांत भांडतां. उच्चनीचपणा दाखवतां. नालायक व नादान आहांत तुम्ही." आपण माणसें आहोंत हें सिद्ध करून देण्यासाठीं आपण उठलें पाहिजे.

हैद्राबाद व आपण निराळे नाहीं. २३ सालीं नागपूरच्या झेंडासत्याग्रहा-साठीं अखिल भारतांतून स्वयंसेवक गोळा झाले होते. हा भारत अखंड आहे. या अखंड भारतांत कोठेंहि लढा झगडा असो. परंतु या क्षणीं तर जवळच बोलावणें आहे. देवाचें बोलावणें आहे हें ज्याच्या कानांत व मनांत शिरेल तो धन्य होय.

ही स्पर्धा नव्हे. तिकडे राजकोट पेटलें म्हणून हैदराबाद पेटवा असा याचा अर्थ नव्हे. दिव्यानें दिवा लागतो. एकमेकांस आधार मिळतो, स्फुरण चढतें. तेजस्वी वल्लभभाई उठावले आहेत, सेनापति उठावले आहेत. तिकडे जवाहिरलाल उठावत आहेत. पेटूं दे भारत, पेटूं दे महाभारत.

माझा भारत सारा पेटूं दे
देवी स्वतंत्रतेला भेटूं दे

अशीं गाणीं गात चला. कूच करा. उन्हाळ्याचे दिवसांत जसे पहाड शिलगलेले दिसतात, त्याप्रमाणें स्वातंत्र्यवृत्तीनें सारें राष्ट्र पेटलें आहे असें जगाला दिसूं दे, जगदीशाला दिसूं दे.

३० वर्षें हातांत सतीचें वाण घेऊन सेनापति झिजत आहेत. एकच ध्यास, एकच वेड. त्यांनीं रस्ते झाडले, मनें झाडलीं. निम्में जीवन तुरुंगांत व अज्ञातवासांत त्यांचें गेलें. अशाचें उतराई कसें व्हावयाचें? कांहीं कृतज्ञता, कांहीं वीरपूजा हृदयांत आहे कीं नाहीं? सेनापतींचा सन्मान म्हणजे स्वातंत्र्याचा सन्मान. दुसरा सन्मान त्यांना नको. महाराष्ट्रा! सेनापतींना साजेसा वाग.

—५ डिसेंबर, १९३८.

## गोड भक्ति २२

आईला विचारा तुला कोणता मलगा आवडतो? एक असा आहे कीं आईच्याजवळ कधीं भांडत नाहीं; आईविरुद्ध ब्र काढीत नाहीं; मुकाट्यानें सांगितलेलें ऐकतो. परन्तु दुसरा असा आहे कीं आईजवळ कधीं भांडतो, तिचा हात धरून ओढतो, अमुक दे असा हट्ट धरतो. रागावून रुसून जरा लांब जातो व आईला त्याची समजूत घालावी लागते. तो प्रेमानें गोड हंसतो, कधीं रागावतो. विचारा, आईला कोणता बाळ आवडेल? मला तर वाटतें कीं पहिला जो सात्त्विकतेचा पुतळा त्याच्यापेक्षां हा दुसरा मुलगा तिला अधिक प्रिय वाटत असेल. या मातृभक्तींत मौज आहे. ऊन आहे. पाऊस आहे. कोणत्याहि स्वरूपाचें प्रेम घ्या. तेथें थोडें भांडणहि असतें. त्या भांडणांत एक अपूर्व गोडी असते. अर्थात् भांडण म्हणजे पुनश्च तोंड न पाहणें नव्हे. कॉंग्रेसला आम्ही माता म्हणतों. श्री. सुरेश बानर्जी मुंबईला असेंच म्हणाले. या मातेजवळ एखादी गोष्ट आम्हीं मागितली तर का रागावून ती आम्हांला हद्दपार करणार? माता म्हणेल "ये. इतका रागावूं नको. घे काय पाहिजे तें." कोणी ही उपमा लांबवून म्हणेल "मुलानें सोमलाचा खडा

मागितला तर." आई त्याची समजूत घालील. परंतु घरांतून बाहेर हांकलणार नाहीं. आम्हांला मातेचीं कधीं न भांडणारीं कांहीं मुलें घालवून लावूं पाहतील तर माता प्रेमानें उचंबळून येऊन आम्हांला पोटाशींच धरील. जें प्रेम कधीं भांडत नाहीं त्यापेक्षां असल्या या लागट प्रेमाचीच मातेला अधिक गोडी वाटेल. जें प्रेम कधीं भांडत नाहीं तें प्रेम तरी आहे का असेंहि मनांत येतें. केवळ आज्ञाधारकपणा म्हणजे प्रेम नव्हे.

माझी विठ्ठल माउली। प्रेमपान्हा पान्हावली
कुरवाळोनी लावी स्तनीं। नच जाई दुरि जवळुनी
केली पुरवी आळी। नव्हे निष्ठुर कोंवळी
तुका म्हणे रस। मुखीं घाली ब्रह्मरस

—५ डिसेंबर, १९३८.

## बा शेतकऱ्या ऊठ! २३

खानदेशांतील शेतकऱ्यांचीं दररोज सारखीं पत्रें येत आहेत. सर्वांच्या मनांतून एकच केविलवाणा स्वर निघतो. 'पीक बुडालें, शेतकऱ्यांची परिस्थिति अगदींच खालावली. सारातहकुबी द्या, कर्जतहकुबी द्या.' शहरांतील आम्हां नोकरीवाल्या लोकांना खेड्यांतील शेतकऱ्यांच्या परिस्थितीबद्दल कल्पना येणार नाहीं. शहरांत आमचीं सुखसाधनें व करमणुकी वाढतच आहेत. पण खेड्यांत शेतकऱ्यावर मरण ओढवलें आहे. हे शहरी गृहस्था, तूं जर शेतकऱ्याच्या आजच्या दुःखद परिस्थितीकडे लक्ष दिलें नाहीं तर थोडेच दिवसांत तुझ्यावरहि मरण ओढवल्याशिवाय रहाणार नाहीं हें पक्कें लक्षांत ठेव. शेतकरी शेतांत धान्य पिकवितो म्हणूनच आज तुला मोठ्या मजेंत येथें चैन करावयास मिळत आहे. तूं शिक्षक अस, तूं वकील अस; डॉक्टर अस, सावकार, शेटजी, सरकारी नोकरीवाला कोणीहि अस; तुला स्वतःचें जीवन सुखी करण्याकरितां तरी सुद्धां निर्मात्या शेतकऱ्याकडे पाहणें हें तुझें कर्तव्य आहे. देठ सुकला म्हणजे वरचें कमलहि सुकल्या-

The Ideal Book Co.

शिवाय राहणार नाहीं. तेव्हां शहरांतील नागरिकांनो, वेळेवर जागे व्हा, शेतकऱ्याला मदत करण्याकरितां धांवा, त्याचें म्हणणें तुम्ही सरकारच्या कानावर पोहोंचवा, त्याला शेतसाऱ्यांत कांहीं तरी सूट मिळवून देण्याचा प्रयत्न करा. त्याच्या पाठीवरील तें भरगच्च कर्जाचें ओझें कमी करा. तो आज मरावयाला टेकला आहे.

पण हें काय, शहरी सावकार म्हणतो, 'मी कशाला शेतकऱ्याला मदत करूं, त्यांचें पीक विकल्यानें माझे पैसे फिटतील. मग त्याला घरांत दाणा, पैसा आहे कीं नाहीं ह्याच्याशीं मला काय करावयाचें आहे? माझे पैसे शेतकऱ्यानें नेले, मला ते वसूल केलेच पाहिजेत. मग तो आहे आणि त्याचें नशीब आहे. भोगेल नशिबाचीं फळें.'

इकडे हे शेटजी काय म्हणत आहेत? ते म्हणतात, 'आहे कुठें मला वेळ? कमी भाव देऊन कापूस खरेदी करणें हा तर माझा जाणून बुजून धंदा आहे. एवढी मोठी गिरणी मी उभारली आहे. इतकें मोठें भांडवल घातलेलें आहे. तें कांहीं दान देण्याकरितां नव्हे. भांडवलावर नफा राहण्याकरितां मी इतका विचार करीत असतों कीं माझ्या स्वतःच्या गिरणींतील मजुरांकडे पहावयास जर मला वेळच मिळत नाहीं, तर शेतकऱ्याच्या राहाणीकडे लक्ष देणें दूरच राहिलें. शेतकरी मला कांहीं फुकट माल पुरवीत नाहीं.'

अरेरे वकील, डॉक्टरांनींही नकार द्यावयाला सुरुवात केली वाटतें! ते देखील शेतकऱ्यांची बाजू सरकारपुढें मांडावयास तयार नाहींत ना! ते म्हणतात, 'असली उठाठेव आमच्याकडून होणार नाहीं बुवा! आमचाच धंदा अलीकडे बसत चालला आहे. आहे कुठें आम्हांस वेळ. सावकार, जमीनदार हीं तर आमचीं मोठीं कुळें. आज आमची सारी मदार त्यांच्यावर आहे. तुम्हां शेतकऱ्यांचें गाऱ्हाणें हातांत घेऊन न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला तर ते आमच्यावर रागावतील. त्यांच्याशीं आमचा विरोध आला तर आम्हांस उपाशीच मरणाची पाळी यावयाची. तेव्हां त्या भानगडींत न पडलेलें बरें!'

'काय सांगूं शेतकऱ्यांनो!' शहरी शिक्षक म्हणतो, 'आमच्या लायब्ररीच्या पुस्तकांतून तुमचे फार गोडवे कवींनीं आणि लेखकांनीं गायिलेले

आहेत. मी तीं पुस्तकें नेहमीं वाचतों. तुम्हीं जगावर अनंत उपकार करून राहिलां आहांत. पण तुमचीं गाऱ्हाणीं सोडवूं का शाळा चालवूं! दोन वर्गांशिवाय समाज तरी चालावयाचा कसा! आजच जर कर्ज रद्द करण्याची, सावकाराला जमीन घेऊं न देण्याची भाषा बोलूं लागलांत तर त्यांच्याशीं विरोध उत्पन्न होईल. त्यांचीं मनें दुखवतील. समाजांत सर्वांनीं प्रेमानें वागावें. सावकाराकडे कर्ज कमी करण्याकरितां मागणी करणें म्हणजे आपला मूर्खपणा आहे. त्यांनीं दिलेले पैसे परत करणें यांतच खरा चांगुलपणा आहे. नाहीं का? त्यांना न दुखवतां तुम्हांला पैशाचें दुःख कमी करतां येईल. सांगूं उपाय? तुम्ही नीट शिक्षण घ्या. सज्ञान व्हा. शेती सुधारा, शेती करण्याचीं आतां नवीन साधनें निघालीं आहेत. तुम्हीं अगदींच अडाणी राहिलां आहांत, म्हणूनच तुमची ही अशी स्थिति झालेली आहे. पैसे कुठें खर्च करावे, कुठें नाहीं हें तुम्हांस समजत नाहीं. वेड्यावांकड्या, खुळ्या, भोळ्या, काल्पनिक व भ्रामक, सामाजिक आणि धार्मिक कल्पना तुम्ही उराशीं बाळगून बसलां आहांत. मुलांमुलींच्या लग्नांत भयंकर पैसा खर्च करतात. स्वतःजवळ पैसे नसले तरी 'कारण' मोठ्या प्रमाणावर साजरें करावें म्हणून पैसे कर्जाऊ आणतात. हंगामांत पैसे आले म्हणजे तमाशे व वेश्येपायीं सर्व खर्च करून टाकतात. आणि सर्वांत वाईट व्यसन म्हणजे दारूचें. तें तुम्ही सोडलें पाहिजे. तुम्ही अत्यंत घाणेरडे राहतां. म्हणून तुम्हांला वाटेल तसे रोग होतात. खेडें अस्वच्छ ठेवल्यानें थंडीताप सर्व लोकांना होण्याचा संभव असतो. अशा रीतीनें तुमचें जीवन सुधारा. विनाकारण सावकाराला त्रास देण्यांत काय अर्थ आहे? पैशाचा योग्य तो उपयोग करावयास शिका. जास्त काटकसर करा. शिक्षण घेऊन सुशिक्षित व्हा.

शहरांतील नागरिकांना जर शेतकऱ्यांच्या दुःखाकडे लक्ष द्यावयास वेळ होत नाहीं तर मग सरकारी नोकरांची गोष्ट तर बाजूलाच राहिली. अभागी शेतकऱ्या, तुझें दुःख तुलाच वेशीवर टांगलें पाहिजे. तुझ्या हांकेला शहरांतील लोक ओ देऊं शकत नाहीं. शेट सावकार तुझी बाजू सरकारपुढें मांडतील ही गोष्ट मला तर बुवा अशक्य कोटींतील वाटते. शहरांतील मध्यम वर्गास तुझ्या दुःखी व कष्टमय जीवनाचें खरें निदान काय आहे याची अंधुक कल्पना आहे, पण तो वर्ग स्वतःच्या उपजीविकेकरितां तुला खरी

मदत करूं शकणार नाहीं. तुझ्या परिस्थितीचीं वरवर दिसणारीं कारणें सांगून मलमपट्टी करण्याकडेच तुझें लक्ष वेधीत आहे. शेतकरी अशिक्षित आहे, सामाजिक व धार्मिक चुकीच्या समजुती उराशीं बाळगून बसला आहे, पैशाचा उपयोग नीट कसा करावा हें त्याला समजत नाहीं. दारूपायीं भयंकर पैसा खर्च होतो वगैरे कारणांत थोडीशी तथ्यता, सत्यता आहे असें धरून चाललें तरी शेतकऱ्यांच्या हलाखीच्या परिस्थितीचें खरें कारण तें नाहीं. खरें कारण डोईजड झालेला शेतसारा व कर्ज. पैशाचा दुरुपयोग त्याच्याकडून कांहीं वेळां होत असेल. कर्जाचें ओझें वाढण्याला हा पैशाचा दुरुपयोग कांहीं अंशीं कारणीभूत होत असेल, अगदींच नाहीं म्हणतां येत नाहीं. पण शेतकऱ्यांची दारूबंदी करून, त्याला सद्वर्तनी बनवून त्याच्या कर्जाचा प्रश्न सुटणार नाहीं. शेतकरी सुशिक्षित झाला तरी कर्जाशिवाय त्याला शेती करितां येईल असें नाहीं.

कर्ज व शेतसारा ह्या गोष्टींच्या बाबतींत जर शेतकऱ्याला मदत झाली तर त्याचें जीवन खात्रीनें सुखकर होईल. मग त्याच्या जीवनांतील कमतरता अगर वाईट गोष्टी ह्या आपोआपच नाहींशा होतील. परन्तु खऱ्या कारणांकडे लक्ष न देतां त्यानें शिक्षण घ्यावें, धर्माचें स्वरूप नीट समजून घ्यावें, काटकसर करावयास शिकावें, असें जर सांगूं लागाल तर ह्या गोष्टी पूर्णपणें फलद्रूप व्हावयाच्या नाहींतच, पण त्याचें दुःखी कष्टमय जिवन हें कायम राहूं देण्याचें पाप शहरी मध्यम वर्गाला लागेल. प्रत्यक्ष खेड्यांत जाऊन शेतकऱ्यांच्या घरांत कांहीं दिवस रहा म्हणजे तुमचीं कारणें किती फोल आहेत हें कळेल. जीवनाला आवश्यक असणाऱ्या गोष्टी व त्याचे व्यवहार कसे करावे हें त्याला चांगलें कळतें. त्याला लिहितां वाचतां येत नसेल. पण त्यावांचून त्याचें जीवन अडून बसलें आहे असें नाहीं. मला वाटतें कीं दारूचा प्रश्न हा सुद्धां शहराचा प्रश्न आहे.

असो. तेव्हां शेतकऱ्या, तूं कोणावरहि विसंबून राहूं नकोस. तुझीच स्वतःची संघटना कर. आपली कॉंग्रेस आहे. तिच्या मार्फत न्याय मिळवून घेण्याचा प्रयत्न कर. जिल्हा कॉंग्रेस कमिटीच्या ऑफिसांत खैरात कर. १०।१०, १५।१५ खेड्यांतील शेतकऱ्यांची सभा घेऊन त्या ठिकाणीं जि. कॉं. कमिटीच्या अध्यक्षाला बोलवा. ते तुम्हांला मदत केल्याशिवाय

राहणार नाहींत. वेळच आली तर ५००-५००, १०००-१००० शेतकऱ्यांचे जथे जि. काँग्रेस कमिटीवर न्या. कां. च्या लोकांना तुमच्या परिस्थितीची जाणीव नाहीं म्हणून तशी जाणीव करून देण्याकरितां ह्या गोष्टी तुम्ही करीत आहांत असें नाहीं. तर सरकारला कळलें पाहिजे कीं आमचीं दुःखें कोणतीं, हें आमचें आम्हांसच आतां कळावयास लागलें आहे. व तीं दुःखें दूर करण्याकरितां काँ. कमिटीच्या वतीनें आम्ही प्रयत्न करीत आहोंत असा तुमच्या जथ्याचा व सभेचा अर्थ आहे. सरकारला सांगा कीं, आज ५।६ वर्षें झालींत; पिक आहे तर भाव नाहीं, भाव आहे तर पीक नाहीं, असें चाललें आहे. एकहि वर्ष शेतकऱ्याला लाभलें नाहीं. हें वर्ष तर अगदींच वाईट आलेलें आहे. घरंदाज शेतकऱ्याला देखील खर्चापेक्षां उत्पन्न कमी आलें आहे. ही परिस्थिति काँग्रेस अधिकाऱ्यांच्या मार्फत सरकारच्या कानावर घाला. आणेवारी बरोबर लावली जात आहे कीं नाहीं याबद्दल काँ. अधिकाऱ्यांना काळजी घ्यावयास सांगा. आणि शेवटीं म्हणजे कर्ज-तहकुबी व सारासूट ह्या बाबतींत शक्य तितक्या सवलती जर आम्हांस मिळाल्या नाहींत तर आमचें जिणें अतःपर कठीण आहे असें त्यांना पटवून द्या. स्वस्थ बसूं नका, उठा.

—२१ नोव्हेंबर, १९३८.

## दिवाळी २४

बंधुभगिनींनो, दिवाळीचा मंगल आनंददायक सण कालपासून सुरू झाला. आपण गरीब असलों, गुलाम असलों तरी त्यांतहि आनंद निर्माण केला पाहिजे. स्पेनमध्यें भीषण युद्ध चाललें असतांहि ते शूर लोक आनंद करतात, क्षणभर दुःख विसरतात. दुःख व दारिद्र्य यांच्यावर स्वार होणें हाच खरा पुरुषार्थ आहे. दुःखांतहि हंसेन, दुःखांतहि दिवाळी करीन आणि दुःखाची नांगी मोडून टाकीन, असें मनुष्य म्हणतो.

शेतेंभातें पिकलीं आहेत, नद्यांचें पाणी निर्मळ झालें आहे, शरद् ऋतु

सुरू झाला आहे, तळ्यांतून कमळें फुललीं आहेत, वादळें थांबलीं आहेत, आकाश निरभ्र आहे, अशा वेळेस आपण हा सुंदर सण योजिला आहे, व्यापारी नवीन वर्षाच्या वह्या घालतात, लक्ष्मीची पूजा होऊं लागते. देशाच्या संसाराचें नवीन पान दिवाळींत उघडायचें असतें.

नवीन वर्ष जणुं सुरू होतें. नवीन संसार, नवीन वर्ष. या वेळेस दिवे लावावयाचे. जीवनांत आशा व प्रकाश आणावयाचा. गोड खावयाचें. मनांत प्रकाश व आनंद; जिभेवर गोड सांजोरी. अशा प्रकारें अंतर्बाह्य आशा-वंत व मधुर अशा वृत्तीनें नवीन वर्षासाठीं उभें रहावयाचें.

दिवाळीला नरकासुर मारला अशी कथा आहे. नरकासुर मारल्याशिवाय कोठली दिवाळी ? आपण आधीं नरकासुर मारूं या. नरक म्हणजे घाण. आपल्या समाजांत हा प्रचंड अक्राळ विक्राळ नरकासुर थैमान घालीत आहे. या नरकासुराला मारायला उठा. हा नरकासुर सर्वव्यापी आहे.

आपण रस्त्यावर घाण करतों. केरकचरा फेंकतों. वाटेल तेथें शौचास बसतों. अशा ठिकाणीं लक्ष्मी कशी येईल ? आज गांवांत अवकळा आली आहे. लक्ष्मी गांवांत शिरूं पाहते. परंतु ती नाकाला पदर लावते व पुन्हां माघारी जाते. गांव म्हणजे जणुं उकिरडे. गांवांत शिरतांच दोन्ही बाजूंनीं गलिच्छ विष्ठा पडलेली असते. माणसास याची लाज वाटली पाहिजे. भाग्य कसें येईल, लक्ष्मी कशी नांदेल? लक्ष्मी निर्मळ कमळांतून जन्मास येते. जेथें सुगंधी सुंदर कमळें फुललीं आहेत, म्हणजेच जेथें स्वच्छता आहे तेथें लक्ष्मी जन्मते. ही घाण, हा नरकासुर नाहींसा करा. तरच दिवाळी तुम्हांला समजली असें होईल.

परंतु बाहेरच्या घाणीपेक्षां मनांतलि स्वार्थ, दंभ यांची घाण तर फारच भयंकर. सेनापति बापट नेहमीं म्हणतात "अंतर्बाह्य स्वच्छ व्हा. बाहेरची घाण नाहींशी करा." आंतील घाण नाहींशी करा. ही आंतरिक घाण या देशांत तर फारच आहे. म्हणून गुलामगिरी कित्येक वर्षें नशिबीं आली.

जातीजातींतलि भांडणें, हिंदु-मुसलमान भांडणें, स्पृश्यास्पृश्य भांडणें, ब्राह्मण-ब्राह्मणेतर भांडणें, कुळ-सावकार भांडणें, मालक-मजूर भांडणें, सर्वत्र भांडणेंच भांडणें. हीं भांडणें आपण बंद केलीं पाहिजेत. त्यासाठीं उदा-रता जीवनांत आणली पाहिजे. गरिबांच्या जीवनांत तर अनंत उदारता

आहे. शेतकरी, कामकरी, मजूर, बिचारे अहोरात्र धडपडून श्रमाचें सारें फळ सावकार, जमीनदार, कारखानदार यांच्या पुढें ठेवतात. त्यांनीं उदार होऊन या गरिबांचे संसार सुखाचे होतील असें करावें. या गरिबांच्या अंगावर नीट वस्त्र आहे कीं नाहीं, त्यांना रहायला नीट घर आहे कीं नाहीं, त्यांच्या मुलांना दुधाचा थेंब मिळतो कीं नाहीं हें पहावें. अशानें गुण्यागोविंदाचे संबंध वाढतात. सलोखा नांदतो. संप होत नाहींत, तंटे वाढत नाहींत. तुकाराम महाराजांनीं म्हटलें आहे,

थोडें आहे थोडें आहे । चित्त साहाय्य झालिया ॥

जर मन निर्मळ असेल तर ही कांहीं फार कठिण गोष्ट नाहीं. सर्वांचा संसार सुखाचा करण्यासाठीं जर आपल्या मनानें तयारी केली तर राष्ट्राच्या संसाराचें स्वरूप आतां एका क्षणांत बदलेल.

दिवाळीला आपण दिवे लावतों. सुंदर सुंदर रंगांच्या ज्योती पाहून दंग होतों. विजेचे दिवे किती गोड दिसतात. एक कळ दाबली जाते व हजारों घरांतून, दुकानांतून, कारखान्यांतून गंमतच गंमत दिसते. अरे हे बाहेरचे दिवे लावणें यांतील अर्थ आहे का माहित ? प्रत्येक पेटवलेली ज्योत म्हणजे प्रत्येक जीवात्मा मला तिच्यांत दिसतो. लाखों लोकांच्या जीवनांच्या ज्योती मिणमिण कशा तरी टिकाव धरून असतात. त्या ज्योति केव्हां मालवतील यांचा नेम नसतो. दिवाळीचे दिवे लावणें म्हणजे लाखों कोट्यवधि दरिद्री लोकांची जाऊं का राहूं करणारी जीवनज्योत स्नेहप्रेमाचें तेल घालून पुन्हां तेजस्वी करणें हा अर्थ आहे. हे जीवनाचे दिवे पहा. तेथें तेल नाहीं, काहीं नाहीं. कसे टिकतील हे दिवे ? धुळयाच्या तीन हजार कामगारांच्या घरचे सर्व जीवनाचे दिवे मालवत आले होते. श्री. प्रतापशेटजींना सद्‌बुद्धि सुचली. या दिव्यांना दिवाळीच्या आधीं थोडें तेल मिळूं लागलें. ही खरी दिवाळी. दिवाळीचा सण साजरा करणाऱ्या माझ्या धनिक बंधूंनो ! तुमच्या हाताखालीं काम करणाऱ्या, श्रमणाऱ्या लाखों लोकांच्या जीवनाचे दिवे मंगल पेटत रहावेत, देशाच्या विराट् संसाराला शोभा रहावी, असें वाटत असेल तर त्यांना प्रेम द्या, सहानुभूति द्या, विजेची कळ दाबतांच बाहेरचे दिवे लागतात. सहानुभूतीची, खऱ्या आस्थेची, खऱ्या बंधुप्रीतीची, माणुसकी-च्या सद्‌भावनेची कळ दाबतांच लाखो लोकांच्या जीवनाचे दिवे सतेज

ठेवतां येतात. सर्वांच्या जीवनांत दिवाळी आणली तरच या बाहेरच्या दिवाळीला अर्थ !

कॉंग्रेसपत्राला अशी दिवाळी राष्ट्रांत साजरी व्हावी हा ध्यास आहे. अंतर्बाह्य प्रकाश यावा, स्वच्छता यावी, हें या पत्राचें ध्येय आहे. भांडणें वाढवावीं हें या पत्राचें ध्येय नाहीं. भांडणें मिटावीं व तीं मिटविण्यासाठीं दुसऱ्यांच्या जीवनाचा विचार सहानुभूतिपूर्वक आपण सर्वांनीं करावा असेंच या पत्राला सदैव वाटतें. धनिकांना मी रागारागानें या पत्रांतून लिहिलें असेल परन्तु त्याचा उद्देश एकच होता. त्यांच्या हृदयांत प्रेमाचा पाझर फुटावा. पाषाणांत आंत ओलावा असतो. वरून ओबडधोबड दिसणाऱ्या खडकाच्या पोटांत झुळझुळ वाहणारे झरे असतात. परंतु ते बाहेर यावेत म्हणून सुरुंग लावावे लागतात, घणाचे घाव घालावे लागतात. म्हणून मी माझ्या लेखणीचे घाव श्रीमंतांच्या हृदयांतील झरे बाहेर पडावेत म्हणून घालीत होतों; आणि एकीकडे माझें कोमल मन कष्टी होत होतें.

दगडाच्या पोटांतील झरे दोन मार्गांनीं बाहेर काढतां येतात. घणाचे घाव घालून किंवा मंजुळ मुरली वाजवून. श्रीकृष्णाची गोड गोड मुरली ऐकून शिळा पाझरूं लागत असें वर्णन आहे. तो गोड पांवा पाषाणांना पाझर फोडी. परन्तु ही दैवी कला कोणाला साधणार? कोणी पांवा वाजवून पाषाणांस पाझर फोडील, तर कोणी घणाचे घाव घालून ते बाहेर आणील.

मला ही पांवा वाजविण्याची कला अद्याप येत नाहीं. महात्मा गांधींची मुरली पाषाणांस पाझर फोडते, मुसळांस अंकुर फोडते. परन्तु हें इतराचें काम नव्हे. आम्हांला ही धन्य कला साधावयास अनन्त जन्म अजून लागतील. तोंपर्यंत आम्ही आदळ आपटच करीत राहाणार. परन्तु त्या आदळआपटीमध्येंहि स्वार्थ नाहीं. ही आमची अडाणी आदळआपट सर्वांच्या जीवनांत दिवाळी यावी म्हणूनच आहे, हें थोरांनीं लक्षांत घ्यावें.

—२४ ऑक्टोबर, १९३८.

# चार लाख गांधी टोप्या २९

महाराष्ट्र चरकासंघानें महात्माजींच्या येत्या वाढदिवसाच्या मंगल निमित्तानें चार लाख गांधी टोप्या महाराष्ट्रांत खपविण्याचा संकल्प केला आहे. हा पुण्य संकल्प पुरा करण्यासाठीं सर्व महाराष्ट्रानें उभें राहिलें पाहिजे. चार लाख गांधी टोप्या चुटकीसरशा खपून गेल्या पाहिजेत.

ज्याचा वाढदिवस साजरा करावयाचा त्याच्या आवडीची गोष्ट आपण केली पाहिजे. महात्माजींना सर्वांत प्रिय गोष्ट कोणती ? खादी. ते एकदां म्हणाले, " मरतांना माझ्या तोंडांतून कदाचित् राम नाम निघणार नाहीं. चरका चरका असेच शब्द कदाचित् बाहेर पडतील. " महात्माजींना चरका हें भगवंताचें नांवच वाटतें. परमेश्वराला भक्त हजारों नांवानीं आळवितो. महात्माजी चरका या नांवानें त्याला आळवितात. चरक्याच्या स्वरूपांत त्यांना ईश्वराचें दर्शन होतें.

गरिबांचा साह्यकारी देवाशिवाय कोण आहे ? चरका गरिबांना साहाय्य करतो म्हणूनच त्याला देव म्हटलें पाहिजे. चरक्यामुळें गरिबांना घरबसल्या सुखाचा घास मिळतो. स्वाभिमानानें श्रम करून त्यांना पोटाला मिळवितां येतें. चरक्यानें लाखों निराश बंधुभगिनींच्या जीवनांत आशा निर्मिली आहे. जो कोणी गांवोगांव जाऊन हें पाहील त्याच्या अनुभवाला ही गोष्ट येईल.

म्हणून महात्माजींना चरक्याचा ध्यास, खादीची अपार प्रीति. त्यांच्या वाढदिवसाच्या दिवशीं म्हणूनच खादीचें सर्वांत अधिक महत्त्व. महात्माजींचा वाढदिवस साजरा करावयाचा म्हणचे जास्तींत जास्त खादी खपवावयाची, स्वतः ध्यावयाची. हें आपण नाहीं का करणार ?

महात्माजींचे या हतपतित राष्ट्रावर अनंत उपकार ! केवढें त्यांचें कार्य, किती अपार परिश्रम ! या ३५ कोटी लोकांच्या राष्ट्रांत एक प्रकारची निराशा होती. सर्वत्र भीतीचें वातावरण होतें. या महापुरुषानें राष्ट्राला आशावंत केलें, भयभीत राष्ट्राला निर्भयतेचा महामंत्र दिला, सारें राष्ट्रीय

जीवन चैतन्यमय केलें. अमुक एक असें कार्यक्षेत्र त्यांनीं ठेवलें नाहीं, ज्यांत आपली दिव्य दृष्टि घेऊन ते गेले नाहींत. त्यांनीं स्वातंत्र्ययुद्धाचे महान् प्रयोग केले. लाखों लोकांना देशार्थ त्याग करावयास उभें केलें. निःशस्त्र जनतेच्या हातांत तोफांना तोंड देणारें निःशस्त्राचें शस्त्र दिलें. लहान मुलें हांसत फटके खाऊं लागलीं. बायका अंगावर घोडे दौडत येत आहेत तरी खंबीरपणें उभ्या राहिल्या. सारा राष्ट्राचा आत्मा महात्माजींनीं जागृत केला. राष्ट्रीय शिक्षण असो, दारुबंदी असो, अस्पृश्योद्धार असो, हिंदुमुस्लीम ऐक्य असो, ग्रामोद्योग असोत, ब्रह्मचर्याचे प्रयोग असोत, गोरक्षण असो, स्त्रियांची सुधारणा असो, हिंदी-प्रचार असो, साहित्यसंसार असो—सर्वत्र हा महापुरुष एक दिव्य दृष्टि देत आहे. राष्ट्राच्या सर्वांगीण जीवनाला प्रचंड चालना देणारा असा महापुरुष राष्ट्राला भाग्यानें मिळत असतो. मग अशा या महापुरुषाचे कसे उतराई होणार? आपण आपल्या कातडीचे जोडे करून त्यांच्या पायीं लेवविले तरी ते उपकार फिटणार नाहींत. परमेश्वराचे उपकार का फेडतां येतात? परंतु आपण देवाला एक लहान फूल देतों, एक काडवात लावून ओंवाळतों. कृतज्ञता व्यक्त करतों. कृतज्ञता व्यक्त करावयास मानवी आत्मा भुकेलेला असतो. महाराष्ट्राचा आत्मा महात्माजींबद्दल कृतज्ञता दाखवावयास भुकेलेला नाहीं का?

जर भुकेलेला असेल तर ही शुभ्रस्वच्छ खादी टोपी तरी निदान घेऊन कृतज्ञता प्रकट करा. ही लहानशी तीन आण्यांची टोपी ती घ्या. आपल्या डोक्यावर ती धारण करा. ही तीन आण्यांची टोपी—परंतु तींत पृथ्वी-मोलाच्या वस्तू सांठवलेल्या आहेत. श्रीकृष्णाच्या चिमण्या तोंडांत यशोदा-माईला सारें ब्रम्हांड दिसलें. परंतु तें यशोदेला दिसलें. तिच्या त्या पवित्र प्रेमळ दृष्टीला दिसलें. त्याप्रमाणें निर्मळ दृष्टीनें, पक्षातीत दृष्टीनें जो या लहानशा गांधी टोपींत पाहील त्याला विश्वब्रम्हांड दिसेल.

या गांधी टोपींत मला भुकेलेल्या लाखो बंधुभगिनींचीं रूपें दिसतात. या गांधी टोपींत मला सत्याग्रहाचे संग्राम दिसतात. या गांधी टोपींत लाठी-मार दिसतात, गोळीबार दिसतात, फांशीं गेलेले हुतात्मे दिसतात. ३० सालीं, ३२ सालीं सरकारनें सूतशाळा जप्त केल्या, चरके जाळले, टकली हातांत घेणारांवर लाठीहल्ले चढविले. या टकलीसाठीं लोकांनीं तुरुंगांत

उपवास केले. त्या चळवळींत गांधी टोपी घालणारास नोकरीस मुकावें लागलें. गांधी टोपींतील शक्ति सरकारनें ओळखली होती. टकली समोर तोफाबंदुकवाला टरकतो हें दृश्य दिसत होतें. खादींतील अनंत शक्ति सरकारनें ओळखली, परन्तु अभागी व बुद्धिहीन लोकांनीं ओळखली नाहीं; ते खादीची टरच करीत बसले.

जेथें जेथें खादीचा संदेश गेला होता, तेथें तेथें चळवळ अफाट पसरली होती. खानदेशांतच पहा. असोदे गांवांतून शेंदीडशें तरुण उठले; खिरोदें गांवांतून तसेच तरुण उठावले. मुकटी येथून व कापडणें येथून जास्तींत जास्त लोक तुरुंगांत गेले. वर्धा तहशील मधून ५५० बाया तुरुंगांत गेल्या. हा प्रचार कोणी केला? खादीनें. ही ऊबदार खादी थंडगार हृदयें देश-भक्तीनें पेटवते. खादीच्या पाठोपाठ राजकारण जातें. खादीनें जो घांस दिला जातो त्या घांसाला स्वातंत्र्याचा वास लागतो. म्हणून आमच्या स्वातंत्र्याचें खादी हें प्रतीक बनलें आहे.

खादीनें राष्ट्राला संघटित केलें आहे. या सुतानें साऱ्या प्रांतांचीं हृदयें एकत्र जोडलीं आहेत. वर वर अलग दिसणारे प्रांत आंत खालीं खोल सुताच्या धाग्यानें जोडले जात आहेत. खादी म्हणजे महती संघटना. खादी म्हणजे खोल आंतरिक ऐक्य. राष्ट्रीय संसारांत आज खादी शिरोभागीं आहे.

गरिबांना स्वाभिमानाचें अन्न देणारी, स्वातंत्र्य युद्धाचें प्रतीक झालेली अशी खादी कोण आदरणार नाहीं? कोण अंगावर घालणार नाहीं? अशा या खादीची मंगल टोपी कोण आपल्या डोक्यावर घालणार नाहीं? 'सर्वेषु गात्रेषु शिरः प्रधानम्' सर्व अवयवांत डोकें महत्त्वाचें. असें हें डोकें आधीं खादीनें नटवा. नवीन काळाला नवीन मंत्र, नवीन शास्त्र, नवीन वस्त्र. आजची राष्ट्रमातेची उपासना खादी परिधान करूनच करावयाची आहे. आज नको पागोटें, नको रुमाल, नको मंदील. आजच्या युगाचें चिन्ह गांधी टोपी.

राष्ट्राचें मंगल करणाऱ्या गांधी टोपीहून दुसरी मंगल वस्तु कोणती? राष्ट्राचें तोंड उजळ करणाऱ्या गांधी टोपीहून दुसरें निर्मळ शिरोभूषण कोणतें? समुद्राच्या लाटा आदळतात, उसळतात व त्यांतून स्वच्छ शुभ्र फेंस बाहेर

पडतो. आमच्या चळवळींचें सार म्हणून ही गांधी टोपी वर आली आहे. ही शुभ्र स्वच्छ टोपी आदरा.

चार लाख टोप्या खपविणें का जड आहे? संयुक्त खानदेशाची २० लाख लोकसंख्या आहे. त्यांतून १० लाख बायका वजा करा. आणखी दोन लाख अर्भकें, लहान मुलें दूर करा. तरी ८ लाख लोक टोप्या घालणारे निघतील. दोन्ही खानदेशांतच ४ लाख टोप्या वास्तविक खपल्या पाहिजेत. मग सर्व महाराष्ट्रांत खपविणें का अशक्य आहे?

उठा, सर्व मराठी इंग्रजी शाळेंतील मुलांनो! गांधी जयंतीस गांधी टोप्या घ्या. साऱ्या शाळांतून ही स्वच्छ शुभ्र देशभक्तीची प्रचंड लाट उसळूं दे. शाळांतील शिक्षकांनो! सर्वत्र ही गोष्ट पसरा, सांगा. सर्व कामगारांनो! तुमच्या खेड्यांतील मायबहिणींची, भावांची अब्रू सांभाळणारी ही खादी, तिचीच तुम्ही ही टोपी घ्या शेतकऱ्यांनो, तीं लाल पागोटीं दूर करून स्वातंत्र्याचें चिन्ह असणारी ही टोपी डोकीवर चढवा. उठा व्यापाऱ्यांनो, या टोप्या खरेदी करून दुकानांतील सर्वांना द्या. उठा सर्व पांढरपेशांनो, ही स्वातंत्र्याची पताका घरोघर न्या.

'डोक्यावर गांधी टोपी घालणें म्हणजे डोक्यावर स्वातंत्र्य घेऊन नाचणें. ती गांधी-टोपी नाहीं. माझ्या भारताचें वैभव, मंगल भाग्य, येणारा उज्ज्वल भविष्यकाल, गरिबांचा आनंदी संसार, निर्मळ स्वातंत्र्य—या सर्वांचा अमृतकुंभ त्या गांधी-टोपीच्या रूपानें आपण डोक्यावर घेत आहोंत. उठा सारे आणि घ्या हे अमृतकलश डोक्यावर. सर्वांनीं निश्चय करा. विजयादशमीचें सीमोल्लंघन करावयाचें आहे. सीमा ओलांडावयाचा नवीन पायंडा पाडा. या वर्षीच्या शिलंगणांत सर्वांचीं डोकीं एका गांधी टोपीनें शृंगारलेलीं दिसूं देत. सर्वांच्या डोक्यावर गांधी टोपी व डोक्यांत स्वातंत्र्याचा विचार. शुद्ध खादीच्या टोप्या घालून राष्ट्रांत नवचैतन्य आणा. सर्वत्र गांधी-टोपी दिसली कीं ऐक्याची नवीन लाट उसळेल. आपण सारे स्वातंत्र्याचे शिपायी, जणूं एका ध्येयाचे, एका विचाराचे असें वाटेल. लष्करांत सर्वांचा एक पोषाख असतो. कां? सर्वांना एकत्वाची भावना पटावी म्हणून.

'माझिया जातीचे मज भेटो कोणी'

असें प्रत्येकास वाटत असतें. ही राष्ट्रांत एक प्रचंड व्यापक जात निर्माण करा. संतांनीं त्यांच्या काळांत माळा पताका वगैरे संघटनेचें तंत्र निर्माण केलें. त्या त्या काळांतील महापुरुष संघटनेचीं नवीन तंत्रें निर्माण करतात.

मुसोलिनीचे काळे डगलेवाले, हिटलरचे पिंगट डगलेवाले तर खुदाई-खिदमतगारांचे लाल डगलेवाले. एक खूण पाहिजे. आपण निदान डोक्याची खूण तरी निर्मू या. राष्ट्रीय ऐक्याचें हें एक मोजमाप आहे. त्याला अर्थ आहे. राष्ट्रांतील लाखों लोक आज एकदम एका गोष्टीसाठीं उभे राहातात यांत अपार शक्ति आहे. आज गांधी टोपीसाठीं डोकें पुढें करणारे चार लाख लोक निघाले तर पुढें मरणासाठींहि डोकें पुढें करणारे चार लाख निघतील अशी आशा वाटूं लागते.

लहानशा गोष्टीसाठीं तरी लाखों लोक एकदम उभे राहातात असें दिसलें तर ती क्षुद्र गोष्ट कोणी समजूं नये. परकी सत्तेला तो गंभीर इशारा आहे. राष्ट्राला ती आशेची खूण आहे. उठा सारे आणि घरींदारीं, गल्लीगल्लींत, शाळा कॉलेजांत, खेड्यांत व शहरांत, बाजारांत व देवळांत गांधी टोपीचें राज्य करा. गांधी टोपीचें राज्य करून दाखवा म्हणजे इंग्रजांचें राज्य येथून दूर करण्यास स्फूर्ति आल्याशिवाय राहणार नाहीं. वंदे मातरम्.

—१९ सप्टेंबर, १९३८.

## भविष्यदर्शन कीं सुखस्वप्न २६

अहिंसेचें उदात्त उपनिषद् मानवी जीवनांत दाखल व्हावें ही महात्मा गांधींना तहान आहे. दिवसेंदिवस हा त्यांचा ध्यास उत्कट होत आहे. नुकतेच ते वायव्य-सरहद्द प्रांताचा दौरा करून आले. हा प्रांत म्हणजे आपल्या यात्रेचें फिरून फिरून जाण्याचें स्थान असें त्यांनीं गौरवानें म्हटलें आहे. पुन्हां कदाचित् ते तिकडे जातील. श्रीमती मिराबेन ह्यांना त्यांनीं तिकडे सेवेसाठीं पाठवलेंच आहे.

वायव्य प्रांतांत आज अधिक गोंधळ माजला आहे. महात्माजींसमोर अनेक शिष्टमंडळें आलीं. अनेकांजवळ त्यांनीं चर्चा केली. सरहद्दीपलीकडच्या जाती या प्रांतांत वरचेवर घुसतात. दिवसाढवळ्या लुटालूट करतात, माणसें पळवतात. या प्रांतांत कॉंग्रेसनें अधिकारस्वीकार केल्यापासून हे प्रकार वाढत आहेत. याचें कारण लष्कर व पोलिस यांच्यावर असावा तितका अधिकार येथील सरकारला नाहीं. शिवाय पोलिसांचा पुनःपुन्हां उपयोग करावयास कॉंग्रेस सरकार कचरतें. महात्माजींनीं सांगितलें "अशा परिस्थितींत डॉ. खानसाहेब यांनीं राजीनामा वेळ आली तर दिला पाहिजे."

सरहद्द ब्रिटिश सरकारचें धोरण चुकीचें आहे. महात्माजी तरी काय करणार? ते म्हणाले, 'माझ्याजवळ कांहीं यक्षिणीची कांडी नाहीं. मला चमत्कार करतां येत नाहीं. सरहद्दीवरचे लोक लुटालूट कां करतात? अन्नवस्त्र मिळालें नाहीं म्हणजे मनुष्य अत्याचारास प्रवृत्त होतो. या लोकांना धंदा देऊन स्वावलंबी करणें हाच याला मार्ग आहे. मला जर या लोकांत जाऊं दिलें तर त्यांना मी अहिंसक बनवीन, शांत करीन.'

वायव्य सरहद्द प्रांतांत या प्रश्नासाठीं महात्माजी गेले नव्हते. ते एक लाख खुदाई खिदमतगारांचा निकट परिचय करून घेण्यासाठीं गेले होते. अब्दुल गफारखान हे देवाचे सेवक आहेत. अहिंसा त्यांचा प्राण आहे. त्यांच्या अनुयायांची श्रद्धा आहे का हें पाहण्यास महात्माजी गेले होते. या स्वयंसेवकांची पुढाऱ्यावर श्रद्धा आहे. परन्तु व्यक्तीवरची श्रद्धा शेवटीं तत्त्वावर बसावी लागते. 'बुद्धं शरणं गच्छामि' ही पहिली पायरी. ही पायरी चढून शेवटीं 'धर्मं शरणं गच्छामि' या स्थितीवर जाणें जरूर असतें.

महात्माजी हें पहावयास आले होते. या सेवकांजवळ ते बोलले. ते म्हणाले, 'बंदुक टाकून दिल्यामुळें तुम्हांस दुबळें वाटत असेल, तर बंदूक हातीं धरा. अहिंसावादी बनल्यामुळें आपण अधिक बलवान झालों असा प्रत्यय आला पाहिजे.' महात्माजींनीं खुदाईखिदमतगारांस सरहद्दीपलीकडच्या लोकांत जाऊन सेवा करावयास, तेथें अहिंसेचें साम्राज्य पसर-

विण्यास सांगितलें. ते म्हणाले, 'सरहद्दीचाच नव्हे तर हिंदुस्थानच्या स्वराज्याचा प्रश्न तुमच्यावर, तुमच्या शांततापथकावर अवलंबून आहे.'

महात्माजींच्या या शब्दांत अधिक अर्थ आहे असें मला वाटतें. आज जगभर युद्धाचे वारे सुटले आहेत. भीषण छाया युरोपवर व जगावर पसरली आहे. जर्मनी, जपान, व इटली यांचा भस्मासुर दुबळ्या राष्ट्रांच्या स्वातंत्र्याचें भस्म करण्यासाठीं सरसावला आहे. अबिसिनिया अस्तास गेला. स्पेनला फांशीं देण्याचें काम चाललें आहे. चीनला-जपान चिरडूं पहात आहे. झेक राष्ट्रास झोडपण्यांत आलें. आस्ट्रिया खाण्यांत आला. ज्यू लोकांवर अंगावर कांटा आणणारे अत्याचार होत आहेत. महात्माजी लिहितात, "एका सर्व जातीचा उच्छेद मांडला असतां जर त्या जातीच्या संरक्षणार्थ युद्ध पुकारलें तर तें समर्थनीय ठरेल." -परंतु युद्धाचा मार्ग गांधीजींचा नाहीं. ते कोणता सल्ला देतात?

ते लिहितात, "ज्यूंना जर्मनी जर हांकलीत असेल तर ज्यूंनीं सांगावें "आम्हीं येथें जन्मलों. जर्मनी आमचीहि मायभूमि आहे. वाटलें तर आम्हांस गोळी घालून ठार करा. आम्ही येथून जाणार नाहीं." अशा प्रकारचा ज्यूंनीं सत्याग्रह करावा." परंतु त्याबरोबर ज्यूंना एक सूचना महात्माजींनीं दिली आहे. "आज पॅलेस्टाइनमध्यें ब्रिटिश बंदुका अरबांचे प्राण घेत आहेत. ज्यू लोकांनीं या गोष्टीस आळा घातला पाहिजे. ब्रिटिशांच्या लष्कराची मदत घेऊन त्यांनीं अरबांस सतावूं नये. पॅलेस्टाइनमध्यें त्यांनीं अरबांजवळ प्रेमानें रहावें. जर ज्यू अरबांचा छळ इंग्रजांकडून करवतील तर ज्यूंचा जर्मनी छळ करतो, याबद्दल त्यांना कुरकुर करतां येणार नाहीं."

महात्माजींनीं मागें झेक राष्ट्रास असेंच अहिंसेनें लढावयास सांगितलें. आज ज्यूंना ते हेंच सांगत आहेत. परन्तु हें सर्वांत अधिक सांगण्याचा अधिकार त्यांना भारतीयांस आहे. या भारतभूमींतच हा संदेश अधिक आशादायी ठरण्याचा संभव आहे.

महात्माजींना नेहमीं विचारण्यांत येतें "हिंदुस्थानवर कोणी स्वारी केली तर? हिंदुस्थानच्या सरहद्दीचें काय?" उद्यां स्वराज्य मिळाल्यावर हिंदुस्थानला इतर राष्ट्रांशीं जर लष्करी स्पर्धा करावयाची झाली तर अब्जावधि रुपये खर्चावे लागतील. देशांतील आर्थिक परिस्थिति सुधारण्यास बरींच

वर्षें लागतील. परन्तु त्याच्या आधीं लष्करासाठीं आणखी कर बसवावे लागतील. जगाच्याच आंधळ्यांच्या मालिकेंत हिंदुस्थान बसणार का ? माणसांचीं पोटें कशीं फाडावीं हेंच हिंदुस्थानांतील लाखों लोकांस शिकवण्यांत येणार का ?

हें भेसूर चित्र आहे. सरहद्दीवर लाख लोक येणाऱ्या परचक्रास तोंड देण्यासाठीं अहिंसक वृत्तीनें उभे राहतील का ? पुढें पंजाबांत अकाली शीख तसेच उभे राहतील का ? पुढें नंतर संयुक्त प्रांतांतील पांच लाख स्वयंसेवक मरणासाठीं पथकें पाठवतील का ? हिंदुस्थानांत सैन्य लागेल, परन्तु तें अहिंसेचें सैन्य. याच्यासाठीं सक्तीची लष्करभरती नाहीं. परन्तु आंतरिक माणुसकीची प्रेरणा हवी. या सैन्यासाठीं कारखाने नकोत, करभार नकोत. हिंदुस्थान परचक्रास अशा रीतीनें तोंड देईल. १० हजार वर्षांच्या त्याच त्या मानवी इतिहासानंतर एक नवीन पाऊल टाकलें जाईल.

महात्माजींसमोर हा प्रश्न आहे. प्रांतिक कां. सरकारांसमोर हा प्रश्न आज उभा आहे. गोळीबार करण्याची पाळी येते. अत्यंत भीत भीत व कमींत कमी करतां येईल तेवढाच गोळीबार करण्याची कांग्रेस सरकारें दक्षता घेतात. मुंबईला जर कां. मंत्री नसते तर गोळीबारांत दोघांनीं मरून भागतें ना; दोनशें मरते. कामगार ट्रामगाड्यांत मोफत घुसून लाल झेंडे फडकवीत होते. कांग्रेस सरकारानें अडथळा केला नाहीं. इतर मंत्री हें सहन करते ना. परन्तु तरीहि शेवटीं थोडा गोळीबार करावा लागला. कांग्रेस याची शेखी मिरवत नाहीं. जोंपर्यंत कांग्रेसजवळ अहिंसक स्वयंसेवकांचें पथक नाहीं, तोंपर्यंत अगतिक होऊन सहनशीलतेचा शेवटचा तंतु तुटला म्हणजे असें करावें लागतें. समजा, जर कोठें जमाव दगड मारूं लागला, तर त्या दगडांना आपल्या छातीवर व डोक्यावर घेऊन शांतपणें जमावाच्या क्रोधास तोंड देणारे सैनिक आमच्या जवळ हवेत. परन्तु आज कोठें आहेत ?

भावी हिंदुस्थानसमोर हे अनेक प्रश्न आहेत. महात्माजी ते प्रश्न सोडवण्याच्या चिंतेंत आहेत. अद्याप स्वराज्य मिळावयाचें आहे. मागें एकदां महात्माजींनीं लिहिलें होतें, " मी पुन्हां दांडीमार्च जेव्हां सुरू करीन, त्या वेळेस मी दिलेली शिकवण देशाच्या जीवनांत किती मुरली आहे तें दिसून येईल." आयुष्याच्या सायंसमयीं स्वातंत्र्याचा शेवटचा संग्राम महात्माजी लढतील.

त्यावेळेस ब्रिटिश लष्करी सत्तेसमोर उभे राहून मरा असा ते आदेश देतील. हा संग्राम, हा नवा दांडीमार्च पेशावर प्रांतांत का सुरू होईल ? त्या उंच भव्य पर्वतांच्या मुक्या अध्यक्षतेखालीं ती दिव्य मोहीम सुरू होईल का ? यासाठीं का त्यांनीं तेथें जाऊन आपली अहिंसेची बांसरी उत्कटपणें वाजविली ?

भविष्यकाळाच्या पोटांत काय आहे तें कोणास ठावें ? महात्माजींना लोक वेडा म्हणतील. वेडयांनींच जगाला माणुसकी शिकविली आहे. आज ते नवदर्शन करीत आहेत. त्यांच्या शिकवणीचा पुढें महान् वृक्ष होईल व सारें जग त्याच्या शीतल सुगंधी छायेंत बसेल. महात्माजी उद्यां काय करतील तें मी कसें सांगूं ? " मी उद्यां काय करीन तें मलाहि माहित नसतें " असें ते म्हणतात. ज्यानें स्वतःला ईश्वराच्या हातांतील एक साधन केलें आहे त्या महात्म्याच्या मुखांतून असेच उद्गार निघणार. परन्तु महात्माजींच्या सरहद्द प्रांतांतील यात्रेंत उज्ज्वल भविष्य सांठवलेलें आहे, असें चिंतनशील मनास वाटल्याशिवाय रहात नाहीं.

—५ डिसेंबर, १९३८.

## अहिंसा २७

अहिंसा माझ्या जीवनाचा आधार आहे. अहिंसेकडे माझी लहानपणापासून वृत्ति आहे, कल आहे. कांग्रेसमध्यें माझ्या अहिंसक स्वभावाला वाढावयास वाव होता म्हणून मी कांग्रेसचा भक्त बनलों. धर्ममय भावनेनें मी कांग्रेसचा उपासक बनलों. ३० सालीं धुळें जेलमध्यें असतांना दे. भ. नानासाहेब ठकारांनीं मला विचारलें, " तुम्ही सुटल्यावर काय करणार ? " मी म्हटलें, " प्रेमधर्माचा, सत्यधर्माचा प्रचार करीन." ३२ सालीं पू. विनोबाजींजवळ मी धुळें जेलमध्यें म्हटलें, " मी हातांत झाडू घेऊन गांवोगांव फिरत राहीन. दिवसा सफाई करावी, रात्रीं भजन प्रवचन करावें, रामनाम मुखानें म्हणावें. मी संस्था, आश्रम यांत राहूं शकणार नाहीं. तेथें माझा

जीव गुदमरेल" पू. विनोबाजी हंसून म्हणाले "असा मनुष्य आमच्याकडे आला नाहीं तरी आम्ही त्याच्याकडे जाऊं."

माझी अशी ही वृत्ति आहे. स्पर्धाक्षेत्रापासून मी दूर राहतों. अधिकाराची जागा मिळावी वगैरे स्वप्नांतहि माझ्या मनांत विचार येत नाहीं. परंतु अहिंसक वृत्तीचा असून मी कम्युनिस्ट लोकांशीं मैत्री कशी ठेवतों याचें कांहींना आश्चर्य वाटतें.

मला अशी श्रद्धा आहे कीं, ज्याच्या हृदयांत भूतदया आहे तो कम्युनिस्ट असलाच पाहिजे. महात्माजी आहिंसक साम्यवादी आहेत. मी कम्युनिस्टांशीं सहकार्य करतों म्हणजे त्यांच्या हिंसेशीं करतों असें नाहीं. कम्युनिस्ट केवळ अहिंसा मानीत नाहींत. आहिंसेनें कार्य झालें तर त्यांना पाहिजेच आहे. परंतु हिंसा ते अंतीं वर्ज्यंच मानतलि असें नाहीं. परंतु माझा हा स्वभाव नाहीं. अहिंसामय माझी वृत्ति आहे. मी अंमळनेरच्या थोड्या दिवसांपूर्वी भरलेल्या सभेंत सांगितलें, "मी जर मुंबईंत काम करणारा असतों व कामगार दगड मारीत आहेत असें मला कळतें तर त्यांच्या दगडांसमोर मी आधीं उभा राहिलों असतों. माझें डोकें फुटल्यावर मगच मिलवर दगड त्यांना मारतां आला असता. अंमळनेरचे कामगार जर दगड कधीं मारूं लागले तर त्यांना आधीं मला मारावें लागेल." हा माझ्यांत व कम्युनिस्ट मित्रांत फरक आहे.

गांधिवादी व साम्यवादी यांच्यांतलि मी एक लहान दुवा आहें. कम्युनिस्टांना खड्यांप्रमाणें मी वगळणार नाहीं. त्यांच्या हिंसेसमोर मी माझी अहिंसा नेऊन उभीं करीन. भाई डांगे एकदां मला म्हणाले, "गुरुजी, आमच्यावर टीका करावयाची तुम्हांला मुभा आहे." ते माझ्यापासून सर्वच त्यांचा कार्यक्रम अपेक्षीत नाहींत.

किसान व कामगार पिळले जात आहेत हें कोणीहि कबूल करील. किसानांची करुण कहाणी ऐकून शहारे येतात. तुम्ही पोटाला पोटभर मिळवण्यासाठीं उभें राहिलें पाहिजे. परंतु अहिंसेचा मंत्र घेऊन उभे रहा असें मी त्यांना सांगेन. या हिंदुस्थानांत अहिंसेशिवाय तरणोपाय नाहीं. हिंदुस्थान म्हणजे एक प्रचंड खंडच आहे. नाना धर्म नाना पंथ; नाना जाति नाना भेद; नाना भाषा नाना रूढी; अनंत प्रकारचा इतिहास; नाना प्रांत;

स्पृश्यास्पृश्य, हिंदुमुसलमान; अशा या प्रचंड देशांत एकदां हिंसा सुरू झाली तर ती कोठें थांबेल याचा नेम नाहीं. शिवाय हिंसा ही संपूर्ण जनतेची शक्ति असूं शकत नाहीं, हिंसा कांहीं लोकच करूं शकतात. हिंसेनें मिळालेली शक्तिहि त्यांच्याच हातीं राहाते. ती बहुजन समाजाच्या कल्याणासाठींहि असूं शकेल. परंतु ती सत्ता जनतेची नव्हे. खरी लोकसत्ता स्थापावयाची असेल तर अहिंसेनेंच स्वराज्य स्थापूं या.

परन्तु या तात्त्विक वादविवादांत मी शिरूं इच्छित नाहीं. हिंसा योग्य कीं अयोग्य हाहि प्रश्न मी दूर ठेवतों. ती योग्य ठरली तरीहि मला पेलणार नाहीं. त्रिचनापल्ली तुरुंगांत एका कम्युनिस्ट मित्राजवळ मी बोलत होतों. त्यानें विचारिलें, 'उद्यां हिंसेनें स्वराज्य मिळवावयाचें झालें तर' मी त्याला म्हटलें, 'कदाचित् मी गोळीबारासमोर उभा राहीन; परन्तु गोळी घालूं शकणार नाहीं. तुम्ही सांगतां तशी परिस्थिति आली तर मी दूर राहीन व खेड्यांत स्वच्छतेचें काम करीत जाईन, लहान मुलांच्या नाकांचा शेंबूड काढीत जाईन.

मी कम्युनिस्ट आहें. परंतु अहिंसामय वृत्तीचा आहें. अर्थात् हिंसेचा वास येणारे कठोर शब्द मी लिहितों व बोलतों. त्यामुळें मी अनेकांचीं हृदयें दुखविलीं आहेत. निरनिराळ्या निवडणुकी, तसेंच कामगार लढे यांच्याशीं एकरूप होऊन मी अहिंसेच्या उपासकाला न शोभसा वागलों आहें. श्री. वामन संपत पाटील यांजपासून तों अंमळनेरचे तांबोळी शेटजीं-पर्यंत व श्री. प्रताप शेटजींपासून तों श्री. काकासाहेब बर्वे यांच्यापर्यंत मी सर्वांना दुखविलें आहे. प्रत्यक्ष हिंसेपेक्षां ही हिंसा अधिक भयंकर असते. कारण हा प्रहार बुजत नाहीं. अतःपर मी जपण्याचें ठरविलें आहे.

साच आणि मवाळ । मितले आणि रसाळ
शब्द जैसे वल्लोळ । अमृताचे

हें माझें ध्येय होवो. एक दिवस सर्वत्र मला मांगल्य दिसेल का असें एखाद्या क्षणीं मनांत येऊन माझें हृदय उचंबळतें. तें माझें ध्येयस्वप्न मनासमोर आलें म्हणजे माझा अधःपात मला दिसतो. माझ्या त्या ध्येयासाठीं मी स्वतःला संयमार्गीत घालणें अत्यंत आवश्यक झालें आहे. ज्यांना मी दुख-यलें आहे त्यांची मी मनःपूर्वक क्षमा मागतों. न्यायमूर्ति रानडे म्हणत,

"विचार कठोर असूं देत. भाषा कठोर नको." तें खरें आहे. पुनश्च मला पश्चात्ताप करण्याची पाळी न येवो. खरा पश्चात्ताप एकदांच होतो. परंतु माझा हा निश्चयहि देवांच्या कृपेशिवाय पार पाडणें कठिण.

नामा म्हणे केशव राजा। केला पण चालवि माझा ॥

—१२ डिसेंबर, १९३८.

## एकच उपाय २८

कांग्रेसचा व्याप दिवसेंदिवस वाढत आहे. कांग्रेसचा प्रवेश खेड्यापाड्यांतून होत आहे. बहुजनसमाज कांग्रेसच्या निशाणाखालीं गोळा होत आहे. ठिकठिकाणच्या ज्या निवडणुका झाल्या त्यांत बहुजन समाजांतील पुष्कळ लोक कांग्रेसच्या तिकीटावर निवडून आले.

आपण आज बदलत्या काळांत आहोंत. बदलत्या काळांत फार जपून वागावें लागतें. सहकार्य, सहानुभूति, सद्भाव, परस्परविश्वास यांची अत्यंत जरूर असते. कारस्थानें करण्याची बुद्धि अशा वेळीं दूर राखावी लागते. सर्व व्यवहारांत निर्मळपणा राखण्याची अत्यन्त आवश्यकता असते.

वरचे वर्ग व बहुजनसमाज हे आजपर्यंत दूर दूर होते. फैजपूरला पहिलें ग्रामीण असें कांग्रेसचें अधिवेशन झालें. फैजपूरनें शहरें व खेडीं यांना जोडण्यास आरंभ केला. नवयुगास सुरुवात झाली. परन्तु शहरें व खेडीं यांचा खरा एकजीव अद्याप झाला नाहीं. वरिष्ठ वर्ग व मागासलेले वर्ग यांची तन्मयता अद्याप दिसत नाहीं.

शेटजी व भटजी या वर्गांच्या हातांत आजपर्यंत सत्ता होती. श्रीमंत व धीमंत हे सूत्रचालक होते. आतां बहुजनसमाज जागृत होत आहे. सत्ता आपल्या हातीं असावी असें त्यास वाटत आहे. या गोष्टीचें वैषम्य वरच्या वर्गांस वाटतां कामा नये. बहुजनसमाज हातांत कारभार घ्यावयास उत्सुक असेल तर आपण आनंद मानला पाहिजे.

कांग्रेसच्या झेंड्याखालीं बहुजनसमाज येत आहे. निरनिराळ्या म्यु. टींत,

बोर्डांत कांग्रेसच्या नांवानें तो शिरला आहे. तेथें आपण अधिकाराच्या व मानाच्या स्थानावर असावें असें त्यास वाटत आहे. या लोकांस तेथें बसवलें तर कारभार नीट चालेल कीं नाहीं याची खात्री पूर्वीच्या वरिष्ठ वर्गांतील कार्यकर्त्यांस वाटत नाहीं. अशा वेळेस काय करावयाचें ?

बहुजनसमाजाच्या हातीं जर आपण अधिकार आनंदानें न देऊं तर पूर्वीचा अविश्वास अधिकच वाढेल. मनें जवळ येण्याऐवजीं दूर होतील. आपण त्यांच्या हातीं अधिकार द्यावा. त्यांना प्रेमानें सूचना सल्ला द्यावी. आपली माहिती त्यांना पुरवावी. आपलें ज्ञान त्यांना द्यावें. त्यांच्याकडून काम करवून घ्यावें. आपण मान व अधिकारस्थान यांपासून खऱ्या भावनेनें दूर राहूं तर आपण सांगितलेलें ऐकलें जाईल. निःस्वार्थ वृत्तीनें हें सांगत आहेत असें बहुजनसमाजांतील लोकांस वाटेल. आपल्या सांगण्यास तेव्हांच थोडी किंमत येण्याचा संभव आहे.

महाभारतांतील गोष्ट या प्रसंगीं ध्यानांत घ्यावी. धर्मराजाला तहान लागली होती. त्यासाठीं भीम पाणी आणण्यास गेला. तेथें यक्ष होता. यक्ष भीमास म्हणाला, " माझ्या प्रश्नांचीं उत्तरें दे व मग पाणी ने. " भीमानें ऐकलें नाहीं. तो तेथेंच मरून पडला. मागून अर्जुन आला. त्याची तीच गत झाली. नकुळ सहदेव आले. तेहि मरून पडले. शेवटीं स्वतः धर्मराज आले. त्यांनीं यक्षाचे प्रश्नांस उत्तरें दिलीं. यक्ष प्रसन्न झाला व म्हणाला, " धर्मा काय पाहिजे माग. " धर्म म्हणाला , माझा धाकटा भाऊ सहदेव जिवंत कर. " यक्ष हंसून म्हणाला, " धर्मा, तूं वेडा दिसतोस. भीम, अर्जुन हे तुझे पाठचे सख्खे भाऊ. मोठे शूर व पराक्रमी. नकुळ सहदेव हे माद्रीचे पुत्र. हा बावळट, लहान सहदेव उठावा असें कां मागतोस ? " धर्म म्हणाला " जो लहान आहे तो आधीं उठूं दे. "

आपण वरच्या वर्गांनीं असेंच म्हटलें पाहिजे. हे मागासलेले वर्ग आधीं उठूं दे. त्यांना उठवण्यास आपण झटलें पाहिजे. त्यांना विश्वासांत घेतलें पाहिजे. त्यांना मानानें वागवूं. त्यांना पुढें करूं. त्यांनीं आपल्या हातीं सत्ता असावी असें दर्शविलें तर त्यांस आपण पुनःपुन्हा जातिनिष्ठ आहांत असें म्हणणें बरें होणार नाहीं. त्यांच्या जातिनिष्ठेचा आपल्या त्यागमय,

सेवामय, स्नेहमय वर्तनानें आपण त्यांना विसर पाडला पाहिजे. जातिनिष्ठ आहांत असें आपण म्हणूं तर ते अधिकच तसे होतील.

संक्रमणावस्थेंतच दक्षता लागते. नवीन अंकुर लावतांना खूप काळजी घ्यावी लागते. कोकणांत जेव्हां भाताचें रोंप उपटून त्याची पुनः लावणी करतात, तेव्हां किती चिखल करतात. जमीन पुनःपुन्हां नांगरून नांगरून तयार करावी लागते. आज बहुजन समाजाच्या अंतःकरणांत राष्ट्रभक्तीचें रोंप लावावयाचें आहे. तेथें खूप खत घातलें पाहिजे. श्रद्धा, विश्वास, प्रेम हीं भरपूर आधीं ओता व मग देशभक्तीच्या भावनालतांची लावणी तेथें करा. तरच त्या वाढतील, फोंफावतील. सुंदर फळाफुलांनीं शोभतील, डोलतील.

एका क्षणांत शेंकडों वर्षांचे संस्कार कसे नष्ट होतील ? आपल्या पूर्वजांचीं पापें आहेत. वरिष्ठ वर्गांनीं आजपर्यंत बहुजनसमाजाची उपेक्षा केली. या वरिष्ठ वर्गाबद्दलचे बहुजन समाजाच्या मनांतील शेंकडो वर्षांचे संशय जावयास हवे असतील तर वरिष्ठ वर्गांनीं निःस्वार्थ सेवेचे समुद्र आणून ओतले पाहिजेत. कांहीं पिढ्या केवळ निरपेक्ष निर्मळ सेवाच वरिष्ठ वर्ग जर करतील तर पुढें विश्वास उत्पन्न होईल. प्रायश्चित्तरूप सेवा आज आपण केली पाहिजे. त्यांच्यावर रागावून रुसून चालणार नाहीं.

कांग्रेसच्या झेंड्याखालीं कालपर्यंत जे नव्हते ते आज येतांक्षणींच जातिभेदातीत कसे होतील ? जातिभेद हे हजारों वर्षे आपल्या रोमरोमांत भिनले आहेत. एका क्षणांत ते जाणें शक्य नाहीं. प्रांतिक, धार्मिक, जातीय असे शेंकडो प्रकारचे भेदभुंगे राष्ट्रीय जीवन पोखरून टाकीत आहेत. ब्राह्मणेतरांनाच कशाला नांवें ठेवूं ? असेंब्लीचे निवडणुकीचे वेळेस देशस्थ ब्राह्मण कोकणस्थास व कोकणस्थ ब्राह्मण देशस्थास मतें द्यावयास तयार नसत. ऋग्वेदी यजुर्वेदी माणसास मत देत नाहीं. यजुर्वेदी ऋग्वेद्यास मत देणार नाहीं. वरपासून खालपर्यंत सर्वत्र भेदाचें हें भीषण भूत हैदोस घालीत आहे. भेदभूत मारावयाचें असेल तर निरपेक्ष सेवा करणारे, मानापमानास विसरणारे सर्व जातींतून शेंकडों लोक निघाले पाहिजेत. वरिष्ठ वर्गांतून तर आधीं निघाले पाहिजेत.

कॉंग्रेसच्या झेंड्याखालीं जे आले, त्यांच्यावर आपण विश्वास टाकूं या.

त्यांच्याकडे जाऊं येऊं या; त्यांच्याजवळ ऊठूं बसूं या; बोलूं चालूं या. त्यांना मनापासून मोठेपणा देऊन त्यांचें कौतुक करूं या. प्रेमानें त्यांना सागूं या, "कॉंग्रेसच्या झेंड्याची अब्रू राखा. सेवा करा. स्वार्थ नको, लांचलुचपत नको. वशिले नकोत. जनतेचें कल्याण पहा. तुमच्या हातांत झेंड्याची अब्रू आहे. अब्रू दवडाल तर भूमातेच्या तोंडाला काळें फासाल. जपून जबाबदारीनें वागा. आम्ही आहोंतच तुमच्याजवळ. तुम्हांस मदत देऊं, सूचना करूं, माहिती देऊं. कसें वागावें तें सांगूं."

आजच्या संक्रमणावस्थेंत हाच खरा उपाय आहे. अशानेंच आजपर्यंत अविश्वासानें एकमेकांपासून दूर राहिलेले बंधू एकत्र येतील. हृदयें हृदयांस मिळतील. सार्वजनिक जीवन निर्मळ होईल. अधीर व निराश होऊन चालणार नाहीं. आपण सारे एकत्र येणार, ध्येयनिष्ठ होणार. लवकरच स्वातंत्र्य संपादणार या अमर आशेनें आपण सारे वागूं या.

—१९ डिसेंबर, १९३८—

## एकजूट

२९

अमळनेरला २६ तारखेपासून संयुक्त खानदेश कामगारपरिषद भरणार आहे. हा अंक प्रसिद्ध होईल त्या दिवशीं परिषद सुरू झालेली असेल. ही परिषद एका दृष्टीनें अपूर्व आहे. महाराष्ट्रांत क्वचितच दिसून येणारी अशी एक महत्त्वाची वस्तु येथें दिसून येईल. ही परिषद कामगारांची असली तरी हजारों किसानहि या सभेस उत्सुकतेनें हजर असलेले दिसतील. किसान व कामगार अशा या दोन प्रचंण्ड शक्तींचें मधुर संमेलन कोणाला आनंद देणार नाहीं? परन्तु या दोन शक्तींत तिसरीहि एक शक्ति मिसळलेली दिसेल. सुरतेला जी नुकतीच विद्यार्थी-परिषद भरली, त्या परिषदेला महाराष्ट्र व कर्नाटकांतून जे प्रतिनिधि गेले, त्यांतील बरेचसे अमळनेरला आलेले दिसतील. हा नवविचारानें संपन्न, उत्कट ध्येयवादानें रंगलेला असा तरुणसंघहि या किसान कामगार परिषदेंत समरस झालेला पाहून राष्ट्राच्या भावि उज्वल

भवितव्याची आशा वाटूं लागते. कामगार, किसान व सुशिक्षित ध्येयवादी, क्रांतिवादी तरुणवर्ग यांच्याच एकजुटींतून खरें स्वातंत्र्य समोर येऊन उभें राहील.

या तीनहि वर्गांत गेल्या वर्षांत प्रचण्ड संघटना होत आहेत. कामगारांच्या गेल्या वर्षांतील चळवळी रोमहर्षण आहेत. कलकत्त्याच्या लाखों जूट कामगारांचा संप, कानपूरचा लाखों कामगारांचा तो ४० दिवस चाललेला भव्य दिव्य झगडा, यांची कोणाला विस्मृति पडेल? मद्रासच्या ट्राम्वेमधील कामगारांचा संप, ठाणें जिल्ह्यांतील आगपेट्यांच्या कारखान्यांतलि संप, पंजाबांतील शाली वगैरे तयार करणाऱ्या कारखान्यांतलि संप, सर्व देशभर कामगार कमर कसून उभा राहिलेला दिसून येतो. बहुतेक ठिकाणीं कामगारांनीं यशहि मिळविलें. आपल्या खानदेशांतील दिव्य झगडे आपण विसरणार नाहीं. पगार न घेतां पोट पाठीशीं बांधून आपण पगारवाढीचा लढा चालविला. धुळ्याचा लॉक ऑऊट आपण खोलला. आपली संघटना वाढली.

कामगारांच्या चळवळीप्रमाणेंच किसानांच्याहि चळवळी होत आहेत. बिहारमध्यें लाखों किसान उठूं लागले, संयुक्त प्रांतांत जमीनदारांना तोंड देण्यासाठीं गांवोगांव किसानांच्या सभा झाल्या. मध्यप्रांतांत व मुंबई प्रांतांत किसानांनीं मोर्चे काढले. आज ठिकठिकाणीं किसानसंघ स्थापन होत आहेत. किसानांच्या सभा होत आहेत. किसान संघटना करावयास शिकत आहे.

आणि तरुण विद्यार्थी. तेहि संघटित होत आहेत. राजबंदीदिन, हैदराबाददिन, स्वातंत्र्यदिन वगैरे अनेक प्रसंगीं विद्यार्थ्यांनीं आपली संघटना जागरूक ठेवली. राजकारणापासून आम्ही अलिप्त राहूं शकत नाहीं हें त्यांनीं दाखविलें. अनेक ठिकाणीं विद्यार्थ्यांचे संप झाले, आज राजकोटमध्यें तमाम विद्यार्थि स्वातंत्र्ययुद्धांत दाखल झाले आहेत. जो स्वातंत्र्ययुद्धांत भाग घेणार नाहीं, तो विद्यार्थीच नव्हे असें तेथें घोषिलें जात आहे. हैदराबाद संस्थानांतलि शेंकडों विद्यार्थ्यांनीं वंदे मातरम्‌साठीं शाळात्याग केला आहे.

अशा रीतीनें कामगार, किसान व तरुण हे जागृत होत आहेत. या तिघांना एकत्र गोवणें हें महत्त्वाचें कार्य आहे. कामगारांच्या संपांत अनेक ठिकाणीं विद्यार्थ्यांनीं सहानुभूति दाखवली, मदत पाठवली. धुळें येथील

टाळेबंदीसाठीं खानदेशांतील विद्यार्थ्यांनीं हरताळ पाडले. अमळनेरच्या शेतकऱ्यांच्या टोलटॅक्सच्या झगड्यांत कामगार व विद्यार्थि सामील होते. धुळ्याच्या कामगारांच्या झगड्यांत ४० गांवचे शेतकरी येऊन दाखल झाले. असा हा एकजीव होत आहे.

अमळनेरच्या परिषदेंत हीच गोष्ट अधिक स्पष्टपणें दिसून येईल. आपण एक गोष्ट लक्षांत ठेवूं या कीं या आपल्या साऱ्या संघटना शेवटीं कांग्रेसच्या स्वातंत्र्ययुद्धाला प्रखर करण्यासाठीं म्हणून आहेत. त्या संघटना कांग्रेस-विरोधी नाहींत. रोजचे प्रश्न सोडवण्यासाठीं व प्रचंड लढा उभा राहील त्या वेळेस एकजात त्यांत सामील होण्यासाठीं अशा संघटनांची जरूरच आहे.

या सर्व संघटना अहिंसक असूं देत तरच आपलें बळ वाढेल. अहिंसा म्हणजे शरणागति नव्हे, दुबळेपणा नव्हे. अहिंसा म्हणजे आपल्या रास्त हक्कासाठीं शांतपणें परंतु ध्येयाच्या तीव्रतेनें लढणें. आपली संघटना पोरकट असतां कामा नये. हुल्लड माजवणें म्हणजे संघटना नव्हे. संघटनेंतून सामर्थ्य निर्माण न झालें तर ती संघटना कसची? वाफ कोंडून ठेवूं या. वाफ सारी सोडणें यात शक्ति नाहीं. कोंडलेली वाफ वेळ येतांच सोडूं तरच प्रचंड हालचाली होतील. शब्दांची वाफ दवडीत नका बसूं. परंतु मनांत अपार निश्चय सांठवा. अधीर होतो तो दुबळा असतो. अधीरपणा हें दुबळेपणाचें लक्षण आहे. आपण क्षणाक्षणाला, उठल्याबसल्या अधीर नाहीं होतां कामा. सिंहाच्या अंगावर उंदीर उड्या मारतील, माशा नाचतील. सिंह शांत पडून राहतो. परंतु समोरून हत्ती आला तर गर्जना करून उठतो. नाग आपलें विष सांठवून ठेवतो. होतां होईल तों तो चावत नाहीं. परंतु एकदां फणा करून उभा राहिला म्हणजे त्याच्या नजरेला नजर देतां येत नाहीं.

ही संयमाची अपार शक्ति आपण सांचविली पाहिजे. किसानांचा मोर्चा न्या. परंतु तो फळ मिळवल्याशिवाय मग परत आणूं नका. संप करा, परंतु मग यशाशिवाय खालीं वाकूं नका. पदोपदीं संप, पदोपदीं मोर्चे काढूं तर प्रतिकारशक्ति वाढणार नाहीं.

कामगार, किसान, तरुण संघटित होत आहेत याचें कांग्रेसच्या आत्म्यास वाईट वाटणार नाहीं. तुमची संघटना व्हावी म्हणून तर अधिकारस्वीकार.

पूर्वीच्या अमदानींत सारीच भीति. ही भीति जावी व तुम्ही निर्भय होऊन उभें राहावें हाच अधिकारस्वीकारांतील मुख्य हेतु. ही सारी संघटना शेवटीं स्वातंत्र्यसंग्रामासाठीं उपयोगांत आणा म्हणजे झालें.

अमळनेरला किसान-कामगार कार्यकर्ते एकत्र जमणार आहेत. कांग्रेस-मध्यें प्रखर वृत्तीचे व सौम्य वृत्तीचे असे भेद होत आहेत. प्रखर वृत्तीच्या लोकांना वगळण्याचे हेतुपुरस्पर प्रयत्नहि होतात. एक पक्ष आपली संघटना करूं लागला तर दुसऱ्यासहि करणें प्राप्त असतें. कांग्रेसमधील जहाल गटानेंहि एकत्र यावें. आपल्या चळवळीस एकसूत्रीपणा आणावा. आपला पक्ष बळकट करावा. यांत पाप वगैरे कांहीं नाहीं. स्वार्थत्याग सर्वांचाच आहे. आणि अमक्यानें अधिक स्वार्थत्याग केला एवढ्यावरून त्याच्या पाठीमागेंच जावें असें होत नाहीं. बॅ. सावरकरांहून कोणाचा त्याग अधिक आहे? त्यांच्या पासंगासहि मोठेमोठे पुरणार नाहींत, मग आम्हां पामरांची कथा काय? परन्तु म्हणून त्यांच्या झेंड्याखालीं गेलेंच पाहिजे असें नाहीं. त्याग मोठा असेल परन्तु ध्येय चुकीचें असणें शक्य आहे. या दृष्टीनें कांग्रेसमधील कांहीं लोक अधिक त्यागी, अधिक विरक्त व तपस्वी असले तरी एवढ्यानें त्यांचेंच सारें अनुकरणीय ठरेल असें नाहीं.

कामगार, किसान वगैरेंचे प्रश्न प्रखर होत आहेत. कर्जाचा प्रश्न, तह-शिलीचा प्रश्न, खंडकरी बिल, वगैरे प्रश्नांवर कांग्रेसमधील कांहीं कार्यकर्ते मूग गिळून बसतात. दुसऱ्यांना हें पहावत नाहीं. हे दुसरे प्रखर लोक कां स्वस्थ बसतील ? नाहीं बसणार. ते चळवळी करतील. त्यांत कांग्रे-सचा द्रोह आहे असें मला वाटत नाहीं.

किसान, कामगार, विद्यार्थी, यांच्या संघटना करणाऱ्यांनीं एक गोष्ट लक्षांत ठेवणें जरूर आहे. किसानांत काम करणारे जे असतील त्यांच्या हातांत किसान पाहिजेत. कामगारांत कार्यकर्ते असतील, त्यांनाहि हाच विश्वास हवा. तसेंच विद्यार्थ्यांतहि काम करणाऱ्यांस म्हणतां आलें पाहिजे. कांहीं पुढारी म्हणतात, " आम्हांला रान उठवायचें आहे. " रान उठवणें सोपें, परन्तु जागृत वाघाला आंवरणें कठिण. सेनापति सांगेल तसें लष्कर वागेल तरच खरें बळ. किसान, कामगार, विद्यार्थी यांना चेतवणें सोपें आहे. परन्तु त्यांना लगामहि घालतां आला पाहिजे. उठा म्हटलें कीं

उठतील, थांबा म्हटलें कीं थांबतील, अशी शिस्तीची बळकट संघटना व्हायला हवी.

या संघटनांत संयम हवा, शिस्त हवी; पोरकटपणा नको, अहिंसा हवी. आणि सर्वांत महत्त्वाची वस्तु म्हणजे शेवटीं त्या कांग्रेसच्या लढ्याला उपकारक ठरल्या पाहिजेत. अमळनेरला या अनेक दृष्टींनीं विचार होईल अशी आशा आहे. अमळनेर काय करतें, काय ठरवतें इकडे महाराष्ट्राचें लक्ष आहे. ही जबाबदारी ओळखून सारे वागतील अशी मी आशा करतों.

—२६ डिसेंबर, १९३८.

## कॉंग्रेसची कसोटी ३०

हिंदु महासभा व मुस्लीम लीग यांनीं कॉंग्रेसला पकडींत धरून नष्ट करण्याचा दुष्ट कारभार चालविला आहे. तिकडून बॅ. जिनांनीं रागारागानें म्हणावयाचें, "कॉंग्रेसला हिंदु राज्य स्थापावयाचें आहे." इकडून बॅ. सावरकर म्हणतात, "कॉंग्रेस ही मुसलमानांची मिंधी आहे."

पर्वतावर कितीहि लाटा आदळल्या तरी पर्वत अचल व अभंगच राहील. तो आपले पाताळांत रोंवलेले पाय व आकाशाला भिडलेलें मस्तक तसेंच राखील. कॉंग्रेसचे पाय बहुजनसमाजाच्या सेवेंत रोंवलेले आहेत. सर्व भारतीय ऐक्याच्या दिव्य ध्येयाच्या आकाशांत तिनें आपलें शिर स्थिर ठेवलें आहे. हिंदुस्थानचे तुकडे करण्याचें पाप कॉंग्रेस कोणाला करूं देणार नाहीं. जगांतील सर्व संस्कृति व सर्व धर्म भारतांत येऊन त्यांचें एक मधुर, मनोहर सहस्ररंगी संमिश्रण भारतभाग्यविधात्यास बनवावयाचें आहे. भारतीय इतिहासांतील हें सोनेरी सूत्र जो हातीं घेईल त्यालाच भारतीय इतिहासाचें मर्म समजलें असें म्हणतां येईल.

कॉंग्रेसनें हें ध्येय आपल्यासमोर ठेवलें आहे. मी एकदां पुण्याहून आगगाडींत बसून येत होतों. एक विद्वान् गृहस्थ मजजवळ बोलत होते. ते म्हणाले, "अशानें तुमची कॉंग्रेस नाहींशी होईल." मी त्यांना म्हटलें,

"मरण तर सर्वांनाच आहे. थोर ध्येय ठेवून, त्याच्यासाठीं अखंड श्रमून, झिजून, जर मरण आलें तर तें मरण नसून जीवनच आहे. क्षुद्र व संकुचित ध्येय डोळ्यांसमोर ठेवून जगणें यांत काय भाग्य ? कॉंग्रेससारख्या संस्थेला का डबक्यांत बुड्या मारावयास लागणार ? भारतांतील ३५ कोटी लोकांच्या ऐक्याच्या ध्येयभूत सागरांत ती बुड्या मारीत राहील व स्वातंत्र्याचें मौक्तिक मिळवण्याची पराकाष्ठा करील."

कॉंग्रेस अमर आशा उराशीं ठेवून भारतांत अपूर्व गोष्ट घडवून आणण्यासाठीं धडपडेल. तिच्या धडपडीला अंतीं यश आल्याशिवाय राहणार नाहीं. एकीकडे जिनांचा जळफळाट चालला आहे. परंतु त्याच वेळेस पंजाब व बिहार येथील सभांतून दुसरे थोर मुस्लीम पुढारी सर्व मुस्लीम बंधूंस कॉंग्रेसमध्यें सामील होण्यास सांगत आहेत. मुर्शिदाबाद येथें मौ. अश्रफुद्दिन म्हणाले, "इंग्रजांच्या १५० वर्षांच्या राज्यांत इस्लामला धोका आला नाहीं. आतां कॉंग्रेसच्या हातांत मंत्रिमंडळें आलीं म्हणून का दोन वर्षांत धोका आला ? इस्लामला धोका अशी ओरड करून सर्वसाधारण मुसलमान जनतेला फसवण्याची कांहीं मुसलमान पुढाऱ्यांची सांप्रतची वृत्ति आहे. ही वृत्ति कल्याणाची नाहीं. ही वृत्ति भेकडपणाची आहे. हिंदुस्थानांतील सर्व समाजांना खाजगी राष्ट्रीय जीवनधर्म कायम राखून नवीन सुधारणा व संस्कृति घडवून आणण्याचे बाबतींत मदत करणें शक्य आहे. कोणत्याहि अटी न घालतां कांग्रेसच्या स्वातंत्र्याच्या लढ्यांत मुसलमान बंधूंनीं सामील व्हावें."

मुसलमान बंधूंतहि असा सुंदर ध्येयवाद आहे. हीच आमची आशा आहे. भारतांतील सर्व नव युवकांनीं हीच दृष्टि घेतली पाहिजे. आम्हांला ३५ कोटींचा हिंदुस्थान पाहिजे आहे अशी घोषणा तरुणांनीं नाहीं करायची तर कोणी ? कांग्रेसच्या झेंड्याखालीं किती मुसलमान येतात हें नका पाहूं. तुम्ही हिंदु तर या सारे. तुम्ही आलेत म्हणजे तेहि येतील; आल्याशिवाय राहणार नाहींत. भारताच्या अभंग ऐक्याची दृष्टि घेऊन उभा राहील तोच खरा भारतीय. या विशाल ऐक्यासाठींच भारत जगला आहे व जगेल.

सारें जग चिरफाड करण्यांत आनंद मानीत आहे. कांग्रेस ३५ कोटींना

सांधवण्याचें देवाचें काम करून राहिली आहे. यश का अपयश हा प्रश्न नाहीं. गीता गर्जून सांगत आहे,

मामनुस्मर युद्धय च।

देवाला स्मरून कांग्रेस लढत राहील. देवाला स्मरणें म्हणजे भारतांतील सर्व मानवप्रवाहांना एका सागराकडे घेऊन जाणें. हें देवाचें काम. सागराच्या अनंत लाटा खालीं वर होत तीराला गांठतात. कॉंग्रेस ही यश कीं अपयश हें न पाहतां ध्येयाला गांठण्यासाठीं धडपडत राहील.

ज्वारीचे टपोरे मोत्यासारखे दाणे असतात. परन्तु जात्याच्या दोन्ही तळीं त्या दाण्याचें पीठ करतात. हिंदुमहासभा व मुस्लीम लीग या जात्यांत कॉंग्रेससारखी थोर संस्था का भरडून निघेल ? समजा भरडली गेली तरी तें तिचें भरडून निघणेंहि राष्ट्राला पुष्टिदायकच होईल. तें ज्वारीचें पीठ तुम्हांलाच ताकद देईल. कांग्रेसचें मरणहि जीवनप्रद ठरेल.

परन्तु कांग्रेस मरणार नाहीं. भारतांतील कोट्यवधि तरुण का बेडकांप्रमाणें चिखलांत नांदतील ? भारतीय तरुणांचा आत्मा भ्रामक अहंकारी बंधनें फेंकून व्यापक ध्येयालाच मिठी मारावयास तडफडत आहे. या तरुणांना बॅ. जिना व बॅ. सावरकर जर पिंजऱ्यांत घालूं पाहतील तर हे तरुण तें सहन करणार नाहींत. आम्हांला जुनीं बंधनें, जुने चिखल, जुनीं बरबटें नकोत, अशी ते घोषणा करतील व नव भव्य भारत बनवण्यासाठीं कॉंग्रेसच्या झेंड्याखालीं थोर प्रयत्न करावयास उभे राहतील.

—२ जानेवारी, १९३९.

## मोठी दृष्टि

३१

आज भारतवर्षात कोणत्या एका गोष्टीची अत्यंत आवश्यकता पदोपदीं भासत असेल तर ती मोठ्या व व्यापक दृष्टीची. संकुचितपणाचे उपासक आज सर्वत्र दिसत आहेत. या विशाल देशांत विशाल दृष्टि जर घेतली नाहीं, तर नेहमीं अडचणी व आपत्तिच येणार. मोठ्या देशांत जन्म

घेणाऱ्यांचें मोठें भाग्य व त्याप्रमाणेंच जबाबदारीहि मोठी. हिंदुस्थानच्या डोक्याशीं उभा असलेला उंच हिमालय सांगत आहे " हिंदी लोकांनो, क्षुद्र वृत्ति सोडून उच्च वृत्ति घ्या. " हिंदुस्थानच्या तिन्ही बाजूंनीं उचंबळणारा हिंदी महासागर युगानुयुगें गर्जना करून सांगत आहे, " हिंदी लोकांनो, हृदय माझ्यासारखें मोठें करा. "

परन्तु जगांतील सर्वांत मोठ्या उंच हिमालयाची किंवा उचंबळणाऱ्या अनंत सागराची शिकवण अद्याप आम्ही घेतली नाहीं. कांग्रेसला ही शिकवण द्यावयाची आहे. एकच थोर व महनीय अशी ही त्यागमयी, पुण्यमयी संस्था ह्या कार्यासाठीं उभी राहिलेली आहे. परन्तु दुःखानें आणि खेदानें म्हणावें लागतें कीं कांग्रेसमधील कांहीं थोरामोठ्यांसहि ही व्यापक दृष्टि अद्याप यावयाची आहे.

माझे कांहीं मित्र कांग्रेसपत्रामुळें असंतुष्ट झाले आहेत. " तुमच्या कांग्रेसपत्रामुळें आम्हांला लाजेनें खालीं मान घालावी लागते. कोठें इतरत्र गेलों तर विचारतात कीं, काय हें तुमचें खानदेशांतील कॉंग्रेस पत्र ! " वगैरे ते मजजवळ बोलले. दुसऱ्या कांहीं मित्रांनीं पत्रें पाठवून कळविलें " लाल झेंडा व तिरंगी झेंडा तुम्ही एकत्र कसा आणतां? तुम्ही दांभिक आहांत. वरपांगीं गांधीभक्ति दाखवून गांधी तत्त्वांची तुम्हांला मनसोक्त निंदाच करावयाची आहे. "

माझ्या मित्रांचे वरील बोल व वरील पत्रें ऐकून व वाचून मला अत्यंत दुःख झाल्याशिवाय राहिलें नाहीं. दंभ हा तर दुर्गुणांचा राजा. मी दांभिक गांधीभक्त आहें का, मी माझ्या मनांत पाहूं लागलों. मी जितका असावयास पाहिजे तेवढा गांधीभक्त नसेन. परंतु दंभ तर मला माझ्या ठिकाणीं या बाबतींत दिसेना. माझ्या मित्रांच्या हृदयांत महात्माजींबद्दल जितकी भक्ति असेल तितकीच माझ्याहि आहे. माझें हृदय फाडून दाखवतां आलें तर तेथें महात्माजींची मूर्ति दिसेल.

माझे मित्र मग माझ्यावर कां रागावतात ? मी कांग्रेसमध्यें त्यांच्यापेक्षां अधिक अर्थ पाहतों म्हणून ते मजवर रागावतात. दे. भ. अण्णासाहेब दास्ताने एकदां हंसत मला प्रेमानें म्हणाले, " तुमची विशाल सहानुभूति आमच्याजवळ नाहीं. " मी जरा संकुचित व्हावें अशी माझ्या मित्रांची

अपेक्षा दिसते. परंतु संकुचित वातावरणांत माझा आत्मा तडफडून गुदमरून मरेल. संकुचितपणामुळें का कांग्रेसची शक्ति वाढेल? त्यांना तसें वाटत असेल, मला तसें वाटत नाहीं. कांग्रेसची शक्ति कमी होत आहे असें मला वाटलें तर मी माझा मार्ग सोडीन. कांग्रेस हें माझें महान् दैवत आहे. कांग्रेसचें बळ यत्किंचितहि कमी होण्यासाठीं मी कारणीभूत होत असेन तर वसिष्ठ ऋषिप्रमाणें—

"अद्या मुरीय यदि या तुधानोऽस्मि"

असेंच मीहि म्हणेन. मी असा चांडाळ असेन तर आजच मला मरण येवो.

मी कांग्रेसमध्यें अधिक अर्थ पाहतों. मी कम्युनिस्ट बंधूंशीं सहकार्य करतों. किसानसंघाशींहि तुसडेपणानें वागत नाहीं. परंतु याच माझ्या वृत्तीचा माझ्या मित्रांना राग येतो. कम्युनिस्ट व किसान कार्यकर्ते यांना मी अराष्ट्रीय मानावयास तयार नाहीं. हे लोक जात्यंध नाहींत. अत्यंत पददलित बंधूंसाठीं ते तडफडतात, रागानें बोलतात. ते शूर आहेत, त्यागी आहेत, कष्टाळू आहेत. उद्यां कांग्रेसचा सत्याग्रह सुरू झाला तर हे आधीं होमांत उड्या घालतील. स्वामी सहजानंदजींनीं अंमळनेरला हीच गोष्ट सांगितली. हे लोक कांग्रेसचे शत्रु नाहींत. अंमळनेरच्या कामगार परिषदेंतील ठराव वाचणाऱ्यांस ही गोष्ट दिसून येईल. प्रत्येक ठरावांत कांग्रेसची शक्ति वाढवण्याबद्दल अट्टाहास आहे. "कांग्रेसनें शिस्तभंगाचे इलाज योजले तरी रागावूं नका. किसान संघ काढलेत तरी ते कांग्रेसशीं जोडलेले ठेवा. कांग्रेसचे सभासद सर्वांनीं व्हा." अशा गोष्टी त्या ठरावांत आहेत.

कांग्रेसला या लोकांना क्रांतिमय करावयाची आहे. क्रांतिमय म्हणजे हिंसामय नव्हे. क्रांतिमय म्हणजे सर्वांत मोठा गरीब वर्ग जो किसान-कामगारांचा त्यांच्या सुखाच्या गोष्टी कॉंग्रेसनें अधिक त्वरेनें हातीं घेणें. यायोगें हे वर्ग कांग्रेसच्या झेंड्याखालीं येतील. आम जनता कांग्रेसमध्यें आली म्हणजे कांग्रेसचें बळ शतपटीनें वाढेल.

किसान कामगार कम्युनिष्ट कार्यकर्त्यांना आज कांग्रेस जवळ करूं पहात आहे. पं. जवाहिरलाल आल्यापासून हे वारे वाहूं लागले आहेत. कम्युनिस्ट बंधूंनीं महात्माजींची मोकळेपणें भेट घेऊन चर्चा केली. महात्माजी या शूरांना दूर नाहीं लोटूं पहात. असें कळतें कीं हल्लीं कम्युनिस्ट लोक

व कांग्रेसमधील थोर सूत्रचालक यांच्यांत कांहीं वाटाघाटी होत आहेत. कदाचित् मुंबई कार्पोरेशनच्या निवडणुकींत कम्युनिस्ट लोक कांग्रेसच्या तिकीटावर उभे केले जातील. संभव आहे कीं मुंबई प्रां. कां. कमिटी मुंबईच्या कामगार कार्यकर्त्यांवरील शिस्तभंगाचे इलाज मागें घेईल. मग महाराष्ट्र प्रां. कां. कामिटीहि इकडे क्षमा करील. दृष्टि मोठी होत जाईल, कांग्रेसमध्यें अधिक अर्थ येईल.

म्हणजे मला नम्रपणें म्हणावेंसें वाटतें कीं कांग्रेस पत्राचें धोरण आहे तेंच कांग्रेसच्या थोर लोकांच्या मनांतील वृत्तीचें द्योतक आहे. कां. लाहि बंधनें हवींत, परन्तु तीं क्षुद्र बंधनें नकोत. पृथ्वीला क्षितिजाचें बंधन शोभतें. सागराला वेळेचें बंधन शोभतें. त्यांना क्षुद्र बंधन घालाल तर हास्यास्पद होईल. चोहोंकडून कोंडलेलें थडगें नाहीं करावयाचें कॅांग्रेसचें. कांग्रेसमाता म्हणजे विशाल दृष्टीची, व्यापक सहानुभूतीची, सर्वोत्तम सर्वश्रेष्ठ अशी संस्था.

ठिकठिकाणच्या कांग्रेस कार्यकर्त्यांनीं किसान कामगार कार्यकर्ते जवळ करावे. त्यांना आस्था दाखवावी. आज जनतेंत प्रचंड आग्रति करावयाची आहे. सारी शक्ति उपयोगांत आणूं या. कम्युनिस्ट कांग्रेसद्रोही नाहींत. कांग्रेसला तेहि वाढवूं पाहतात. क्वचित् प्रखर मतभेद झाला तर तो प्रासंगिक असतो. क्षणभर आई मुलाला दूर लोटते व मूल आईपासून दूर जातें. पुन्हां दोघे एकमेकांकडे अश्रूंतून हंसत बघतात व एकमेकांस भेटतात.

—९ जानेवारी, १९३९.

## स्वातंत्र्य-दिन

२६ जानेवारीचा स्वातंत्र्यदिन हिंदुस्थानभर साजरा केला जाईल. या दिवशीं घरोघर तिरंगी झेंडे लावले जातील. प्रभातफेऱ्या निघतील. खादी खपली जाईल. रस्ते झाडले जातील. हरिजनांच्या भेटीगांठी घेतल्या जातील.

हिंदुमुसलमान एकत्र येतील. सभा होतील, मिरवणुका निघतील. सारें वातावरण एका दिव्य भावनेनें भरून जाईल.

या दिवशीं स्वातंत्र्यार्थ झालेले सारे प्रयत्न डोळ्यांसमोर येऊन उभे राहतील. जगांतील आजपर्यंतचे स्वातंत्र्याचे झगडे आठवतील. स्वातंत्र्यासाठीं जगाच्या आरंभापासून आतांपर्यंत किती बलिदान झालें असेल याची कोण गणती करील ? स्वातंत्र्यार्थ केलेल्या बलिदानाचें मोजमाप करावयाचें नसतें. स्वातंत्र्य हें अमोल आहे.

जगांतील व भारतांतील आजपर्यंतचे स्वातंत्र्यसंग्राम आठवले व आजचा भारतीय संग्राम डोळ्यांसमोर आणला म्हणजे एक नवीन गोष्ट दिसते. हिंदुस्थान आज अहिंसक मार्गानें स्वातंत्र्य मिळवूं पहात आहे. जगाच्या इतिहासांतलि ही नवीन भर आहे. दहा हजार वर्षें एका मार्गानें गेल्यावर दुसरा एक मार्ग भारत तयार करीत आहे. शांतपणें उभे राहून भारतांतलि स्त्रीपुरुष, लहान मुलें लाठीमार खात आहेत. गोळ्या झेलीत आहेत, घोड्याचे टापांखालीं, मोटारींखालीं देह फेंकीत आहेत, हा देखावा अपूर्व, अभूतपूर्व, आहे.

२६ जानेवारीच्या दिवशीं किती कितीतरी गोष्टी आठवतील. गेल्या २० वर्षांतील सारे हुतात्मे हृदयांत उभे राहतील. परन्तु अद्याप पूर्ण बलिदान झालें नाहीं. स्वातंत्र्यार्थ अजून अपार त्याग केला पाहिजे आहे. त्याची प्रतिज्ञा या दिवशीं सर्वांनीं केली पाहिजे.

२६ जानेवारीच्या या स्वातंत्र्यदिनांत सर्वांनीं सामील व्हावें. कारखान्यांना मालकांनीं सुटी द्यावी. शाळा बंद ठेवाव्या. सर्वांनीं स्वातंत्र्याचीं गीतें गात, इतर विधायक सेवा करीत हा दिवस दवडावा. शाळांना सुटी मिळेल का ? कारखानदार कामगारांना स्वातंत्र्याचा आनंद अनुभवूं देतील का ?

कांहीं शाळांतून या २६ तारखेस मुलांच्या परीक्षा ठेवण्यांत आल्याचें कळतें ! त्या शाळाचालकांच्या कृपण मतीची किंव येते. स्वातंत्र्याचा भव्य इतिहास आठवून आज नाचावयाचें. अशा वेळेस चार भिंतींच्या आंत मुलांना गणितें सोडवावयास लावणार ? तरुणांनो, स्वातंत्र्याच्या प्रेमाची परीक्षा द्यावयाची असेल तर शाळांत पेपर सोडवीत बसूं नका. तुमचें स्वातंत्र्यप्रेम किती बळकट आहे हें तुमच्या शाळाचालकांस पहावयाचें आहे.

तुमचें उत्कट प्रेम दाखवून त्यांना समाधान द्या. शाळेंत दगडी भिंती, बाकें याशिवाय चालकांस या दिवशीं कांहीं न दिसो.

खानदेशांतील हा दिवस यंदा अभिनव रीतीनें साजरा होईल. सारी दुःखी जनता जळगांवला एकत्र येऊन तिरंगी झेंड्याखालीं उभी राहून हा दिवस साजरा करणार आहे. खानदेशांतील सारे विद्यार्थी, सारे कामगार, इतर जनता या शेतकऱ्यांच्या प्रचंड समुदायांत मिळून जातील व अभेद्य एकजूट तिरंगी झेंड्याखालीं करतील अशी आशा आहे.

—२३ जानेवारी, १९३९.

## मंत्र्यांचे चरणीं ३३

पू. खानदेश जिल्ह्यांतिल ५० हजारांवर शेतकरी जळगांवला २६ तारखेस जमले होते. उदासीन शेतकरी कां जमा झाले? त्यांना अपार कष्ट आहेत म्हणून. सुखासुखी शेतकरी सभा—परिषदांस जमणार नाहीं, पायीं वणवण करीत येणार नाहीं.

खानदेशच्या शेतकऱ्यांची यंदा कमर मोडली आहे. किती तरी वर्षें तो हालांत दिवस काढीत आहे. आज कित्येक वर्षें भाव नाहींत म्हणून तो डबघाईस आला आहे. १९३१ सालीं अतिवृष्टि होऊन पिकें बुडालीं. तरी तेव्हांहि त्यांची हांक कोणी ऐकली नाहीं, तहशील वसूल केले गेले. त्या वेळेस एका शेतकऱ्यानें सभेंत सांगितलें होतें, " आतां आम्हांला सरकारनें विकावें व तहशील वसूल करावे." दुसरा एक शेतकरी म्हणाला " आमच्या सर्व जमिनी सरकारनें घ्याव्या. आम्हांला रोज काम द्यावें, पोटभर मजुरी द्यावी." १९३१ सालांतील ते शब्द. आज सात वर्षांनंतर आणखी काय दैना झाली असेल हें ज्यांना हृदय असेल त्यांनीं ओळखून घ्यावें.

दगडावर दहा घाव घातले तरी तो फुटलेला दिसत नाहीं. परंतु त्याचे अणुपरिमाणु ढिले होत असतात. अकरावा घाव पडतांच त्या अभंग दिसणाऱ्या दगडाचीं छकलें होतात. कोणी विचारतो, " एकदम कशीं

छकलें झालीं ?" त्याला उत्तर मिळतें "पहिले दहा घाव तुम्ही पाहिले नाहींत." खानदेशांत एके ठिकाणीं एकानें विचारलें, "अशीं वर्षें का शेतकऱ्याला येत नाहींत ? यंदाच कां ओरड ?" त्याला उत्तर आहे कीं, "यंदाचा अकरावा घाव होता. दहा घाव दहा वर्षें बसले. तरी अभंग दिसणारा शेतकरी या अकराव्या टोल्यानें जमीनदोस्त झाला आहे."

ठिकठिकाणच्या शेतकऱ्यांच्या कहाण्या ऐकल्या म्हणजे काय करावें तें समजत नाहीं. एदलाबाद पेट्यांतील पूर्णा नदीच्या कांठचीं ३० गांवें तर भयंकर आपत्तींत आहेत. हिंदुस्थान सरकारचीं राखीव शिकारीचीं जंगलें शेतकऱ्यांना उध्वस्त करीत आहेत. ३००–३०० विहिरी असलेलीं गांवें उजाड होत आहेत. अतिवृष्टि व जंगली जनावरांचा पिकांवरचा हल्ला यांमुळें तेथील शेतकरी ठार झाला आहे. साऱ्या खानदेशानें कुऱ्हाडी हातांत घेऊन तीं जंगलें सफा करण्याची वेळ आली आहे. कोणी म्हणतात, "त्या जनावरांना जगण्याचा हक्क नाहीं का?" परंतु माणसांनाहि जगण्याचा हक्क आहे कीं नाहीं ? सरकारला तीं जंगली जनावरें प्रिय असतील तर या तीस गांवच्या लोकांना सर्व नुकसानभरपाई देऊन दुसरीकडे वसाहतीस जागा द्यावी. गांवें उजाड होत चाललीं. इंग्लंड देशांत ४।५ शें वर्षांपूर्वी जमीनदार लोक शेती सोडून शेतांचीं कुरणें करूं लागले होते. लोंकरीचा व्यापार तेजींत होता. शेतांत मेंढ्या चरत. त्या वेळेस धान्याचा तुटवडा पडूं लागला. सर थॉमस मूर या विद्वानानें लिहिलें, "इंग्लंडच्या जनतेस जगावयाचें असेल तर त्यांनीं मेंढ्या बनावें." आज एदलाबाद पेट्यांतील लोकांस जगावयाचें असेल तर त्यांनीं जंगली जनावरें व्हावें. एदलाबाद पेट्यांतील ही स्थिति उपेक्षणीय नाहीं.

एदलाबाद पेट्यांतील दुःख अनन्त आहे. आणि उरलेल्या खानदेशांतील का कमी आहे ? कोणी म्हणतो, "महिनाभर धान्य पुरेल." कोणी म्हणतो 'आजच बाजारांतून विकत आणावें लागलें.' ज्वारीचें पीक साफ गेलें आहे. कपाशीचें पीकहि बुडालें आहे. धरणगांवचीं जिनें लौकर बंद पडलीं. शेंगा जमिनींत राहिल्या. बाजारांत गाड्या येतात. परंतु यंदा शेंगांना दुप्पट मजुरी पडली. पाऊस पडल्यामुळें काढलेल्या शेंगा पुन्हा चिखलांत मिळाल्या. त्या पुन्हां नदीनाल्यावर धुवाव्या लागल्या. परंतु शेतकऱ्याची

सर्व बाजूंनीं स्थिति कोण पाहतो ? शेंगाच्या गाड्या दिसतात, त्यांना किती मजुरी पडली हें कशाला कोण पाहील ?

गेला महिनाभर सर्व खानदेशभर आम्ही घुमलों आहोंत. शेतकऱ्याच्या मुक्या जीवनांच्या आंत प्रचंड वणवा पेटत आहे. हा ज्वालामुखी केव्हां पेट घेईल याचा नेम नाहीं. आम्ही करबंदी करूं असे बोल महिन्या दोन महिन्यांपासून ऐकूं येत आहेत. कांग्रेस सरकार असतांना अशी वेळ येणार नाहीं असें बैठकींतून आम्हीं सांगत असूं. शेतकऱ्याचा अंत पाहूं नका.

एके ठिकाणीं कांहीं शेतकरी म्हणाले, 'दादा शेतकऱ्याला कोणी नाहीं. आम्ही भूकंपांत कां गडप होत नाहीं ?' आम्हांला कोणी नाहीं, कोणी नाहीं, हे शब्द मी मरेपर्यंत विसरणार नाहीं. मी त्यांना म्हटलें, 'कांग्रेस आपली आई आहे. ती मुलांना पोटाशीं धरल्याशिवाय राहणार नाहीं. तिला जेवढें देतां येईल तेवढें ती देईल.' 'होईल तेव्हां खरें' ते निराशेनें म्हणत.

आमचे प्रिय आमदार, तसेंच जि. कां. कमिटीचे अध्यक्ष मंत्र्यांना भेटून आले असें कळतें. २६ तारखेच्या सभेला वार्किंग कमिटीचे दे. भ. शंकरराव देव हजर होते. म. प्रां. कां. चे अध्यक्ष दे. भ. केशवराव जेधे होते. ५० हजार शेतकरी त्यांनीं पाहिले. त्याची कहाणी ते मंत्र्यांच्या कानावर घालतील का ? पूर्व खानदेशाला भरपूर भाकरी या वर्षी देववतील का ?

कांग्रेसमाता की जय हा मंत्र खानदेशाला आम्हीं शिकविला. 'कांग्रेस माय बाप । जाळील सर्व ताप' हे चरण जनतेच्या मुखावर नाचविले. त्याची सत्यता आज आपत्तींत दिसून आली पाहिजे. कां. बद्दलचें जनतेंतील प्रेम त्यांना सहानुभूति मिळून वाढीस लागलें पाहिजे.

कांग्रेसच्या थोर मंत्र्यांनो, तुम्ही अहोरात्र श्रम करीत आहांत. क्षणाचा विसावा नाहीं. जनतेची चिंता तुम्हांस सदैव लागलेली आहे. स्वार्थ तुम्हांला शिवत नाहीं. स्तुतीची तुम्हांला स्पृहा नाहीं; निंदेची भीति नाहीं. स्थितप्रज्ञाप्रमाणें तुम्ही कामाचे बोजे पार पाडीत आहांत. खानदेशाच्या हजारों मुकी शेतकऱ्यांच्या वतीनें, खानदेशांतील उदार, दिलदार, भोळ्या व श्रद्धावान् शेतकऱ्यांचे वतीनें त्यांच्या मुलांबाळांच्या वतीनें साश्रु प्रणाम

करून तुमच्या चरणीं प्रार्थितों कीं या वर्षी खानदेशांतील शेतकऱ्यांस भरपूर सारासूट न मिळाली तर ती दुःखाची गोष्ट होईल. श्रद्धावान् मनुष्याची श्रद्धा एकदां भंगली म्हणजे काय राहिलें? जनतेच्या मनांत केवळ निराशा निर्माण होणें हें इष्ट नाहीं. खानदेशी शेतकऱ्याची श्रद्धा रहावी, त्याच्या जीवनांत निराशेची अंधारी अमावास्या येऊं नये, यासाठीं सारासुटीची पौर्णिमा नसली तरी निदान शुद्ध अष्टमी तरी येवो अशी प्रार्थना आहे.

एखादा धनिक उठतो व एकाद्या शाळा कॉलेजसाठीं १०।२० लाख रुपये देऊन टाकतो. मग खानदेशांतील १३ लाख जनतेची श्रद्धा टिकवण्यासाठीं कां. सरकार का उभें राहाणार नाहीं? २०।२५ लाख ही महत्त्वाची वस्तु नाहीं. जनतेची श्रद्धा व आशा ही पृथ्वी मोलाची वस्तु आहे. कां. चे मंत्री या बाबतींत अधिकांत अधिक उदारपणा दाखवतील अशी आशा आम्हीं बाळगावी का? ज्या क्षणीं केवळ निष्करुण आंकडेबाजी दूर ठेवावी लागते, हिशोबी कृपणता दूर राखावी लागते, असा हा क्षण आहे. या क्षणाचें महत्त्व थोर मंत्री ओळखतील, या क्षणांतील सारा अर्थ स्वच्छपणें वाचतील असा श्रद्धाशील मनाला विश्वास वाटत आहे.

—३० जानेवारी, १९३९.

## कैदी ३४

ते सत्याग्रहाचे दिवस होते. सत्याग्रहांत कोण भाग घेत होते? लहान मुलें व तरुण यांची गर्दी होत होती. संसारांत बरबटलेले भाग घेत नव्हते. परन्तु स्वातंत्र्य या मंत्रानें ज्यांचें हृदय उचंबळत होतें व बुद्धि पेटत होती, ते झेंडे हातीं घेऊन, लाठीकाठीस न जुमानतां तुरुंगांत घुसत होते.

त्या तुरुंगांत अधिकारी जुलमी होते. राजकीय कैद्यासहि जेथें तलवारीच्या धारेवर धरण्यांत येई, तेथें चोर डाकू म्हणून आलेल्या कैद्यांची काय स्थिति असेल याची कल्पनाच करणें बरें. रामदासाला त्या कैद्यांची स्थिति पाहून

द्वेष येई. परन्तु तो आपला संताप बेताल होऊं देत नसे. रामदास वयानें फार मोठा नव्हता, १७।१८ वर्षांचा होता; परन्तु संयमी होता. विचारांला आपल्या जीवनांत त्यानें प्राधान्य दिलें होतें.

रहिमू हा जुना कैदी होता. कामांत मोठा हुशार होता. अनेक वेळां कैदी शिक्षा कमी होऊन सुटले. परन्तु रहिमू सुटला नाहीं. त्याला १५ हून अधिक वर्षें झालीं. त्याला घरची हकीकत किती तरी वर्षांत कळली नाहीं. त्याची पत्नी मरण पावली होती. परन्तु लहान मुलगा घरीं होता. त्याचें काय झालें? रहिमूच्या मनांत येई, आपण सुटूं, आपला मुलगा पाहूं. परन्तु कोठें असेल मुलगा!

रामदासाला रहिमूबद्दल दया वाटे. रहिमू खिन्न असे. तो कोणाशीं बोलत नसे. तो आपला नमाज किती गंभीरपणें करी! त्या दिवशीं होता रविवार. कपडे धुण्याचा तो दिवस. सारे कैदी हौदावर कपडे धूत होते. रहिमू कपडे धूत होता. परन्तु त्याचें लक्ष कोठें होतें? त्याच्या डोळ्यांतील पाणी त्या कपड्यांवर पडत होतें. रामदासचें लक्ष त्याच्याकडे गेलें. तो रहिमूजवळ गेला व म्हणाला, "तुमचें कपाळ दुखतें वाटतें? द्या तुमचे कपडे मी धुवून देतों. साबण लावतों." रहिमू देईना. तो म्हणाला "तुम्ही राजकीय कैदी, आम्ही चोर, डाकू आमचे कपडे तुम्ही कां धुवावे? तुम्ही स्वराज्याचे लोक. तुमची सेवा आम्हीं करावी." रामदास ऐकेना. त्यानें रहिमूच्या कपड्यांस साबण लावून ते धुवून दिले.

रविवारीं गूळ मिळत असे. जे मांस खाणारे असत त्यांना गुळाऐवजीं मांस मिळत असे. रहिमू मांस घेत असे. परन्तु त्यानें मास खाणें बंद केलें. तो गूळ घेऊं लागला, इतर कैद्यांस आश्चर्य वाटलें. रहिमू संत होऊं लागला, अवलिया होऊं लागला, अशी ते त्याची थट्टा करीत.

त्या सोमवारीं रहिमू रामदासाला म्हणाला, "बेटा, हा लाडू घे." रहिमूनें बाजरीची भाकरी कुस्करून त्यांत गूळ घालून लाडू केला होता. रामदास-साठीं त्यानें तो आणला होता. रामदासनें खाऊन टाकला. तो म्हणाला, "माझी आई माझ्यासाठीं असाच लाडू ठेवून देई." रहिमूचे डोळे चमकले. अश्रुबिंदु! रामदासानें विचारलें, "डोळ्यांत कां पाणी?" रहिमू म्हणाला, "पुढें केव्हां तरी सांगेन."

त्या तुरुंगांत राजकीय कैदी खूप जमले. जागा पुरेना. कांहीं क्रिमिनल कैदी सोडावे व कांहीं राजकीय कैदी दुसऱ्या मोठ्या तुरुंगांत पाठवावे असें ठरूं लागलें. राजकीय कैद्यांचे नंबर घेतले जाऊं लागले. विसापूर जेल-मध्यें १०० कैदी पाठवावयाचे ठरलें. त्यांत रामदासाचेंहि नांव होतें. रामदास जाणार. रहिमूला वाईट वाटलें. त्या तुरुंगांतील दुःखांत तो एक त्याचा आधार होता. वाळवंटांत तो झरा होता. अंधारांतील तो दीप होता. पुन्हां रहिमूला आधार, पुन्हां रहिमू निराधार. सायंकाळीं राजकीय कैद्यांची पार्टी जावयाची होती. दुपारीं रहिमू रामदासाला भेटला व म्हणाला, " रामदास, बेटा तुला मी काय देऊं ? या रहिमूजवळ ही एक माळ आहे. ही माझी जपमाळ आहे. रात्रींच्या वेळचा माझा आधार म्हणजे ही माळ तुला मी देतों. ही घेऊन जा. ही माझी आठवण." रामदासाला नाहीं म्हणवेना. परन्तु ही माळ कोठून आली असें अधि-काऱ्यांनीं विचारलें तर ? रहिमूवर आणखीच रागावतील. रामदासानें रहि-मूची समजूत घातली. रहिमू म्हणाला, " रामदास, तुला पाहिलें म्हणजे मला माझ्या मुलाची आठवण होते. पुत्रप्रेमाचा अनुभव तुझ्या द्वारां मी घेत होतों. तूं माझे कपडे धूत होतास. मला वाटे मी पिता झालों. मला पुत्र मिळाला. तुला गुळाचा लाडू मी देत होतों. म्हणून ते अश्रु डोळ्यांत येत. तूं जाणार ? पुन्हां रहिमूला कोण ? " रामदास म्हणाला, " कदाचित् सुटणाऱ्या क्रिमिनलमध्यें तुझा नंबर येईल." रहिमू म्हणाला, "तें माझें नशीब नाहीं. तुरुंगच माझें घर, तुरुंगच कबर. जा रामदास, आठवण ठेव. सुटलास तर मला भेटावयाला ये. तीन महिन्यांनीं भेट घेतां येते. परन्तु मला कोण भेटायला येणार ? तूं ये." रामदासनें कबूल केलें.

पार्टी विसापूरला गेली. रामदासला रहिमूची नेहमीं आठवण येई. कांहीं क्रिमिनल कैदी सोडण्यांत आले. परंतु रहिमूची पाळी त्यांत आली नाहीं. रहिमू अधिकच निराश झाला. त्याच्यानें खाववेना. तो आपला भत्ता घेई परंतु दोन घांस खाई. रहिमूला काय होत होतें ? त्याचें दुःख कोणाला कळणार ?

म. गांधींची चळवळ थांबली. सारे राजकीय कैदी सुटले. रामदास बाहेर आला. रहिमूची भेट घेण्यास तो उत्सुक होता. रहिमूसाठीं साबणाच्या

वड्या त्यानें घेतल्या. क्रिमिनल कैद्यांना फार तर साबण बाहेरचा घेऊं देत. दुसरें कांहीं घेतां येत नसे.

रामदास त्या पहिल्या जेलमध्यें आला. जेलर साहेबांस भेटला. 'रहिमूला भेटावयाचें आहे' तो म्हणाला. त्याचा कैदी नंबर त्यानें सांगितला. जमादार-साहेब जवळच होते. ते म्हणाले "तो रहिमू तर मर गया. बुड्ढा हो गया था. बडा बदमाष." जेलरसाहेब म्हणाले, "सुपरिंटेंडेंट साहेबांनीं ती त्या दिवशीं लाथ मारली तोच ना कैदी? काम करायच्या वेळेस माळ जपत बसला होता, ढोंगी, तो मेला. पुरला गेला."

रामदास गंभीरपणें उठला. त्या साबणाच्या वड्या तो तेथेंच विसरला. जमादारसाहेबांनीं त्या काळजीपूर्वक उचलून घेतल्या. रामदास घरीं आला. त्यानें घरीं आल्यावर कोणत्या तारखेस रहिमू मेला त्याची माहिती विचारली. तारीख महिना कळविण्यांत आला. दरवर्षीं ती तारीख व तो महिना आला म्हणजे रामदास उपवास करतो व रहिमूचें स्मरणाश्रूंनीं तर्पण करतो. त्या दिवशीं तो गरीब लोकांना कपडे, धान्य देतो.

—१३ मार्च, १९३९.

## सुंदर मनुष्य आणि मडकें ३५

एक मनुष्य होता. तो अत्यंत सुस्वरूप होता. त्याच्यासारखा सुंदर पुरुष झाला नाहीं असें लोक म्हणत. आपल्या सौन्दर्याचा त्यास गर्व झाला. तो सर्वांना तुच्छ मानी.

फुलापेक्षां मी सुकुमार आहें, ताऱ्यापेक्षां तेजस्वी आहें; असें तो म्हणे. त्रैलोक्यांत माझ्यासारखा सुंदर पुरुष असणें शक्य नाहीं, असें तो प्रौढीनें सांगत असे.

राजे लोकांना नाना प्रकारचे लोक पदरीं ठेवण्याचा शोक असतो. जें जें अपूर्व दिसेल त्याचा ते संग्रह करीत असतात. अत्यंत सुरूप, अत्यंत कुरूप, अति उंच, अति ठेंगणा, अत्यंत बुद्धिमान्, अत्यंत अडाणी असे

नमुने ते जमा करीत असतात. एक अजबखानाचं जणुं ते तयार करतात.

त्या सुंदर पुरुषाला एका राजानें आपल्याजवळ ठेवलें. त्याला काम कांहीं नसे. राजाच्या पंक्तीला जेवावें, एवढेंच त्याचें काम. रहायला त्यास सुंदर बंगला राजानें दिला होता. खावेंप्यावें, हिंडावें, फिरावें एवढेंच त्याला माहीत होतें.

काम करणाऱ्या लोकांचा तो फार तिटकारा करी. मातींत काम करणारे कुंभार, शेतांत काम करणारे शेतकरी, मळ वाहून नेणारे भंगी, रस्ते झाडणारे झाडू—सर्वांना तो तुच्छ मानी. " माझ्या बोटांना कधींहि माती लागलेली नाहीं. " असें तो म्हणावयाचा.

एके दिवशीं तो फिरावयाला जात होता. तिकडून शेतांत काम करून एक शेतकरी येत होता. त्याचें अंग धुळीनें भरलें होतें. हा सुंदर पुरुष त्यास म्हणाला, 'माझ्या समोरून यावयाला लाज नाहीं वाटत ? तूं किती घाणेरडा, मी बघ किती सुंदर !'

शेतकरी म्हणाला, 'महाराज या तुमच्या सुंदर देहाला जर खायला मिळालें नाहीं तर त्याचें सौन्दर्य टिकेल का ? वेलींतील रस जर मिळाला नाहीं तर फूल टवटवीत दिसेल का ?

तो पुरुष म्हणाला, 'खाल्लें नाहीं तर सौंदर्य कसें टिकेल ? माझे डोळे खोल जातील, माझे गाल बसतील. मी भुतासारखा दिसूं लागेन. राजानें मला पाळलें आहे, म्हणून तर मी निश्चित आहे. माझें सौन्दर्य कायम रहावें म्हणून उत्कृष्ट अन्न राजा मला देतो.'

शेतकरी म्हणाला, 'जें अन्न तुमचें सौन्दर्य राखतें, तें अन्न उत्पन्न करण्यासाठीं आम्हांला मातीमध्यें खपावें लागतें, शेतें नांगरावीं लागतात, बी पेरावें लागतें. आम्ही असे मातींत काम करणार नाहीं तर सोन्यासारखें धान्य पिकणार नाहीं, सोन्यासारखी तुमची कांति टिकणार नाहीं. म्हणून आम्हांला तुच्छ नका मानूं.'

तो सुंदर पुरुष म्हणाला, 'तुझ्याजवळ बोलण्यांत अर्थ नाहीं. सौंदर्य म्हणजे काय तें तुला काय कळे. जा, नीघ येथून.' शेतकरी निघून गेला. हा गर्विष्ठ मनुष्य पुढें चालला.

वाटेंत एक कुंभार माती तुडवीत होता. तो सुंदर पुरुष त्यास म्हणाला,

'मी येत आहें तें तुला दिसलें नाहीं का ? असलें घाणेरडें काम माझ्यासमोर करायला तुला लाज नाहीं रे वाटत ?'

कुंभार म्हणाला, 'मी कामांत दंग असतों. कोण येतें जातें तिकडे माझें लक्ष नसतें. माझें काम घाणेरडें असें कोण म्हणेल ? महाराज, तुम्हीं घरांत राहतां का आकाशाखालीं उघड्यांत राहतां ?' सुंदर पुरुष म्हणाला, 'अरे आकाशाखालीं सारखा उघड्यावर राहीन तर उन्हानें करपेन, थंडीनें गारठेन, पावसानें भिजेन. राजानें सुंदर बंगला दिला आहे त्यांत मी राहतों, म्हणून तर माझें सौंदर्य टिकलें आहे.' कुंभार म्हणाला 'तो बंगला कशाचा बांधला आहे ?' सुंदर पुरुष म्हणाला 'विटांचा.' कुंभार म्हणाला 'त्या विटा मीच तयार करीत आहें. मग मला तुच्छ कां मानतां ? आणि तुम्ही पाणी कशानें पितां ? उन्हाळ्यांत थंडगार पाणी कशानें पितां ?' सुंदर पुरुष म्हणाला 'खुजामधून.' कुंभार म्हणाला 'ते खुजे आम्ही तयार करीत असतों. मग आमचें काम वाईट कसें ?' तो सुंदर पुरुष म्हणाला 'तुझ्याजवळ बोलण्यांत अर्थ नाहीं. जा नीघ माझ्यासमोरून, नाहीं तर राजाला सांगेन.'

कुंभार कामाला लागला व तो सुंदर मनुष्य पुढें चालला. तों समोरून कोण येत होतें ? डोक्यावर मळाचें पिंप घेतलेला भंगी येत होता. तो सुंदर पुरुष नाकाला पदर लावून फारच रागानें त्या भंग्याकडे पाहूं लागला. हातांत दगड घेऊन त्या भंग्याला तो मारणार, इतक्यांत भंगी म्हणाला, 'कां मारतां ? मी काय केलें ?' तो सुंदर पुरुष म्हणाला 'माझेसमोरून नरक घेऊन यावयास लाज नाहीं वाटत ? घाणेरडे आहांत अगदीं, आणि अक्कलहि नाहीं.' भंगी म्हणाला 'मीं का वाईट आहें ? तुमची घाण मी भरून नेली नाहीं तर कसें होईल ? मी घाण भरून नेतों व तुम्हांला स्वच्छतेच्या स्वर्गांत ठेवतों. तुमच्या भोंवतीं स्वच्छता निर्माण करणारा मी चांगला, का आपल्या सभोंवतीं घाण करणारे तुम्हीं चांगले ? तुम्हीं घाण करणारे व मी घाण हरण करणारा. दोघांत कोण श्रेष्ठ ? आई मुलाची विष्ठा काढते म्हणून का ती तुच्छ झाली ? भंगी म्हणजे समाजाची आई आहे. आईचा अपमान करणारा नरकांत जातो, तुम्हांला माहीत नाहीं. आणि मी जें डोक्यावरून नेत आहे तें तुमच्याच पोटांतील हें तुम्हीं विसरलेले दिसतां.'

तो सुंदर पुरुष म्हणाला, 'सारेच बेटे मिजासखोर. जो तो मला

उपदेशच करीत आहे. घाणेरडे आणि पुन्हां त्याचें समर्थन करतातें. एवढी अक्कल रे तुम्हांला कोठून आली ? तरी बरें, शाळेंत तुम्ही जात नाहीं. शाळेंत न जातां अशीं व्याख्यानें, प्रवचनें देतां, मग शाळांतून गेल्यावर बृहस्पतीच व्हाल. बघतोस काय ? नीघ. का मारूं दगड ? राजाला सांगेन बघ.'

भंगी निघून गेला. सुंदर पुरुष आतां बाजारांत आला. सर्वत्र त्याला घाणच दिसली. एका दुकानांत मडक्यांतून धान्य ठेवलें होतें. तो सुंदर पुरुष त्या दुकानदाराला म्हणाला, " हें सोन्यासारखें धान्य असल्या मडक्यांतून कां ठेवतां ? सोन्याचांदीच्या भांड्यांतून तें कां ठेवीत नाहीं ? आणि हें काय ? या बरण्यांतून काय आहे ? मध, मुरावळा, गुलकंद ! असल्या सुंदर व उंची वस्तु असल्या मातीच्या बरण्यांतून का ठेवावयाच्या ? सोन्या-चांदीच्या नाहीं, तर निदान स्वच्छ कांचेच्या बरण्यांतून तरी ठेवाव्या. हीं मडकीं व या बरण्या कशाला ?'

दुकानदार म्हणाला, 'सोनेंचांदी कोठून आणूं ? राजाजवळ असेल, परन्तु आमच्या जवळ कोठली ? आणि काच तरी मातीपासूनच होते, माहीत नाहीं का ? राजाच्या पदरीं असलेल्या त्या पंडितानें त्या दिवशीं रात्रीं हें नाहीं का सांगितलें ? आणि शेवटीं तर तो पंडित म्हणाला : सारें मातींतून निर्माण झालें आहे. सुंदर गुलाब, सुंदर डोळे, सुंदर केस सारें मातींतूनच आलें आहे व मातींतच जाईल. तुम्हीं मातीला तुच्छ मानतां, परन्तु त्याच मातीचे तुम्हीं बनलेले आहांत. कवीचा चरण तुम्हांला माहीत नाहीं का ? ऐका.

'माती असशी मातिंत मिळशी'

महाराज, हा तुमचा देह. म्हणजे तरी एक मडकेंच आहे. जरी सुंदर नीटनेटकें परन्तु कांहीं झालें तरी मडकेंच !' दुकानदार शांतपणें म्हणाला, 'रागावलेत तरी सत्य तें सत्यच. तुम्हांला खुष करण्यासाठीं मी खोटें कसें सांगू ? राजाला जाऊन सांगितलेंत तरी मला भीति नाहीं. मी त्या पंडिताला पटवून देईन. तुम्हीं मडकें आहांत, आपण सारीं कच्चीं पक्कीं मडकीं आहोंत, हें राजाला माहित आहे. हें मडकें केव्हां फुटेल याचा नेम नाहीं. मनुष्य मेला म्हणजे त्याच्या पुढें

आपण मडकें धरतों. यांतील अर्थ हाच. तें मडकें लोकांना सांगत असतें : ऐट नको मारूं. तुम्ही मातीचीं मडकीं आहांत. आज ना उद्या फुटाल व मातींत मिळाल. मृताच्या पुढें मडकें धरतात तें तुम्ही पाहिलें नाहीं वाटतें ! रागावूं नका. या फुटणाऱ्या मडक्यांत राहूनहि न फुटणारा व न तुटणारा असा तो अखंड परमात्मा जोडतां येतो. तें तुच्छच असतें असें नाहीं.'

सुंदर पुरुष म्हणाला, 'तूं तर सर्वांहून ताण केलीस. तुझ्या अकलेचे तारे तुटूं लागले. माझ्या सौंदर्याला मडकें म्हणतोस ? आणि पुन्हां तें सिद्ध करूं पाहतोस ?'

दुकानदार म्हणाला, 'मोठे म्हणतात तें मी म्हणतों. राजाच्या पदरीं असलेले ते गवयी एक गाणें म्हणतात. तें कोणा एका साधूनें केलेलें गाणें आहे. त्यांत पुढील चरण आहे :

मट्टी आटावन मट्टी बिछावन, मट्टीसे मिल जाना होगा ।
इस तन धनकी कौन बढाई, देखत नयनोंमें मट्टी मिलाई ॥

'थोर थोर लोक असें म्हणतात—म्हणून आम्ही असें म्हणतों. मोठ्यांचें ऐकायचें नाहीं तर कोणाचें ?'

तो सुन्दर पुरुष म्हणाला, 'मी मडकें ? तूं एक मडकें व मीहि मडकें तुझी माझी बरोबरी करतोस ?'

दुकानदार म्हणाला, 'तुम्ही फार तर उंची मडकें. मी साधा लोटा तर तुम्ही उंची सुरई, म्हणजे झालें.'

तो सुन्दर पुरुष म्हणाला, 'मी का सुरई, मी का बरणी ?'

एकदम आवाज आला, 'मडक्यापेक्षांहि तूं तुच्छ आहेस. अरे घमेंडखोरा ! तूं आमच्यापेक्षां शतपटीनें घाणेरडा आहेस.'

तो सुंदर पुरुष पाहूं लागला. कोण बोलतें त्याला समजेना. 'अरे, असा वेड्यासारखा काय बघतोस ? मूर्खा जरा इकडे ये. आम्ही मडकीं आधीं होतां होईं तों बोलत नाहीं. परन्तु तूं मानवी मडकें फारच बेतालपणें बोलूं लागलास. तें आम्हांला सहन होईना.' तीं दुकानांतील मडकीं बोलूं लागलीं.

सुंदर पुरुष म्हणाला, 'काय मी तुमच्या पेक्षां घाणेरडा आहें ?'

त्या मडक्यांतील प्रमुख व पोक्त मडकें म्हणालें 'हो, तूं आमच्यापेक्षां घाणेरडा आहेस.'

सुंदर पुरुष म्हणाला, 'सिद्ध करा. नाहीं तर तुम्हांला या क्षणीं फोडून टाकतों. तुमचे तिळ तिळ तुकडे करतों. गांवांत एक मडकें ठेवूं देणार नाहीं. राजाला सांगून राज्यांतील साऱ्या मडक्यांचीं मुंडकीं उडवायला लावीन. काय समजलांत? साऱ्या मडक्यांवर सूड उगवीन. कर, सिद्ध कर.'

तें वृद्ध व जुनें मडकें म्हणालें, 'मी सिद्ध करीन, परन्तु तूं ऐकलेंस तर. जें खरोखर दिसेल तें मानशील का?'

सुंदर पुरुष म्हणाला, 'अलबत. जें खरें आहे तें मानलेंच पाहिजे.'

तें मडकें म्हणालें, 'माझ्यामध्यें हें धान्य आज सहा महिने झालें, ठेवलेलें आहे. ही गोष्ट तुम्हांला माहित आहे?'

सुंदर पुरुष म्हणाला, 'वर्ष वर्ष सुद्धां ठेवतात.'

तें मडकें म्हणालें, 'बरोबर. तरी तें धान्य वाईट होत नाहीं. या धान्याला वास येतो का बघा?'

सुंदर पुरुष म्हणाला, 'नाहीं हें चांगलें आहे.'

मडकें म्हणालें, 'आमच्या पोटांत हें धान्य वर्ष वर्ष राहिलें तरी घाण होत नाहीं. आतां तें तुमच्या पोटांत एक दिवस ठेवून पहा. त्याची काय दशा होईल? तुमच्या पोटांत तें असेंच चांगलें राहील का, खरें सांगा.'

सुंदर पुरुष म्हणाला, 'माझ्या पोटांत गेल्यावर त्याची क्षणांत घाण होईल.'

मडकें म्हणालें, 'मग तूं घाणेरडा का आम्हीं घाणेरडीं? खरें सांग, खरें तें मानावयाचें ठरलें आहे.'

सुंदर पुरुष म्हणाला, 'मी घाणेरडा आहें.'

तें मडकें म्हणालें, 'आपण सारे घाणेरडेच आहोंत. आपण सारीं मडकीं आहोंत. कोणी कोणाला हिणवायला नको. परन्तु या मलिन मडक्यांना सुंदर होतां येतें. जें मडकें दुसऱ्याच्या उपयोगी पडतें, जें दुसऱ्याला प्रेमाचें अमृत देतें, जें मडकें सत्याची पूजा करतें, व सत्याची सेवा करितां करितां फुटून जाण्यासहि सिद्ध असतें, तें मडकें थोर होतें, सुंदर होतें. त्या मडक्याचें सोनें होतें, त्या भंगुर मडक्यांतून अमृतत्व बाहेर येतें, दिव्य सौंदर्य प्रकट होतें. मातीच्या मडक्याचा सोन्याचा कलश होतो!'

तो सुंदर पुरुष म्हणाला, 'थोर मडक्यांनो! तुमचे माझ्यावर अनंत उपकार आहेत. तुम्ही आधीं कधीं बोलत नाहीं. परंतु आज मला अमृतमय, रहस्यमय थोर वाणी ऐकविलीत. मी कृतार्थ झालों. मला नवीन डोळे तुम्ही दिलेत. सत्पंथ दाखविलात. मी या माझ्या मडक्याचें सोनें करण्यासाठीं झटेन. या घाणेरड्या मडक्याला सौंदर्यसिंधु बनवीन. सांगा, आणखी कांहीं थोडें सांगा.'

तें मडकें म्हणालें, 'भल्या माणसा! जगांत कसें वागावें याचें एक सूत्र तुला सांगून ठेवतों. जगांत आपण जेव्हां जन्माला येतों, तेव्हां आपण रडत येतों, परंतु लोकांना आनंद होतो. आपला आत्मा या लहानशा मडक्यांत बद्ध होऊन जन्मतो व रडतो. परंतु लोक पेढे वाटतात. आपण मरतांना याच्या उलट स्थिति व्हावी. या मडक्यांत राहूनहि मी जीवनाचें सोनें केलें. मातीचें मोतीं केलें असें मरतांना वाटून स्वतःला आनंद झाला पाहिजे. आणि इतरांना रडूं आलें पाहिजे. असा हा सुंदर मनुष्य, गोड मनुष्य मरत आहे असें मनांत येऊन लोकांना रडूं येऊं दे. जन्मतांना रडत आलों, मरतांना हंसूं दे; जन्मतांना इतर हंसले, त्यांना माझें मरण पाहून रडूं दे!'

सुन्दर पुरुष म्हणाला, 'किती गोड तुम्ही सांगतां' मला एखादी लहानशी प्रार्थना सांगा.

एक मडकें म्हणालें, 'भारतांतील एका महर्षीनें, मडक्यांत राहून विश्वाला कवटाळणाऱ्या एका ऋषीनें, सुंदर व सरळ, साधी, सोपी, सुटसुटीत अशी एक प्रार्थना जगाला दिली आहे. ती ऐक.

तमसो मा ज्योतिर्गमय
असतो मा सत् गमय
मृत्योर्मा अमृतं गमय

मला अंधारांतून प्रकाशाकडे ने; असत्याकडून सत्याकडे ने; मृत्यूकडून अमृताकडे ने. असे हे तीनच चरण आहेत. परन्तु त्रिभुवनमोलाचे आहेत!'

तो सुंदर मनुष्य त्या मडक्यांना प्रणाम करून ती प्रार्थना गुणगुणतच निघून गेला. त्या दिवसापासून त्याचें जीवन निराळें झालें. त्यानें आपल्या जन्माचें सार्थक केलें. त्याच्या मडक्याचें सोनें झालें. पूर्वी लोक म्हणत

'याच्यासारखा देखणा कोणी नाहीं.' आतां लोक म्हणतात, 'याच्या सारखा थोर व गोड कोणी नाहीं!'

—३ एप्रिल, १९४०.

## त्रिपुरी म्हणजे जवाहरलाल ३९

महात्मा गांधींचा राजकोटचा उपवास होता. उपवास सुटल्यावरहि अशक्तपणामुळें ते त्रिपुरीस त्वरित येऊं शकले नसते. बरें वाटतांच दिल्लीस जाणें त्यांचा धर्म होता. राष्ट्रपति सुभाषबाबू त्रिपुरीस होते, परन्तु ते रुग्ण-शय्येवर. जुन्या व. कमिटींतिल सभासद फारसे कोणी उघड बोलत नव्हते. त्यांचें वकीलपत्र प्रधानांनीं घेतलें होतें. अशा परिस्थितींत पंडित जवाहर-लालांवर सर्वांत मोठी जबाबदारी पडली होती. ज्याच्यावर जबाबदारी पडते त्याला बरेंवाईट पहावें लागतें. जवाहिरलालांवर अनेकांचा रोष झाला आहे. त्यांनीं अवसानघात केला असा त्यांचेवर आरोप आहे. त्यांच्या सांगण्या-मुळेंच काँग्रेससमाजवादी तटस्थ राहिले असें मानण्यांत येतें. राष्ट्रांत समाज-वादी विचार, किसान कामगारांचें कार्यक्रम यांवर भर पंडितजींनीं दिला होता. त्यांच्याकडे जहालांचे डोळे होते. परंतु त्यांच्या कसोटीस पंडितजी उतरले नाहींत.

याचें कारण काय? पंडितजी एकदम परंपरा तोडूं इच्छित नाहींत. ते संयमी वाढ इच्छितात. व्याख्यानांतून विचार मांडणें, निराळे सूर्यकिरण कांचेंतून वाकून जातात तसेच ध्येयवाद कर्मसृष्टींत आणतांना थोडा वाकडा होतो. महात्माजींच्या गैरहजेरींत काँग्रेसचे तुकडे पडूं न देणें हें जवाहिर-लालांचें काम होतें. गोविंद वल्लभ पंत यांचा ठराव सर्व कारभाराचा पाया होता. जुन्या सभासदांस तसा ठराव पाहिजे होता. एरव्हीं ते नवीन व. कमिटींत येण्यास तयार नव्हते. जर हा ठराव नापास झाला असता तर काय झालें असतें? व. कमिटीचे जुने लोक दूर राहिले असते. नवीन व. कमिटी बनवावी लागली असती. कदाचित् त्यांत जवाहिरलाल येते,

कदाचित् न येते. मंत्रिमंडळांनीं राजिनामे दिले असते. नवीन कार्यक्षम मंत्री मिळणें कठिण झालें असतें. शिवाय निरनिराळे प्रांत म्हणजे कडबोळीं. मुंबई इलाख्यांत महाराष्ट्र, कर्नाटक, गुजराथ एकत्र आहेत. मद्रास इलाख्यांत तामीळ, तेलगू, कन्नड व मल्याळम् यांचें मिश्रण आहे. मध्यप्रांतांत हिंदी, मराठी व वऱ्हाड असे भेद आहेत. या सर्वांस एकत्र ठेवणें हें कठीण काम आहे. कार्यक्षम मंत्री व वजनदार, कसलेले, शेंकडों लढाया लढलेले, सरदारांसारखे नियंत्रक असतील तरच हा गाडा चालणार. नाहीं तर फजीति होण्याचा संभव. आमचे ओंगळ प्रांतीय व जातीय भेद पुढें येण्याचा संभव. जगासमोर स्वातंत्र्येच्छु भारताचें हंसें. उद्यांच कांहीं लढाई सुरू होणार नव्हती. उद्यांच कांहीं कायदेभंग नव्हता. मंत्रिमंडळांचें अद्याप काम आहे. या सर्व गोष्टी जवाहिरलालांसमोर असतील. या गोष्टी कां. सोशॅलिस्टांतील कांहींसमोर असतील. पंतांच्या ठरावावर जवाहिरलाल कांहीं बोलले नाहींत. वर्किंग कमिटींतील कोणीच बोललें नाहीं. परन्तु एकदां हा ठराव पास झाल्यावर जवाहिरलाल उठावले. राष्ट्राध्यक्षांच्या व जहालांच्या जास्तींत जास्त ज्या भावना प्रकट करणें शक्य त्या त्यांनीं ठरावांत मांडल्या. फेडरेशनचा त्यांनीं स्पष्ट धिक्कार केला. हिंदी प्रतिनिधीच आपली योजना तयार करतील, यावर भर दिला. मंत्र्यांचें काम तितकें मला पसंत नाहीं असें सांगून त्यांना सूचना दिली. लढा जवळ आहे, तयार रहा; असा इशारा दिला. ब्रिटनचें धोरण मान्य नाहीं, असें सांगितलें. कां. संस्थानी लढ्यांत जरूर तेथें व योग्य तेव्हां हात घालील, तिचा हा हक्क आहे; व्यक्तींना भाग घ्यावयास हरकत नाहींच, असें घोषित केलें. अशा प्रकारें परंपरा न सोडतां जेवढें पुढें जातां येईल तेवढें पाऊल त्यांनीं पुढें टाकलें.

जहालांजवळ अद्याप शिस्त नाहीं, संघटना नाहीं, एकभाव नाहीं. त्यांच्या आपसांतहि स्पर्धा आहेत. त्यांच्यांत अखिल भारतीय प्रतिष्ठेचे पुढारी फार नाहींत. अशामुळें काय करावयाचें ? शिवाय महात्माजींचें नेतृत्व तर अत्यंत जरूर. महात्माजींचा ज्यांच्यावर विश्वास, त्यांचीहि म्हणूनच जरूर. अशा परिस्थितींत आपले पुरोगामी विचार, आपल्या योजना यांचा कांग्रेसच्या कार्यक्रमावर जेवढा परिणाम एकत्र राहून घडवितां येईल तेवढा घडवावा, असें जवाहिरलालांस

वाटलें असल्यास त्यांत आश्चर्य नाहीं. कांग्रेसला हळुहळू ते नवीन रंग चढवीत आहेत. पटकन दिलेला रंग टिकणारहि नाहीं.

सारांश, त्रिपुरी म्हणजे संयमाचा व ऐक्याचा विजय, जवाहिरलालांचा विजय. जवाहिरलालांचींच भाषणें, त्यांचेच ठराव, त्यांच्या हस्तें झेंडावंदन, त्यांच्या हस्तें स्वयंसेवकांस समारोपाचे शब्द; हुल्लड चालली असतां त्यांचें तें शांत, परन्तु गंभीर व खंबीरपणें सव्वा तास उभें राहणें, ती त्यांची विजयी इच्छाशक्ति—या सर्वांतून त्यांचेंच प्रभावी व्यक्तिमत्त्व प्रकट होत होतें. म. गांधींचे नंतर राष्ट्र कोणाकडे पहात असेल तर तें जवाहिरलालांकडेच होय, हें गोविंद वल्लभपंतांचें विधान यथार्थ नाहीं असें निर्मळ मनाचा कोण म्हणेल?

—२० मार्च, १९३९.

## आरसपानी नर्मदा ३७

त्रिपुरी कांग्रेस नर्मदातीरीं होती. त्रिपुरीच्या जवळ नर्मदेचा एक अत्यन्त सुंदर देखावा आहे. त्रिपुरी कांग्रेसला गेलेल्या हजारों लोकांनीं तें भव्य दृश्य पाहिलें. भेडाघाटाजवळ हा देखावा आहे. मी व अमळनेरचा कांग्रेस-प्रेमी मित्र शंकर दोघे एके दिवशीं एकदम हा देखावा पहावयास निघालों. आम्हीं आधीं ठरवलें नव्हतें. अकस्मात् ठरलें, अकस्मात् गेलों. प्रथम धुवाधारी या धबधब्याकडे आम्हीं गेलों. हजारों लोक तेथें जमले होते. कोणी संकल्पपूर्वक स्नानें करीत होते. कोणी स्तोत्रें म्हणत होते, तेथें जणूं महापर्वणीच होती. नर्मदेचा प्रवाह कृश होता. तो प्रवाह शेंकडों कर्वतींनीं जणूं कापून काढलेला होता. नर्मदेनें स्वतःला जणूं स्वच्छ करण्याकरितां शेंकडों पाषाणमय साधनांनीं धुवून धुवून काढलें होतें. धबधबा फार उंच नाहीं. ३५।४० फूट फार तर असेल परन्तु काय मौज दिसते! पिंजलेल्या कापसाची रास दिसावी तसा दिसतो. पाण्याची धार जोरानें खालीं आपटते व त्यांतून शुभ्र स्वच्छ फेंस बाहेर पडतो. जणूं पाण्यांतील निर्मळ आत्माच बाहेर प्रगट

होत असतो. सूर्याचे किरण पडून सुंदर इंद्रधनुष्य दिसे. खालीं खूप खोल डोह झालेला आहे व त्यांत भोंवरे झालेले आहेत. एक दोन तरुण त्यांत पोहण्यासाठीं उड्या घालणार होते. एकानें कडेकडेला थोडी सुरनाळी मारली. दोन संत्रें बाहेर काढलीं. नर्मदेचा प्रसाद म्हणून लोकांनीं खाल्लीं. खालीं पाण्यांत खूप कपारी आहेत. दगड आहेत, कोठें अडकाल, आपटाल, भोंवरे आहेत, असें कळल्यावर ते तरुण आंत गेले नाहींत. शंकर व मी तेथें उभा होतों. इतक्यांत आम्हांला कोण बरें दिसलें ? अमळनेरचा चित्रकार नागेश खालच्या बाजूला शांत बसून देखावा रेखाटीत होता. आम्ही टाळी वाजविली. आणखी पाहूं लागलों तों खामगांवच्या राष्ट्रिय शाळेंतील चित्रकला-आचार्य पंधे गुरुजी आणखी खालीं एका दगडी आसनावर बसून देखावा काढीत होते. त्यांच्याबरोबरचे विद्यार्थीहि आले होते. तेहि वह्या व पेन्सिली घेऊन स्केचिस करीत होते. हळुहळू ते सारे वर आले. नर्मदेमध्यें स्नानें करूं व मग फराळ करूं असें ठरलें. पंधेगुरुजींबरोबरचा छोटा बटू म्हणाला, " ती तिकडे एक लहान धार पडत आहे, तिच्याखालीं आपण उभे राहूं चला." मी प्रथम नाखूष होतों. पाय सरकला तर डोहांत पडेन अशी भीति वाटली. परंतु त्या लहान वीरानें हात धरला व माझ्या निर्जीव मनांत उत्साह आला. आम्ही हळुहळू उतरलों. पलीकडे धो धो धुवाधारा पडत होती. तिच्याशेजारीं या लहान धारेखालीं आम्ही गेलों. त्या धारेखालीं डोकें केलें. धाडधाड कोणी वरून बर्फाचे गोळे मारावे तसें तें पाणी डोक्यावर पडे. मी म्हटलें, " माई नर्मदे, या डोक्यांतील सारी घाण काढ. जोरानें डोकें घांस. मार जोरानें थपडा." पुन:पुन्हां मी माझें डोकें आईच्या त्या जीवनमद मारापुढें करीत होतों. पत्रींतील चरण मला आठवले.—

" आई तूं मज मार मार "

मग माझी पाठ पुढें केली. आई जोरानें पाठ धुवूं लागली. पाठीवरील दोषांचे खळमळ ती दवडूं लागली. किती आनंद होत होता. आमचें पाहून दुसरेहि लोक तेथें येऊं लागले. म्हणून आम्हांला क्रीडा संपवणें भाग होतें. पंधे गुरुजी म्हणाले, " येथें खरी स्फूर्ति आहे. या धारेखालीं डोकें धरणें म्हणजे विद्युत्संचार आहे." आम्हीं वर आलों. पंधेगुरुजींनीं फराळाचें

भरपूर आणलें होतें. आम्हीं दोघे त्यांत सामिल झालों. इतक्यांत अमळ-नेरच्या मिलमधील कॅप्टन मल्हारी वगैरे उत्साही वीर दिसले. तेहि स्नानें करून आमच्यांत मिसळले. दगडाचे पाट मांडलेले होते, आम्ही फराळ केला. नंतर नर्मदेच्या किनाऱ्यानें जावयाचें ठरलें. निघालों आम्हीं. छोटा वीर सर्वांच्या पुढें होता. आरसपानी पहावयास आम्हीं निघालों. कंगोरे कंगोरे सर्वत्र होते. पाय सोलूनच निघावयाचे. जातांजातां कांहीं कंटाळूं लागले. परन्तु लहान मुलें पुढें गेलीं. मीहि मग जोरानें निघालों. रेंगाळ-णारेहि मग आले. तों आम्हांला तिकडून प्रवशांना नेणारी लॉंच दिसली. अरे हीच ती दरी. आली दरी. संगमरवरी पाषाणांची दरी आली. 'महात्मा गांधी की जय' आम्ही जयजयकार केला. परन्तु खालीं उतरावयाचें होतें. कसें उतरणार? कडा तुटलेला होता. परन्तु ठायींठायीं खांचा होत्या. त्यांना धरून उतरतां आलें असतें. आम्हीं पिशव्या खालीं फेंकल्या. हळुहळू सारे खालीं आलों. जेथपर्यंत स्टीमलॉंच किंवा नांव येते तेथें आम्हीं बसलों होतों. पली-कडे ती पुढें दरी दिसत होती. आम्ही पाणी प्यायलों. तेथें प्रतिध्वनी फारच सुंदर ऐकूं येई. आजूबाजूस पाषाणांच्या नाना आकृति दिसत. पंधे गुरुजी म्हणाले, 'हें पहा दगडांतलें डिझाइन. किती सुंदर' मी म्हटलें, 'येथून पहा म्हणजे प्रचंड बुद्ध किंवा महावीरं यांची मूर्तीच उभी आहे असें दिसेल. लेण्यांतील कल्पना अशाच मिळाल्या असतील.' आम्ही पुन्हां वर चढून आजूबाजूस संशोधन करीत होतों. एके ठिकाणीं फारच रम्य स्थान आढळलें. गार वारा तेथें येत होता. आम्हांला आश्चर्य वाटलें. सर्वांना हांकारे केले. सारे आलों. आम्ही हिंडून हिंडून दमलों होतों. त्या गार वाऱ्यानें श्रम गेले. येथेंच कोठून गार वारा असें वाटलें. जरा आणखी पुढें गेलों. तों स्वच्छ आरसपानी दगडाचें मयूरासन आढळलें. किती गुळगुळीत व गार गार. वरच्या बाजूस दोन मोठे कोनाडे होते. पंधे गुरुजी एकांत जाऊन बसले. मीहि त्यांच्या शेजारीं बसलों. एकानें फोटोचें बटन दाबलें. आमचा फोटो निघाला. तेथून जाऊं नये असें वाटे. आमच्या बरोबर बाबाजी होते. ते म्हणाले, या रे या रे तुम्हांला जहागिरी देतों. तुला माळव्याची घे, तुला बुंदेलखंडची घे, मी येथला राजा आहें. तें शहाज-हानचें मयूरासन तुच्छ आहे. हें खरें सिंहासन. अम्हांला निघणें भाग होतें.

कारण ६४ योगिनींच्या देवळांतील मूर्तींचीं पंधेगुरुजी व त्यांचे शिष्य स्केचिस करणार होते.

आम्हीं निघालों. नर्मदेचा विचार करीत निघालों. नर्मदेनें स्वतःला बंधनें घालून तपस्या चालविली होती. दोहों बाजूस आरसपानी प्रचंड भिंती होत्या. मधून नर्मदा जात होती. किती वर्षें तिची ही तपस्या चालली आहे, देव जाणें. आम्ही विचार करीत जंगलांतून जात होतों. तों मोटार-स्टँडजवळ आलों. योगिनीमातांचें मंदिर पाहावयास निघालों. १०८ पायऱ्या होत्या. वर गेलों. देऊळ किल्ल्याप्रमाणें आहे. मध्यवर्ती देवीच्या अंगणांत सभोंवतीं ६४ योगिनी आहेत. प्रत्येक दोरींत एकेक देवी आहे. कोठें काली, कोठें भैरवी, अशा त्या देवता आहेत. एकच रूप पुन्हां नाहीं. कोठें कमलासनावरची, कोठें सिंहावरची, कोठें वाघावरची, कोठें महिषावरची अशी देवी कोरलेली आहे. गळ्यांत मुंडमाळा आहेत. वाईट वाटतें कीं, या देवतांचीं तोंडें फोडलेलीं आहेत. वाहनांचीं तोंडें भ्रष्ट झालेलीं आहेत. तरीहि उत्कृष्ट शिल्प तेथें दिसतें. आमचे छोटे मित्र चित्रकार वह्या घेऊन स्केचिस करूं लागले. प्रेक्षक त्यांच्या वह्यांत डोकावत व "यांना यांतलि समजतें. आपणांस काय कळे ?" असें म्हणून निघून जात. एके ठिकाणीं देवीच्या पायाशीं दोन स्त्रिया हातांत वीणा घेऊन बसल्या आहेत असें एक डिझाईन आहे. फारच सुंदर आहे. नागेशनें त्याचें स्केच केलें. दुसऱ्या एका मूर्तीजवळ एक स्त्री पायां पडत आहे असा सुंदर प्रसंग आहे. परंतु हें घाईघाईनें किती पाहणार ? एके ठिकाणीं देवतेचें स्वरूप केवळ अस्थिचर्ममय असें दाखवलें आहे. ही मरणदेवता असें कोणी सांगितलें. औरंगाबादजवळ जीं लेणीं आहेत, त्यांतील एका लेण्यांत अशाच अस्थिचर्ममय पाषाण मूर्ति खोदलेल्या आहेत. शेवटीं आम्ही निघालों. पंधे गुरुजी व नागेश वगैरे सायंकाळपर्यंत स्केचिस करीत बसणार होते. मी, शंकर, मल्हारी वगैरे सारे निघून पुन्हां कांग्रेस नगरांत आलों. तें आरसमयूरासन आम्ही विसरणार नाहीं, तें नर्मदास्नान विसरणार नाहीं. जीवन स्वच्छ होण्यासाठीं निर्मळ अशीं पवित्र भक्कम बंधनें घालून घ्यावीं, स्वतःला संयमावर घासून, कर्वतून घ्यावें, असा नर्मदेचा संदेशहि विसरणार नाहीं.

—३ एप्रिल, १९३९.

# देवा गणेशा

३८.

काल गणेशचतुर्थीचा मंगल दिवस. सर्व महाराष्ट्रभर घरोघर गणेशाची पूजाअर्चा कालपासून सुरू झाली असेल. कोठें पांच दिवस, कोठें सात दिवस, कोठें दहा दिवस असा हा उत्सव सुरू राहील. मीहि मंगलमूर्तीचा उत्सव मांडला आहे. माझ्या हृदयमंदिरांत त्याची स्थापना केली आहे. बुद्धि त्याच्या पायांशीं नम्रपणें बसली आहे. मधून मधून जीव मान वर करून देवा गणेशाला प्रश्न विचारीत आहे व तो त्याचीं उत्तरें देत आहे. असा हा वैयक्तिक उत्सव सुरू आहे. हीं आमचीं भक्तिप्रेमाचीं प्रश्नोत्तरें, या गुजगोष्टी तुम्हांला ऐकावयाच्या असतील तर ऐका. तुम्हांलाहि त्याचा कदाचित् फायदा होईल.

जीवः—गणेशा, तूं सुखकर्ता, दुःखहर्ता, विघ्नहर्ता. आमचीं दुःखें केव्हां जातील, आमचीं विघ्नें केव्हां हरतील, आम्हांला सुखाचे दिवस कधीं येतील ?

गणेश :—दुःखें दूर करण्याचा व सुख जवळ आणण्याचा एकच सनातन मार्ग आहे. विघ्नांचा विनाश होणें व विकासाचा मार्ग मोकळा होणें याचाहि तोच मार्ग आहे. हा कोणता बरें मार्ग ? येतो का तुझ्या लक्षांत ?

जीव :—नाहीं येत; तूंच स्पष्ट करून सांग.

गणेश :—सहानुभूति. एकमेकांबद्दल सहानुभूति वाटणें हाच धर्माचा प्राण आहे. आज तुमच्या राष्ट्रांत सारे सहानुभूतिशून्य झाले आहेत. परस्परांबद्दल सहानुभूति वाटूं लागली म्हणजे विरोध कमी होतात. द्वेषमत्सर मावळतात. सहकार्याचें राज्य सुरू होतें.

जीव :—ही सहानुभूति कशानें उत्पन्न होईल ?

गणेश :—विवेकानें. दुसऱ्याला आपल्याचसारखें हृदय आहे, मन, बुद्धि आहे, याची जाणीव झाली म्हणजे सहानुभूति उदयास येते. आत्म्याचें नातें वाढवीत चला. आपलेपणाचें नातें म्हणजे परीस आहे. मुलगा कितीहि वाईट असला तरी आपलेपणाच्या नात्यामुळें तो आईला गोड वाटतो. हें

आपलेपणाचें नातें प्रत्यक्ष सृष्टींत उत्तरोत्तर अधिक आणा. हरिजन आपलेच, भंगी आपलेच, मुसलमान बंधू आपलेच, अशा रीतीनें राष्ट्र बनवा. एकजीव करून मानवाच्या विकासाकडे वळा. अरे माझी तुम्हीं कालपासून पूजा करीत आहांत. परन्तु तुमची पूजा मला विषाप्रमाणें झोंबते.

जीव:——कां बरें? तुला मखरें घातलीं आहेत, खिरापती वाटीत आहेत, मेळे चालले आहेत. काय आमचें चुकतें?

गणेश:——अरे माझें नांव काय? गणपति हें माझें नांव. सर्व गणांचा मी पति, सर्व गणांचा ईश. सारे मानवी समाज माझ्यासमोर प्रेमानें आले तर ना माझी गणेशाची पूजा होणार? त्या दिवशीं अमळनेरमधील विद्यार्थी वर्गणी गोळा करावयास गेले. तर कोणी म्हणाले "महारामांगांना नका जवळ येऊं देऊं." महारामांगांचा जो गण, तो माझ्यांत नाहीं का? अरे माझे असे लचके काय तोडतां? असे खंड खंड काय करतां? सारे माझ्याजवळ जर येणार नसतील तर कसला माझा उत्सव? तुम्ही आमचे उत्सव करतां कीं थट्टा करतां? आम्हांला परमेश्वररूप मानतां कीं डबक्यांतलि बेडूक समजतां? परवां गोकुळअष्टमीचा उपवास केलात. परन्तु भगवान् श्रीकृष्ण गोकुळांत प्रेमानें काला करी. सर्वांना घास देई तुम्ही तर हॉटेलमध्यें हरिजन बंधूंस येऊं देण्यासहि तयार नाहीं. कसली गोकुळ अष्टमी? कसली गणेशचतुर्थी? आतां नवरात्रांत देवीचा उत्सव कराल. देवीला चार हात, अठरा हात, अशा कल्पना आहेत. अठरा पगड जातींकडून प्रभु आपलीं कार्यें करवून घेतो. साऱ्या जाती म्हणजे जणूं त्याचे हात. परन्तु तुम्ही एकमेकांस तुच्छ लेखतां. काय तुम्हांला सांगावें? आम्हां देवतांचा तुम्हीं शेंकडों वर्षें अज्ञानानें वा अहंकारानें अपमान करीत आहांत. खरा गणेशोत्सव करावयाचा असेल तर सर्व गणांना प्रेम द्या. सर्व गणांबद्दल सहानुभूति बाळगा.

जीव:——असें कोण करील, कोण शिकवील?

गणेश:——अरे तुमची कांग्रेस शिकवीत आहे. कांग्रेस म्हणजे जणूं माझें मंगलरूप. कांग्रेसनें आपले दरवाजे सर्वांसाठीं खुले ठेवले आहेत. कोणा एका वर्गाचें, कोणा एका धर्माचें, कोणा एका जातीचें हित ती पहात नाहीं. 'यारे सारे अवघे जण' अशी ती हांक मारीत आहे. त्या कांग्रेसनें

मुसलमानांसहि जवळ घेतलें आहे, हरिजनांना पोटाशीं धरलें. परन्तु तुम्हीं तिला दगड मारतां, शिव्या देतां. ते दगड मला बसतात, त्या शिव्यांची लाखोली मलाच मिळते. माझी पूजा करावयाची असेल तर कांग्रेसची पूजा करा. भरतखण्डांत जगांतील सर्व धर्म व सर्व जाति जणूं आहेत त्या सर्वांना बरोबर घेऊन एक महान् प्रयोग कांग्रेस करूं पहात आहे. हें दिव्य कर्म आहे. यांत तन, मन, धन ओतून सामील व्हा. कांग्रेसद्वेषी तो गणेशद्वेषी; कांग्रेसद्रोही तो गणेशद्रोही.

जीवः---देवा गणेशा, हें लोकांस कोण पटवणार ?

गणेश :---तुम्हींच. गणेशाची पूजा म्हणजे विद्येची पूजा. मला तुम्हीं ज्ञानदेवता मानतां ना ? गणपतीची पूजा म्हणजे सर्व गणांची पूजा; सर्व मानवांची पूजा. ही पूजा विचार देऊन करा. जो खरा गणेशाचा उपासक असेल तो सर्व गणांत सहकार्य व प्रेम उत्पन्न करण्यासाठीं झटेल. सहानुभूति शिकवील. निरक्षर लोकांस साक्षर करील. विचारहीनांस विचार देईल. अज्ञानी जनतेस ज्ञान देईल. गणेशाची पूजा शहरांत चालली आहे. तेथें ज्ञानसत्रें आहेत. परन्तु बहुजन समाज खेड्यांत पसरलेला आहे. तेथें ना शाळा, ना वाचनालय; ना नवीन विचार ना व्याख्यानमाला. शहरांतून गणेशोत्सवांत जेवढा पैसा दरसाल जातो तेवढा खेड्यांतून शाळा काढण्यांत खर्च केला तर किती तरी काम होईल ? परन्तु ज्ञानाचें महत्त्व तुम्हांला नाहीं. आपले सारे गण, आपले सारे भाऊ विचारवंत, ज्ञानवंत व्हावेत म्हणून, आहे का तळमळ ? खरा गणेशाचा उपासक यासाठीं तडफडेल.

जीवः---खरें आहे तुझें म्हणणें. आमच्यांत सहानुभूति नाहीं. सहानुभूति नाहीं म्हणून दुसऱ्याचें दुःख कळत नाहीं. दुसऱ्याची स्थिति सुधारावी असें स्वप्नांतहि मनांत येत नाहीं. अशानें आमचें मंगल कसें होणार?

गणेशः---मला तुम्ही मंगलमूर्ति म्हणतां. परंतु मातीच्या देवाची पूजा करून मंगल येणार नाहीं. मातीच्या देवाला मखरें घालून मोक्ष मिळणार नाहीं. मातीची मूर्ति म्हणजे सर्व मूर्तींचें प्रतीक आहे. माझी पूजा करून सर्व दुःखी लोकांची सेवा करावयास वांकणार नसाल तर माझें स्वरूप तुम्हांला समजलें असें मी कसें म्हणूं ? मला मखरें घालणारा कामगारांना, हरिजनांना, भंग्यांना, गरिबांना घरें आहेत कीं नाहीं तें पाहील,

माझ्यासमोर व्याख्यानमाला करणारा आपले बंधू किती सुशिक्षित आहेत याचा विचार करील. माझ्यासमोर आरास करणारा किती घरांत दिवा रात्रीं नसतो याचा विचार करील. माझ्यासमोर ताटें भरभरून खिरापती वाटणारे किती घरांत पोटभर खायला नाहीं, मुलांना खाऊ कधीं मिळत नाहीं, याचा विचार करतील. हा विचार जोंपर्यंत पूजकाला स्फुरत नाहीं, तोंपर्यंत ती मंगलमूर्तीची पूजा नसून मातीची पूजा आहे. गणेशाची पूजा नसून एका तुकड्याची पूजा आहे. विद्यानिधीची पूजा नसून अज्ञानाची पूजा आहे.

जीवः——देवा गणेशा, तूं सांगितलेंस हें दुसऱ्यांना मी सांगेन. परन्तु हें कोणाला आवडेल ?

गणेशः—आवडो नावडो. स्वतःच्या सद्सद्विवेकबुद्धीप्रमाणें वागावें. माणुसकीप्रमाणें वागावें. त्यासाठीं दगड डोक्यांत बसले व कुऱ्हाड मानेंत बसली तरी पर्वा करूं नये. सत्कर्म करतां करतां हें देहाचें मडकें फुटणें याहून भाग्य तें कोणतें ? जा व या विराट् गणेशाची खरी ज्ञानमय पूजा करावयास सांग म्हणजे दुःखें दाही दिशांस पळतील; विघ्नें नाहींशीं होतील; समाजांत आनंद व मांगल्य येईल.

— २९ ऑगस्ट, १९३८.

## हरिजनांसंबंधीं प्रश्नोत्तरें ३९

प्रश्नः— कांग्रेसनेंच हें काम कां घ्यावें ?

उत्तरः— कांग्रेस सर्वांना माणुसकी देऊं पहाते म्हणून. वास्तविक सर्वच पक्षांचें हरिजनांची अस्पृश्यता जावी असें मत आहे. हिंदुमहासभेचे अध्यक्ष दे. भ. बॅ. सावरकर हे तर सहभोजनें करण्याचा हट्ट धरण्याबद्दल प्रसिद्ध आहेत. परन्तु कांग्रेसनें हरिजनांसंबंधीं आग्रह दाखवला असतां त्या कांग्रेसचें अभिनंदन करावयास किंवा केसरीसारख्या पत्रांतून कांग्रेससंबंधीं गलिच्छ गैरसमज पसरवले जात असतां त्याचा निषेध करावयास ते उभे रहात

नाहींत. हिंदुमहासभेचे प्राण हुतात्मा श्रद्धानन्द किंवा लाला लजपतराय सारे अस्पृश्यांचे कैवारी होते. श्रद्धानंदांनीं तर मंदिर–सत्याग्रह उचलला होता. त्यांनीं हरिजनांसाठीं दोन वर्तमानपत्रें चालविलीं होतीं. हिंदूंच्या संघटनेचें बिगुल वाजविणारे हरिजनांना माणुसकी मिळत नाहीं म्हणून चवताळून उठत नाहींत. कांग्रेसला मुसलमानधार्जिणी म्हणून शिव्या देणारे ती हरिजनांची बाजू घेऊन त्यांना हिंदु समाजांत माणुसकीचें स्थान मिळावें म्हणून झटते, तरीहि शिव्याच देतात! नावडतीचें मीठ अळणी हेंच खरें. कांग्रेसजवळ दंभ नाहीं. इतर पक्षांनीं ठराव करून दप्तरांत ठेवले. कांग्रेस आपले ठराव शक्य तितके प्रत्यक्ष सृष्टींत आणूं इच्छिते.

प्रश्न :––श्री तात्यासाहेब केळकरांनींहि सहभोजनांतून पूर्वीं भाग घेतला होता का ?

उत्तर :–अहो, सारे घेतात. परन्तु बहुजनसमाजांत येऊन सांगण्याचें, शिकविण्याचें नैतिक धैर्य कोणासहि नाहीं.

प्रश्न :––हरिजनांची स्थिति सुधारली तर मृत गुरें नेण्याचें, भंग्याचें काम कोण करणार ?

उत्तर :––ज्याला करतां येईल तो करील. आज शिंप्याचें काम शिंपीच करतो का? शिक्षकाचें काम ब्राह्मणच करतो का? दुकान चालवावयाचें काम वाणीच करतो काय? आपापले वडिलोपार्जित धंदे सोडून किंवा वर्णांचे धंदे सोडून ज्याला जो करतां येईल तो तो धंदा मनुष्य करीत आहे. तसेंच समाजांत ज्याला भंगी-काम करतां येईल, ढोरें फाडतां येतील, मोटा शिवतां येतील, ते तीं कामें करतील. कामें अडून पडत नाहींत. ब्राह्मण लोकहि हल्लीं ढोरें फाडण्याचें काम करूं लागले आहेत व हें काम सेवेचें आहे, शास्त्रीय व पवित्र आहे, असें पटवून देत आहेत. अमक्यानें अमुक काम करावें असा आज निर्बंध वरचे वर्गांचे लोकांत उरला नाहीं. मग हरिजनांनाच तो नियम कां लावावा?

प्रश्न :––यांत वर्णाश्रमधर्माचा नाश नाहीं का ?

उत्तर :––खरें सांगूं का, वर्णाश्रमधर्म हा शब्द आज उरला आहे. कोठें आहे वर्ण व कोठें आहे आश्रम? वर्ण म्हणजे काय? ज्यानें त्यानें आपलें काम करणें. परंतु ब्राह्मणाचा मुलगा आज डेअरी घालतो, दुकान

घालतो, फुलें विकतो, हॉटेल घालतो. कोठें आहे वर्ण ? क्षत्रियाचा मुलगा शिक्षक होतो, डॉक्टर होतो, कारकून होतो. वैश्याचा मुलगा वकील होतो, नाटकांत जातो, सिनेमांत काम करतो. परंतु वर्ण याची अधिक चिकित्सा करूं. वर्ण म्हणजे रंग. बुद्धीचा कोणता रंग घेऊन मनुष्य जन्माला आला आहे, हें ओळखणें म्हणजे वर्ण ओळखणें. आईबापांच्या अंगाचा रंग मुलाच्या देहाला असतो. परन्तु आईबापांच्या हृदयाचे, बुद्धीचे गुण मुलांत असतातच असें नाहीं. तसें असतें तर सारीं मुलें एकाच गुणधर्माचीं निपजलीं असतीं. परन्तु एकाच आईबापाचीं मुलें कोणी गणिती, तर कोणी चित्रकार, तर कोणी नकला करणारीं अशीं निपजतात. याचा अर्थ हा कीं प्रत्येकाचा विशिष्ट वर्ण आहे. त्या विशिष्ट वर्णाचा विकास त्यानें करावा व समाजाची सेवा त्यानें करावी. शाळांतून मुलांच्या या गुणांची परीक्षा झाली पाहिजे व त्या गुणांच्या विकासाची सोय राष्ट्रीय सरकारनें केली पाहिजे. जोंपर्यंत सर्वांना शिक्षण नाहीं, शिक्षणाचे प्रयोग करून मुलांचे गुणधर्म पारखले जात नाहींत, गुणधर्म पारखून त्यांच्या वाढीची सोय केली जात नाहीं तोंपर्यंत कोठला वर्ण ? सारे शूद्र आहेत. स्वराज्य मिळाल्याविना व खऱ्या शाळांतून प्रयोग झाल्याशिवाय वर्णचिकित्सा होणार नाहीं. ती चिकित्सा होऊन त्या त्या मुलांच्या विकासाची सोय स्वराज्याशिवाय कशी होणार ? आज सारे होतात कारकून, होतात मास्तर. आवड असो वा नसो. आज देवानें दिलेल्या गुणधर्मांचा वध होत आहे. देवानें दिलेलें बुद्धीच्या गुणांचें भांडवल गुलामगिरींत वाढीस न लागतां मरतें. देवानें जर विचारलें, ‘ मी तुला गुण दिले होते, त्याचा काय उपयोग केलास ?’ तर मी काय उत्तर देणार? ‘ देवा गुलामगिरीमुळें मला त्या गुणांचा कोंडमारा करावा लागला ’ असेंच म्हणावें लागेल. जर पुन्हां प्रभूनें विचारलें, ‘ मग त्या गुलामगिरीला दूर करावयास उठलास का ’ ‘ नाहीं ’ उत्तर द्यावें लागेल. मग प्रभु म्हणेल, ‘ तूं वर्णाचा अभिमान बाळगीत होतास. परन्तु मी दिलेला वर्ण मातींत दवडलास. दास्य दूर करावयास उठला नाहींस. तुझा सारा दंभ आहे. ’ स्वराज्याशिवाय खऱ्या वर्णाची चिकित्सा व विकास शक्य नाहीं. आज वर्ण नाहीं व आश्रमहि नाहीं. समाजांत बाळपणीं लग्नें करून नाचणाऱ्यांना ब्रह्मचर्याची काय थोरवी ? मरेपर्यंत पोरें

पैदा करणाऱ्यांस वानप्रस्थ व संन्यास काय कळे ? आज समाजांत वानप्रस्थ असते तर साक्षरताप्रसार चुटकीसरशी झाला असता. परन्तु पेन्शनें खात शहरांतून बंगले बांधून राहतात आणि वर्णाश्रम धर्मांच्या बेटे बाता मारतात! चीड येते आज. महात्माजींनीं आश्रमधर्माला थोडा उजळा दिला आहे. आणि एकप्रकारें थोडा वर्णधर्मालाहि उजळा दिला आहे. विणकराला म्हणतात तूं वीण; तेल्याला म्हणतात तूं घाणा घाल. परंतु गिरणीचें तेल वापरणारे आम्हीं तेल्यांची जात मारीत आहोंत. गिरणीचें कापड वापरून विणकर, लोढारी, रंगारी सारे मारीत आहोंत. सर्वांत मोठा सब गोलंकार यंत्र करीत आहे. कारखान्यांत सारे एकत्र काम करतात. सर्वांचे धंदे कारखानदारांनीं मारले. आणि सर्वांना एकत्र घाणींत व नरकासारख्या चाळींत कोंडलें. अशा शेटजींवर वर्णाश्रमवाल्यांनीं आधीं बहिष्कार घालावा; अशा कारखान्यांतलि मालावर बहिष्कार घालावा. सारे धंदे तुम्ही मारीत आहांत व सबगोलंकार वाढवीत आहांत. विचार कराल तर तुमचें हिडीस स्वरूप अधिकच उघड होईल. आज वर्ण नाहीं, आश्रम नाहीं, निर-निराळ्या जातींना धंदा नाहीं. परन्तु कांग्रेस धंदे देत आहे. ग्रामोद्योगसंघ, चरकासंघ, चर्मालयें, वगैरे सुरू करून धंदे देत आहे. आणि कोणी सेवेचा कोणताहि धंदा करो, तो पवित्र आहे, त्या माणसाला माणुसकीनें वागवा, असें शिव्याशाप खाऊन शिकवीत आहे. किती तुम्हांला सांगूं ?

प्रश्नः—तुमच्यामुळें हरिजन जरा ताठ मान करून चालूं लागले. हें बरें का ?

उत्तरः—पडलेल्यांची मान जरा सावरूं लागली तर खऱ्या भावाला आनंद होईल. आईला आपल्या लेकराची मान सदैव वांकलेली आवडेल का ? आज आपणांस ताठ उभें रहावयासच शिकावयाचें आहे.

प्रश्नः—अशा मार्गांनीं हरिजनांचा उद्धार होईल का ?

उत्तरः—हरिजनांच्या उद्धाराची काळजी नका करूं. हरिजनांना पशू-प्रमाणें ठेवून तुम्हांला देवाघरीं मोक्ष मिळणार आहे का ? परवां श्री गाडगे महाराजांनीं अमळनेरला सांगितलें, 'माणसाला शिवूं नका करतांच देव तेथून पळतो' हरिजनाच्या ऐहिक उद्धाराविषयीं म्हणत असाल तर ते नीट सर्वांत मिसळूं लागले, हिंडूं फिरूं लागले, म्हणजे त्यांना निरनिराळे धंदे

करतां येतील. तुम्हीहि त्यांना चांगलीं कामें सांगाल. त्यांची आर्थिक स्थिति सुधारेल.

प्रश्नः—ते मृत मांस खातात.

उत्तरः—ज्याला कांहीं खायला मिळत नाहीं तो दगडहि खाईल. दुष्काळांत विश्वामित्र ऋषीनें कुत्र्याचें तंगडें चघळलें. हरिजनांना सन्मान्य धंदा नाहीं. धान्य घ्यावयास, ताजें मांस घ्यावयास पैसा नाहीं. ते निराधार होऊन मृतमांस खातात. अरे हें दारिद्रय आहे; हें अनंत दुःख आहे. बकऱ्याची चरचर मान कापून वाघाप्रमाणें खाण्यापेक्षां मेलेलें खाणें यांत कमी राक्षसपणा आहे. परन्तु तें जाऊं दे. गरिबीमुळें हें करावें लागतें. मांस तर तुम्ही सारेच बहुतेक खातां. आणि मुसलमान, ख्रिश्चन, मराठे वगैरे सारेच तुम्ही मांसखाऊ एकत्र बसतां उठतां. हरिजन मृतमांस खातो. तें दारिद्रयामुळें. परन्तु वऱ्हाडांत व खानदेशांत शेंकडो हरिजन वारकरी मांस कोणतेंच न खाणारे आहेत. त्यांना तरी तुम्ही कोठें घेतां जवळ ? वकीली डावपेंच काय लढवतां? ही गंमत नाहीं. हा हृदयाचा, माणुसकीचा, खऱ्या सद्धर्माचा प्रश्न आहे. मी जातों आतां. बंधुभाव दाखवा, व भारताचें तोंड उजळ करा. हीच पुन्हां पुन्हां प्रार्थना.

—२९ ऑगस्ट, १९३८.

## राष्ट्रीय आठवडा ४०

१९१९ सालीं अमृतसर येथें जालियनवाला बागेंत गोळीबार झाला. इतकें भयंकर अघोर तें कृत्य झालेलें आहे कीं, त्याचें वर्णन करतां येणें शक्य नाहीं. २० वर्षें झालीं. पण त्या प्रसंगाचें चित्र डोळ्यांपुढें उभें राहिलें म्हणजे अद्याप देखील शहारे येतात. जनरल डायर यांनीं गोळीबार केला. १५००० लोकांची सभा भरलेली होती. जालियनवाला बागेंतील पटांगण बाटलीच्या आकाराप्रमाणें आहे. म्हणजे सर्व बाजूंनीं बंद व बाहेर जाण्यास त्या पटांगणाला फक्त एकच लहान दार आहे. जनरल डायर

आपल्या साक्षींत म्हणाला, 'सभेंतील लोकांना मी जागा सोडून जावयास हुकूम सोडला होता व नन्तर २-३ मिनिटांनीं गोळीबाराचा हुकूम सोडला.' अधिकारमदानें धुंद झालेल्या त्या जनरल डायरच्या येवढेंहि लक्षांत आलें नाहीं कीं १५००० लोक २।३ मिनिटांत अगदीं छोट्याशा दारांतून एकदम कसे बाहेर पडतील ? त्यानें १६०० गोळ्या झाडल्या, 'इतकेंच काय पण आणखी गोळ्या शिल्लक असत्या तर त्याहि सोडल्या असत्या' असें तो साक्षींत म्हणाला. जनरल डायरच्या कारकीर्दींत तेथील लोकांची फारच कुचंबणा झालेली आहे. एका इंग्रज बाईचा कोणी अपमान केला म्हणून त्यानें गांवांतील साऱ्या हिंदी लोकांना रस्त्यावरून सरपटत जाण्याचा हुकूम सोडला. मनुष्यत्वाला न शोभणारा असा प्रकार त्या वेळीं झालेला आहे. ५०० च्या वर लोक गोळीबाराला बळी पडले. जखमी झालेल्या लोकांचे हाल तर विचारूंच नका. रात्रभर ते तसेच पडले होते. ना अन्न, ना पाणी, ना शुश्रूषा ! त्यांच्या जवळ जाणार कोण ? नको ! नको ! जास्त वर्णन करूं नये असें वाटतें. चीड येते. पण चीड येते ती जनरल डायर ह्या व्यक्तीची येत नाहीं, इंग्रज लोकांची येत नाहीं, तर ब्रिटिश साम्राज्यशाहीची येते.

साम्राज्यशाहीची तहान एका जालियनवाला बागेच्या कत्तलीनें शमणार नाहीं. शेंकडों जालियनवाला बाग प्रकरणें घडवून आणल्याशिवाय साम्राज्यशाहीचा पाय हिंदुस्थानांतून उखडणें शक्य नाहीं. वसाहतींच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय पिळवणुकीवरच साम्राज्यशाहीचा राक्षस पोसला जातो हें लक्षांत ठेवा. ब्रि. साम्राज्य हें जगांतील एक अग्रगण्य साम्राज्य गणलें जातें. अशा साम्राज्यशाहीशीं आपणां हिंदुस्थानच्या लोकांना टक्कर द्यावयाची आहे. स्वातंत्र्य म्हणजे कांहीं पोरखेळ नव्हे.

१९१९ पासूनच सामुदायिक लढ्याचा कालखंड सुरू झाला. राष्ट्रीय लढयाची एक अवस्था आटोपली, दुसरी सुरू झाली. दडपशाहीविरुद्ध लढून आपले लोकशाही हक्क मिळविण्यासाठीं हिंदी जनता सज्ज झाली. साम्राज्यशाहींतहि चांगुलपणा असतो, असें म्हणणाऱ्या लोकांची आशा पार नाहींशी झाली. जालियनवाला बागेंतील शूर वीरांच्या रक्तांतून नवीन कांग्रेसचा जन्म झाला. हिंदी जनतेची प्रातिनिधिक संस्था ती बनूं लागली. जनतेच्या साम्राज्यविरोधी लढयाचें तिनें धडाडीनें नेतृत्व घेतलें.

कांग्रेस ही आज एकच अशी हिंदुस्थानांत संस्था आहे कीं, जी ब्रि. साम्राज्यशाहीशीं टक्कर देण्यास उभी राहिलेली आहे. तिनें स्वातंत्र्याचें रणशिंग फुंकलें आहे. आपल्या स्वातंत्र्याच्या लढ्याला दिवसेंदिवस जोर चढावा, तो सुसंघटित व्हावा म्हणून साम्राज्यशाहीला बळी पडलेल्या जालियनवाला बागेंतील स्मृतीच्या निमित्तानें हा आठवडा सुरू करण्यांत आलेला आहे. तेव्हां कां. ची संघटना वाढविणें, तिचें बळ वाढविणें हेंच खरें त्या हुतात्म्यांचें पुण्यस्मरण आहे. कांग्रेसचें बळ वाढवावयाचें असेल तर अगोदर कां. चे सभासद झालें पाहिजे. मागच्या वर्षीं ४० लाख सभासद झाले, यंदा ६० लाख सभासद झाले पाहिजेत. कामगारांनीं सुद्धां कां. च्या झेंड्याखालीं आलें पाहिजे. गरीब, श्रीमंत, १८ वर्षांचे वरील विद्यार्थी ह्यांचें कां. चे सभासद होणें हें पहिलें कर्तव्य आहे. तमाम सारे लोक कां. च्या झेंड्याखालीं उभे राहिले पाहिजेत. सारातहकुबी दिली नाहीं म्हणून आम्हीं कां. चे सभासद होणार नाहीं असें शेतकऱ्यांनीं म्हणतां कामा नये. कां. आज अधिकारपदावर दिसत असली तरी तिची सत्ता संकुचित आहे हें विसरतां कामा नये.

कां. कडून आपल्या मागण्या पूर्ण होत नसल्या तरी तिचे सभासद व्हा. तिची शक्ति वाढवा, बळ वाढवा. म्हणजे मग तुमच्या मागण्या आपोआपच पूर्ण केल्या जातील. ब्रि. साम्राज्यशाहीच्या विरुद्ध आपण सारे एक झालें पाहिजे. कामगारांना लाल बावट्याचें राज्य पाहिजे असलें तरी त्याकरितां प्रथम तिरंगी झेंड्याखालीं आलें पाहिजे. कामगार व शेतकरी हीं दोन कां. चीं फुप्फुसें आहेत. कां. मध्यें त्यांच्याशिवाय त्राण राहणार नाहीं. ती निर्जीव होईल. परंतु कां. जर निर्जीव झाली तर ह्या दोन्हीहि वर्गांची परिस्थिति सुधारण्याची आशाच धरावयास नको. त्याप्रमाणेंच व्यापारी, वकील, शिक्षक वगैरे सर्वांनीं कां. चे सभासद व्हावें. कां. ला मदत केल्याशिवाय कोणत्याहि वर्गाचा प्रश्न सुटणें शक्य नाहीं. लढाईची वेळ जवळ येत आहे. तयारी करा. उठा. खादी खरेदी करा. हिंदु-मुसलमान बंधूंनो एकत्र या. हिंदु-मुस्लीम ऐक्याची अशा गंभीर प्रसंगीं घोषणा करा. प्रभातफेऱ्या काढा. स्वयंसेवक दलें उभारा. गांवचें सारें वातावरण कांग्रेसमय करा. थोडे दिवसांपूर्वीं शिंदखेडें तालुक्यांतील कम-

खेडें या खेडेगांवांत खादीधारी लोकांचें संमेलन भरलें होतें. त्याचा परिणाम खेड्यांतील लहान मुलांवर इतका झाला कीं, एक ७ वर्षांचा मुलगा सभेंत उठून म्हणाला, 'आजपासून मी संपूर्ण खादी वापरीन अशी प्रतिज्ञा करतों.' दुसरा एक मुलगा उठला व घरीं जाऊन वडिलांजवळ मागणी केली कीं, मला खादीचा सदरा, टोपी व पॅण्ट करून द्या. वडिलांनीं त्या मुलाचें ऐकलें नाहीं. त्यानें उपवास सुरू केला. त्याचा विजय झाला. वडिलांनीं खादीचा पोषाख दिला. खानदेशांतील खेडीं कमखेड्याचा कित्ता गिरवतील अशी आशा आहे.

—वर्ष २, अंक १.

## थोरांचें तरी ऐका ४१

खिरोदें येथें हरिजनांना मंदिर खुलें झालें. त्यामुळें सनातनी मंडळींत अस्वस्थता माजली आहे असें कळतें. पारतंत्र्यांत स्वस्थ बसणारे कोणत्या तरी कारणानें अस्वस्थ झाले हेंहि एकपरि बरें. देव जर सर्वांचा असेल, सारीं आपण त्याचीं लेंकरें हें जर यथार्थतेनें आपण म्हणत असूं तर देवाजवळ हरिजन गेल्यानें सर्वांना सद्धर्म आला असेंच वाटलें पाहिजे. धुळ्याचे महामहोपाध्याय श्रीधरशास्त्री पाठक यांनीं अस्पृश्यतेला शास्त्राधार नाहीं म्हणून सुंदर शास्त्रीय विवेचनाचा ग्रंथ लिहिला आहे. महाराष्ट्रांतील वांईची प्राज्ञपाठशाळा कोणास माहीत नाहीं ? नवमतवादी शास्त्री महाराष्ट्रभर पसरवण्याचें काम जर कोणी केलें असेल, तर तें प्राज्ञ-पाठशाळेनें. आज तर्कतीर्थ भाई लक्ष्मणशास्त्री जोशी तिचे चालक आहेत. परन्तु पूर्वींचे प्राज्ञपाठशाळेचे प्राण म्हणजे परमपूज्य नारायणशास्त्री मराठे; आज ते संन्यासी आहेत. केवलानंद म्हणून ओळखले जातात. ज्या वेळेस ते प्राज्ञशाळेंत चालक होते, त्या वेळची एक गोष्ट माझ्या मित्रानें मला सांगितली, तो माझा मित्र हिमालयांत देव भेटावा म्हणून जाणार होता. गुरुदेवाचा आशीर्वाद घेण्यासाठीं तो गेला. त्या वेळेस पूज्य नारायणशास्त्री त्याला म्हणाले

**"तुला देव पाहिजे ना? हरिजनांच्या मुलांचीं ढुंगणें धू म्हणजे तुला देव मिळेल."**

आज उभ्या महाराष्ट्रांत परमपूज्य केवलानंदांहून हिंदुधर्माचा आत्मा अधिक कोण जाणूं शकणार! वर्ध्यांचे पूज्य विनोबाजीहि नारायणशास्त्र्यांच्या पायाशीं शिकलेले आहेत. असे हे थोर आजचे महर्षि ते देव कोठें तें सांगत आहेत. हरिजनांना मंदिर उघडें करायचें कीं नाहीं, याची चर्चा करीत बसणाऱ्यांनीं हे वरील थोर उद्गार ऐकावे. निरहंकारी होऊन हरिजनांना जवळ घ्यावें व हिन्दुधर्माचें खरें उज्वल रूप प्रकट करावें.

पूज्य नारायणशास्त्री यांची दुसरी एक गोष्ट त्याच मित्रानें सांगितली. १९३१ सालीं महात्माजी लंडनला गेले होते व वाटाघाटी चालू होत्या. परन्तु आमचे जातीय प्रश्न सुटेनात. महात्माजींनीं मुसलमानांना इतकें देतों म्हटलें तर ब्रिटिश सरकारनें अधिक देऊं करावें. शेवटीं महात्माजी म्हणाले **"कोरा चेक देतों, परन्तु लढा सुरू झाला तर आमच्या खांद्यांशीं खांदा लावून लढा."** परन्तु शेवटीं कांहीं निष्पन्न झालें नाहीं. जगासमोर हिन्दुस्थानचे धिंडवडे निघाले. त्या वार्ता ऐकून महाराष्ट्रांतील दोन महापुरुषांस मरणप्राय वेदना झाल्या. एक महर्षि सेनापति बापट व दुसरे श्री केवलानन्द. ऐक्याची नितान्त आवश्यकता राष्ट्रास पटविण्यासाठीं बलिदान करावें असें त्या वेळेस सेनापतींच्या मनांत आलें. आणि केवलानन्द वाईस होते. वर्तमानपत्रांतील त्या हकीगती वाचून ब्रिटिशांनीं हिन्दुस्थानची चालवलेली फजीति ऐकून नारायणशास्त्री यांच्या डोळ्यांतून एकसारख्या जलधारा वहात होत्या.

महाराष्ट्र, त्या अश्रूंतील अर्थ तुला कळेल तर तूं निराळा वागशील. हिन्दु–मुसलमानांत ऐक्य उत्पन्न करण्याच्या मार्गावर राहशील. निदान द्वेष तरी पसरवणार नाहींस. वातावरण निर्मळ ठेवण्याचा आपण अधिक प्रयत्न केला पाहिजे. आगींत तेल ओतून कसें चालेल?

परन्तु पुण्याला कांहीं राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे लोक 'तूं माणूस आहेस कीं मुसलमान आहेस?' असा नवीन प्रयोग 'तूं माणूस आहेस कीं जनावर आहेस?' या प्रयोगाऐवजीं करूं लागले आहेत. एवढा द्वेष शिकून आपण काय साधणार? ब्रिटिश मात्र उरावर अधिक बसणार. कांहीं मुस्लीमपुढारी

जातिनिष्ठ असले तरी आपण अशा हीन मार्गानें नाहीं जातां कामा. कॉंग्रेस मुसलमानांजवळ निर्मळ बोलणें करते. त्यांनीं न ऐकलें तर स्वातंत्र्याचा लढा तिचा नाहीं थांबणार. महाराष्ट्र, ते थोर अश्रू लक्षांत आण व वाग.

—वर्ष २, अंक ४६.

## धर्म म्हणजे शब्द नव्हेत; अनुभव. ४२

अमळनेरच्या जैन युवक मण्डळानें ५ दिवस एक व्याख्यानमाला चालविली. पहिले दिवशीं साने गुरुजी गेले होते. श्री. मुनि महाराज अध्यक्ष होते. साने गुरुजी म्हणाले, ' मी तुम्हांला काय सांगणार ? माझ्या जवळ नवीन कांहीं नाहीं. तुमचा धर्म अहिंसाप्रधान आहे. जगांत दुःख नसावें ह्यासाठीं तुमचा धर्म आहे. जगांतील दुःख जावें म्हणून तुम्हीं काय करतां ? तुम्हीं मंदिरांत जातां. हिंदु हिंदु मंदिरांत जातात, मुसलमान मशिदींत जातात. परन्तु एवढ्यावरून धर्म दुनियेंत आहे असें कसें म्हणूं ? अमळनेरमध्यें धर्म असता तर गटारें बांधावयास आपण उभे राहिलों असतों. डांस वाढत आहेत; रोग फैलावत आहेत. त्यांचा बंदोबस्त करावयास उठलों असतों. तिकडे लढाई सुरू झाली. येथें एकदम भाव वाढले. धान्य, साखर, रॉकेल, काड्याची पेटी, औषधें साऱ्यांचे भाव वाढले. परंतु मजुराची मजुरी वाढली नाहीं. भाजीविक्या माळणीची भाजी महाग झाली नाहीं. केळीं महाग झालीं नाहींत. तुमच्या दुकानांतील महाग वस्तु ते गरीब कसे घेणार ? काय खाणार ? तुमच्यामध्यें अहिंसा असली, तर तुम्हीं व्यापारी एकदम जमले असतेत. भावनियंत्रण केलें असतेंत. माझ्याकडे दहा गरीब लोक आले व म्हणाले ' गुरुजी, भाव वाढतात. व्याख्यान द्या. ' माझ्या शब्दांत तेवढी शक्ति नाहीं. अहिंसा धर्म जर तुम्हांस प्रवृत्त करीत नाहीं तर माझ्यासारख्या क्षुद्राचें कोण ऐकणार ? परन्तु उद्यां मामलेदारांनीं बोलावलें, सरकारचें कडक फर्मान निघालें म्हणजे पटकन ऐकाल. आपण सत्तेला

भितों, दंडुक्याला भितों. अहिंसेचा कायदा मानीत नाहीं; दंडुक्याचा कायदा मानतों. बंधुभाव दंडुक्यानें शिकवावा लागतो. कोठें आहे धर्म ?

धर्म शब्द स्वस्त झाला आहे. व्याख्यानांत आम्ही 'माझ्या बंधूंनो' म्हणून म्हणतों. परंतु 'सारे माझे बंधू' याचा जीवनांत अनुभव येतो का? मी कांहीं दिवसांपूर्वी सावदे स्टेशनवरून फैजपूरला जात होतों. पाऊस पडत होता. मोटार भिजली होती. मी आंत गेलों व बाकांवरील कोरड्या जागेवर बसलों. दुसरे लोक येत होते. शेवटीं एक जण आला. उरलेली जागा फारच भिजली होती. ती कडेची होती. तिकडून आंत पाणी येई. त्यांनीं मला ओळखलें. नमस्कार केला. ते त्या ओल्या जागेवर बसणार तों मी माझी घोंगडी त्यावर पसरली. इतका वेळ ती घोंगडी मी मांडीवर ठेवली होती. त्या ओल्या जागेवर मीच कां बसलों नाहीं? कोणीतरी बसणारच ना माझा भाऊ? परंतु माझ्या देहाची, माझ्या कपड्यांची मला चिंता होती. मला लाज वाटली. कसलें आपलें प्रेम असें मनांत आलें. कोठें आहे बंधुभाव? सारें ओंठांत आहे. पोटांत नाहीं. माझी पै किंमत त्या दिवशीं मला कळली. सत्य, अहिंसा, प्रेम हे शब्द स्वस्त झाले आहेत. परंतु त्यांचा अल्पसा अनुभवहि दुर्मिळ आहे.

आपल्या देशांत अपार दुःख आहे. हें दुःख दूर करावयास पंथातीत भेदातीत काँग्रेस उभी राहिली. तुम्ही अहिंसा धर्माचे. तुम्ही त्या संस्थेचे आधार झालें पाहिजे. परंतु यंदा तुम्ही सभासदहि झाले नाहींत. म्हणतात, तुमच्यांत भांडणें आहेत तीं मिटवा. घरांतील भावाभावांतहि जरा मतभेद होतात, परंतु एका घरांत रहातात. काँग्रेस पस्तीस कोटि लोकांची. मतभेद असणारच. सुभाषचंद्रांचे मतभेद असले तरी ते आधीं काँग्रेस सभासद व्हा असें सांगतात. काँ. च्या पोटांत, काँग्रेसच्या गोटांत सारें करा. देशांतील एक महान् संस्था अहिंसेनें दुःख दूर करायला उभी राहिली, तिचे सभासदहि तुम्ही होत नाहीं. तुम्ही कसे अहिंसा धर्माचे? दुःख दूर करण्यासाठीं संघटना हवी. सर्व दुःखी जनांनीं एकत्र आलें पाहिजे. काँग्रेस सर्वांना एकत्र हांक मारते. जें दुःख सर्वांचें होतें, तें क्षणांत विझवताल. हिंदुस्थानांतलि दुःख अजून सर्वांचें होत नाहीं. लाखोंची उपासमार आपली वाटत नाहीं. अशानें दुःख कसें दूर होणार? सूर्य उगवला म्हणजे

न दिसूं देणारें धुकें उडून जातें. मनांत प्रेमसूर्य उगवला म्हणजे दुसऱ्याचें दुःख न दिसूं देणारा स्वार्थ निघून जातो. हृदयांत थोडें प्रेम बाळगा.

अशा महान् संस्थांना पाठिंबा द्या. थोडी खादी घ्या. पूर्वी अंमळनेरला गांधी जयंतीस हजार हजार रुपयांची खादी खपे. तें प्रेम कोठें आहे? मी कांहीं जैन मुलांना विचारलें, 'तुम्ही पूर्वी खादी वापरत होतेत व आतां कां नाहीं?' ते म्हणतात, 'आम्ही सोडून दिली.' यानें तुमची अहिंसा वाढली कीं कमी झाली? मध्यें पाऊस पडला नव्हता. लोकांना मजुरी नव्हती. खादीचें काम मागत. खादी खपत नाहीं. काम कोठून देणार? पाला शिजवून लोक जगत. मजजवळ पत्रें आहेत अशीं. पोटभर जरा खेड्यांतील लोकांस खायला मिळावें म्हणून महात्माजी म्हणाले, 'खादीचे दर वाढवूं.' कोणी घेत ना. त्या महापुरुषानें शेंकडा २५ टक्के किंमती पुन्हां खालीं केल्या. महात्माजींना आपण खालीं ओढलें. कसलें आपलें प्रेम? आज अहिंसा धर्माचा महान् ऋषि महात्माजींहून कोण आहे? त्यांचा शब्द खालीं पडूं न देणें हें आधीं तुमचें काम होतें. परंतु थोडी खादीहि घेववत नाहीं. धर्म म्हणजे गप्पा नव्हे. धर्म म्हणजे झीज, त्याग. येत्या गांधी जयंतीला एखादा सदरा तरी खादीचा करा.' असें भाषण झाल्यावर श्रीमुनिमहाराज म्हणाले, 'कॉंग्रेस सर्व जगांत अहिंसा आणूं पहाते तिचे सभासद व्हा. आणि खादी? खादी तर आधीं हवी. चरबी लावलेला कपडा अंगावर घालून पूजा कशी करतां? रेशमाचे किडे उकळून रेशीम होतें. ते रेशमी कपडे घालून पूजा करतां. देवालाहि जर व रेशीम लेववितां. हा अधर्म आहे. खरा धर्म नाहीं. पूर्वी घरोघर रोटिया असे. आज नाहींसें झालें. जैन लोकांनीं तर आधीं खादी वापरावी. वरून चांगले झक कपडे करून भागत नाहींत. आंत प्रेम हवें. तें प्रेम हृदयांत असेल तर खादीच वापराल. घरीं बसल्या बसल्या खादी घेतल्यानें अनेकांना अन्न द्याल. अनेक खेड्यांतिल बंधुभगिनींचें दुःख दूर कराल.' शेवटीं श्री. बाबुभाई आभार मानतांना म्हणाले, 'पूर्वी आपण पुष्कळ सभासद होत होतों. आतां कोणी म्हणतात गुरुजींचें धोरण बदललें, कॉंग्रेस कामगारांची झाली. गुरुजी एक दुःख ओळखतात. कॉंग्रेसचा अध्यक्ष कामगार बंधु झाला तरी तो आपलाच आहे.'

—वर्ष २, अंक २४.

## वृक्षसंवर्धन ४३

एक काळ असा होता कीं, ज्या वेळेस हिंदुस्थानांत जंगलेंच जंगलें होतीं. त्या वेळेस आपले पूर्वज हातांत कुऱ्हाडी घेऊन जंगलें तोडावयास जात. ‘पृथुपर्शवो ययुः’ रुंद परशु हातांत घेतलेले आर्य निघाले असें वेदांत वर्णन येतें. जंगलें तोडून जमीन साफसूफ करून त्यांनीं ती लागवडीस आणली होती. जंगलें तोडणें जणूं त्या वेळचा राष्ट्रधर्म होता. कोणतेंहि धर्मकर्म असो. त्या प्रसंगीं होम हवा व होमासाठीं समिधा रानांतून आणल्या पाहिजेत. यांत हेंच तत्त्व दिसतें.

परंतु कर्तव्य हें काळाप्रमाणें बदलतें. एके काळीं जंगलें तोडणें हा धर्म होता. आज जंगलें लावून मंगल निर्माण करणें हा धर्म झाला आहे. हिंदुस्थानांतून झाडी तुटत चालली. त्यामुळें गांवांचें सौंदर्य व संपत्ति कमी होत आहे. पाऊस कमी होत आहे. जळण महाग व दुर्मिळ म्हणून शेतांत सोनें पिकविणारें शेण शेणीगोवरींच्या रूपानें चुलींत जात आहे. या सर्व गोष्टींचा राष्ट्रीय दृष्ट्या विचार झाला पाहिजे.

मुंबई इलाख्यांत कारवारच्या बाजूला अपार जंगल आहे. परन्तु मध्य व उत्तर भागांत जंगल कमी आहे. कारवारचें जंगल जर कांहीं मध्य उत्तर भागांत आणतां आलें तर बरें होईल! पण तें अशक्य आहे. आपण येथेंच तें निर्माण केलें पाहिजे. काठेवाडांत जंगलांची लागवड केल्याशिवाय तेथील परिस्थिति सुधारणार नाहीं, पाण्याचें दुर्भिक्ष संपणार नाहीं, असें महात्माजींनीं परवां म्हटलें आहे.

गांवाला नदी हवी व वनराजी हवी. नदी गांवाला ओलावा देते. आमराई छाया देते. मुकीं जनावरें नदीचें पाणी पितात व उन्हांत छायेखालीं बसून रवंथ करतात. गुराखी त्या दाट छायेखालीं खेळतात. गांवांतील मुलेंमुली अशा राईंत जाऊन तेथें झोले बांधून झोंके घेतात. व क्षणभर पांखरांच्या सुखाचा आस्वाद घेतात. एखादी सभापरिषद असली तर या हिरव्या मंडपांत भर दुपारींहि भरवतां येते.

ज्या मुलाला आईचा हात लागत नाहीं, तें मूल नीट वाढत नाहीं. मुलाच्या अंगावरून आईचा कोमल हात फिरला पाहिजे. म्हणजे त्या मुलाला बाळसें येतें. त्याला कळा चढते. गांवांचें असेंच. पूर्वीं आपलीं गावें गर्द झाडींत असत. कांहीं धीट घरें मधून डोकावत. मोठीं सुंदर दिसत गावें. परंतु आज खेडींपाडीं उदास, भगभगीत दिसतात. त्यांच्या तोंडावर तजेला नाहीं, रया नाहीं. याचें काय कारण? आईचे हात दूर झाले. झाडें म्हणजे भूमातेचे जणुं हिरवे हिरवे हात. ज्या गांवांना हे हात कवटाळतात, ज्या गांवच्या डोक्यावर मातेचे मंगल हात आशीर्वाद देत असतात, त्या गांवांना आनंद व शांति लाभते. परंतु हे भूमातेचे बळकट परंतु कोमल असे हात आज खेड्यांभोंवतीं कोठें आहेत?

असें म्हणतात कीं झाडें हवेंतील ओलावा ओढून आणतात. जेथें झाडें अधिक तेथें पाऊस अधिक. रवीन्द्रनाथांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, झाडें म्हणजे भूमातेची प्रार्थना. झाडें म्हणजे भूमातेचे देवाला जोडलेले हात. पृथ्वीनें आपल्या लेंकरांसाठीं जी अंतःकरणांत प्रार्थना केली ती झाडांच्या रूपानें वर आली. किती गोड कल्पना! भूमातेचे हे जोडलेले हजारों हजार हात पाहून वरील विशाल आकाशाचें हृदय भरून येतें आणि त्याचें हृदय विरघळून खालीं या भूमातेला सस्यशामल करणारी जलवृष्टि होते.

सारीं राष्ट्रें जंगल कमी नाहीं ना होत या गोष्टीकडे लक्ष देत असतात. मागें एकदां इटली देशांत १० लाख झाडें लावण्याचा संकल्प झाला होता. १९३२ मध्यें अमेरिकेचा स्वातंत्र्यदाता जॉर्ज वॉशिंग्टन याच्या २०० व्या जन्मदिवशीं अमेरिकेंत लाखों झाडें लावलीं गेलीं. कारण वॉशिंग्टन यास झाडांचें प्रेम होतें. अफाट जंगलें असलेल्या अमेरिकेला झाडें लावण्याची आवश्यकता वाटते. मग हिंदुस्थानला किती असेल?

ज्यानें जें झाड लावलें, त्याचें त्यानें पालन केलें पाहिजे, त्या झाडाला पाणी घातलें पाहिजे, हें माझ्या हातचें अमुक फुलझाड, हें माझ्या हातचें निंबाचें झाड, हा माझ्या हातचा शिरीष, हा माझ्या हातचा आम्रवृक्ष असें ज्याला म्हणतां येईल तो धन्य होय. परमेश्वर झाडें लावीतच असतो. तो वाऱ्याकडून झाडांचें बीं दशदिशांस फेंकतो व मेघांच्या पखालींतील पाणी घालून त्यांना वाढवतो. मानवांनीं हा धडा घ्यावा म्हणून मुके-

पणानें हें काम तो करीत असतो. थोर लोक कृतीनें शिकवतात. थोरांहून थोर तो परमथोर जगत्पिता, जगद्गुरु हें कृतीनें शिकवीत आहे. त्याच्यापासून धडा घेईल तो त्याचा लाडका होईल.

एका अमेरिकन कवीनें झाडांना हिरवीं मंदिरें ‘ Green Temples of God.’ असें म्हटलें आहे. किती गोड हें वर्णन. जें झाड स्वतः तापून जगाला छाया देतें, स्वतःचें आंबट फळ जवळ ठेवून तें पिकल्यावर, गोड केल्यावर आपोआप अनासक्त रीतीनें खालीं सोडतें, ज्या झाडाचा सारा बहर, ज्याचें जगणें मरणें विश्वासाठीं, त्या झाडाखालीं परमेश्वर नसेल तर कोठें असेल ? बाहेरच्या दगडी मंदिरांत हरिजनांना जातां येत नाहीं. परंतु हिरव्या मंदिरांत तो येतो, या मंदिरांत झोंपतो. झाड सर्वांना छाया देतें. जणूं ईश्वराचेंच हें रूप. पापी या, पुण्यवंत या, हिंसक या, अहिंसक या, सर्वांचें स्वागत हा उदार हिरवा राणा करीत असतो.

भारतीय संस्कृति तर झाडांखालींच वाढली. देवाशीं गुणगुण करण्यासाठीं उंच जाणाऱ्या झाडाखालीं त्यांचे संदेश ऋषींनीं ऐकले. वृक्षांचा माथा वर आकाशाला भेटूं पाहतो, पाय पाताळाला पोंचूं पाहतात, शाखा दशदिशांना मिठी मारूं पाहतात अशा या झाडांखालीं वाढलेली भारतीय संस्कृतिहि परमोच्च, परमोदार, परम गंभीर व खोल, अतिविशाल अशी झाली आहे. भारतीय संस्कृतींत फुलांचा वास आहे, फुलांची पवित्रता आहे. भारतीय संस्कृति त्यागधर्म शिकवते, यज्ञधर्म शिकवते. कारण वृक्ष म्हणजे मूर्तिमंत महान् यज्ञ. भारतीय संस्कृतीच्या उपासकांनीं तरी वृक्षाला विसरूं नये. बेल लावा, तुळशी लावा, दूर्वा लावा, वड–पिंपळ, आम्र–बकुल, लावा. झाडाखालीं बसा. झाडाखालीं जेवा. आंवळीभोजनासारखीं व्रतें आपण निर्मिलीं आहेत. घरांत काय रोज बसतां व जेवतां ? घर म्हणजे कबरस्थान. चोहों बाजूनें कोंडणाऱ्या भिंती. घरांतील रहाणें म्हणजे डबक्यांतील रहाणें. तेथें मी व माझें. तेथें दृष्टि संकुचित होते. म्हणून मानवांनीं मधून मधून वनभोजन करावें. विशाल आकाशाचे खालीं, यज्ञमूर्ति झाडांच्या संगतींत जेवावें. जीवनांत जरा विशालता येईल, व्यापक दृष्टि येईल, भारतीय संस्कृतींत वृक्षाचा अपार महिमा आहे. पत्रावळीवर जेवणें पवित्र मानलें गेलें आहे. तेथें सृष्टीचा जणूं जिवंत संबंध आहे,

वृक्षांच्या हिरव्या रंगाच्या छत्र्या देऊन भूमातेनें आपल्या लेंकरांना छत्रपति केलें आहे. ती सोन्यामोत्यांची छत्री कोणाला मिळेल त्याला मिळो. त्या छत्रीखालीं छाया मिळण्याऐवजीं आगच मिळावयाची. परंतु या भूमातेनें पसरलेल्या लहान मोठ्या लाखों छत्र्या, यांच्याखालीं शीतल छायेशिवाय दुसरें काय आहे? या छत्र्यांवर कधीं कधीं फुलांची ती नक्षी गुंफते, या छत्र्यांना रंगीत फळांचीं मोतीं लावते. मुलांचें किती गोड कौतुक! आई मुलांचें जें कौतुक करते, त्याला सीमा नाहीं.

वृक्षाचा महिमा मी किती सांगूं, किती वर्णूं? वृक्षाखालीं उभें राहिलें म्हणजे भावसमाधि लागण्याची पाळी येते. वृक्षांचें जीवन समोर येऊन स्वतःच्या जीवनाची लाज वाटते. डोळ्यांतून पश्चात्तापाचें पाणी वाहूं लागतें. व त्या अश्रूंच्या वृष्टीबरोबरच पुढें जिवाला छाया देणाऱ्या पावित्र्याचीं रोपें हृदयांत लावलीं जातात.

—वर्ष २, अंक २३.

## भारताचें भवितव्य ४५

स्वतंत्र होण्याची भारतानें प्रतिज्ञा केली आहे. हें स्वातंत्र्य कसें मिळवायचें? अनत्याचारी मार्गानें. कॉंग्रेसनें हें आपलें ब्रीद ठरविलें आहे. स्वातंत्र्य हें ध्येय व अहिंसा हें साधन. आज २० वर्षें कॉंग्रेस या मार्गानें जात आहे. या अहिंसात्मक मार्गाचा प्रत्यक्ष चळवळींत उपयोग केला गेला. घोड्यांच्या टापांखालीं तुडवले जात असतां, लाठ्यांचा वर्षाव अंगावर होत असतां, गोळीबार होत असतां, मोटार लॉऱ्या अंगावर घातल्या जात असतां भारतीय सत्याग्रही वीर शांत राहिले. त्यांनीं हात उगारला नाहीं, दगड फेंकला नाहीं. या अहिंसात्मक चळवळीबद्दल जगानें कौतुक केलें. परंतु केवळ ही चळवळ अहिंसात्मक होती का? महात्माजींनीं एक महत्त्वाचा लेख लिहून सांगितलें कीं, ती चळवळ १०० टक्के अहिंसक नव्हती, गोष्ट खरी आहे. आमच्या भाषणांतून इंग्रज सरकार व इंग्रज

लोक, सरकारी अधिकारी यांच्याबद्दल संताप असे. आम्हांस त्वेष येत असे. पोलिसांना पाहून पिवळी पगडी हाय हाय आम्ही मोठमोठ्यानें मुंबईस ओरडत असूं. आम्ही गुप्त पत्रकें छापीत असूं. सारांश, आम्हीं बाहेरून अहिंसक दिसलों तरी मनानें संपूर्ण अहिंसक नव्हतों. मनांत द्वेष होता, त्वेष होता. अहिंसेचा कांहीं अंश आमच्यांत होता हें निःसंशय परंतु संपूर्ण अहिंसा नव्हती.

मनांत दाबून ठेवलेली हिंसाच आज वर्गयुद्धांतून व धर्मयुद्धांतून प्रकट होत आहे. किसान व जमीनदार, कारखानदार व कामगार, हिंदु व मुसलमान असे झगडे आज सर्वत्र उभे आहेत. ती मनांतलि हिंसा आज शतमुखांनीं प्रकट होत आहे. मग पुढें काय?

महात्माजींनीं संस्थानांतील सत्याग्रह थांबविले. त्यांत दोन हेतु होते. संस्थानांचें खरें स्वरूप प्रकट व्हावें. सत्याग्रह बिनशर्त मागें घेतल्यावर तरी ते समंजसपणें वागतात का पहावें हा एक हेतु. दुसरा हेतु म्हणजे जनतेच्या अहिंसेच्या कसोटीचा. जनता अहिंसेशीं एकरूप झालेली असेल तर झगडा थांबतांच तिला चुकल्याप्रमाणें वाटतां कामा नये. अहिंसा म्हणजे सेवा. जनतेंत विधायक कार्यास या अहिंसक फौजेनें वाहून घेतलें पाहिजे. परंतु महात्माजींना हे दोन्ही हेतू फलद्रूप झालेले दिसले नाहींत. सत्याग्रह थांबल्यावर संस्थानिक अधिकच चेकाळले. राजकोटमध्यें जुलूम सुरूच राहिला. प्रजापरिषदेच्या अध्यक्षांची शेतीवाडी जप्त करण्यांत आली. सुधारणा समितीच्या कामाचा पत्ता नाहीं. इकडे कोल्हापूर संस्थानांत तोच प्रकार. कार्यकर्त्यांच्या हातांत हातकड्या घातल्या जात आहेत. त्यांचीं घरेंदारें जप्त होत आहेत. संस्थानी प्रजा परिषदेशीं सहानुभूति बाळगणाऱ्यांचे छळ होत आहेत. त्रावणकोरासारखीं जरा सुधारलेलीं संस्थानेंहि महात्माजींनीं संस्थानांत येणें विघातक असें निर्लज्जपणें म्हणत आहेत. तालचेर संस्थानांतील परागंदा प्रजेची दुर्दशा अद्याप तशीच चालू आहे. अशा रीतीनें संस्थानिकांनीं आपण कसे आहोंत हें पुन्हां दाखवून दिलें. आणि सत्याग्रही प्रजा सत्याग्रह थांबल्यावर त्यांना उदासीन वाटूं लागलें. खादी विकणें, स्वच्छता, साक्षरताप्रसार वगैरे विधायक कामांत सारेच रमतील असें दिसत नाहीं.

त्यांच्या मनांत असमाधान रहाणार. प्रत्यक्ष झगड्याशिवाय त्यांना दुसरें कांहीं नको आहे. अहिंसेचा संपूर्ण साक्षात्कार नसल्यामुळें हें होत आहे.

संस्थानिक उद्दामपणें वागत आहेत. त्याला सार्वभौम ब्रि. सरकारच कारण आहे. ब्रि. सरकार नीट कान टोंचील तर संस्थानिकांची वर्तणूक निराळी होईल. महात्माजी लिहितात 'एखाद्या माणसास संस्थानिकांनीं भेटूं नये असें साम्राज्य सरकारला वाटत असेल तर संस्थानिक त्याला भेटणार नाहींत. संस्थानिक ब्रि. सरकारचीं बाहुलीं आहेत.'

ब्रि. हिंदुस्थानांत कांहीं प्रांतांत कांग्रेस मंत्रिमंडळें आहेत. परन्तु मंत्र्यांना जनतेचें सर्वांगीण हित करतां येणें अशक्य आहे. पैसे हातीं नाहींत. ब्रिटिश सरकारच्या हातांत तिजोरी. म्हणून ब्रि. हिंदुस्थानांतील जनताहि असंतुष्ट आहे. जोंपर्यंत ब्रि. सरकार लुटारू म्हणून राहणार तोंपर्यंत जनता सुखी कशी करतां येणार ?

संस्थानिक व ब्रि. सरकार लुटारूपणा सोडावयास तयार नाहींत. जनता तर अधीर होत चालली. अहिंसात्मक लढा करावयाचा तर विधायक सेवेस सर्वांनीं वाहून घेऊन अहिंसक शक्ति वाढविली पाहिजे. परन्तु इतका धीर आतां नाहीं. धीर नाहीं म्हणजे अधिक अहिंसा आचरण्यांत आणण्याची इच्छा नाहीं किंवा शक्यता नाहीं. आज २० वर्षें जी कांहीं अहिंसा आम्हीं दाखविली तिच्याहून अधिक आम्हांपासून अपेक्षूं नका असें जनता कदाचित् म्हणेल.

मग उपाय काय ? अधिक अहिंसा शक्य नसेल, पेलत नसेल तर काय करावयाचें ? गुलामगिरी तर सर्वांत त्याज्य. महात्माजींनीं अनेक वेळां लिहिलें आहे 'अहिंसेनें नसेल स्वतंत्र होतां येत तर हिंसेनें व्हा. परन्तु गुलाम राहूं नका.' अहिंसेनें स्वराज्य मिळवावें असें त्यांना वाटतें. हा प्रयोग कोठें शक्य असेल तर भारतांतच शक्य आहे असें त्यांचें हृदय सांगतें. परन्तु भारतीय जनता हा प्रयोग करतांना थकली असेल तर ?

अहिंसा वा हिंसा कोणताहि मार्ग घेतला तरी त्यांत संघटणा हवी. व्यवस्थितपणा हवा. आज देशांत चळवळ सुरू झाली तर कांहीं ठिकाणीं अत्याचार होतील. परन्तु असे असंघटित अत्याचार काय कामाचे ? अत्याचारानें, हिंसेनें स्वराज्य मिळवावयाचें असेल तर त्यांत एकसूत्रीपणा आणला

पाहिजे. महात्माजी म्हणतात, ‘ जर अधिक अहिंसा शक्य नसेल, तर राष्ट्रानें हिंसेसाठीं तयार झालें पाहिजे. मला जर अहिंसक लढा करून हिंसेपासून राष्ट्र वांचवतां आलें नाहीं तर तें हिंसेच्या वणव्यांत, रक्तपातांत सांपडल्याशिवाय राहणार नाहीं. ’

महात्माजींचा ब्रि. सरकारला हा स्पष्ट इशारा आहे. त्याप्रमाणें राष्ट्रालाहि आहे. असंदिग्धपणा सर्वांत वाईट. हिंदुस्थानला अधिक अहिंसा शक्य नसेल तर तसें ठरविलें जावें. कांग्रेसनें विचार करून आपलें क्रीड बदलायचें असेल तर बदलावें. मुंबईस सुभाषचंद्र आपल्या भाषणांत म्हणाले होते, ‘ कांग्रेसचें क्रीडहि बदलून घेण्यासाठीं आम्हीं खटपट करूं. ’ महात्माजी राष्ट्रास नक्की काय तें एक करा असें सांगत आहेत. मागेंहि त्यांनीं असाच इषारा दिला होता, या वेळेस पुन्हां दिला आहे. एकदां आचार्य कृपलानी म्हणाले होते कीं, ‘ अहिंसेच्या साधनांनीं अत्यंत निष्ठा व अत्यंत श्रद्धा ठेवून महात्माजी शेवटपर्यंत प्रयोग करतील. परन्तु जर त्यांना असें दिसलें कीं, अतःपर अहिंसा शक्य नाहीं तर ते दुसऱ्या कोणीहि हिंसा अवलंबिली नसेल इतकी ते अवलंबावयास तयार होतील, जें हातीं घेतील तें महात्माजी अर्धवट घेऊन नाहींत. ’

उद्यां महात्माजी काय करतील हा प्रश्न नाहीं. अहिंसेचा उपाय शोधण्यांत ते सध्यां मग्न आहेत. राष्ट्राची कोंडी फोडावयास लढा लवकरच कोणता तरी केला पाहिजे असें त्यांना वाटत आहे. हा शेवटचा महान् प्रयोग केल्याशिवाय ते राहणार नाहींत. म्हणून सध्यां सर्वांनीं शांत–गंभीर रहावें. कवि रवीन्द्रनाथ टागोर म्हणतात, ‘ शंकराची समाधि भंगाल तर प्रलयकाल ओढवेल. महात्माजींना शेवटची देणगी अद्याप राष्ट्रास द्यावयाची आहे. त्यांची चिंतना चालू आहे. त्यांच्यावर विश्वास ठेवा व ते जें सांगतलि तें करावयास सिद्ध रहा. ’

रवीन्द्रनाथांनीं भारतीयांस गंभीर उपदेश दिला आहे. संस्थानिकांस व साम्राज्यसरकारास कोण देणार ? आज जगांत भीषण परिस्थिति आहे. इंग्लंडला हिंदुस्थान कायमचें शत्रु करून फायदा नाहीं. हिंदुस्थानला स्वातंत्र्य देऊन मित्र करणें यांतच ब्रिटिशांचें हित आहे. ‘ परन्तु विनाशकाले विपरीत बुद्धि ’ हा नियम आहे. ब्रि. सरकारला त्यांच्या देशांतील जग-

विख्यात लेखकानें पुष्कळ वर्षांपूर्वी धोक्याची सूचना दिली आहे. बर्नार्ड शॉ यानें एका प्रस्तावनेंत स्पष्ट सांगितलें आहे. 'ब्रि. साम्राज्य सरकारनें साम्राज्यांतील गुलामगिरी दूर करावी, असंतोष वाढूं देऊं नये. जुलूम नाहींसा करावा. परन्तु शांतपणें प्रश्न सुटूंच नयेत, अहिंसेनें प्रश्न सुटूंच नयेत असें ब्रि. सरकारला वाटत असेल तर? तर मग त्यांची इच्छा पुरी केली जाईल. ब्रिटिशांना रक्तच पाहिजे असेल तर तेंहि मिळेल!'

महात्माजींसारखा युगपुरुष शांतीचा अनन्त अमृतकुंभ हातीं घेऊन रक्ताळ जगांत उभा राहिला आहे. शॉ व रवींन्द्रनाथ इंग्लंड व हिंदुस्थान यांना गंभीर इषारा देत आहेत. भारताचें भवितव्य कोणतें असेल बरें? जगाच्या दहा हजार वर्षांच्या इतिहासांत कधीं झाला नव्हता अशा विशाल प्रमाणावर अहिंसेचा प्रयोग आफ्रिकेंत व हिंदुस्थानांत आजवर केला तोच प्रयोग अधिक उत्कटतेनें, शांतपणें व गंभीरपणें त्यांच्या दिव्य नेतृत्वाखालीं करून भारतवर्ष मोक्ष मिळवील का? खरी अहिंसक क्रांति करून दाखवील का?'

भारतभाग्य विधात्याला माहीत!

—वर्ष २, अंक १५.

## मंगल विवाह ४५

अडावदचे चिरंजीव बन्सीलाल काबरे यांचा विवाह नगर जिल्ह्यांत शेवगांव येथें कांहीं दिवसांपूर्वी झाला. हा लग्नसमारंभ खरोखरच मंगल असा झाला. वधूवरें शुद्ध खादीच्या वस्त्रांनीं नटलेलीं होतीं. नटलेलीं म्हणण्याऐवजीं साधेपणानें शोभत होतीं. नवरदेव रोजचाच सदरा व कोट घालून मिरवणुकींत पायीं जात होता. त्याच दिवशीं तेथें एक दुसराहि विवाह होता. त्या समारंभांतील नवरदेव भरजरी पोषाखांत घोड्यावरून छत्रचामरांसह जात होता. एकीकडे तो देखावा तर एकीकडे पायीं जाणारा हा खादीच्या पोषाखांतील ध्येयवादी नवरदेव!

या समारंभांत सर्व रूढींना चाट दिली होती. वधूच्या घरीं नवरदेव मण्डळीबरोबर पायीं आला. नंतर त्यानें अभ्यंगस्नान केलें. त्यानंतर वधू व वर चौरंगावर उभीं राहिलीं. वधूवरांनीं मारवाडी भाषेंत छापलेली सुंदर प्रतिज्ञा म्हटली. ही प्रतिज्ञा फार अर्थपूर्ण होती. वधू म्हणते, "मी केवळ भोग्य वस्तु नाहीं. स्त्री म्हणजे पुरुषाहून कमी अशी भावना हे नाथ तुमची असूं नये. आपण दोघें परस्परांच्या आत्म्यास ओळखूं या. संसार नेटका करून परमार्थ करूं या. स्वातंत्र्य मिळविणाऱ्या राष्ट्रीय सभेचें बळ वाढवूं या." किती तरी सुंदर विचार त्या प्रतिज्ञेंत होते. वधूला वर म्हणतो "तुझे विचार मला मान्य आहेत. ईश्वर मला सामर्थ्य देवो."

या समारंभास माहेश्वरी समाजांतील थोर थोर कार्यकर्ते आले होते. हैद्राबाद स्टेट कांग्रेसचे कार्यकर्ते आले होते. माहेश्वरी समाजाचे अध्यक्ष, चिटणीस वगैरे आले होते. पूर्व खानदेश जिल्हा कॉंग्रेसचे चिटणीस श्री. सितारामभाई बिर्ला, अमळनेरचे सुप्रसिद्ध श्री. लटे वकील, अडावदचे श्री. बंडूशेट काबरे वगैरे खानदेशांतील नवविचाराची कितीतरी मंडळी आली होती. वधूवरांकडील मंडळी सुशिक्षित व राष्ट्रप्रेमी अशी असल्यामुळें अत्यंत आनंदानें सारें कार्य झालें. वधूवरांनीं परस्परांस माळ घातल्यावर सानेगुरुजींचें लहानसें भाषण झालें. ते म्हणाले "श्री. बन्सीलाल यांच्या घराण्याशीं माझा घरोबा आहे. अमळनेरला त्यांचे सारे भाऊ शिकले. त्यांच्या घरीं आम्हीं अनेकदां विद्यार्थि घेऊन गेलेले आहोंत. या घरोब्या-मुळें, त्याप्रमाणेंच हा विवाह सर्व रूढी झुगारून, पडदा दूर करून, खादी परिधान करून होणार, म्हणूनहि मी आलों आहें. हा खरा मंगल विवाह आहे. आपण वधूवरांवर मंगलाष्टकांच्या वेळेस अक्षता वर्षत होतों. अक्ष-तांचा वर्षाव याचा अर्थ काय? अक्षता म्हणजे ज्याला क्षय नाहीं, नाश नाहीं, अशा भावनांची खूण. अक्षतांचा तांदुळ तुटका नको. तो निर्मळ स्वच्छ तांदुळाचा दाणा—म्हणजे निर्मळ सौभाग्य व भाग्य. त्या अक्षतांच्या वर्षावानें वधूवरांवर आपण खऱ्या मांगल्याची वृष्टि करीत होतों. वधूवर अक्षय सुखांत व समृद्धींत राहोत असें सांगत होतों. मांगल्याचा असा वर्षाव होत असतांना सावधान शब्दहि बरोबर होता. मांगल्याची वृष्टि पाहिजे असेल तर विचारपूर्वक आचार झाला पाहिजे. जपून संयमानें वागलें पाहिजे.

बेसावध मनुष्य बुडतो; सावधानी मनुष्याचा सांभाळ होतो. सावधान असणें म्हणजे आसमंतात् पाहणें. वधूवरांवर व अक्षता फेकणाऱ्या आपणांवर यामुळें मोठी जबाबदारी येते. सभोंवती दास्य व उपासमार असेल तर कोठली मंगलाची वृष्टि? देश परतंत्र आहे. देश उपासमारीनें मरत आहे. धंदा नाहीं, ज्ञान नाहीं, सर्वत्र भांडणें. अशा परिस्थितींत मंगलाची प्राप्ति कशी होणार? सभोंवतीं सुखसमाधान असेल तर मला सुखसमाधान मिळेल. सभोंवतीं आग पेटली असेल तर मला तिची आंच लागल्याशिवाय कशी राहील? वधूवरांना खरें सुख मिळावें असें ज्यांना वाटत असेल त्यांनीं देश स्वतंत्र करावा. **स्वातंत्र्याशिवाय सुख नाहीं**. देश स्वतंत्र होईपावेतों कोठले सुखाचे संसार? कोठलें मांगल्य? वधूवरांनीं आपल्या प्रतिज्ञेंतहि त्या गोष्टींचा उल्लेख केला आहे. त्या प्रतिज्ञेची जाणीव, कोट्यवधि भुकेकंगाल, बंधुभगिनींची जाणिव त्यांना आहे. म्हणूनच आज त्यांनीं पवित्र खादी अंगावर घातली आहे. गरिबांची अन्नान्न दशा थांबविणारी खादी, तिच्याहून कोणतें अधिक मंगल वस्त्र? मघां मी बाजारांतून जात होतों. जुन्या रूढींचे भक्त अशी कांहीं मारवाडी मंडळी जात होती. मी पुढें जात होतों. पाठीमागून त्यांचा संवाद कानीं पडत होता. एक जण म्हणाला "ते धर्मशाळेंत उतरले आहेत. चला पाहूं तर खरी ती मंडळी." दुसरा म्हणाला "रस्ता कोठचा?" तिसरा म्हणाला "ते गांधी-टोपडे जात आहेत आपण त्यांच्या मागोमाग जाऊं, 'पवित्र खादीची टोपी डोक्यावर घालणारांना ते चुस्त सनातनी 'गांधी टोपडे' म्हणत होते. माझ्या देशाला **गुलाम करणाऱ्या टोपड्यांची** यांना चीड येत नाहीं. परन्तु देशांत स्वाभिमान, स्वावलंबन, तेज, त्याग, यांची ज्योत पेटविणारी ही खादी, गरिबांची अन्नपूर्णा अशी ही खादी, ती पाहून ते जळफळत होते. दुर्दैव आहे आपल्या देशाचें. परन्तु दुःख करून काय होणार? निराशेंत हा येथला विवाह म्हणजे आशा आहे. अंधारांतलि हा किरण आहे. लग्नाच्या वेळेस, किंवा कोणत्याहि मंगल प्रसंगीं उदकुंभ भरून ठेवतात. डोक्यावर भरलेले घडे घेतात. डोक्यावर खादी टोपी घालणें म्हणजेच मंगल घडे डोक्यावर घेणें. गरिबांच्या जीवनाचे रिकामे घडे, त्यांत खादी जीवनरस ओतते. त्यांचे दुःखी जीवनाचे घडे सुखाच्या

अमृतानें भरते. **खादी म्हणजे गरिबांशीं सहकार.** विवाहाच्या वगैरे प्रसंगीं आम्रवृक्षाचे पल्लव हवेत. आम्रवृक्षाला संस्कृतांत सहकार अशी संज्ञा आहे. जो समाज गरिबांचें स्मरण करीत नाहीं तेथें कोठला सहकार? खादी न वापरणारा गरिबांशीं असहकार करतो. आजच्या या मंगल कार्यांत हा सहकार मला दिसत आहे. त्याचप्रमाणें दुसरी एक महत्त्वाची गोष्ट येथें मला दिसत आहे. येथें पडदा नाहीं. **पावित्र्य पडद्यांत वाढत नाहीं.** आपण परकी गुलामगिरीशीं झगडत आहोंत. त्याबरोबरच घरांतील गुलामगिरीशीं झगडलें पाहिजे. आपणांत अनेक प्रकारची गुलामगिरी आहे. हरिजनांवरची गुलामगिरी, श्रीमंतांची गरिबांवरील गुलामगिरी, पुरुषांची स्त्रियांवरील गुलामगिरी, अनेक प्रकारची गुलामगिरी आहे. स्त्रियांना आत्मा आहे हें आपण विसरून गेलों. एके काळीं स्त्रिया शिकत. त्यांची मुंज होई. त्या वाटेल तेवढें शिकत. जन्मभर ब्रह्मचारी व्रतानेंहि रहात. त्यांना वेदांचा अधिकार होता. परन्तु पुढें बालविवाह आले. पति हाच गुरु. त्यानें शिकवावें. किती पति पत्नीला ज्ञान देतात? पत्नी भाकर देते, किती पति तिला विचाराची भाकर देतात? देशांत काय चाललें आहे, कोणते नवीन विचार, कोणतीं नवीन ध्येयें उत्पन्न होत आहेत, कोणी सांगतो का? पत्नी म्हणजे जणुं पतीची करमणूक. तिनें कां शिकावें तर याला तिच्याजवळ संवाद करतां येईल म्हणून; तिनें कां शिकावें हिशेब ठेवतां येईल, थर्मामीटर लावतां येईल, पत्र लिहितां येईल म्हणून; हा उपयुक्ततावाद ठीक आहे. परन्तु **स्त्रियांनीं कां शिकावें? त्यांना आत्मा आहे म्हणून.** त्यांना हृदय व बुद्धि यांच्या भुका आहेत म्हणून. परन्तु ही दृष्टि कोठें आहे? बार्डोली तालुक्यांत स्त्रिया सभेला नसतील तर सरदार वल्लभभाई बोलत नसत. विचारांची भेट स्त्रियांना घडली पाहिजे. मातेभोंवतीं मुलें-बाळें वाढणार. त्या माता का अज्ञानांत ठेवावयाच्या?

पडदा दूर करणें म्हणजे हीं अज्ञानाचीं बंधनें दूर करणें. जाऊं दे प्रकाश आत्म्याजवळ. ईश्वरानें सुंदर डोळे दिले, त्याच्यावर का पट्टे बांधावयाचे? डोळे असून नीट चालतां येत नाहीं. चालतांना कोण अडचण. आगगाडींतून सृष्टिसौंदर्य पाहातां येत नाहीं. हळूच जरा घुंगट दूर करून त्या बिचाऱ्या पाहतात. अरेरे, आम्ही आमच्या मायबहिणींचे डोळे जणुं

काढले, फोडले. त्यांना अंतर्बाह्य आंधळें केलें. त्यांस ज्ञानापासून दूर ठेवलें. ईश्वराच्या सृष्टीपासून दूर ठेवलें, घरें म्हणजे तुरुंग झाले. जणुं स्त्रियांना खायला दिलें, दोन दागिने दिले, दोन वस्त्रें दिलीं, कीं झालें कर्तव्य ! स्त्रियांच्या आत्म्याचा केवढा हा अपमान !

आजच्या या विवाहांत हें अमांगल्य दूर करून खरें मांगल्य निर्मिलें आहे. प्रतिज्ञेच्या श्लोकांत नारी ही नरापेक्षां कमी नाहीं असें म्हटलें आहे. सावित्रीच्या गाण्यांत 'स्त्रिया यशाची शक्ति, भ्रताराची करिती भक्ति' असें म्हटलें आहे. विवाह मंत्रांत वधुवरांस सुंदर उपमा दिल्या आहेत. वर हा आकाश आहे तर वधू ही पृथ्वी आहे. आकाश दूर असलें तरी क्षितिजाजवळ पृथ्वीला अखंड चिकटलेलें आहे. पति दूर असला तरी तो पत्नीच्या हृदयाकाशांत सदैव आहे, ती पतीच्या हृदयांत आहे. कधीं कधीं आकाशांत ढग येतात; वादळें येतात. आकाश कडाड गर्जना करतें. परन्तु पृथ्वी शान्त रहाते. ती क्षमाशील असते. पृथ्वीला माहीत असतें कीं हे ढग जातील; हीं वादळें थांबतील. आकाशाचा खराखुरा शाश्वत असा अभंग निळा रंग पाठीमागें आहे. कधीं कधीं पृथ्वीहि संतापते. भूकंप होतात. पर्वत आग पाखडूं लागतात. परन्तु आकाश शान्त असतें. पति रागावला तर पत्नी शांत, पत्नी रागावली तर पति शांत. आकाश व पृथ्वी यांच्या उपमांत अनंत अर्थ भरला आहे. वधू-वर जर अशी विशाल दृष्टि घेतील तर संसार सुखाचा होईल. परस्परांनीं परस्परांस सांभाळावें. **संयम शिकून संगीत निर्मावें.** मंत्रांत म्हटलें आहे : वधूवर म्हणजे ऋग्वेद व सामवेद. ऋग्वेदाचे मंत्र संगीतांत बसवले म्हणजे सामवेद होतो. सामवेद म्हणजे साम्य-वेद, समानता निर्मिणारा वेद. संगीतानें हृदयांत शांति, एक प्रकारची समाधि निर्माण होते. असें संगीत वधूवरांनीं सहकार्यानें, एकमेकांच्या सदिच्छा संभाळून निर्माण करावें. फुलांचे हार, सुतांचे हार वधूवरें अर्पण करतात. सूत परस्परांभोंवतीं गुंडाळतात. हें प्रेमाचें सूत्र आहे. पतंग आकाशांत उंच उडतो व आपण त्याची मौज बघतो. **पतीचा पतंग उडविणारा पत्नीचा प्रेमाचा धागा.** पतीच्या त्या पतंगाला कोण उडवतें ? तो बारीकसा डोळ्याला न दिसणारा धागा. तो धागा त्याला जरा खेंचतो, परन्तु वर उडविण्यासाठीं खेंचतो. जगाला डौलानें उंच विहरणारा पतंग

दिसतो. धागा दिसत नाहीं. पतीची प्रतिष्ठा, पतीला मान, पति जगांत वावरतो, त्याला बाजारांत किंमत ! परन्तु समाजांत पतीचा पतंग उंच उडावा म्हणून पत्नी प्रेमाच्या धाग्यानें त्याला बांधते. हा सूक्ष्म परन्तु अभंग प्रेमतंतु जगाला दिसत नाहीं, परंतु हा धागा नसेल तर पतंग उडणार नाहीं. स्वतः दूर नामानिराळी राहून, घरांत राहून, तेथून प्रेमाच्या धाग्यानें पतीचा पतंग ती उंच उडवूं पहाते. पतीनें उंच जावें अशी स्त्रीची इच्छा असते. पुनःपुन्हां त्यानें गोते खावे, खालीं यावें, असें तिला वाटत नाहीं. पतीच्या मोठेपणांत तिचा मोठेपणा. **होम करणें म्हणजे ध्येयार्थ जीवन देणें.** गृहस्थाश्रम म्हणजे असें हें खरेंखुरें महाकाव्य आहे. हें महाकाव्य आहे; हा आश्रम आहे. सद्‌गुण व संयम शिकण्याची ही महान् पाठशाळा आहे. येथें सहकार्य आपण शिकतों. सहनशीलता शिकतों. आणि असा हा संसार वेळ आली तर राष्ट्राच्या महान् संसारांत होमावयाचा. पति, पत्नी, मुलें सर्वांचा महान् कार्यासाठीं होम. हरिश्चंद्र, रोहिदास, पडलीं सारीं बाहेर. श्रियाळ, चांगुणा, चिलया राहिलीं उभीं सत्त्वासाठीं. कुटुंबासाठीं स्वतःचा त्याग, प्रांतासाठीं गांवाचा, देशासाठीं प्रांताचा, जगासाठीं देशाचा व सत्यासाठीं आत्म्यासाठीं सर्व दुनियेचा त्याग, असा हा उत्तरोत्तर वाढता त्याग आहे. पावित्र्य म्हणजे चिरयज्ञ. आपण सर्व विधींत होम करतों. समिधा देतों. आपले देह म्हणजेच या समिधा. त्यांचा ध्येयासाठीं होम करावा लागतो. वधूवरांनीं यासाठीं एकमेकांस धीर देऊन तयार करावयाचें. शेवटीं महान् जीवनासाठीं आपलीं लहान निर्मळ जीवनें आनंदानें अर्पावयाचीं. असो. आजचा हा मंगल विवाह वधूवरांस, आप्तेष्टांस, शेजाऱ्यांस, समाजास सुखावह होवो. मी आशीर्वाद नाहीं देऊं शकत, कारण ती माझी शक्ति नाहीं. परन्तु माझी सदिच्छा आहे, प्रभूला प्रार्थना आहे कीं, वधूवरांस खरें सुख व मांगल्य भरपूर मिळो. ॥ वंदे मातरम् ॥ ”

—वर्ष २, अंक ४८.

## राष्ट्राला कमीपणा नका आणूं ४६

निर्मळपूर मोठें गांव होतें. चांगलें म्हणजे त्यांतल्या त्यांत बरें. ज्या गांवांत प्रामाणिक लोक भरपूर असतील, दिल्या वचनाला जागतील, सत्याची पूजा करतील, तें गांव म्हणजे देवाचें गांव. ज्या गांवांतील लोक स्वच्छता सांभाळतील, सार्वजनिक कामांत अफरातफर करणार नाहींत, पैला शिवणार नाहींत, स्वार्थ दूर ठेवतील, वशिलेबाजी गाडतील, तें गांव म्हणजे देवाचें गांव. ज्या गांवांतलि लोक स्वदेशी ओळखतात, देशाला स्मरतात, देशाला काळिमा आणणारें कोणतेंहि कृत्य करीत नाहींत तें गांव म्हणजे देवाचें गांव. परन्तु अशीं गांवें कितीशीं या हिंदुस्थानांत असतील ? निर्मळपूरहि त्याच मामल्याचें. परन्तु म्हणतात ना दगडापेक्षां वीट मऊ. त्याप्रमाणें इतर गांवांपेक्षां निर्मळपूर जरा बरें इतकेंच.

हिंदुस्थानांत कोणत्या पंचायतीचा कारभार, कोणत्या म्युनिसिपालटीचा कारभार आदर्शभूत आहे ? सारें जीवन जसें मातीमोल झालें आहे. सर्वत्र खाबू लोक. आपल्या या नालायक कारभारामुळें हिंदुस्थानची मान खालीं होते याची या प्रतिनिधींना जाणिवच नसते. स्वार्थापुढें त्यांना देश दिसत नाहीं. वशिल्याच्या लोकांच्या घरपट्ट्या कमी लावतील, स्वतःच्या घरपट्ट्या वेळेवर भरणार नाहींत, पैसे घेऊन कॉंट्रॅक्टें देतील, एक का दोन, सतराशें लफडीं. आमचें निर्मळपूरहि त्याला अपवाद नव्हतें.

परन्तु देशांत जरा राष्ट्रीय जागृति झाली होती. कॉंग्रेसचें वजन जरा वाढलें होतें. ती तुरुंगाचा रस्ता सोडून सरकारच्या खुर्चींवर जाऊन बसली होती. सरकारदरबारीं कांग्रेसचें सनदशीर वजन वाढलेलें पाहून पुष्कळ लोक कांग्रेसला भजूं लागले. जे पूर्वी तिचें नांव काढतांच शिव्या देत, ते तिचे गोडवे गाऊं लागले होते. सत्ता व स्वार्थ याशिवाय जगांत काय आहे ?

ठिकठिकाणीं लोक पंचायतीचा, बोर्डाचा, म्युनिसिपालटीचा, असेंब्लीचा कारभार नीट चालावा म्हणून कॉंग्रेसमार्फत निवडणुकी लढवूं लागले.

फारशी आर्थिक सत्ता हातीं नसली तरी स्वार्थ दूर करूं, वशिलेबाजी नाहींशी करूं, प्रामाणिकपणें कारभार हाकूं, पैशाची अफरातफर होऊं देणार नाहीं असें कॉंग्रेस कार्यकर्त्यांस वाटूं लागलें. उमेदवारांची निवडानिवड होऊं लागली. त्यांनीं प्रतिज्ञापत्रकें लिहून दिलीं. नेहमीं खादी वापरूं, कॉंग्रेस सांगेल तसें वागूं असें लिहून दिलें. निवडणुकीचा प्रचार सुरू झाला. ठायीं ठायीं कॉंग्रेसला बहुमत मिळालें.

निर्मळपूरमध्यें सुद्धां कॉंग्रेसनें म्युनिसिपल निवडणूक लढविली. कॉंग्रेसला बहुमत मिळालें. अभिनंदनाच्या सभा झाल्या. सुताचे हार घालण्यांत आले. त्या निर्मळ सुतानें कॉंग्रेसच्या निर्मळ आत्म्याशीं यशस्वी वीर जोडले गेले. आनंदी आनंद झाला. परन्तु पुढें प्रश्न उभे राहूं लागले. अध्यक्ष कोण, चेअरमन कोण यांच्या भानगडी उपस्थित झाल्या. निर्मळपूरचा कारभार निर्मळपणें व निस्पृहपणें चालवूं व त्याचा लौकिक वाढवूं असें मनांत येण्याऐवजीं खुर्ची कोणाला मिळते याचीच चिंता वाटूं लागली. कार्यकर्त्यांस वाईट वाटूं लागलें. आपण यांच्यासाठीं घसे फोडले, मनांत आशा बाळगल्या परन्तु सारें का फुकट जाणार ? परन्तु कांहीं प्रतिनिधींच्या त्यागानें, सौजन्यानें वेळ सांवरली गेली, तात्पुरते प्रश्न सुटले. पुढें कारभार सुरू झाला.

कॉंग्रेसचा कारभार म्हणून लोक डोळ्यांत तेल घालून बघत होते. कोठें छिद्र सांपडतें, कोठें दोष सांपडतो, हें पाहण्यासाठीं लोक टपले होते. कोणी सांगत. 'तुमच्या प्रतिनिधींच्या अंगावरची खादी आतां कोठें गेली ? अजून खादी अंगावर नाहीं. पांढरी टोपी डोक्यावर नाहीं, खादीचें धोतर कमरेला नाहीं.' ऐकून वाईट वाटे. परन्तु दिल्या शब्दाला जागतील, दिल्या कराराला पाळतील अशी आशा वाटे.

परन्तु पुढें तर आणखीच वाईट गोष्टी कानावर येऊं लागल्या. कॉंग्रेस पक्षाचेच लोक म्यु. टींत नाना प्रकार करूं लागले. निर्मळपुरांतील कॉंग्रेस कार्यकर्ते वातावरण निर्मळ राहण्याची खटपट करीत होते. कोणी म्हणाले, "हे कॉंग्रेसचे नाहींत असें जाहीर करावें. कॉंग्रेसची मान्यता काढून घ्यावी. झेंड्याचा अपमान नको." कोणी म्हणाले "अधीर होऊन चालणार नाहीं. पाहूं, आशा धरूं" परन्तु कुत्र्याचीं शेपटें का सरळ होतील ? कडु कालीं का गोड होतील ? कालपर्यंत ज्यांची एक विशेष वृत्ति होती, ती कां एका दिव-

सांत नाहींशी होईल ? अनेक वर्षांच्या संवई, अनेक वर्षे मनांत खेळविलेले स्वार्थ. ते का कॉंग्रेसच्या झेंड्याखालीं येतांच मरतील ?

निर्मळपुरांत एक तरुण होता. तो फार बोलत नसे. कॉंग्रेसवर त्याचें फार प्रेम. तो तिच्यासाठीं जप करी, तिच्यासाठीं देवाला आळवी. तो म्हणे " मी दुसरें काय करणार ? एवढेंच माझें काम " त्याला या कॉंग्रेसच्या सभासदांच्या गोष्टी ऐकून खिन्नता येई. त्याला असह्य दुःख झालें. काय करावें त्याला कळेना. राष्ट्रीय सप्ताह जवळ आला होता. एप्रिल महिन्याचे ६ ते १३ तारखेपर्यंतचे दिवस. सत्याग्रहाच्या जन्माचे ते दिवस. हिंदु—मुस्लीम ऐक्याचे ते दिवस. मरणाला मारणारे ते दिवस ! ते १९१९ सालचे पुण्य-दिवस ! ते आले होते. राष्ट्रांत सर्वत्र उत्साह होता. कोणी खादी विकीत होते, कां. सभासद नोंदीत होते, हरिजन-वाडे झाडीत होते, हिंदु—मुस्लीम ऐक्याच्या मिरवणुकी काढीत होते. परन्तु त्या तरुणानें काय केलें ?

त्यानें उपवास सुरू केला. निर्मळपूरच्या कॉं. सभासदांत प्रामाणिकपणा यावा, राष्ट्राला शोभेसें वर्तन त्यांनीं करावें, कॉंग्रेसला कमीपणा त्यांनीं आणूं नये. यासाठीं त्यानें उपवास सुरू केला. तो कोणाजवळ बोलला नाहीं. तो मनांत म्हणाला,

'देवा सांगूं सुखदुःख'

परन्तु ४।५ दिवस उपवासाचे झाले. तो तरुण आतां अंथरुणावरच पडून राही. त्याचे मित्र म्हणत 'काय रे, काय होतें ?' तो म्हणे 'बरें नाहीं. पडून राहतों.' एका मुलाजवळ त्यानें सर्व सांगितलें होतें. तो येई व त्याची सेवा करी. परन्तु हळुहळू वार्ता गांवांत पसरूं लागली. त्या तरुणानें मौन स्वीकारलें. तो रामनाम म्हणे. पाणी घेई. दुसरें कांहीं घेत नसे.

अन्नाशिवाय मनुष्य किती दिवस राहणार ? अन्नमय प्राण. तो तरुण खंगला. हाडें दिसूं लागलीं. हात इकडचा तिकडे करणें जड जाई. पुढें पुढें तर डोळ्यांच्या पापण्या उघडणेंहि कष्टाचें होई. डोळे मिटून तो पडे. नाडी बंद झाली. हृदयाचे ठोके मंद झाले. तोंडावर मंद हास्य होतें. कोणी कांहीं विचारलें तर जरा हंसे. परन्तु शेवटीं अखेरचा दिवस आला. पहांटेची वेळ होती, त्या तरुणाच्या लहानग्या मित्रानें प्रार्थना म्हटली.

तरुणानें ऐकली. त्याच्या हृदयाशीं भारतमातेचें चित्र होतें. तिरंगी झेंड्याचें चित्र होतें. वंदे मातरम् म्हणून तरुणानें श्वास सोडला.

गांवांत वार्ता गेली. त्या लहान मुलानें तरुणाच्या उशाखालचा एक कागद खिशांत घातला. हजारों लोक जमले होते. मोठी प्रेतयात्रा निघाली. म्यु. टीचे सारे कां. सभासदहि होते. तेहि मधून मधून खांदा देत होते. मिरवणूक स्मशानभूमीवर आली. कांहींचीं भाषणें झालीं. इतक्यांत तो लहान मुलगा उभा राहिला. १४–१५ वर्षांचा तो होता. तो म्हणाला, 'याचें मृत्युपत्र मला वाचून दाखवावयाचें आहे. तें ऐका.'

सारे स्तब्ध राहिले. 'कित्येक दिवस मी दुःखी होतों. आपल्या येथें कां. तर्फें निवडणूक लढविली गेली. यश आलें परन्तु तें निर्मळ यश योग्य कारभारानें अधिक उज्वल केलें पाहिजे होतें. परन्तु उलट स्थिति होऊं लागली. मला वाटे काय करावें? कोणतीहि संस्था तिच्यांतील लोकांत जर प्रामाणिकपणा, चारित्र्य, त्याग, निर्लोभता, शिस्त, निरहंकारता नसतील, तर ती मरेल. राष्ट्रीय सप्ताह आला तेव्हां मी मनांत म्हटलें, 'देवा तुला माझा नवस. माझा देह तुला देतों, परन्तु निर्मळपूरचे म्यु. कां. सभासद निर्मळ राख.'

तो मुलगा दूर गेला. कॉं. म्यु. सभासद तेथें होते. त्यांच्याकडे लोक पाहूं लागले. शेवटीं ते सारे सभासद उभे राहिले व म्हणाले, 'आम्ही चुकलों अतःपर आम्ही कॉंग्रेसचें तोंड मलीन करणार नाहीं. स्वार्थ वा क्षुद्र विचार मनांत येतांच हें मुकें बलिदान आमच्या डोळ्यांसमोर उभें राहील. त्यांना अधिक बोलवेना. चिता पेटली. तो पुण्य-देह भस्मीभूत झाला. निर्मळपुरांतील मानसिक घडणीचेंहि भस्म झालें. त्या तरुणानें आपलें जीवन देवास दिलें. देवानें तें शतपटीनें वाढवून निर्मळपूरला दिलें!

—वर्ष २, अंक १.

# आगामी प्रकाशनें

## वि. स. खांडेकर

१ अश्रु
२ बुद्ध आणि हिटलर
३ चल ये राणी
४ विसावें शतक
५ तिसरी भूक
६ वर्षाकाल
७ छाया भाग १-२
८ वालुका
९ सुवर्णकण
१० चार भिंती
११ मंजिऱ्या
१२ मराठीचा नाट्यसंसार
१३ वा. म. जोशी ( व्यक्ति आणि वाङ्मय )

## ग. त्र्यं. माडखोलकर

१ तीन दिवस
२ ऋणभार
३ माझे आवडते कवी
४ चक्रवर्ति उदयन
५ उर्वशी
६ उमरखय्याम
७ विलापिका

## द. र. कवठेकर

१ आपुलकीची झळ
२ ढगाआड
३ आग आणि पाणी
४ आभाळाची सांवली

## ना. धों. ताम्हनकर

१ गुजाताई
२ शेजारी

## प्र. के. अत्रे

१ 'मी' कसा झालों
२ शब्दचित्रें

## कृष्णाबाई मोटे

१ कलाक्षेत्रांत
२ मवाली
३ अनामिकेची पूजा

## काकासाहेब कालेलकर

१ स्मरण—यात्रा

## अनंत काणेकर

१ उघड्या खिडक्या
२ काळे आणि पांढरे

## चिं. वि. जोशी

१ गुंड्याभाऊ
२ दरबार कथा
३ नटश्रेष्ठ
४ लंकावैभव

## दत्तु बांदेकर

१ हिरवी माडी
२ कबुली जबाब

## कुसुमावतीबाई देशपांडे

१ मोळी

## शकुंतला परांजपे

१ चांदणी

## ना. ह. आपटे

१ साजणी

१ ? आचार्य भागवत

१ ? क्षमाबाई राव

## साने गुरुजी

१ गोड निबंध भाग २-३

REFBK-0005700